म. ग्रं. सं. ठाणे
विषय जिवध
सं. क्र. ९५९

REFBK-0003287

म. ग्र. स. ठाण
विषय निबंध
सं. नं. १५२

# ळकांचें पुण्यस्मरण



**न. चिं. केळकर**

ग्रा. क्र. ३२८६

# लो॰ टिळकांचें पुण्यस्मरण

ग्रंथकार

**नरसिंह चिंतामण केळकर**

संग्राहक

**काशिनाथ नरसिंह केळकर**

बी. ए. (टिळक विद्यापीठ).

REFBK-0003287

१ ऑगस्ट १९२७

किंमत एक रुपया

प्रकाशक

काशीनाथ नरसिंह केळकर, बी. ए., (टिळक विद्यापीठ)

हायकोर्ट वकील

५५४ सदाशिव पेठ, पुणें.

---

मुद्रक

अनंत सखाराम गोखले

'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

[ या ग्रंथासंबंधीं सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन आहेत ].

# प्रस्तावना

लोकमान्य टिळकांच्या चरित्राचा प्रथमखंड मीं चार वर्षांपूर्वी लिहून प्रसिद्ध केला. दुसरा खंडहि लिहून प्रसिद्ध करून हें काम यापूर्वीच हातावेगळें करणें अगत्याचें होतें. जवळची मित्रमंडळी व पहिल्या खंडाचे कांहीं वाचक यांनीं चरित्रग्रंथ पुरा करण्याविषयीं माझ्यामागें तेव्हांपासून तगादाहि लावला होता, व प्रतिवर्षी मी त्यांना तें काम पुरें करण्याचें आश्वासनहि देत आलों आहें! पण अनेक कारणांमुळें हें आश्वासन पार पाडण्याचें माझे हातून घडलें नाहीं, याबद्दल मनापासून वाईट वाटतें. कारण या कामाला जितकी सर्वांगीण स्वस्थता पाहिजे तितकी मला मिळाली नाहीं. पण स्वस्थतेकरितांच वाट पहात बसलों तर ती कधींहि मिळणार नाहीं! म्हणून गेल्या महिन्यापासून दुसरा खंड लिहिण्याचें काम मीं हातीं घेतलें आहे. आणि ता. १ ऑगस्ट १९२८ रोजीं टिळकचरित्राचा उरलेला भाग प्रसिद्ध करून वाचकांचे हातीं देण्याचा निर्धार केला आहे. तथापि लोकमान्यांच्या यंदांच्या श्राद्धतिथीला त्यांच्याविषयींचा एकादा ग्रंथ प्रसिद्ध करितां येत नाहीं, ती तिथी सुनी जाते, हेंहि मनाला पटेना. श्री० सदाशिवराव बापट यांच्या मनांत लोकमान्यांच्या आठवणींचा तिसरा खंड काढावयाचा असून त्याची कांहीं सामग्रीहि त्यांनीं जुळविली आहे. पण अनेक कारणांमुळें त्यांना तो ग्रंथ या तिथीला प्रसिद्ध करितां आला नाहीं. केसरी कचेरीच्या विद्यमानें टिळकांच्या राजकीय लेखांचे तीन खंड प्रसिद्ध झाल्यावर चौथा खंड सामाजिक व धार्मिक लेखांचा प्रसिद्ध करण्याचा विचार होता. परंतु आमचे सहकारी मित्र रा० गणपतराव केतकर यांना त्यांच्याहि अनेक उद्योगांमुळें यंदां तो संकल्प तडीस नेतां आला नाहीं. म्हणून प्रस्तुतचें हें लहानसें पुस्तक तिथिपालनाकरितां प्रसिद्ध केलें आहे. गेल्या १९ वर्षांत निरनिराळ्या वेळीं लोकमान्य टिळकांच्या संबंधानें केसरींत मीं जे लेख लिहिले, व निरनिराळ्या प्रसंगीं त्यांच्यासंबंधीं जीं भाषणें केलीं, तीं सर्व एकत्र करून या पुस्तकांत दिलीं आहेत, अर्थात् त्यांत कांहीं भाग चरित्रवर्णनपर, कांहीं गुणविवेचनपर, व कांहीं केवळ चरित्रसाधनपर असा आहे. प्रसंग व विषय वेगवेगळे असल्यामुळें प्रत्येक प्रकरणाला तुटक स्वरूप आहे. तथापि ज्या हेतूनें टिळकांविषयीं आदर व भक्ति बाळगणारे लोक त्यांच्या तिथिपालनाचे समारंभ करितात, त्या हेतूनें, त्या समारंभांतलेंच एक कार्य, म्हणजे टिळकांच्या चरित्राचिंतनाचें कार्य, आपण करीत आहों असें हें पुस्तक वाचतांना वाचकांस वाटण्याचा संभव आहे.

पुणें,<br>
ता. २२ जुलै १९२७

न. चिं. केळकर

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | लो० टिळकांच्या यशाचें मर्म ... ... ... | १ |
| २ | ऐक्यप्रिय टिळक ... ... ... ... | ८ |
| ३ | टिळक व इंग्रजी शिक्षण-पद्धति ... ... ... | १२ |
| ४ | लो० टिळकांच्या चरित्रासंबंधीं ( विद्यार्थ्यांस उपदेशपर व्याख्यान ) | १६ |
| ५ | केसरीवरील खटल्यासंबंधीं विलायतेंतील लोकमत ... ... | २१ |
| ६ | टिळक सुटले ! ... ... ... ... | २८ |
| ७ | प्रयत्नांतीं परमेश्वर ... ... ... ... | ३३ |
| ८ | पुणें कोर्ट ऑफ वॉर्ड्सचा कारभार ... ... ... | ३९ |
| ९ | टिळकांचा एकसष्टावा जन्मदिवस ... ... ... | ४४ |
| १० | टिळकांची विलायतची सफर ... ... ... | ५२ |
| ११ | लो० टिळकांचा मृत्यु ... ... ... ... | ५६ |
| १२ | कै० लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ( मृत्युलेख ) ... ... | ६४ |
| १३ | लो० टिळकांच्या अस्थींचा नगरप्रवेशसमारंभ ... ... | ८५ |
| १४ | लो० टिळकांचें स्मारक ... ... ... ... | ८८ |
| १५ | अधिकाऱ्यांचा टिळकद्वेष ... ... ... ... | ९७ |
| १६ | टिळक व स्वराज्य ( व्याख्यान ) ... ... ... | ९९ |
| १७ | लो० टिळकांच्या धोरणाची मीमांसा( व्याख्यान )... ... | १०१ |
| १८ | टिळकांच्या जन्मस्थानाचें स्मारक ... ... ... | १०६ |
| १९ | लोकमान्यांची पुण्यतिथि ... ... ... ... | १०८ |
| २० | लो० टिळकांचें पुण्यस्मरण ... ... ... ... | ११० |
| २१ | लो० टिळकांचा पुतळा ( अनावरणसमारंभ ) ... ... | ११४ |
| २२ | टिळक-चरित्राच्या टीकाकारांस उत्तर ... ... ... | ११७ |
| २३ | लोकमान्य-स्मारकमंदिर-समारंभ ... | १५१ |

# लो० टिळकांचें पुण्यस्मरण

## केळकरांचे लेख

# लो० टिळकांचें पुण्यस्मरण

## लो० टिळकांच्या यशाचें मर्म

रत्नाकर, ऑगस्ट १९२०

लो० टिळकांइतका 'यशस्वी' पुरुष महाराष्ट्रांत गेल्या शें-पन्नास वर्षांत झाला नाहीं याविषयीं बहुधा एकमत आहे. पण त्या यशाचें मर्म काय ? असा प्रश्न निघाला असतां त्याचीं उत्तरें मात्र निरनिराळीं येण्याचा संभव आहे. याचें कारण यश या शब्दाचा सर्वांचा अर्थ एकच असत नाहीं. यश याचा अर्थ कोशकार कीर्ति असा देतो. पण मनुष्याची कीर्ति ज्यावरून होते तेंही यशच असतें. कार्यदर्शक शब्द कारणालाहि लक्षणेनें लागतो. यश या शब्दाचा हा दुसरा अर्थ अपूर्व कार्यसिद्धि असा आहे. टिळकांचें कार्य अपूर्व व त्याची सिद्धिहि अपूर्व !

कीर्ति या अर्थानें यश हा शब्द मनांत आणून टिळकांच्या यशाचें मर्म काय या प्रश्नाचें जें उत्तर मिळतें तें, कार्यसिद्धि हा अर्थ घेऊन येणाऱ्या उत्तराहून वेगळें आहे. टिळकांचें यश म्हणजे कीर्ति सर्व हिंदुस्थानभरच काय, पण इतर कांहीं देशांतहि पसरली होती. हिंदुस्थानांतल्या रानाजंगलांतल्याहि मनुष्यांनीं टिळकांचें नांव कर्णोपकर्णीं ऐकलें होतें. आणि टिळक म्हटले म्हणजे कोणी तरी एक 'फार मोठा माणूस' इतकेंच ज्ञान त्यांना असे. देव, भूत, राक्षस यांचें वस्तुरूप कोणींच पाहिलेलें नाहीं. हे तीनहि आहेत किंवा असावेत अशी कबुली मन आंतून देतें; पण या तिघांचेंहि स्वरूप कोणीं पाहिलेलें नसतें. त्यांची कल्पना मन करावयासच बसलें तरी प्रत्येकाची वेगवेगळी होईल. किंबहुना, त्याच एकाच माणसानें निरनिराळ्या वेळीं कल्पना चालविली तरी हीं कल्पनारूपें वेगवेगळीं असूं शकतील. पण भक्तिभावना हें जसें ईश्वराचें अस्तित्व मानण्याला सबळ कारण, तशींच भूतें व राक्षस यांचें अस्तित्व मानण्याचें खरें कारण भीति हें असतें.

कीर्तिमान् टिळकांची हजारों लोकांची कल्पना त्यांच्या भौतिक स्वरूपाच्या कल्पनेइतकीच वस्तुस्थितीला सोडून असण्याचा संभव होता. ज्यांनीं टिळक कधीं पाहिले नव्हते अशांनीं त्यांच्या स्वरूपाविषयीं चालविलेल्या कल्पना ऐकण्याचा प्रसंग मला अनेक वेळां आला. त्यांनीं मुद्दाम होऊन टिळकांचें वर्णन केलें नाहीं, पण त्यांच्या बोलण्याच्या ओघावरून तें वर्णन न कळत बाहेर पडत असे. सामान्य लोकांची कल्पना अशी कीं, टिळक हे कमींत कमी सहा सात फूट उंच, भले लठ्ठ, कदाचित् गुलमिशावाले, हातांत एखादें भलें मोठें दांडकें वापरणारे, असे पुरुष

असावे. पण हें वर्णन वस्तुस्थितीला अगदीं सोडून होतें. दुसऱ्या कित्येकांची कल्पना अशी कीं, टिळकांना एखादा साहेब दिसला न दिसला पुरे, ते त्याच्या अंगावर खेंकसत असतील, त्याला तोंडावर शिव्याशाप देत असतील, त्याचे आई-बाप उद्धरीत असतील, किंवा हातांतलें सोडगेंहि त्याच्या अंगावर उगारीत असतील. ही कल्पनाहि वरच्या इतकीच वस्तुस्थितीला सोडून होती हें सांगणें नकोच. टिळक हे कोणी मोठे विरागी म्हणजे साधुसंतासारखा पोषाख केलेले, किंवा अंगाला भस्म फांसलेले, किंवा कपाळाला लाल शेंदराचें बोट लावलेले, अशी जी कित्येकांची कल्पना तिचीहि गत वरीलप्रमाणेंच. आणि टिळक हे देवासारखे होते, ते नवसाला पावत, किंवा मनांतलें ओळखीत, किंवा भविष्य सांगत, किंवा रोग बरे करीत अशाहि ज्या कल्पना—अर्थात् फार थोड्या लोकांचे ठिकाणीं—दिसून येत होत्या त्याहि खोट्या होत्या हें सांगावयास नको.

पण पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, देव-भूत राक्षस यांची भौतिक कल्पना प्रत्येकाची वेगवेगळी असली तरी भक्ति व भीति या भावना जशा सर्वसामान्य व सत्य-स्वरूप असतात, तशींच कीर्तीनें टिळकांना ओळखणाऱ्या दूरदूरच्या लोकांच्या मनांत त्यांजविषयीं एक भावना सर्वसामान्य होती. ती अशी कीं, टिळक हे मोठे देशभक्त असून देशाच्या शत्रूपासून त्याला सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. अर्थात् टिळक हे आपले मित्र, उपकारकर्ते व आपल्या शत्रूंचे शत्रु. अशा लोकांना देश किंवा त्याची सुटका या शब्दांच्या व्याख्या बरोबर करितां आल्या नसत्या; पण देशाची व त्याच्या सुटकेची कल्पना प्रत्येकाची वेगळी असली तरी, या सर्व कल्पना ज्यांत बसूं शकतील असा कांहीं गुण टिळकांमध्यें होता म्हणूनच त्यांच्या मोठे-पणाची कीर्ति पसरली व मान्य झाली.

अशा कीर्तीचें निर्णायक कारण असामान्यत्व. कीर्ति ही समुद्राच्या लाटां-सारखी आहे. एक लाट उठली म्हणजे ती दुसऱ्या लाटेला उठविते, दुसरी तिसरी-ला, असा क्रम पुढें सुरू होतो. पण पहिली लाट उठण्यालाहि कांहीं तरी सबळ क्षोभ-कारण लागतेंच. टिळकांच्या कीर्तीची लाट प्रथम महाराष्ट्रांत उठली व मग ती हलुहळू इतर प्रांतांत पसरली हें खरें; पण मूळ महाराष्ट्रांत तरी ही लाट उठण्याला कारण काय झालें ? टिळकांवरील खटले व त्यांना झालेली शिक्षा हें त्यांच्या अखिल भारतीय कीर्तीचें खरें कारण आहे असें कित्येक टीकाकार म्हणतात. ठीक आहे. खटले होणें, शिक्षा सोसणें, आणि या दोहों प्रसंगीं निर्भय धीरोदात्त अशी वृत्ति ठेवणें यामुळें होणारी कीर्ति क्रमाक्रमानें वाढणारी असून सर्व हिंदु-स्थानाला एकदम पटणारी अशा प्रकारची आहे ही गोष्ट मान्य करण्यास हरकत नाहीं. परंतु यांत देखील वर दर्शविलेलें टिळकांचें कांहींतरी असामान्यत्व हेंच कारण मानलें पाहिजे. राजकीय गुन्ह्यांकरितां टिळकांहून अधिक शिक्षा झालेले किंवा तुरुंगांत अधिक दिवस काढलेले लोक आहेत; पण त्यांच्या खटल्यांच्या व

शिक्षांच्या 'बातमी'नें त्यांची 'कीर्ति' सर्व हिंदुस्थानभर पसरली नाहीं किंवा टिकूनहि राहिली नाहीं. अर्थात् हें असामान्यत्व कोणतें ? याचा विचार करितां यश या शब्दाचा जो दुसरा म्हणजे कार्यसिद्धि हा अर्थ, त्याकडे वळावें लागतें. टिळकांची कार्यसिद्धि कांहीं विशेष होती म्हणूनच त्यांची कीर्ति कांहीं विशेष झाली. मग ही कार्यसिद्धि कोणची ? तर **सरकारशीं राजकारणाचें भांडण सतत भांडत राहून त्या भांडणांत जास्तींत जास्त लोक सामील करून घेऊन त्याची दहशत सरकारास बसविणें, हें होय.** आणि ही कार्यसिद्धि कां झाली तर टिळकांच्या आंगचे **लोकोत्तर गुण या एका कार्यावर खर्च झाले** म्हणून.

कार्यसिद्धि या शब्दामध्यें क्रियापूर्णत्वाचा ध्वनि असला तरी, टिळकांनीं देखील केलेलें कार्य शेंकडा शंभर इतकें पूर्णत्वाला गेलें होतें असें कोणचि म्हणत नाहीं. किंबहुना १९२१ सालीं असा एक क्षण खचित आला होता कीं, राजकारणाची चळवळ टिळकांच्या चळवळीपेक्षांहि अधिक तीव्रतेला पोंचली होती. टिळकांच्या चळवळीपेक्षां त्या चळवळींत त्या वेळीं अधिक लोक सामील होते, आणि टिळकांच्या कोणच्याहि चळवळीपेक्षां त्यावेळच्या चळवळीची सरकारला क्षणभर अधिक दहशत वाटली. पण या गोष्टी झाल्या, तरी क्षणभर झाल्या ! त्या तशा टिकल्या नाहींत. त्यांमध्यें सातत्य राहिलें नाहीं. उलट टिळकांविषयीं सरकारची जी शत्रुत्वाची भावना १८९५-९६ सालीं होती तीच १९२० सालापर्यंत एकसारखी टिकली. चिरोलसाहेबानें टिळकांचें 'Father of Indian unrest' हें जें वर्णन केलें आहे तें त्यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभाला जसें लागतें तसें, 'सरकारचे शत्रु' हें जें त्यांचें वर्णन सरकारनें केलें तें त्यांच्या कारकीर्दीच्या जवळ जवळ अखेरच्या काळांत उद्भवलेलें होतें. म्हणजे अशा रीतीनें टिळकांच्या कारकीर्दीचे आद्यंत हे सुसंवादी स्वर असून या कारकीर्दीच्या मध्यभागीं झालेले त्यांच्यावरील खटले हे अनुवादी-स्वरानें टिळकांचें धोरण एकाच प्रकारचें राहिलें असें सांगतात. ग्रंथपरीक्षा जशी उपक्रमोपसंहार व मध्यवर्ती सिद्धान्त यांच्या साहाय्यानें करितात, त्याच रीतीनें टिळकांच्या चरित्राचें परीक्षणहि या तीन प्रकारच्या कसोट्यांनीं करावें लागतें. सरकाराशीं झुंज ठेवणें, केव्हांही त्या झुंजेंत जास्तींत ज्यास्त लोक सामील करणें, व सरकारास दहशत वाटेल अशा रीतीनें झुंज लढवणें, या तिहींनाहि अवश्य लागणारी अशी एक गोष्ट म्हणजे धोरणाचा सुसंगतपणा व उद्योगसातत्य हें होय. सतत सुसंगतपणें अधिकांत अधिक लोक मिळवून सरकाराला दहशत पडण्यासारखी राजकीय झुंज करणें हेंच टिळकांच्या यशांतील खरें मर्म होय, असें विचारांतीं कोणासहि समजून येईल. लो० टिळकांची कीर्ति क्रमानें वाढतच गेली केव्हांहि कमी झाली नाहीं. पण त्याचें कारणहि हें कीं, वरील अर्थाची कार्यसिद्धिहि यथाप्रमाण वाढत गेली आणि या कार्यसिद्धीला टिळकांच्या अंगचे सर्व गुण एकाग्रतेनें खर्ची पडले.

वरील कसोटी लावून पाहिली असतां टिळक हे त्यांच्या आधींच्या समकालीन व नंतरच्या त्यांच्या बरोबरीच्या लोकांहून वेगळे पण अधिक यशस्वी कसे ठरले तें कळून येईल. आपण निरनिराळीं उदाहरणें घेऊं म्हणजे कळेल. महाराष्ट्र घेतला तर कृष्णशास्त्री चिपळूणकर बुद्धिवान् व विद्वान्, पण त्यांना राजकारणाची दृष्टिच नव्हती. विष्णुशास्त्री चिपळूणकरांना राजकारणाची दृष्टि भरपूर होती. टिळकांनीं त्यांचीच दृष्टि व स्फूर्ति घेतली. पण शास्त्रीबोवांमध्यें टिळकांच्याइतकी उद्योगशीलता, बहुजनसमाजांत मिळूनमिसळून वागण्याची आवड आणि राज्यकारभाराचे किरकोळ वाद हे चळवळीच्या चरांत इंधनासारखे घालून स्वयंपाकासारखें प्रत्यक्ष कार्य करून देणारी आग पेटत ठेवणें ही कला नव्हती. ते अवघ्या बत्तिसाव्या वर्षीच वारले हें खरें. तथापि त्यांची समक्ष माहिती असलेले लोक सांगतात त्यावरून टिळकांसारखा चालू राजकारणाचा राडा उरकण्याला लागणारा स्वभाव शास्त्रीबोवांच्या ठिकाणीं नव्हता. प्रो० जिनसीवाले हे विद्वान् व बहुश्रुत, पण ते अगदींच एककल्ली. हातून कधीं एक अक्षरही हुकमी लिहून व्हावयाचें नाहीं; आणि कोणी एक विषय पुढें आणला तर दुसराच कांहींतरी काढून मुळावर कांहींच उरूं न देण्याची त्यांची वादपद्धति असे. राजकारणांत विधायक सूचना करून, कानामात्रांइतकें सूक्ष्म पाहून प्रतिपक्षाशीं धांवतें युद्ध करण्याची कला जिनसीवाले यांना मुळींच अवगत नव्हती. डॉ० अण्णासाहेब पटवर्धन यांची बुद्धि अत्यंत कुशाग्र. पण ते चालू राजकारणांत मुळीं पडलेच नाहींत, व पडते तरी त्यांची दिनचर्या व स्वभाव यांच्यामुळें त्यांच्या हातून चालचलाऊ काम चारदोन दिवसदेखील झालें नसतें. कोणास कधीं न सुचतील असेहि मुद्दे एकादवेळीं ते काढीत. पण पुष्कळ वेळां कोणी कधींहि मानणार नाहींत असेच ते असत. डॉ० नानासाहेब देशमुख यांची बुद्धिमत्ता जबर आणि त्यांचें अंतःकरण राष्ट्रीयत्वानें पूर्ण भरलेलें; परंतु राजकारणांतील प्रत्यक्ष व पुढारी-पण टिळकांवर सोंपवून, आपला आशीर्वाद आणि सल्लामसलतीची व इतर हरएक प्रकारची मदत त्यांना देऊन, नानासाहेबांनीं चालू राजकारणापासून स्वतःस मोकळें ठेवलें होतें.

आतां दुसऱ्या पक्षांतील महाराष्ट्रीय पुढारी घेऊं. रा० ब० गोपाळराव हरि देशमुख हे बहुश्रुत व लेखनव्यासंगी. परंतु त्यांचा बहुतेक जन्म सरकारी नोकरींत गेला. उरलेल्या वेळांत देखील त्यांनीं जें लिहिलें सवरलें त्याचा रोख आधुनिक शास्त्रें, कला, भौतिक सुधारणा वगैरेविषयीं आपल्या समाजांत अभिरुचि उत्पन्न करणें व जुन्या धार्मिक, सामाजिक कल्पनांचें मनावरील बंधन कमी करणें यांतच गेला. हें काम त्यांच्या परीनें चांगलेंच होतें. पण राजकारणांत इंग्रजांची सत्ता व शहाणपण यांनीं त्यांची दृष्टि दिपून व बुद्धि थिजून गेल्यासारखी झाली होती. यामुळें राजकारणांतील झगडा करण्यास ते फारसे पात्र नव्हते. रावबहादुर रानडे यांची बुद्धि टिळकांच्या बुद्धीइतकी किंवा तिजहूनहि अधिक विशाल होती. आणि

त्यांची व्यापक कामगिरी, एकंदर समाजाला उद्योगशील बनविण्याविषयींची आतुरता विषयाभ्यासाची आस्था, तात्त्विक विचारांचा खोलपणा, सार्वजनिक पुढाऱ्याला लागणारी मनःसमता यांविषयीं लो० टिळक हे स्वतः इतके आदरयुक्त उद्गार काढीत कीं, त्यांच्या मतें अखिल हिंदी पुढाऱ्यांत श्रेष्ठपणाचा मान एकट्या रानड्यांना मिळतो. परंतु रानडे यांचेंहि सर्व आयुष्य नोकरपेशांत गेलें आणि राष्ट्रीयत्वाची प्रखर भावना जनतेंत उत्पन्न करण्याला जो तापटपणा अवश्य असतो तो त्यांचे अंगीं मुळींच नव्हता. रानड्यांना 'फादर ऑफ पॉलिटिक्स् इन् महाराष्ट्र' हें नांव यथार्थतेनें देतां येईल. पण हें वर्णन, आणि चिरोलसाहेबांनीं केलेलें टिळकांचें वर्णन, हीं जोडून पाहिलीं—अर्थात् राजकारण व असंतोष या दोन शब्दांतील सूक्ष्म व गहन फरक लक्षांत घेतला—म्हणजे रानडे व टिळक यांच्यांतील फरक कोणाच्याहि तेव्हांच लक्षांत येईल. आणि रा० ब० रानडे यांचीहि कीर्ति जरी सर्व हिंदुस्थानभर पसरलेली आहे तरी त्यांच्यापेक्षां टिळकांची कीर्ति समाजाच्या वरिष्ठ वर्गाप्रमाणें मध्यम व कनिष्ठ वर्गांतहि कां अधिक पसरली होती हें समजेल. अधिकांत अधिक जनता आपल्याबरोबर सामील करून घेण्याची कला रानड्यांपेक्षां टिळकांना अधिक हस्तगत झाली होती यांत शंका नाहीं. कै० गोखले व टिळक हे दोघे तर पुढारी या नात्यानें एकाच काळीं समाजांत वावरत होते. त्या दोघांचें चरित्र आजच्या पिढीच्या डोळ्यांपुढें ढळढळीत असल्यामुळें दोघांतील फरक काय व गोखल्यांपेक्षां टिळकांचें कीर्तिरूप यश देशांत अधिक कां पसरलें हें स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं.

मुंबईच्या पुढाऱ्यांपैकीं कीर्तिमत्तेच्या दृष्टीनें टिळकांशीं फक्त फिरोजशहा मेथा यांचीच तुलना करतां येईल. मेथा हे रानड्यांपेक्षां अधिक तापट व राजकारणाची झुंज कसून खेळणारे होते. पण त्यांचें वास्तव्याचें ठिकाण, भाषा, राहणी, स्वभाव, सर्वच गोष्टी, त्यांचें राजकारण व सामान्य जनता यांचा संबंध जुळण्याला प्रतिकूल होत्या. इतर प्रांतांतील पुढाऱ्यांपैकीं लाला लजपतराय हे टिळकांच्या बरेचसे जवळ येतात; पण पंजाबाची स्थितिच अशी आहे कीं, तेथें लजपतरायांसारख्या पुढाऱ्यासहि हवा तेवढा अनुयायीवर्ग संघटित असा मिळूंच नये. त्यांतल्या त्यांत लजपतराय यांच्या सेवेचा कल राजकारणापेक्षांहि धार्मिक, सामाजिक बाबींकडे अधिक असे, व राजकारणांत आपणासहि दोन गोष्टी अधिक सांगण्यासारखे टिळक होते असें स्वतः लजपतरायच म्हणत. पं० मदन मोहन मालवीय हे उद्योगशीलतेंत कदाचित् टिळकांनाहि मागें सारण्यासारखे आणि हिंदुसमाजापुरतें पाहिलें तर निदान उत्तर-हिंदुस्थानांत टिळकांची जी कीर्ति तिच्याहून पंडित मालवीय यांची कीर्ति अधिक प्रसृत आहे यांत शंका नाहीं. पण दीर्घसूत्रीपणा, अनिश्चितता वगैरे व्यक्तिगत अवगुण पंडितजींमध्यें असून, शिवाय त्यांचें मन जात्या मृदु असल्याकारणानें राजकारणांत टिळकांइतकी तीव्रता ते आणूं शकले नाहींत. अगदीं अलीकडल्या काळापर्यंत त्यांची वृत्तिहि बरीचशी नेमस्तपणाकडे असे. बंगालचे पुढारी सुरेंद्रनाथ

बानर्जी यांनीं टिळकांप्रमाणेंच आपल्या प्रांतांत अनभिषिक्त राजसत्तेचा उपभोग घेतला; परंतु निःस्वार्थीपणांत त्यांच्या प्रांतांतलेहि लोक सुरेंद्रबाबूंना टिळकांइतका मान देत नसत. आणि उपयुक्ततेहून अधिक वयोमान त्यांना मिळाल्यामुळें सुरेंद्र-बाबूंची कीर्ति त्यांच्या हयातींतच उतारास लागलेली पाहण्याचा त्यांना प्रसंग आला. टिळकांच्याइतकी सर्व हिंदुस्थानभर कीर्ति झालेला एकहि पुढारी मद्रास इलाख्यांत झाला नाहीं. पूर्वीं जी. सुब्रह्मण्य अय्यर व अलीकडे न्या० मू० सुब्रह्मण्यं अय्यर यांना लोकप्रियता पुष्कळच लाभली; पण ती बरीचशी प्रांतिक होती. बिहारप्रांत, मध्यप्रांत यांजमध्यें टिळकांशीं तुलना करण्यासारखा कीर्तिमान पुढारी झालाच नाहीं.

गुजराथेंत म० गांधींच्या पूर्वीं नांव घेण्यासारखा कीर्तिमान् राजकारणी पुढारी कोणीच झाला नव्हता. पण म० गांधी यांनीं त्याचा सगळा वचपा भरून काढून, आपल्या प्रांताला कीर्तिमान् पुढाऱ्यांच्या गणनेंत सर्व हिंदुस्थानांत अग्रमान मिळवून दिला. टिळकांच्यापेक्षांहि म० गांधी हे एके वेळीं अधिक कीर्तिमान् ठरले यांत शंका नाहीं. मीं मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं, चार पांच वर्षांपूर्वीं एक काळ असा येऊन गेला कीं, तेव्हां तीव्रतेच्या दृष्टीनें म० गांधींचें राजकारण टिळकांच्या राजकारणापुढें बरेंच गेलें होतें. सर्वसाधारण विद्वत्तेच्या दृष्टीनें टिळक हे गांधींपेक्षां श्रेष्ठ असले तरी, इंग्रजी भाषा लिहिण्याबोलण्यांत गांधींनीं टिळकांवर ताण केली. शिवाय जनतेचें साहाय्य मिळविण्याच्या दृष्टीनें परप्रांताची कोणचीहि देश-भाषा अवगत नसणें ही एक टिळकांच्याहि मध्यें मोठी उणीव राहून गेली होती, ती म० गांधी यांनीं भरून काढली. निर्भयतेंत टिळक व गांधी यांजमध्यें डावें उजवें कांहींच म्हणतां येण्यासारखें नाहीं. राहणीच्या साधेपणांत गांधींनीं टिळकांच्याहि पुढें मजल मारली, व एकाद्या विशिष्ट गोष्टीविषयीं आग्रहाची व करारीपणाची कड, एका विशिष्ट क्षणीं, कोण अधिक पोंचवूं शकला ही बाब घेतली तर टिळकांपेक्षां गांधीच अधिक मान्यता पावतील. पण विशिष्ट प्रसंगीं टिळकांपेक्षांहि जनतेचें अधिक पाठबळ मिळविण्याची पात्रता म० गांधी यांनीं सिद्ध केली असली तरी ती टिकविण्याची पात्रता त्यांनीं सिद्ध केली नाहीं असेंच म्हणावें लागतें. गांधींच्या करारीपणाबद्दल लोकांना जितका विश्वास वाटतो तितकाच, ते आपलें राजकारणी धोरण लहरी-पणानें वेळोवेळीं केवळ आत्मसंतोषार्थ बदलूं शकतील असा संशयहि जनतेला येत असतो. आपल्या धोरणाला प्रसंगानुसार मुरड घातली पाहिजे असें टिळकांचें मत व कृतिहि होती. पण फरक असा कीं, म० गांधी यांची मुरड इतकी ढोबळ असणें संभवनीय कीं, तिनें मूळच्या वस्तूचें स्वरूपच सर्वस्वीं पालटल्याचा भास व्हावा; आणि टिळक देखील मुरड घालीत पण ती इतकी सूक्ष्म बेमालूम असे कीं, त्यांच्या मूळच्या धोरणाचें स्वरूप फारसें बदललें असें सहसा कोणास म्हणतां येत नसे. यामुळें टिळकांनीं सुरू केलेलें सरकाराशीं राजकारणी झुंज म० गांधी यांनीं परिणत

स्वरूपाला आणलें व एकवेळीं टिळकांपेक्षां अधिक जनतेचें पाठबळ चळवळींत मिळवून टिळकांपेक्षांहि त्यावेळेपुरती सरकारला अधिक दहशत उत्पन्न केली तरी, चळवळीच्या तीव्रतेचें सातत्य व दहशत म० गांधी यांना टिळकांप्रमाणें राखतां आली नाहीं. येवढ्याच बाबतींत टिळक व महात्मा गांधी यांच्या यशाच्या मर्मांत फरक पडतो. म० गांधींच्या गुणांच्या अंगभूत असलेले जे प्रतियोगी दोष तेंच कदाचित् या गोष्टीला कारणीभूत असतील. किंवा उलट कोणीकोणी असेंहि म्हणतात कीं, टिळक आणखी पांचसात वर्षें जगते तर त्यांच्याहि लोकप्रियतेचें काय झालें असतें कोणास ठाऊक ? पण काल्पनिक गोष्टी सोडून प्रत्यक्ष घडून आलेल्या गोष्टींपुरतें पाहिलें तर, टिळक व गांधी यांच्यामध्यें जो फरक वर दर्शविण्यांत आला तो मान्य केल्याशिवाय, माझे मतें, गत्यंतर नाहीं.

असो. अशा रीतीनें टिळकांच्या कीर्तिरूपी यशाची मीमांसा करतां येते. यश म्हणजे कार्यसिद्धि या अर्थानें टिळक काय, गांधी काय, कोणासहि ती सिद्धि सोळा आणे आपल्या पदरांत पडली किंवा आपलें कार्य पूर्ण होऊन आपण कृतार्थ झालों असें यथार्थतेनें म्हणतां आलें नाहीं किंवा येत नाहीं. दोघांच्याहि कार्यसिद्धीची कल्पना विशाल असल्यानें, इतरांपेक्षां स्वतः त्यांनाच आपल्या कार्यसिद्धीची अपूर्णता व आपल्या कर्तृत्वाचा उणेपणा भासत असला पाहिजे व भासत होताहि. पण एका माणसाला देशाच्या विद्यमान बिकट परिस्थितींत जितकें करतां आलें तितकें टिळक व गांधी या दोघांनीं केलें यांत शंका नाहीं. त्यांतल्या त्यांत टिळकांचा भर प्रत्यक्ष राजकारणावर विशेष होता, व गांधींचा भर सद्‌गुणसंवर्धनावर आहे ही गोष्ट जनतेला दिसत असल्याकारणानें, म० गांधीइतकेंच टिळकांना आपले व आपल्या देशाचे मित्र असें जनता मानीत असली, तरी आपल्या शत्रूंचे शत्रु या दृष्टीनें गांधींपेक्षां टिळकांस जनता अधिक मान्यता देत होती व आहे असें मला निःसंशय वाटतें. कित्येकांच्या दृष्टीनें शत्रुत्वाच्या कसोटीनें देशभक्तीची किंमत करणें हें हीनतेचें ठरेल, व सात्त्विक गुणांचे जे एकांतिक समर्थनकार असतील त्यांनीं असें म्हटलें असतां त्यांत वावगें कांहीं नाहीं. पण जनता ही जशी आहे तशी सामान्यपणें घेतली असतां टिळकांच्या यशाचें मर्म काय अनुमानितां येतें इतकेंच दर्शविण्याचा मीं येथें प्रयत्न केला आहे.

टिळकांपेक्षां निरनिराळ्या एकेकट्या गुणांनीं श्रेष्ठ असे अनेक लोक हिंदुस्थानांत होऊन गेले. पण टिळकांमध्यें जो गुणसमुदाय संघटित झाला होता तो इतर थोड्यांमध्यें होता, व तो असाच होता कीं, त्यामुळें टिळकांची कीर्ति इतरांपेक्षां अधिक व्हावी.

# ऐक्यप्रिय टिळक

ऐक्य, ता. १ ऑगस्ट १९२५

लो० टिळकांचे टीकाकार त्यांवर नेहमीं जो एक आक्षेप आणीत असतात तो असा कीं, टिळक हे व्यक्तिद्वेष्टे व भांडखोर असून कोणत्याहि दृष्टीनें पक्षपातांत ऐक्य घडवून आणण्याचा त्यांनीं कधींच प्रयत्न केला नाहीं. टिळकांशीं युद्ध करण्याच्या खुमखुमीनें टिळकांना चिडवून ज्यांनीं आव्हान केलें होतें त्यांचीं अंगें खाल्लेल्या मारानें अजून दुखत असल्यामुळें त्यांनीं टिळकांस भांडखोर म्हणावें हें ठीकच आहे. पण टिळकांच्या चरित्राचें वरवर अवलोकन केलें असतां ठळकपणें त्यांतील भांडणें व पक्षभेदच दिसत असल्यामुळें, टिळकांवरील प्रेमानें कांहीं भोळे टिळकभक्त भांडखोरपणा हाच टिळकांचा मोठा गुण असें समजून त्यांचें जेव्हां कौतुक करतात तेव्हां मात्र असा गैरसमज दूर करणें अवश्य होतें.

टिळकांचे अंगीं भांडखोरपणा होता असें जर सिद्ध होईल तर तो टिळकांचे अंगीं आहे एवढ्यावरूनच सद्‌गुण आहे असें म्हणणें योग्य होणार नाहीं. पण टिळकांचे बाबतींत खरी गोष्ट अशी कीं, त्यांच्या शत्रूंनीं त्यांना भांडखोर म्हटलें व टिळकभक्तांनीं भोळेपणानें तें कबूल केलें तरी वास्तविक थोडें सूक्ष्म अवलोकन केलें तर त्यांच्या सर्व भांडणांचे मुळाशीं उत्कट ऐक्यप्रेम व देशभक्ति हीच होती, असें दिसून येईल.

लो० टिळकांच्या आयुष्याचा चित्रपट डोळ्यांपुढें धरल्यास त्यांत अव्वलपासून अखेरपर्यंत प्रतिपक्षावर कडक टीका, भांडणें, पक्षभेद यांखेरीज त्यांत कांहींच नाहीं असेंच सकृद्दर्शनीं वाटेल हें खरें आहे; पण सूक्ष्मदृष्टीनें पहाणाऱ्याला वरवर दिसणाऱ्या या विध्वंसक कार्याच्या रखरखीत वाळवंटाखालीं, सद्धेतुपूर्वक विधायक देशसेवेची सूक्ष्म व शीतल गंगा वहात असलेली दिसल्यावांचून राहणार नाहीं. मूर्तिकार सुंदर चौकोनी अशा संगमरवरी दगडाच्या खपल्या टाकीनें उडवीत असतांना, ज्याला त्यांतील हेतु कळत नाहीं तो सुंदर दगडाच्या सपाट गुळगुळीत पृष्ठाला खवले पडलेले पाहून या 'विध्वंसा'बद्दल मूर्तिकाराचा निषेध करील. पण ज्या प्रेमळ कृष्णभक्तानें मुरलीधराची सुंदर मूर्ति घडविण्याकरितां मूर्तिकाराची योजना केली त्याला या 'विध्वंसा'चें कांहींच वाटत नसून, तोंडाशीं मुरली धरून खरोखरच आलाप काढीत आहे कीं काय असा भास करण्याइतकी सुंदर व हुबेहुब मुरलीधराची आकृति त्या शिळेंतून टाकीच्या घावासरशीं केव्हां बाहेर येते, याची तो अत्यंत आतुरतेनें मार्गप्रतीक्षा करीत असतो. टिळकांच्या चरित्राचेंही असेंच आहे.

टिळकांच्या आयुष्यांतील त्यांचा सर्वांत मोठा शत्रु म्हणजे सरकार. या शत्रूशीं झगडतां झगडतांच त्यांचें सर्व चित्त, वित्त व आयुष्य बहुधा सर्वस्वीं खर्चीं

पडलें. पण खरें पाहिलें तर त्याची त्यांना मोठीशी हौस होती असें नाहीं. विरोधाच्या वेळीं टिळकांची बुद्धिमत्ता, कर्तृत्व, धडाडी, करारीपणा हे गुण विशेष उठावदार दिसले हें जरी खरें असलें, तरी अंगावर चाल करून येणाऱ्यावर कौशल्यानें प्रहार करणारा शूर पुरुष जसा युद्धप्रिय ठरत नसून युद्धनिपुण ठरतो, तसेच टिळकहि केवळ युद्धनिपुणच ठरतील. देशाची स्थिति हल्लींच्याहून वेगळी असती तर आपण या राजकारणाच्या लढायांत न शिरतां, एकांतवासांत प्राचीन आर्यविद्येच्या संगतींत संशोधनकार्यांत आपलें आयुष्य घालविलें असतें, असे उद्गार त्यांनीं अनेक प्रसंगीं काढल्याचें प्रसिद्ध आहे. व राजकारणांतून सरकारनें सक्तीनें मधून मधून दिलेल्या विश्रांतीचा उपयोग करून त्यांनीं पाश्चिमात्य तत्ववेत्त्यांनाहि चकित करून टाकण्यासारखे जे अद्वितीय ग्रंथ लिहिले त्यावरून त्यांचे वरील उद्गार कोणासहि पटतील. पण परकी राज्यकर्ते या देशाच्या कल्याणाकरितां कांहीं येथें आले नाहींत असा त्यांचा ठाम सिद्धान्त असल्यामुळें, सरकारच्या कृत्यांतील दुष्ट हेतु त्यांना सर्वांच्या आधीं स्पष्ट दिसे; व पुढें होऊन निस्पृहपणें ते त्याचा कडक शब्दांत निषेध करीत. पण सरकारचे हेतु चांगले नाहींत हें एकदां मान्य केल्यावर टिळकांचे शब्द कडक असतात यांत त्यांचा काय दोष? टिळकांनीं ज्याचा गौरव करावा असें हिंदुस्थानच्या हिताचें कृत्य स्वखुषीनें जर सरकारनें कधीं केलेंच नसेल तर त्याला टिळकांनीं तरी काय करावें? व्यक्तिशः एखादा अधिकारी कितीहि थोर असला तरी या सदोष राज्ययंत्रांत तो चांगला वागणें शक्य नाहीं असें ते म्हणत; याच दृष्टीनें तत्ववेत्ते मोर्ले व मुत्सद्दी मोर्ले यांत त्यांनीं फरक आहे असें आगाऊच भाकीत करून ठेविलें होतें, व अखेर तेंच खरें ठरलें. तरी सुद्धां लॉर्ड रिपनसारख्या व्हाइसरायाची टिळकांनीं गौरवपूर्वक वाखाणणीच केली आहे. आतां हें भाग्य पुष्कळ अधिकाऱ्यांना लाभलें नसलें तर, उलट पुष्कळ लॉर्ड रिपनहीं झाले नाहींत हें सर्वमान्यच आहे. सरकारशीं देखील ऐक्य करणें त्यांना शक्य असल्यास हवें होतें, व 'प्रतियोगी सहकारिता' या शब्दप्रयोगांत तेंच धोरण दिसून येतें.

समाजसुधारकांशीं टिळकांनीं विरोध केला त्याचा दोष टिळकांप्रमाणें सुधारकांकडेहि येतो. आर्यांच्या उच्च तत्वज्ञानाचा सहानुभूतिपूर्वक अभ्यास न करतां त्यांची व तदनुयायी सामान्य जनाची निंदा करून समाजसुधारणा होणें शक्य नाहीं, समाजास वळण लावण्यास समाजास आपल्या उदाहरणानें धडा घालून देऊन, व समाजाच्या पोटांत शिरून समाजसुधारणा झाली पाहिजे असेंच ते म्हणत. पण समाजांत मिसळणें व बोलल्याप्रमाणें वर्तन करणें हे नेमके दोन गुण सुधारकांनीं कधींहि फारसे दाखविले नाहींत. परकी सरकारच्या हातून आमची समाजसुधारणा होणें शक्य नाहीं असें टिळक म्हणत, तर सुधारकांचा सर्व भार सरकारवरच असे. अर्थातच, परकी सरकार व त्यांचे साह्य मागणारे सुधारक यांचा स्वधर्मावर हल्ला होणार म्हणून बावरलेल्या जनतेची कड टिळकांना घेणें योग्य वाटलें

व ती त्यांनीं घेतलीहि. पण सर्वच समाजाला मूर्खांत काढणारे सुधारक अधिक निंदक, कीं समाजाला पाठीशीं घालून त्याचें संरक्षण करणारे टिळक अधिक भांडखोर ?

नेमस्तांशीं त्यांचा विरोध तत्त्वतःच होता. सरकारचे हेतु चांगले नाहींत असें उघड दिसत असतां वेळींअवेळीं सरकारचे नसते गुण गाऊन आपलें दैन्य प्रगट करणें त्यांना आवडत नसे. लोकमत हें खरें सरकार होय व त्याचें बळ वाढलें पाहिजे, सरकारच्या लहरीवर भिस्त ठेवून आपलें राजकारण हांकणें योग्य नाहीं असें ते म्हणत. नेमस्तांचा क्रम याहून अगदीं विरुद्ध होता. सुधारकांप्रमाणेंच नेमस्तांनीं-हि लोकमताची आरंभापासून उपेक्षा केली व सरकारच्या औदार्यावर भिस्त ठेवून ते वेळोवेळीं फसले. यामुळें सरकारचे हेतु उघड उघड दुष्ट दिसत असतां त्याची नेमस्त गय करतात असें पाहिलें म्हणजे स्वदेशप्रेमामुळें टिळकांना साहजिकच त्वेष चढे व कडक शब्दांत ते त्यांचा निषेध करीत. पण सुधारक किंवा नेमस्त यांपैकीं कोणाविषयींहि वैयक्तिक द्वेष किंवा मत्सर त्यांना कधींहि वाटलेला नाहीं. किंवा कोणा एकाहि व्यक्तीशीं साऱ्या जन्मांत त्यांची अढी पडली असेल असें कधींहि घडलें नाहीं. आगरकर व रानडे यांचे ते जाहीरपणें गुण गात. दाजीसाहेब खरे यांचे व टिळकांचे विचार, स्वभाव, आचरण, राजकीय पक्षभेद वगैरे कोणत्याहि बाबतींत काडीइतकेंहि साम्य नसतां टिळकांचे ते अखेरपर्यंत जिवलग स्नेही होते. लॅ. रोव्हिन्यु बिलाचे वेळीं मेथा व गोखले यांनीं दाखविलेल्या धैर्याबद्दल टिळकांनीं त्यांना समाजाचे पुढारी असें जाहीरपणें उल्लेखून मोठ्या आदरानें त्यांचा गौरव केला होता. गोखले १९०५ सालीं विलायतेहून आल्यावेळीं टिळक त्यांना स्टेशनवर सामोरे गेले व गांवांत जाहीरपणें त्यांच्या झालेल्या सन्मानांत टिळकांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. या गोष्टी पक्षभेद निकराला गेलेल्या काळांतील आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांत टिळकांनीं जी हिंदूंची कड घेतली ती त्यांच्या-सारख्या स्वाभिमानी व करारी देशभक्तास साजेशीच होती. दुसऱ्यानें लाथा मारल्या तरी निमुटपणें सोसून भांडणें वाढवूं नयेत असलें दुबळें ऐक्यप्रेम त्यांच्या अंगीं नव्हतें हा त्यांचा गुणच होय. ऐक्य खरें तेंच कीं, जें दोन समबल व समान भूमिके-वरील समूहांचें होईल. टिळकांना असलें ऐक्य हवें होतें. इंग्रजांचे आपण आवडते आहों, व हिंदूंवर आपण हात चालविल्यास आपणांस कोण मना करणार आहे असें वाटून जोंपर्यंत मुसलमानांनीं हिंदूंचें वैर केलें, व ते काँग्रेसशीं फटकून राहून सरकाराशीं बिलगून राहिले तोंपर्यंत टिळकांनीं त्यांना विरोध केला; पण लखनौ काँग्रेसचे वेळीं टिळकांचें ऐक्य-प्रेम पुरें कसोटीला उतरलें. हिंदूंसारखे आपणहि परतंत्र आहों व हिंदुस्थानास स्वराज्य मिळाल्याशिवाय आपणासहि गत्यंतर नाहीं हें जेव्हां मुसलमानांना पटलें, व मुस्लीम लीग काँग्रेसला येऊन मिळण्यास तयार झाली, तेव्हां टिळकांनीं हिंदूंच्या वतीनें उदार होऊन सढळ हातानें मुसलमानांस

सवलती दिल्या व ऐक्य घडवून आणलें. उतावळेपणानें ऐक्याकरितां टिळक कधीं हापापलेले नसत; पण योग्य वेळ येतांच पडतें घेऊन सुद्धां ऐक्य घडवून आणण्याचें कौशल्य व कळकळ टिळकांइतकी कोणींहि दाखविली नाहीं. टिळकांच्या या हेतूंची खरी पारख ज्यांना झाली असे हजरत मोहानी, अल्लीबंधु वगैरे पुढारी अलीकडे टिळकांना आपले राजकीय गुरु म्हणूं लागले होते हें प्रसिद्ध आहे.

नवीन उदयोन्मुख असा ब्राह्मणेतरपक्ष टिळकांना आपला शत्रु समजतो. पण खरोखर हा एक पक्ष नसून कांहीं मोजक्या कोल्हापुरी सत्यसमाजिष्टांखेरीज यांच्यांत अधिक कोणी नाहीं. सामान्य ब्राह्मणेतर जनता टिळकांना देवाप्रमाणें भजत आली आहे हें टिळक दौऱ्यावर असत तेव्हां दिसून येतच असे, व ब्राह्मणेतरांचे पुष्कळसे जबाबदार पुढारी टिळकांचे चहाते असून टिळकपक्षीय असल्याबद्दल अभिमान बाळगणारेच आहेत.

सारांश, परकी राज्याखालीं हीन व दीन बनून दिवसानुदिवस खचत चाललेल्या जनतेंत स्वाभिमान व स्वातंत्र्यप्रेम उत्पन्न करून, जोरदार लोकमताची प्रशस्त सडक स्वातंत्र्यदेवीकरितां त्यांना करावयाची होती; व प्रसंगीं प्रतिकूल परिस्थितीचें जंगल तोडण्याकरितां त्यांना तीक्ष्ण शस्त्रधारा चालवावी लागली आणि त्यांत ते यशस्वीहि झाले. पण जंगल तोडल्यावर रस्ता साफ करून व रस्त्याचे दुतर्फा बागबगीचा व रोषनाई करण्याकरितां जो नाजूक व कुशल हात लागतो तोहि त्यांचेजवळ होता, व त्याचा त्यांनीं यशस्वी रीतीनें उपयोगहि केला. त्यांना लढण्याची हौस होती असें नव्हे तर ते युद्धनिपुण सेनापति होते, व या युद्धनैपुण्याच्या तोडीचा उदार मुत्सद्देगिरीहि त्यांचेपाशीं होती म्हणूनच ते लोकोत्तर ठरले.

# टिळक व इंग्रजी शिक्षणपद्धति

**[ म० गांधींनीं सुरू केलेला एक महत्त्वाचा वाद ]**

लोकसंग्रह, खास अंक १९२०

पुण्यांत लो० टिळकांची प्रथम श्राद्धतिथि अत्यंत उत्साहानें व पुण्यास शोभेल अशा कार्यक्रमानें पाळली गेली याविषयीं कोणासहि समाधान वाटल्यावांचून राहणार नाहीं. गतवर्षीं लो० टिळकांना तिलांजलि देण्याच्या दिवशीं लाला लजपतराय हे पुण्यास आले होते; यंदां प्रथम श्राद्धतिथीच्या दिवशीं महात्मा गांधी हे आले. अशा रीतीनें लो० टिळकांच्या और्ध्वदेहिक धर्मक्रियेच्या दोन महत्त्वाच्या दिवशीं लजपतराय व गांधी यांसारखे दोन सर्वश्रेष्ठ पुढारी पुण्यास लाभले; व त्यांनीं आपल्या वक्तृत्वपूर्ण शब्दांनीं केलेली टिळकांची स्तुति ऐकून व आपले समानधर्मी असे प्रमुख लोक इतर प्रांतांतहि आहेत हें पाहून, टिळकभक्तीविषयीं पुणेंकरांचा आत्मविश्वास दृढतर झाल्यास नवल नाहीं. महाराष्ट्रांतील लोक आत्मीयबुद्धीनें टिळकांची भक्ति करितातच; पण आत्मिक भावनेपेक्षांहि अधिक प्रशस्त, विस्तृत व सात्त्विक असें अधिष्ठान आपल्या भक्तीला आहे असें महाराष्ट्रीयांनीं म्हटल्यास त्यांत कांहीं वावगें नाहीं. टिळकांच्या खऱ्या योग्यतेचें परीक्षण आजवर झालें याहून अधिक निरनिराळ्या दृष्टींनीं अद्यापि व्हावयाचेंच आहे व या दृष्टींपैकींच एक दृष्टि म्हणून खालील दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

याचें कारण असें कीं, महात्मा गांधी यांनीं कांहीं महिन्यांपूर्वीं इंग्रजी शिक्षणावर बवळजवळ बहिष्कार घालावा असें सुचवितांना असें एक विधान केलें होतें कीं, इंग्रजी शिक्षण टिळक न घेते तर ते झाले याहून अधिक मोठे झाले असते. व केवळ इंग्रजी शिक्षणामुळेंच ते खुरटून गेले. टिळक इंग्रजी शिक्षण न घेते तर कदाचित् पूर्वकालीन साधुसंतांप्रमाणें खरे लोकमान्य झाले असते; पण या शिक्षणामुळें या साधुसंतांच्या मानानें ते बाहुलीसारखे किंवा बटुवामनासारखे हलके भरतात. टिळकांच्या जोडीला उपरिनिर्दिष्ट लेखांत महात्मा गांधी यांनीं राजा राममोहन राय यांनाहि बसविल्याचें वाचकांस स्मरत असेल. मॉडर्न रिव्ह्यूचे संपादक व मि०ॲंड्र्यूज यांना ही तुलना न आवडून त्यांनीं राजा राममोहन राय हे इंग्रजी शिक्षणामुळें खुरटले नव्हते, तर एका विशिष्ट दृष्टीनें पाहतां राममोहन राय यांची योग्यता, साधुवर्य चैतन्य यांच्याहून कमी नव्हती असें मॉडर्न रिव्ह्यूच्या एकदोन अंकांत सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. असाच प्रश्न लो० टिळकांच्या योग्यतेसंबंधानेंहि लक्षांत घेण्यासारखा आहे. व लोकसंग्रहाच्या वाचकांचें लक्ष या विषयाकडे वेधावें एवढाच प्रस्तुत लेख लिहिण्याचा माझा उद्देश आहे.

महात्मा गांधी यांच्या उपरिनिर्दिष्ट लेखांत 'पिग्मी' ( बटुवामन ) हा जो

शब्द आला आहे त्यासंबंधानें प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं, तो कित्येक लोक मानतात त्याप्रमाणें निंदाव्यंजक नाहीं. तो शब्द घालण्यांत टिळकांना कमीपणा आणण्याचा गांधींचा उद्देश नसून, टिळक हे मोठे व लोकमान्य असले तरी त्यांच्याहून अधिक मोठीं लोकमान्येतर अशीं माणसें आपणांतच पूर्वी होऊन गेलीं; आणि विशेषेंकरून याचें कारणहि टिळकांना इंग्रजी शिक्षण घ्यावें लागलें, इतरांना तें घ्यावें लागलें नाहीं, एवढेंच प्रतिपादण्याचा त्यांचा हेतु होता असें मला वाटतें. जे लोक 'पिग्मी' या शब्दामुळें नाराज झालेले आहेत त्यांनीं गांधींच्या लेखांतील प्रस्तुत व अप्रस्तुत यांतील भेद ओळखला नाहीं असें दिसतें. गांधींना टिळकांची स्तुति विवक्ष्य नसून इंग्रजी शिक्षणाची निंदाच विवक्ष्य होती, हें जरूर लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. निदान टिळकांना तुलनादृष्टीनें किंचित् कमीपणा आणण्यासारखा शब्द वापरतांना गांधींच्या मनांत चैतन्य वगैरे साधूंविषयीं फाजील बहुमानबुद्धि होती, असें कोणीं वाटेल तर म्हणावें; पण स्वतःविषयींच्या अहंकारबुद्धीनें गांधींची ही चूक झाली असें कोणी मानण्याचें कारण नाहीं. कां कीं, लेखांत गांधींनीं टिळकांची व आपली तुलना करून त्यांच्यापुढें आपणहि बटुवामन आहों असेंहि स्पष्ट म्हटलें आहे.

असो. टिळक मोठे कीं गांधी मोठे हा वादाचा मुद्दा नसून टिळक, राममोहन राय वगैरे इंग्रजी शिकलेले लोक चैतन्यादि साधूंहून फार कमी योग्यतेचे ठरतात कीं काय हाच वादाचा मुख्य प्रश्न आहे. याचें उत्तर देतांना दोन प्रकारची सावधगिरी ठेवणें जरूर आहे. एकीकडे टिळकांची व राममोहन राय यांची न कळत निंदा होईल एवढीच भीति मनांत बाळगणारा मनुष्य, तसें न व्हावें म्हणून, इंग्रजी शिक्षणपद्धतीला योग्य तो दोष देण्यापासून परावृत्त होण्याचा संभव आहे. दुसरे पक्षीं, इंग्रजीपेक्षां जुनी शिक्षणपद्धति अधिक चांगली असें सिद्ध करण्याच्या भरांत टिळक, राममोहन राय इत्यादि लोकांच्या खऱ्या योग्यतेकडे न कळत दुर्लक्ष होण्याचा संभव आहे. आमच्या मतें रामानंद चतर्जी व अँड्रयूज यांनीं पहिल्या प्रकारची चूक केली असून, महात्मा गांधी यांनीं दुसऱ्या प्रकारची चूक थोडीशी केली आहे. प्रथम अँड्रयूज वगैरेंच्या विचारसरणीकडे पाहूं. गांधींच्या हल्ल्याचा मुख्य रोंख इंग्रजी राज्यांतील शिक्षणक्रमाविरुद्ध जितका आहे तितका इंग्रजी भाषेच्याविरुद्ध नाहीं, हें अँड्रयूज प्रभृतींनीं लक्षांत ठेविलें नाहीं. भाषा ही बिचारी कोणाचेंच कांहीं घोडें मारीत नसते. उलट इंग्रजी भाषेनें हिंदी लोकांना पूर्वकालीं अगम्य असलेलें असें एक नवीनच ज्ञानभांडार उघडून दिलें आहे. हा तिचा आमच्यावर उपकारच आहे; पण इंग्रजी भाषेबरोबर इतर गोष्टीहि इंग्रजी शिक्षणांत येतात व त्यांचाच परिणाम मुख्यतः आपल्या मनावर अनिष्ट होतो. भाषा तीच; पण तींत इष्ट ग्रंथांप्रमाणें अनिष्ट ग्रंथहि असूं शकतात. आणि अनिष्ट ग्रंथ वर्ज्य करून इष्ट ग्रंथ तेवढे विद्यार्थ्यांच्या हातीं पाडण्याची सत्ता हिंदी लोकांना मिळाल्यास इंग्रजी शिक्षणाशीं त्यांचें भांडण होण्याचें कारण नाहीं. इष्ट व अनिष्ट

हा भेद अत्यंत महत्त्वाचा आहे व ही सत्ता हातीं येईपर्यंत हा तंटा कायम राहणार हें उघड आहे. इंग्रजी भाषा ही हिंदी लोकांना परकी भाषा, हाहि येथें मुख्य मुद्दा नाहीं. कारण अमेरिकन लोक व इंग्रज लोक या उभयतांनाहि इंग्रजी ही मायभाषाच असली तरी खऱ्या राष्ट्रीय दृष्टीनें अमेरिकन आणि इंग्रज आपआपल्या मुलांना त्याच भाषेंतील वेगवेगळीं पुस्तकें शिकवतील व त्यांचे अभ्यासक्रमहि वेगवेगळे असूं शकतील. राजा राममोहन राय हे जसे इंग्रजी राज्याखालीं असतांना स्वेच्छेनें परशिअन व अरेबिक भाषा शिकले तसेच विद्याव्यासंगी टिळक स्वराज्य असतें तरीहि कदाचित् इंग्रजी भाषा शिकून, इंग्रजी वाङ्मय वाचून इंग्रजी भाषेंत एखादा ग्रंथहि लिहिते. पण केवळ इंग्रजी राज्य असल्यामुळें नुसत्या इंग्रजी भाषेलाच शिक्षणक्रमांत एवढें महत्त्व आलें, कीं त्यांचीं अनेक वर्षें इंग्रजीच्या अभ्यासांत व्यर्थ गेलीं व इंग्रज विद्वान् हेच खरे विद्वान् व त्यांच्या मनावर आपला पगडा बसला तरच आपण जिंकली, अशा बुद्धीनें टिळकांनीं 'ओरायन' व 'आर्टिक होम इन् धी वेदाज्' हीं पुस्तकें मूळ मराठींत लिहावीं व इंग्रजांनीं त्यांचीं इंग्रजींत भाषांतरें करावीं असें न होतां, त्यांनीं तीं मूळ इंग्रजींत लिहिलीं व निदान मागाहून तरी त्यांनीं स्वतः त्या विषयावर स्वतंत्र ग्रंथ लिहावे तेहि लिहिले नाहींत, असा आक्षेप टिळकांच्या कित्येक भक्तांनींच घेतला आहे. इंग्रज विद्वानांनीं आजपर्यंत एकाहि महाराष्ट्रीय विद्वानाच्या ग्रंथाचें भाषांतर केलें नाहीं आणि टिळकांनीं मात्र दोन महत्त्वाचे ग्रंथ केवळ इंग्रजींत लिहिले याचा दोष विद्यमान शिक्षणपद्धतीकडेच दिला पाहिजे. व राज्यपद्धतीपासून शिक्षणपद्धति भिन्न असूं शकत नाहीं असें कोणी म्हटलें (व तें खरेंच आहे) तरी शिक्षणपद्धतीचा दोष कांहीं कमी होत नाहीं. मॉडर्न रिव्ह्यूच्या संपादकांनीं म्हटल्याप्रमाणें राममोहन राय यांच्या वेळेपेक्षां टिळकांच्या शिक्षणाच्या वेळीं ही अनिष्ट शिक्षणपद्धति अधिक दृढमूलच झाली होती. राममोहन राय यांना कदाचित् इंग्रजी भाषेंतून विचार करण्याची संवय लागलेली नसेल; परंतु टिळकांच्या वेळीं तेथपर्यंत मजल येऊन ठेपली होती. तात्पर्य, राममोहन राय काय किंवा टिळक काय दोघांनाहि पाश्चात्य शिक्षणपद्धतीनें शिक्षण न मिळतें तर त्यांचें इंग्रजी भाषेचें ज्ञान जरूरीपुरतें राहूनहि त्यांच्या मोठेपणाला हरकत आली नसती. कारण टिळक किंवा राममोहन राय हे त्यांचे देशाभिमानाचे विचार व आचार आणि व्यापक विद्वत्ता यांच्यामुळें मोठे मानले जातात, त्यांच्या इंग्रजीच्या ज्ञानामुळें नव्हे.

दुसरे पक्षीं, महात्मा गांधी यांच्या विचारसरणींत आम्हाला दोष हा दिसतो कीं, इंग्रजी शिक्षणपद्धतीची निंदा करण्याच्या भरांत त्यांनीं टिळक, राममोहन राय यांना कबीर, नानक, चैतन्य यांच्याहून कमी योग्यतेचे ठरविले आहेत. आमच्या मतें या तुलनेला समान अधिष्ठान असें फारसें नाहीं. साधु हे देखील देशभक्त असतात व देशभक्तांच्या अंगींहि साधुत्व असतें; परंतु लौकिक व पारलौकिक हे दोन पंथच वेगळे असल्यामुळें साधु व राजकारणी पुरुष यांची तुलना करण्यांत

फारसें स्वारस्य नाहीं. पण तुलनेचा हा विषय काढलाच तर महात्मा गांधी म्हणतात तें बरोबर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. प्रथमच ही गोष्ट निदर्शनास येते कीं, कबीर, नानक, चैतन्य आणि टिळक, राममोहन राय या दोन वर्गांची तुलना दोन प्रकारांनीं करतां येईल. एक मनःसंस्कृति व दुसरा जनतेवर परिणाम. पहिल्या दृष्टीनें पाहतां कबीराचे दोहरे व टिळकांचे लेख हे ताडून पाहिल्यास टिळकांची मनःसंस्कृति किंवा परिणति कबीराहून कमी होती हें सिद्ध करणें कोणासहि जड जाईल. कबीर हे जितके ईश्वराशीं तादात्म्य पावले होते, तितकेच टिळकहि देशाशीं तादात्म्य पावले होते. टिळकांच्या लेखांत यमकें साधलीं नसलीं किंवा ठराविक छंदोबद्ध रचना केली नसली, तरी सत्यज्ञान देणारीं व अनुभवाचीं वचनें कबीराच्या वचनांइतकींच खणखणीत, झणझणीत, समर्पक, मार्मिक अशीं खचित सांपडतील, टिळकांचे लेख निर्यमक होते म्हणून त्यांना अधोगति मिळाली व दोहऱ्याच्या पायऱ्यांमुळें कबीराला मोक्षपद गांठतां आलें, असें कोणास म्हणावयाचें तर त्यानें खुशाल म्हणावें. कारण या उभयतांचीं आजचीं पारलौकिक स्थानें पाहून येऊन कोण सांगणार ?

दुसरा मुद्दा घेतला तर तुलनेचा कांटा कबीरापेक्षां टिळकांकडेच अधिक झुकेल. कबीर कितीहि लोकप्रिय असला तरी त्या लोकप्रियतेची व्याप्ति एक दोन प्रांतांपुरतीच आढळेल; पण टिळकांची लोकप्रियता सर्व नऊ दहा प्रांतभर पसरलेली आहे कबीराच्या दोहऱ्यांनीं हिंदी जनतेला जितकें आध्यात्मज्ञान झालें असेल तितकें स्वराज्याच्या हक्काचें ज्ञान टिळकांच्या सुप्रसिद्ध चतुर्दश अक्षरी मंत्रानें खचित झालें असलें पाहिजे. स्वतः कबीरानें राम आणि रहिम हे एकच आहेत असें म्हटल्यानें हिंदु-मुसलमानांची एकी जितकी झाली असेल त्यापेक्षां आज मौलाना महंमदअल्लींनीं, टिळक हेच माझे राजकारणांतले गुरु, असें परस्पर म्हटल्यानें ती एकी होण्याचा संभव खचित अधिक आहे. सामान्य जनतेवर कबीर किंवा चैतन्य किंवा नानक ह्यांचा जेवढा परिणाम घडला तितका किंवा त्याहूनहि थोडा अधिकच, निदान टिळकांचा तरी घडला असें आम्ही खात्रीनें म्हणूं शकतों. मग राजा राममोहन राय यांजविषयीं तें तितकें खरें असो किंवा नसो; फार काय पण गांधी हे विनयामुळें आत्मनिंदा कितीहि करोत, पण सर्व हिंदुस्थान मिळून घेतलें असतां स्वतः त्यांनीं जनतेवर जो परिणाम घडविला तेवढा वरील साधुसंतांनीं घडविला नाहीं असें आम्हांस तरी वाटतें. टिळकांचें नांव हिंदुस्थानभर पसरण्याला कबीर नानकांच्या वेळीं नसलेलीं आगगाडी, तारायंत्रें वगैरे साधनें विशेष कारणीभूत झालीं असें कोणाचें म्हणणें असेल, तर त्यास आमची हरकत नाहीं. पण प्रत्यक्ष वस्तुस्थितीबद्दल तरी वाद असण्याचें कारण नाहीं.

तात्पर्य, गांधी म्हणतात त्याप्रमाणें प्रस्तुतची शिक्षणपद्धति सदोष आहे खरी; परंतु ती तशी ठरविण्याकरितां टिळक, राममोहन राय यांना कबीर-नानकांहून कमी लेखणें अवश्य नाहीं.

# लो० टिळकांच्या चरित्रासंबंधीं

[ विद्यार्थ्यांस चार उपदेशपर शब्द ]

[ मंगळवार, ता. १७ ऑगस्ट सन १९२० रोजीं फर्ग्युसन कॉलेजांत श्री० तात्यासाहेब केळकर यांचें " लो० टिळकांच्या चरित्रासंबंधीं चार उपदेशपर शब्द " या विषयावर व्याख्यान झालें. अध्यक्षस्थानीं प्रो० काळे हे होते. व्याख्यानाच्या आरंभीं एका विद्यार्थ्यानें एक सुंदर पद्य म्हटल्या-नंतर अध्यक्ष प्रो० काळे म्हणाले, " माझ्या विनंतीला मान देऊन प्रकृति नादुरुस्त असतांहि तात्यासाहेब येथें आले हे त्यांचे आपणांवर फार उपकार आहेत. तात्यासाहेब हे 'राजेश्री' टिळकांचे उजवे हात आहेत. व टिळकांचे सतत सान्निध्यामुळें आपण या विषयावर मत देण्यास कदाचित् असावे तितके योग्य नाहीं असें परवां मराठा पत्रांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या लेखा-वरून वाटण्याचा संभव आहे. इंग्रजींतही No hero is a hero to his valet de chamber अशी एक म्हण आहे तिचाहि असाच अर्थ आहे. तरी पण ते समतोल वृत्तीचे असल्याकारणानें 'अतिपरिचयात् अवज्ञा' होण्याचें कारण नाहीं. थोड्याच दिवसांपूर्वीं तात्यासाहेबांनीं केसरीपत्रांत " टिळक सुटले पुढें काय ? " असा अग्रलेख लिहिला होता. परंतु " आतां टिळक गेले पुढें काय ? " असा प्रश्न पुढें उभा राहिला आहे. असो. आतां मी आपला जास्त वेळ न घेतां रा० तात्यासाहेब यांस आपलें भाषण करण्यास विनंति करतों.]

आज तुमच्यापुढें भाषण करण्यांत माझ्या मार्गांत तीन अडचणी आहेत. एक-तर माझी प्रकृति आज बरी नसल्यामुळें मला फार मोठ्यानें बोलतां येणार नाहीं. आतांहि थोडी थंडी वाजतेच आहे ! तसेंच मी विद्यार्थ्यांच्या पुढें भाषण करणार आहें. व विद्यार्थ्यांच्या पुढें कशा तऱ्हेचें भाषण करावें लागतें हें आपणांस माहीत आहेच. दुसरें असें कीं, मी फर्ग्युसन कॉलेजांत बोलत आहें. यांत सकृद्दर्शनीं कांहीं अवघड दिसत नाहीं; परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणा, किंवा कांहीं म्हणा; पण फर्ग्युसन कॉलेजचे व टिळकांचे ग्रह कांहीं जमले नाहींत ही गोष्ट खरी ! तिसरी गोष्ट म्हणजे आपल्या अध्यक्षांनींच आतां आपणांस सांगितलें कीं, मी त्यांचा अति-शय निकटचा स्नेही आहे. मला ही गोष्ट कबूल आहे. पण मलाहि इतरांच्या संबंधानें असें म्हणतां येईल कीं, 'लोकमान्य' हा शब्द एकाद्याच्या तोंडून न आला तरी, मनांतून तरी तुम्ही ही पदवी मान्य करतांच करतां. ( टाळ्या ) आपणांपुढें जें एक पद्य नुकतेंच म्हणण्यांत आलें त्यापेक्षां टिळकांची अधिक स्तुति ती मी काय करणार ? मी केवळ त्यांची स्तुति करण्यासाठीं येथें आलों नाहीं. कारण मी कांहीं

भाट नाहीं. तसेंच गुणदोषविवेचनाच्या पद्धतीनेंहि आज मी आपणांपुढें बोलणार नाहीं. कारण टिळकांत जरी एकादा दोष असला तरी यावेळीं मीं तो दाखवावा अशी ही वेळ नाहीं. यावेळीं दोषचर्चा ही अप्रस्तुत आहे. दोषाविष्करणाची ही वेळहि नाहीं. मी त्यांचें नुसतें गुणवर्णन करणार नाहीं; तसेंच नुसतें दोषाविष्करणहि करणार नाहीं. तर मग मी तुमच्यापुढें आज काय बोलणार आहें ? मी आज ॲप्रीसिएशनच्या म्हणजे गुणग्राहकतेच्या दृष्टीनें त्यांच्याकडे पहाणार आहें. या दृष्टीनें पाहतां नुसती निंदा किंवा नुसती स्तुतीच करावयाची नसते, फक्त गुण पहावयाचे असतात; व त्यांतल्या त्यांत जो चांगला गुण असेल तो प्रामुख्यानें दाखवावयाचा असतो. त्यापासून आपल्याला काय बोध घेतां येईल हें पहावयाचें असतें.

कोणी म्हणतील कीं ही दृष्टि एकेरी आहे. परंतु गुणग्रहण हें नेहमीं एकेरीच असणार. सर्वगुणसंपन्न असा कोण आहे ? कांहीं गुण परस्परविरोधी असतात व ते दोघे एकाच माणसाच्या ठिकाणीं असणें हें प्रायः अशक्य असतें. रानड्यांच्याविषयीं असें सांगतात कीं, रानडे म्हणजे एक केवळ क्षमासमुद्र होता ! याच्या उलट टिळक हे तापट होते. आतां हे दोन्ही गुण एकाचवेळीं एका माणसांत असणें केव्हांहि शक्य नाहीं. परस्परविरोधी अशा गुणांचा वास फक्त एका परमेश्वराच्याच ठिकाणीं कल्पिलेला आहे. कसें तें पहा. परमेश्वर हा सर्वज्ञ, प्रेमळ व न्यायी आहे असें म्हणतात. आतां, परमेश्वर जर सर्वज्ञ आहे तर त्याला लोकांचें दुःख कळत असलें पाहिजे. आणि परमेश्वर न्यायी असें म्हटलें तर त्याला प्रेमळ कसें म्हणतां येईल ? पण सर्वगुणसंपन्नता ही एका परमेश्वरापाशींच संभवते. मानवी समाजांत जन्मास येऊन कोणीहि 'सुपरमॅन' कसा असूं शकेल ? असो. आतांपर्यंत टिळकांच्या गुणांची इतकी चर्चा झालेली आहे, कीं एकाद्याला सांगितलें कीं, आजपर्यंत कोणास न दिसलेला असा एकादा टिळकांचा गुण सांग, तुला हजार रुपये बक्षिस देतों, तरी तें त्याला शक्य होणार नाहीं. तेव्हां मी तुम्हांला टिळकांचा एकादा कोणास न दिसलेला गुण दाखविणार आहें असें नाहीं. टिळकांचे गुण तेच, पण ते मी वेगळ्या पद्धतीनें आपणांपुढें मांडणार आहें. तींच फुलें पण चार माळ्यांपुढें दिलीं तर चौघेहिजण चार तऱ्हेनें हार गुंफतील. त्याचप्रमाणें टिळकांचे आजपर्यंत वर्णन केलेलेच गुण, पण ते जर निराळ्या तऱ्हेनें मांडून दाखविले तर ते नवीन दिसतील.

असो. विष्णुसहस्रनामाप्रमाणें टिळकांचे गुण आपणांपुढें म्हणून दाखविले तर पहा त्याचा काय बोध होतो ? टिळक सद्वर्तनी होते, विद्वान् होते, स्वार्थत्यागी होते, देशभक्त होते, उद्योगी होते, पराक्रमी होते, धैर्यवान् होते. अर्थात् यानें आपणांस कांहींच बोध झाला नसेल. आतां हेच गुण पण ते एकमेकांवर कसे अवलंबून होते हें मी आपणांस दाखवितों. या सर्व परस्परावलंबी गुणांची मीं एक सांखळी तयार केली आहे ती अशीः—टिळक सद्वर्तनी होते, म्हणून त्यांच्या विद्वत्तेचें

चीज झालें. ते विद्वान् होते म्हणून त्यांच्या स्वार्थत्यागाचा उपयोग झाला. स्वार्थत्यागी होते म्हणून त्यांच्या देशभक्तीचें चीज झालें. देशभक्त होते म्हणून त्यांच्या उद्योगाचें चीज झालें. उद्योगी होते म्हणून पराक्रमाचें चीज झालें. पराक्रमामुळे धैर्याचें चीज झालें. व टिळक स्वतः धैर्यवान् होते म्हणून लोकांना उपदेश करण्याची त्यांना पात्रता आली.

ही सांखळी थोडी स्पष्ट रीतीनें दाखविणें जरूर आहे. 'टिळक सद्वर्तनी होते म्हणून त्यांच्या विद्वत्तेचें चीज झालें' हें कसें ? टिळकांच्या अंगचा लहानपणापासूनचा पहिला गुण म्हणजे सद्वर्तन हा होय. मनुष्य नुसता विद्वान् असून उपयोग नाहीं. त्याच्या जोडीला सद्वर्तन हाहि गुण त्याचे अंगीं पाहिजे. या दोन गुणांची सांगड असल्यामुळेंच न्यू इंग्लिश स्कूल काढलें तेव्हां टिळकांच्या लायकीविषयीं कोणाला शंका आली नाहीं. खुद्द भांडारकरांनीं त्यावेळीं या प्रसंगासंबंधानें बोलतांना असे उद्गार काढले कीं, 'ही संस्था काढणाऱ्या लोकांत दोन सद्वर्तनी, स्वार्थत्यागी एल्‌एल्. बी. आहेत ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे !' मनुष्य सद्वर्तनी असेल तरच त्याच्या विद्वत्तेचें चीज.

दुसरें, 'टिळक विद्वान् होते म्हणून त्यांच्या स्वार्थत्यागाचा उपयोग झाला'. मनुष्य विद्वान् असून स्वार्थत्यागी असेल तरच त्याचा उपयोग व चीज. जवळ ५ रुपये असून त्यांतून ८ आणे धर्म करण्यापेक्षां जवळ १००० रुपये असून त्यांतून ९०० देशकार्याला देणारा मनुष्य माझ्या मतानें जास्त श्रेष्ठ ठरेल. टिळक वकील झाले असते तर दरमहा हजारों रुपये मिळवितां येण्यासारखी त्यांची विद्वत्ता होती. परंतु त्यांनीं स्वार्थाचा त्याग केला व दरमहा ३० रुपयांवर स्वतंत्र पण दरिद्री आयुष्य पत्करिलें ! हा खरा स्वार्थत्याग. अविद्वानाच्या स्वार्थत्यागाला जग कवडीचीहि किंमत देत नाहीं हें लक्षांत ठेवा. स्वार्थी असता तर जगाला आग लावली असती अशा मनुष्यानें निःस्वार्थी होऊन देशाचा दास व्हावें हा केवढा गुण ! सुभाषितकारानें धीर कोण हें सांगितलेंच आहे. 'विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि तऽएव धीराः' विकारहेतु असून त्याचा त्याग करतील ते खरे धीर !

'टिळक स्वार्थत्यागी होते म्हणूनच त्यांच्या देशभक्तीचें चीज झालें'. स्वार्थत्यागाचा उपयोग देशभक्तीकडे केला पाहिजे, तरच त्याचें चीज. मला अशीं कांहीं माणसें माहीत आहेत कीं, ज्यांच्या अंतःकरणांत कधीं देशभक्तीचा लवलेशहि नव्हता ! परंतु तोंडांतून एक शब्द उच्चारल्याबरोबर ज्यांची रवानगी तुरुंगामध्यें झाली व सुटल्यावरहि त्यांनीं कधीं देशभक्ति दाखविली नाहीं ! माणूस उद्योगी असून मनावर घेईल तर हातून पराक्रम घडणार. उद्योग करीत असतांनाच पराक्रम केले पाहिजेत. न कळत पराक्रम एकाद्याच्या हातून पुष्कळ होतात; पण टिळकांचे पराक्रम तशांपैकीं नव्हते, टिळकांनीं सर्व उद्योग जाणूनबुजून केले असल्यामुळें त्यांना पराक्रम करतां आले. त्यामुळेंच त्यांच्या अंगीं असलेल्या

धैर्याचें बीज झालें. आणि स्वतः त्यांच्या अंगीं एवढें अलोट धैर्य होतें म्हणूनच लोकांना उपदेश करण्यास त्यांना पात्रता आली, हें काय कोणास सांगावयास पाहिजे ?

टिळकांच्या विरुद्ध नुकताच एके ठिकाणीं असा एक आक्षेप घेण्यांत आलेला आहे कीं, त्यांचें सर्व काम Destructive म्हणजे विघातक होतें. माझ्या मतें आक्षेप घेणारांनीं हा दोष म्हणून दाखवावयास नको होता. निदान तो यावेळीं तरी दाखवावयास नको होता ! गुण सुद्धां दोषांच्या भाषेंत बोलतां येतात व दोष हे देखील गुणांच्या भाषेंत बोलतां येतात. दोष दाखविणारालासुद्धां यावेळीं असें म्हणतां आलें असतें—" डिस्ट्रक्टिव्ह काम ना ? होय; डिस्ट्रक्टिव्ह काम टिळकांनींच करावें. तें त्यांनाच करतां येतें ! डिस्ट्रक्टिव्ह काम कां होईना, पण पहा कसें बहाद्दरीनें केलें !" दोष देणाराला हो काय ? लागेल त्याला दोष देतां येईल. कर्व्यांना म्हणावें, 'तुम्हांला राजकीय कामांत काय करतां आलें ?' व टिळकांना म्हणावें, 'तुम्हीं सामाजिक कामगिरी काय काय केलीत ?' म्हणजे खासा रोजगार ! कोणाबद्दल चांगलें म्हणून बोलतां यावयास नको ! टिळकांच्याबद्दल जसा मला आदर वाटतो, तसाच गोखल्यांच्याबद्दलहि माझ्या मनांत कमी आदर नाहीं, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. मलाहि गोखल्यांचेविषयीं असें लिहितां आलें असतें कीं, गोखल्यांना डिस्ट्रक्टिव्ह काम मुळींच करितां येत नव्हतें ! दुसरें, आक्षेपकांनीं निदान राजकीय बाबतींत तरी टिळकांचेबद्दल असें म्हणावयास नको होतें. प्रत्यक्ष चिरोलसारख्या शत्रूकडून त्यांना The father of the Indian unrest म्हणजे " हिंदवी प्रक्षोभाचे जनक " अशी पदवी मिळाली होती व ती सर्वथैव योग्य होती. कोणतेंही राष्ट्र उदयोन्मुख होत असतें तेव्हां त्यांत अनरेस्टच उत्पन्न व्हावी लागते. इंग्रज श्रेष्ठ म्हणून त्यांच्याशीं नमून वागण्यांत नेहमीं जी एक फाजील आदरबुद्धि दाखविण्यांत येते, तिचा विध्वंसच झाला पाहिजे. कांहीं वेळां विध्वंसच योग्य असतो. लढाई सुरू असतां काय होत असतें ? दोन्ही पक्षांकडून लढाईची तोफ सुरू झाली म्हणजे मधल्या जमिनींत पखालींनीं पाणी टाकून शेताकरितां ती कांहीं कोणी नांगरावयास लागत नाहीं किंवा त्या वेळेला तेथें शहर कसें उठेल याचाहि कोणी विचार करीत बसत नाहीं. तोफांच्या माऱ्यानें सर्व वातावरण भाजून निघून तेथें No man's land उत्पन्न होते. चिटपांखरूंसुद्धां तेथें जिवंत रहात नाहीं. मग माणसाची काय कथा ? जमीन भाजून काढल्यानंतरच पेरणी करतात ना ? टिळकांना त्यांच्या शत्रूंनीं तोफेची उपमा दिली असती तर ती जास्त समर्पक झाली असती. टिळकांच्या शत्रूंनींदेखिल त्यांची राजकीय कामगिरी पाहून असें म्हणावयास पाहिजे होतें कीं, " वा; अहो, टिळक म्हणजे केवढी तोफ ! "

असो. टिळकांच्यावरील आक्षेपांचा कांहीं मी आज येथें विचार करणार नाहीं. कारणपरत्वें म्हणून येवढ्या एकाच आक्षेपाबद्दल बोललों. मीं आपणांस जी गुणमाला सांगितली त्यांतला मुख्य गुण कोणता हें आपणांस पहावयाचें आहे.

जगामध्यें रुचिवैचित्र्य आहे. अर्थात् कोणाला हा गुण विशेष आवडेल तर कोणाला तो आवडेल. पण माझ्या मतानें ज्योतिषी ज्याप्रमाणें कुंडलींतील ग्रहांवरून एक 'मुंथाग्रह' किंवा संकीर्णग्रह काढतात त्याप्रमाणें मीं एक संयुक्त गुण काढला आहे. संयुक्त गुण म्हणजे तुमच्या भाषेंत 'The resultant of so many forces'. माझ्या मतें टिळकांचे मुख्य गुण म्हणजे निःस्वार्थीपणा, पराक्रम व धैर्य आणि उद्योगीपणा. या चार गुणांचा संयोगामुळेंच त्यांचें आयुष्य इतकें प्रभावी झालें. या गुणमिश्रणालाच इंग्रजींत 'Practical Power' असें म्हणतात.

निःस्वार्थीपणापासूनच त्यांचें चरित्र सुरू झालें म्हणून तो गुण सांगण्याची जरूरी नाहीं. टिळकांचें धैर्य असामान्य होतें. त्यांचें धैर्य केवळ प्रसंगापुरतें होतें असें म्हणणारे कांहीं लोक आहेत, परंतु मी निकट सहवासामुळें खात्रीनें असें सांगू शकतों कीं, जितका जोरानें निराशेचा आघात होत असे, तितक्याच जोरानें किंबहुना त्याच्यापेक्षां जास्त जोरानें टिळक आपल्या कार्याला पुनः सुरवात करीत. त्यांच्या धैर्याविषयीं एकदोन गोष्टी सहज आठवल्या म्हणून त्या सांगतों. शिक्षा होण्यापूर्वी अर्धा पाऊणतास ते आपल्या स्नेह्यांशीं गप्पागोष्टी व विनोद करीत बसले होते. व तो विनोद ओढूनताणून आणलेला नसून अगदीं खरा व मनापासूनचा होता. नंतर खटल्याचा शेवटचा निकाल ऐकण्याकरितां आम्ही चौघेजण चौचाकींतून कोर्टांत जावयास निघालों. निकाल काय होणार याचें स्वप्न त्यांना पडलेंच होतें; पण अशा प्रसंगींसुद्धां त्यांनीं विनोदानें म्हटलें कीं, "जातांना आपण चौघेजण आहोंत. येतांना घोड्याचें ओझें एका माणसानें तितकेंच कमी होईल!" तसेंच १९०८ सालीं त्यांच्यावर खटला झाला. त्यांत शेवटचे दिवशीं त्यांच्याकडला एक वकील हजर नव्हता. स्नेह्यांनीं विचारलें, "त्यांच्याबद्दल दुसरे दोन वकील देऊं का?" टिळकांनीं उत्तर केलें, "दुसरे दोन वकील आणून काय उपयोगी? एकाद्या मुलीला वीस वर्षांचा नवरा पाहून देण्याऐवजीं दहा दहा वर्षांचीं दोन मुलें तिच्यापुढें उभीं करावीं! असें केलें तर चालेल काय?" (हंशाच हंशा) असो. यावरून त्यांचें मन किती निष्काळजी व संकटाविषयीं बेफिकीर असे तें दिसून येतें.

टिळकांच्या अतुल पराक्रमामुळेंच लोकांवर त्यांची इतकी छाप बसली. वास्तविक पहातां ते तुरुंगांत गेले हा पराक्रम असें मी म्हणणार नाहीं. त्यांना तुरुंगांत घालण्याची बुद्धि सरकारला ज्या कारणामुळें झाली तें कारण म्हणजे त्यांचे तेजस्वी लेख हा पराक्रम होय. "नो मॅन इज ए हीरो टु हिज व्हॅलेट डी चेंबर" अशी एक इंग्रजींत म्हण आहे. म्हणजे "राजाचें मोठेपण त्याच्या खासगी नोकराला काय?" परंतु टिळकांच्या बाबतींत तसें म्हणतां यावयाचें नाहीं. तुमच्या ज्यूलियस सीझर नाटकांतच अशाविषयीं एक प्रसंग आहे:— कॅशस हा ब्रूटसचें मन सीझरविरुद्ध वळवीत असतो व ते दोघे बोलत असतात. त्यांत कॅशस हा ब्रूटसला म्हणतो, "अरे, हा सीझर इतका मोठा कशानें झाला? वास्तविक हा तुझ्या-

माझ्यासारखा यःकश्चित् मनुष्य ! सर्व जगानें याच्या मोठेपणाकडे येवढें स्तिमित होऊन पहावें असें याच्यामध्यें आहे काय ? मी व हा एकदां स्पेनमध्यें स्वारीवर गेलों असतां याला तेथें ताप आला; तेव्हां हा–हाच सीझर एकाद्या दीनदुबळ्या पोरीप्रमाणें मजपाशीं म्हणूं लागला कीं, 'कॅशस मला ताप आलारे'! तसेंच पूर्वी लहानपणीं सीझर व मी टायबर नदींत पोहावयास पडलों असतां वाहतीला लागून हा सीझर बुडूं लागला तेव्हां याला मीं—मीं वांचवला ! असें असतां सीझर मोठा कशानें झाला ? अशा यःकश्चित् साधारण मनुष्याला तुम्ही एवढा थोर समजतां !" पूर्ववयांत एके काळीं टिळकांच्या बरोबर असणाऱ्या कांहीं व्यक्तींना त्यांच्या उत्कर्षा-बद्दल असेंच वाटे. परंतु टिळकांच्या सहवासांत चोवीस तास एकसारखा रहाणारा मनुष्यसुद्धां टिळकांच्या गुणांची तारीफ केल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून, मी पुन्हा म्हणतों, टिळक वॉज ए हीरो टु हिज व्हॅलेट डी चेंबर ! रानडेदेखील टिळकांच्या कांहीं गुणांचें प्रेमानें वर्णन करीत.

---

# केसरीवरील खटल्यासंबंधीं विलायतेंतील लोकमत

केसरी, ता. १८ ऑगस्ट १९०८

लो० टिळक यांच्या खटल्याचा निकाल होऊन आज जवळ जवळ चार आठवडे होत आले. दरम्यान सदर खटल्याचे निकालासंबंधानें हिंदुस्थानांतील प्रमुख लोकांचें व वर्तमानपत्रांचें मत काय आहे हें प्रसिद्ध झालेंच आहे; व त्यावरून पाहतां टिळकांवरचा खटला केवळ आकसानें करण्यांत आला, दोषारोप केलेल्या लेखांत राजद्रोहात्मक असें कांहीं एक नव्हतें; आणि खटल्याचे आद्यंत व न्या० दावर यांनीं दिलेली घोर शिक्षा या गोष्टी न्यायदेवतेच्या तोंडास काळोखी आणण्यासारख्या होत्या; हे सिद्धान्त आतां हिंदुस्थानांतील लोकमतानें सिद्ध झाले आहेत असें घेऊन चालण्यास हरकत नाहीं. विशेषतः ध्यानांत ठेवण्याची गोष्ट ही कीं, ज्यूरींतील बहुमतास कायद्याचे व न्यायाचे दृष्टीनें जें महत्त्व आहे असें मानण्यांत येतें त्याहून अधिक महत्त्व या लोकमतास दिलें पाहिजे. व वस्तुतः तें तसें आहेहि. ज्यूरींतील साता तोंडांच्या न्यायदेवतेकडे बोट दाखवून टिळक दोषी ठरले हा न्याय झाला. आतां त्यावर कोणीं कांहीं बोलतां कामा नये, असें जर सरकार म्हणूं लागेल, तर त्याला लोकांसही असें उत्तर देतां देईल कीं, 'एकतर ही ज्यूरीस्वरूपी न्यायदेवता आपसांत दुमत होऊन भंग पावलेली

आहे, व कोणचीहि भंगलेली मूर्ति हिंदु लोकांस आदरणीय होत नाहीं; व दुसरें असें कीं, फक्त सात व्यक्तींनीं निवडलेला न्याय जर लोकांचें तोंड बांधूं शकतो, तर ज्या लोकसमाजाचें ज्यूरी हें एक केवळ उपलक्षण आहे त्या सहजासन विराटस्वरूपी न्यायदेवतेनें निवडलेल्या न्यायानेंहि सरकारचें तोंड तितक्याच प्रमाणानें अधिक बांधलें गेलें पाहिजे हें उघड आहे. न्याय दोन प्रकारचे असतात. एक कायदेशीर न्याय व दुसरा परमेश्वराचे घरीं रुजू होईल तो न्याय. पैकीं हल्लींच्या खटल्यांत टिळक यांस जर न्याय मिळाला असें म्हणतां आलेंच तर तो फक्त 'कायदेशीर' न्याय होय; व कायदेशीर न्यायाची मीमांसा केली असतां असें दिसून येईल कीं, बहुधा तो सर्व गुळाचाच गणपती व गुळाचाच नैवेद्य अशांतलाच प्रकार असतो. टिळकांस 'कायदेशीर' न्याय देणारा न्यायाधीश सरकारनें नेमलेला असून सरकारचें निमक खाणारा होता; तसेंच तो न्याय देणारे सात ज्यूरर्स लोक परकीय, विधर्मी, विदेशी आणि हिंदुस्थानांतील लोकांचें हितशत्रुत्व करणाऱ्या वर्गापैकीं म्हणजे अँग्लो इंडियन होते हें विसरतां कामा नये. १२४ (अ) कलमाचे दृष्टीनें पाहतां ज्यूरींतील सात लोक राज्यकर्त्यांचे जातभाई आणि म्हणून अंगांगीभावानें सरकारशीं एकजीव व एकरूप असलेले असे होते. व १५३ (अ) कलमासंबंधानें पाहतां हे लोक वस्तुतः स्वतःच फिर्यादी असून क्षणभर न्यायासनावर आरूढ झाले होते असेंच म्हणावें लागतें: या न्यायाधीशानें व या ज्यूरीनें अंमलांत आणलेल्या कायद्यांच्या कलमाची भाषा लोकमतास कधींहि संमत नव्हती व ती ठरवितांना लोकांचें मत घेतलेलें नव्हतें. एवंच अशा प्रकारचा 'कायदेशीर' न्याय हा मुळीं न्यायच नव्हे असें मानण्यास हरकत नाहीं. लोकमतानें दिलेला न्याय याहून वरच्या पायरीचा असतो. लोक-समाजामध्यें जर कांहीं दैविक अंश आहे असें मानलें तर टिळक यांचे खटल्यासंबंधानेंहि लोकसमाजानें दिलेला न्याय व तोच काय तो परमेश्वराचे घरीं रुजू होईल असें म्हणणें प्राप्त होतें. केवळ कांहीं एका विशिष्ट रंगाचा व आकाराचा झगा आंगांत घातल्यानें ज्याप्रमाणें कोणीहि मनुष्य सर्व मानवी विकारांपासून अलिप्त होऊन निःपक्षपाती न्यायाधीश बनूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें आरोपी-संबंधाच्या बातम्या नित्य कर्णोपकर्णीं ऐकून त्याचें शत्रुत्व करणाऱ्या व स्वतःच्या आप्तइष्टांनीं चालविलेल्या वर्तमानपत्रांतील विषारी लेख प्रत्यहीं वाचवाचून ज्यांच्या मनावर प्रतिकूल ग्रह व अभिनिवेश यांचीं पुटावर पुटें चढलीं आहेत अशा लोकांस न्यायमंदिरांत एका विशिष्ट ठिकाणीं उभारलेल्या लाकडी पिंजऱ्यांत बसविल्यानें ते ईश्वराचे घरीं पटण्यासारखा चोख न्याय करण्यास पात्र होतील हेंहि अशक्य आहे. परंतु अशाच लोकांनीं केलेला न्याय हा जर 'कायदेशीर' व म्हणून ग्राह्य असें म्हणतां आलें तर, ज्या अखिल जनसमाजापैकीं न्यायमूर्ति दावर व टिळकांस दोषी ठरविणारे सात युरोपियन ज्यूरर्स हे मिळून केवळ आठ

रजःकण भरतात त्या जनसमाजानें आपल्या इतर अनंत मुखांनीं वदविलेला न्याय तोही यथाप्रमाण अधिक ग्राह्य कां मानतां येऊं नये ?

हिंदुस्थानांतील लोकमतानें रा० टिळक हे निर्दोषी आहेत व त्यांस न्याय मिळाला नाहीं हें सिद्ध असल्याचें वर दर्शविलेंच आहे. परंतु गेल्या विलायतच्या डांकेनें जे कागदपत्र इकडे आले आहेत त्यांवरून पाहतां तिकडेही बहुमतानें रा० टिळक निर्दोषी आहेत असेंच लोकमत असल्याचें उघड दिसून येतें. हिंदुस्थानांतील इंग्रजीं पत्रें हीं ज्यांचें प्रतिबिंब मानितां येईल अशीं राजपक्षपाती व प्रजाद्रोही वर्तमानपत्रें विलायतेंत आहेत. परंतु त्यांत देखील टिळकांचे लेखांतील भाषा, त्यावर केलेला दोषारोप सर्वस्वी व विनतक्रार शाबीत होण्यासारखीं होती असें कोठेंही म्हटलेलें नाहीं. अशा वर्तमानपत्रांपैकीं मूर्धाभिषिक म्हटला म्हणजे लंडन टाइम्स. सरकारचे तर्फेनें व टिळकांचे विरुद्ध जें कांहीं कधीं म्हणतां येण्यासारखें असेल तें सर्व शक्य तितक्या जोरानें व शेलक्या शब्दांनीं लंडन टाइम्समध्यें हटकून सांपडावयाचेंच हा सिद्धांत. असें असतां टिळकांस शिक्षा झाल्याच्या दुसरेच दिवशीं लंडन टाइम्समध्यें जो विस्तृत व व्यापक असा अग्रलेख प्रसिद्ध झाला त्यावरून पाहतां टिळकांच्या शत्रूंच्या या अग्रणीस देखील गुळमुळीत भाषा वापरावी लागली, व आपल्या युक्तिवादांतला कमीपणा त्यास केवळ रागाच्या आविर्भावानें व असंबद्ध अशा गप्पा झोंकून भरून काढावा लागला. टाइम्स म्हणतो कीं, टिळकांस झालेली शिक्षा कांहींशी कडक दिसते खरी. कारण मुंबई व कलकत्ता येथील कित्येक पत्रांतून, युरोपियन लोकांचा रक्तपात करण्याची लालसा प्रकट करणारे उघड लेख प्रसिद्ध होत होते, तशांतला टिळकांचा हा लेख नव्हता. पुराव्याच्या कायद्याच्या दृष्टीनें पाहतां टाइम्सचें हें विधान कबुलीदाखल व टिळकांस अनुकूल म्हणून ग्राह्य धरलें पाहिजे व शिक्षेच्या कडकपणासंबंधानें लोक व टाइम्स यांची ही अशीं एकवाक्यता आहे. परंतु सहा वर्षें काळ्या पाण्याची शिक्षा ही कडक नाहीं असें म्हणण्याची जरी टाइम्सची छाती होत नाहीं तरी या बाबतींत ज्या इतर असंबद्ध गोष्टींचा टाइम्सनें उल्लेख केला आहे त्यावरून त्याच्या मनाचा विषारीपणा उघड दिसून येत आहे. टिळकांचे लेख जर इतर लेखांसारखे वाईट नव्हते तर टिळकांसच इतर लेखकांहून अधिक शिक्षा कां ? या प्रश्नाचें उत्तर जें टाइम्सनें दिलें आहे तें मासलेवाईक आहे. टाइम्सला हें कबूल आहे कीं, बंगाल्यांतील अत्याचारांचें ज्ञान टिळकांस यत्किंचितूही होतें असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं; त्यांनीं आपल्या टेबलाच्या खणांत सांपडलेल्या कार्डाचा खुलासा केला तो कांहीं वावगा नव्हता; अरविंद बाबू वगैरेवरील गुप्त मसलतीच्या आरोपाची जी चौकशी चाललेली आहे तिजमध्यें फक्त टिळक यांचें एकच पत्र सांपडलें, व त्यांत झालें तरी राष्ट्रीय सभेचे प्रसंगीं सुरतेस कांहीं चांगले वक्ते पाठवावे एवढा

मजकूर होता; आणि राजद्रोह फैलावण्यासारखी भाषा वापरण्याच्या तो-हमतीशिवाय त्यांजविरुद्ध इतर बाबतींत कोणास ब्रही काढतां यावयाचा नाहीं, हें लंडन टाइम्सला कबूल आहे. टिळकांच्या लेखांतील भाषेंत राजद्रोह नव्हता किंवा युरोपियन लोकांचा रक्तपात करण्यास उत्तेजन दिलेलें नव्हतें; परंतु जें शब्दांत नव्हतें तें तात्पर्यांत होतें. लेखांची भाषा नेमस्त होती, पण हें नेमस्त-पणाचें सोंग होतें, व या कारणाकरितां युगांतरापेक्षांही केसरीचे लेख लंडन टाइम्सला अधिक भयंकर वाटतात! लेखांतील भाषेंत राजद्रोह मुळींच नाहीं, पण टाइम्स तो वस्तुतः आहे असेंच गृहीत धरणार! कारण काय तर पौर्वात्य लोक हे कोणतीही गोष्ट उघड बोलत नाहींत ते पर्यायोक्तींत फार प्रवीण अस-तात, असें लोक म्हणतात म्हणून! जें भाषेंत नसतें तें त्यांच्या मनांत असतें; ते गूढार्थप्रीय असतात; आणि म्हणूनच त्यांचें लिहिणें स्पष्टोक्तीपेक्षां अधिक घातक असतें. टिळकांनीं जागजागीं आपल्या विधानाच्या मर्यादा उत्तम रीतीनें रेखा-टल्या आहेत; व अशा रीतीनें त्या विधानाची खरी व्याप्ति काटेतोलपणानें लोक-निदर्शनास आणिलेली आहे ही गोष्ट लंडन टाइम्सला कबूल आहे; परंतु या पत्र-काराच्या दृष्टीनें पाहतां टिळकांच्या या सूक्ष्मपणाच्या लेखनकलेंतच काय ती पठाडी गोम आहे! लेखक या नात्यानें टिळकांचें कौशल्य तेंच त्यांच्या पापी मनाचें मुख्य घोतक! त्यांच्या कलमाच्या सफाईचा जो गुण तोच त्यांच्या मनाचा व कृतीचा मुख्य दोष! टिळकांनीं जपून लिहिलें आहे; पण तें कां? तर त्यांना जपण्यासारखें कांहीं आहे असें वाटलें म्हणून! टिळकांनीं बंगाल्यांतील अत्याचा-चारांचा उघडपणें निषेध केला आहे, पण तो कां? तर तो आपण अत्याचारास अनुकूल आहोंत असा संशय येऊं नये म्हणून! तात्पर्य, टाइम्सच्या एकंदर लेखांत या अशाच तऱ्हेच्या युक्तिवादाचा अंगिकार केलेला आहे, व त्याचा मथि-तार्थ एका वाक्यांत सांगावयाचा असतां तो असा सांगता येईल कीं, लंडन टाइ-म्सच्या मताप्रमाणें रा. टिळक यांनीं राजद्रोहाचा आरोप लागू होईल असे लेख ता० १२ मे व ९ जून या तारखांचे केसरींत कां लिहिले नाहींत? तर असे लेख लिहिल्यानें आपल्या राजद्रोही मनाचा सुगावा सरकारास लागेल म्हणून! म्हणजे लेख जरी राजद्रोहात्मक नाहींत, तरी मन राजद्रोही आहेना? व असें मान-ण्यास कारण काय? तर एकंदरीनें एशिया खंडांतील लोक पर्यायोक्तिप्रिय आहेत हें! लंडन टाइम्सच्या युक्तिवादाच्या या वरील वर्णनांत आम्ही काडीइत-कीही अतिशयोक्ति केलेली नाहीं. अर्थात् हा युक्तिवाद इतका अन्याय्य आहे कीं, त्याच्या योगानें वाटेल त्या मनुष्यावर वाटेल त्या गुन्ह्याचा आरोप करून त्यास अपराधी ठरवितां येईल; व ह्मणूनच आमच्या मतें तो युक्तिवाद इतका बेशरम-पणाचा आहे कीं, ज्या कोणाच्या मनांत यत्किंचितही सत्यप्रियता किंवा न्यायबुद्धि जागृत असेल त्याच्या मनास अशा प्रकारच्या युक्तिवादाची खंतीच

चाटली पाहिजे, आमच्या मतें या युक्तिवादामुळें लंडन टाइम्सनें एकाऐवजीं दोन गुन्हे केले आहेत. एक तर पौर्वात्य लोकांबद्दल ते ' पर्यायोक्तिप्रिय ' आहेत असें म्हणून स्वतः पर्यायोक्तीनेंच त्यांस अप्रामाणिक म्हटलें आहे; व दुसरें असें कीं, अशा तऱ्हेनें सबंध राष्ट्राची अब्रू खराब करण्यासारख्या कल्पनेचा आधार घेऊन केवळ त्याचे जोरावर रा० टिळक यांनीं लिहिलेल्या विवक्षित लेखांत राजद्रोहकारक भाषा नसतांही ते लेख राजद्रोहीमनानें प्रेरित झाले होते असें दर्शविलें आहे. जणू काय मीमांसाशास्त्राचे नित्य व अबाधित नियम युरोपियन लेखकांच्या लेखांसच लागू होतात व त्यांसच ते समजतात, आणि पौर्वात्य लोकांस मात्र अर्थमीमांसा कशाशीं खावी हें देखील कळत नाहीं ! लंडन टाइम्सचा हा युक्तिवाद खुद्द इंग्लंडमध्यें देखील पुष्कळ लोकांना पसंत पडणार नाहीं, हें तो पक्कें जाणून होता असें दिसतें. कारण अशा लोकांस उद्देशून म्हणून त्यानें असें लिहिलें आहे कीं, इकडील म्हणजे विलायतेंतील लोकांस टिळकांच्या लेखांत राजद्रोह नव्हता असें भासेल. परंतु तो विषयच मुळीं त्यांना कळण्यासारखा नाहीं. जणू काय राजद्रोहाची खरी कसोटी लावणारी व टिळकांच्या अंतरंगाच्या अंतरंगांतील हितगुजाचा बिनचूक वेध करणारी दिव्य दृष्टी सातांसमुद्रांपलीकडे असणाऱ्या फक्त एका टाइम्सच्या लेखकास, व मुंबई हायकोर्टाच्या मुख्य दालनांतील लांकडी पिंजऱ्यांत तारीख १३ ते २२ जुलैपर्यंत बसणाऱ्या साततोंडी युरोपियन ज्यूरीसच काय ती ईश्वरानें दिली होती, व बाकीच्या सर्वांचे डोळे फुटले होते, आणि या दिव्य दृष्टीस ईश्वरानें त्यास मुकविलें होतें. परंतु या सर्व युक्तिवादाचें मर्म ज्यास कळणार नाहीं असा दूधखुळा कोणीं असेल असें आम्हांस वाटत नाहीं. हें सर्व मर्म टाइम्सकाराच्या एका वाक्यांत सांठविलेलें आहे. तें वाक्य असें कीं, रा. टिळक यांस जी शिक्षा झाली तिचें ' महत्त्व ' ते जहाल पक्षाचे मूर्धाभिषिक्त पुढारी आहेत या गोष्टींत आहे. आमच्या मतें ज्या गोष्टीवरून टिळकांस झालेल्या शिक्षेचें महत्त्व टाइम्सला वाटतें तीच गोष्ट सर्वस्वी त्यांचे शिक्षेस कारणीभूत आहे. म्हणजे त्यांस शिक्षा झाली ती त्यांचे लेख राजद्रोहात्मक होते म्हणून झाली नाहीं तर राष्ट्रीय पक्षाचे ते खरे पुढारी होते म्हणून ! टाइम्सनें कार्यकारणभावाची अदलाबदल केलेली दिसते. टाइम्स म्हणतो त्याप्रमाणें, टिळकांस शिक्षा झाली म्हणून, त्या शिक्षेचें महत्त्व आहे असें नव्हे; तर खरें बोलावयाचें म्हटलें म्हणजे टिळकांचें महत्त्वच तसें होतें म्हणून त्यांस असली शिक्षा देण्यांत आली. टिळकांच्या शिक्षेस महत्त्व असेल, परंतु तें महत्त्व आमच्या मतें या कारणामुळेंच प्राप्त होतें. सर्व हिंदुस्थानांत टिळक हेच या क्षणीं सर्वांत प्रबळ असे पुढारी होते. राजकीय संग्रामांत त्यांचा हात धरणारा दुसरा कोणी दिसत नव्हता; व सर्व हिंदुस्थानांत त्यांच्या इतका लोकप्रिय किंवा वजनदार गृहस्थ प्रजा-

पक्षाकडे नव्हता हें लंडन टाइम्सनें उघड म्हटलें आहे. व त्यांच्या शिक्षेचें झालें तरी तेंच कारण होय.

लंडन टाइम्सचें मत वगळलें असतां मात्र बाकी विलायचें लोकमत बहुतांशीं राजश्री टिळक यांस अनुकूल आहे. त्यांतल्यात्यांत मि. कॉटन, मि. हिंडमन, मि. केरहार्डी वगैरेनीं आपापल्या रीतीनें उघडपणें रा. टिळक यांचें समर्थन केलें असून मॉर्निंग लीडर, स्टार वगैरे पत्रांनीं मार्मिक लेख लिहून केसरीवरील खटल्याचे दोष दाखविले आहेत. मि. कॉटन यांनीं 'न्यूएज' नामक लिबरल पत्रांत एक स्वतंत्र लेख लिहून टिळक यांचें व आयर्लंडचे प्रसिद्ध दे. भ. मि. पार्नेल यांचें साम्य दाखविलें आहे. ते म्हणतात इंग्लिश लोकांना स्वातंत्र्यप्रीती आवडते खरी, पण त्यांना ती कोणी आपल्या स्वतःच्या अंमलाखालीं प्रकट केलेली खपत नाहीं. "परभारें आणि पावणेबारा" असें असलें म्हणजे मग ते स्वातंत्र्यप्रीतीचें कौतुक करतात. पण, हिंदुस्थानांत पहावें तों 'निर्दोष व परमन्याय,' अशा ब्रिटिश अंमलाखालीं पार्नेलच्या बरोबरीचा असा टिळकांसारखा देशभक्त खुनी, बदमाष, व खिसेकापू लोकांच्या संगतींत काल काढण्याकरितां साहा वर्षें अंदमानांत पाठवला जातो !

टिळकांसारखा वक्ता व धीरोदार महात्मा इतर कोणत्याही युरोपियन राज्यांत असता तर; त्याची देशभर वाहवाच झाली असती; पण टिळक पडले इंडियन व यामुळें टिळकांना झालेल्या अन्यायाची कल्पना इंग्लिश मनुष्यास कशी करतां येणार ? टिळक बंडखोर नव्हते, परंतु इंग्रजांच्या मनःसमुद्राला उदारपणाचें भरतें आपल्या आपण होऊन येईल तेव्हां येवो, तों पर्यंत हात जोडून स्वस्त बसावयाचें असें म्हणण्याचे दिवस आतां उरले नाहींत असें मात्र त्यांचें मत आहे. व या त्यांच्या मतास देशांतील सर्व तरुण पिढीकडून मान मिळूं लागला आहे. मि. हिंडमन यांनीं तर खुद्द लंडनटाईम्सला पत्र लिहून त्यांत असें म्हटलें आहे कीं, टिळकांच्या लेखासारख्या लेखाकरतां जर लेखकास ६ वर्षें काळें पाणी भोगावें लागणार तर हिंदुस्थानांत आमच्या राज्यकारभाराविरुद्ध मुळीं एका शब्दानेंही कसलीच टीका करण्याची परवानगी आम्हीं देत नाहीं असेंच सरकार एकदम कां सांगून टाकीत नाहीं. टिळकांस झालेली शिक्षा अन्यायाची आहे व हा सर्व खटला ब्रिटिशन्यायपद्धतीच्या विरुद्ध आहे, असें असून इंग्रजी न्यायाच्या नांवाखालीं असलीं निर्लज्जपणाचीं कृत्यें दिवसाढवळ्या घडून येत आहेत हे पुढील दोनचार महिने पर्यंत इंग्लंडांतील मोठमोठ्या शहरामधून कंठरवानें मी सांगत फिरणार आहें असें हिंडमन यांनीं टाइम्सच्या द्वारें सर्वांस बजावलें आहे. मि॰ केरहार्डी यांनीं लेबरलीडर नामक आपल्या पत्रांत टिळकांवरील खटल्यास नांवें ठेवून असें ध्वनित केलें आहे कीं, राजद्रोह हा टिळकांचा खरोखर गुन्हा नसून हिंदुस्थानांतील मजूरपक्ष व प्रचंड शेतकरी वर्ग यांच्याशीं साहानुभूती बाळ-

गून त्यांची उन्नती करण्याची खटपट रा. टिळक यांनीं केली, हाच त्यांचा मुख्य गुन्हा दिसतो. स्टार नामक लिबरल पत्रानें असें लिहिलें आहे कीं, "टिळकांसारखे प्रसंग राष्ट्रांतील पुढाऱ्यांवर यावयाचेच. फिनिक्स पार्कमधील खुनानंतर पार्नेलची खुनी लोकांशीं सहानुभूती नव्हती हें खरें मानणें इंग्लिश लोकांस पुढें कित्येक दिवसपर्यंत अवघड वाटत असे व हिंदुस्थानांत बॉम्ब उडाल्यामुळें टिळकांचीही तीच स्थिती झाली. परंतु टिळकांनीं शिक्षा सांगतेवेळीं उच्चारलेले गंभीर शब्द प्रामाणिक व उदार मनुष्यास शोभतील असेच आहेत. शिवाय, टिळकांचा गुन्हा केवढाही मोठा असला तरी सरकारची जबाबदारी त्यामुळें कमी होत नाहीं. बॉम्ब गोळे उडण्याचे थांबावे असें असेल तर खटले करून भागणार नाहीं, राजकीय सुधारणा करून लोकांस हक्क दिले पाहिजेत; इंडिया पत्रानें असें म्हटलें आहे कीं, इंग्रजी न्यायदेवतेच्या निःपक्षपातीपणाचें उदाहरण म्हणून केसरीवरील खटला हा कोणालाही पुढें आणतां यावयाचा नाहीं. या खटल्याचे योगानें पश्चिम हिंदुस्थानांत तरी सनदशीर चळवळ व सुधारणा यांचे कार्यास भयंकर हानी झालेली आहे. मॉर्निंगलीडर नांवाच्या लिबरल पत्रानें असें मत दिलें आहे कीं, टिळक ही एक व्यक्ती नसून त्यांजमध्यें दैवी प्रेरणेचें बीज आहे. त्यांमुळें त्यांना आपल्या मार्गांतून कांहीं काळ जरी सरकारास दूर करतां आलें तरी त्याचा काय उपयोग ? पुण्यांत टिळक असल्यानें जर ते सरकारास भयप्रद वाटले असतील; तर अंदमानमध्यें घालविल्यानें त्यांजपासून उत्पन्न होणारी भीति कमी न होतां तिचीं पाळेंमुळें खोल शिरतील व तिचें स्वरूप अधिक सूक्ष्म परंतु अधिक भयंकर होईल ! वर जें हें विलायतेंतील लोकमत सांगितलें तें लंडनटाइम्ससारख्या प्रतिपक्षीय वर्तमानपत्राच्या द्वारें टिळकांच्या लेखांचें जें स्वरुप व त्यांच्या खटल्याची जी हकीकत प्रसिद्ध झाली तेवढ्यावरूनच बनलेलें आहे; रा. टिळक यांचे हे लेख आणि खटल्याची समग्र हकीगत अक्षरशः विलायतेंतील लोकांच्या हातीं पडेल तर सरकाराविषयीं प्रतिकूल व टिळकांविषयीं अनुकूल असा त्यांचा आधींच असलेला ग्रह दुणावेल, याबद्दल आम्हांस तरी शंका वाटत नाहीं या संबंधानें पार्लमेंटांत जीं प्रश्नोत्तरें झालीं त्यांमध्यें मि. केरहार्डी व सर हेन्रीकॉटन यांनीं असिस्टंट सेक्रेटरी मि० बुकॅनन यांस "रा. टिळकांच्या लेखांचीं भाषांतरें पार्लमेंटपुढें ठेवण्यांत येतील काय ?" असें विचारलें परंतु त्यास निवळ नकारार्थी जबाब मिळाला; व या एका गोष्टीवरूनही सरकारचा या खटल्याचे निकालावर कितपत भरंवसा आहे हें दिसून येणार आहे. असो, शेजीबाईनें कोंबडा झांकला म्हणून सूर्य उगवावयाचा रहात नाहीं, या न्यायानें सरकारी रीतीनें नाहीं तर खासगी रीतीनें तरी रा. टिळकांचे समग्र लेख व खटल्याची हकीकत पार्लमेंटाच्या

सभासदांपुढें जाईल, व विलायतेंतील अनुकूल लोकमताचा प्रवाह लवकरच अधिक प्रबळ होईल यांत शंका नाहीं.

---

## टिळक सुटले !

केसरी ता० २३ जून १९१४

गेल्या आठवड्याचा केसरी जेव्हां, आमच्या हातावेगळा झाला तेव्हां, पुढील अंक निघण्यापूर्वी लो० टिळक यांची सुटका होईल आणि ती आनंददायक वार्ता या अंकीं प्रसिद्ध करावयास मिळेल, अशी आह्मांला कल्पनाहि नव्हती. पण ती गोष्ट अवघ्या चोवीस तासांचे आंतच घडून आली. टिळक लवकर सुटणार अशाविषयीं जरी स्पष्ट चिन्हें दिसत होतीं, तरी त्यांच्या सुटकेची नक्की तारीख कोणासच कळलेली नव्हती. टिळक मंडाले येथून जरी ता. ८ रोजीं निघाले तरी, ते पुण्यास ता. १७ रोजीं मध्यरात्रींनंतर त्यांच्या घरच्या दरवाजापुढें येऊन उभे राहीपर्यंत त्यांच्या सुटकेची विश्वसनीय अशी बातमी कोणासच कळली नाहीं; आणि ही ' गुप्त बातमी ' सर्वस्वी गुप्त ठेवण्याचें यश सरकारी अधिकाऱ्यांनीं संकल्पाप्रमाणें पदरांत पाडून घेतलें याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. कोणत्याही पद्धतीप्रमाणें हिशोब केला तरी पुण्यास १७ व्या तारखेस टिळकांचें येणें व्हावें हें भविष्य वर्तवितां येण्यासारखें नव्हतें. लोकांची अपेक्षा सफशेल फसंविणें ही राजकारणांतर्गत एक उपकला आहे; व तिचाच अनुभव प्रस्तुत प्रसंगीं आला. कसेंहि असो; मागच्या शिक्षेपैकीं राहिलेले सहा महिने सरकार भरून घेईल ही जी सकारण किंवा निष्कारण भीति कित्येकांस होती ती खोटी ठरून, शिवाय शिक्षेच्या तारखेपासून मोजली असता भरणाऱ्या सहा वर्षांच्या आधीं पांच आठवडे तरी टिळकांची सुटका सरकारानें केली ही तितक्या पुरती सरकारची मेहेरबानीच म्हटली पाहिजे. टिळकांस शिक्षा देतांना न्याय–मूर्ती ( त्यावेळचे साधे मिस्तर व त्यानंतरचे सर ) दिनशा दावर यांनीं टिळकांस उद्देशून असे शब्द वापरले होते कीं, "ज्या देशावर प्रीति करण्याचा तुमचा बाणा किंवा बहाणा आहे ( Profess या शब्दाचा बाणा किंवा बहाणा करणें या पैकीं वाटेल तो अर्थ होतो), त्या देशाच्या कल्याणाकरितांच तुम्ही ' कांहीं थोडा काळ' देशाबाहेर राहणें इष्ट आहे." तो इष्ट काल ता. २२ जुलै रोजीं संपणार होता; पण त्याच्या आधीं पांच आठवडे टिळकांस सोडल्यानें ' टिळकांच्या देशाच्या ' कल्याणास कांहीं मोठासा विघात होणार नाहीं असें ठरविण्यांत सरकारानें उदारपणाच दाखविला म्हणावयाचा ! कारण गेल्या सहा

वर्षांत अनेक बऱ्या वाईट प्रसंगां–निमित्त अनेक कैदी सोडण्यांत आले. इतर कित्येकांना शिक्षेची स्पेशल सूट देण्यांत आली; व दहा वर्षें शिक्षा झालेला कैदी अवघ्या तीन साडे तीन वर्षांत सुटून घरीं आल्याचेंहि उदाहरण दाखावेतां येईल, नाहीं असे नाहीं. स्वत: टिळकांची शिक्षा काळे पाण्याची, असें मानलें तरी त्यांना दरमहा कांहीं दिवस बाद मिळून सहा वर्षांत त्यांचे सहा महिने कमी व्हावयास पाहिजे होते. पण टिळक असामान्य व्यक्ति या सबबीवर, त्यांच्याशीं कैदेचे दिवस भोगण्यांतही अनन्यसामान्य अशीच वागणूक ठेवण्याचा सरकारचा नियम मुळापासून असून तो त्यांनीं पाळलाहि.

न्या. दावर यांनीं काळेपाण्याच्या शिक्षेचा संकल्प सोडतांना 'कांहीं थोडा काळ' अशा साध्या व मृदु शब्दांची योजना आपणाकडून केली होती खरी; परंतु कोणताहि न्यायाधीश ज्या सर्व परिस्थितीचा विचार करून शिक्षा देतो, त्या परिस्थितींत आरोपींचें वय व शिक्षेचें स्वरूप यांचा परस्पर संबंध मात्र तो विसरतो असें मानतां येत नाहीं. यामुळें ५२ वर्षांचें वय झालेला टिळकांसारखा मनुष्य सहा वर्षें काळेपाणी भोगून जिवंत परत येईल, असें न्यायमूर्ति दावर यांस वाटलें असल्यास त्यांची मनोरचना खरोखर सर्वस्वी आनंदाकांक्षी ( optimistic ) असली पाहिजे असेंच म्हणावें लागतें. व सहा वर्षें देशाबाहेर तुरुंगाच्या सक्त एकांतवासांत काढूनहि टिळक जिवंत परत आले ही बातमी ऐकून इतरांप्रमाणें न्यायमूर्तींसहि मनापासून साश्चर्यानंद होईल यांत शंका नाहीं. असो; टिळक सहा वर्षेंपर्यंत देशांत राहिलेले सरकारास नको होते, व त्यांनीं तो आपला हेतु तडीस नेलाहि! पण टिळकांनीं सहा वर्षें केवळ शरीरानें देशत्याग करावा इतकीच सरकारची इच्छा नव्हती; तर त्यांनीं देशाला व देशानें त्यांना या मुदतींत पुरें विसरून जावें अशीहि त्यांची इच्छा असावी असें दिसतें. कारण या दोघांमध्यें जितकी उंच व अभेद्य भिंत बांधतां येईल तितकी बांधण्याची सरकारनें खबरदारी घेतली होती. इकडे, टिळकांची चित्रें बाळगणें, त्यांचीं पद्यें म्हणणें वगैरे गोष्टींना गुन्ह्याचें स्वरूप आणलें असून, त्यांच्या संबंधानें बरेंचसें स्फुट वाङ्मय सरकारजमा करण्यांत आलें होतें, तर तिकडे टिळकांना फक्त घरच्या माणसांच्या खुशालीपलीकडे बाहेरच्या जगाची कांहीं एक बातमी मिळूं नये, असा सक्त बंदोबस्त कसा करण्यांत आला होता, हें दुसरीकडे दिलेल्या त्यांच्या संभाषणांतील हकीकतीवरून दिसून येईलच. गुन्हा राजकीय स्वरूपाचा असला म्हणजे कैद्याला सरकारनें जांवयाप्रमाणेंच वागविलें पाहिजे असें कोणीहि म्हणत नाहीं. पण देशांतील कोणतीहि सार्वजनिक माहिती कैद्यास मिळूं नये असा सक्त निर्बंध घालण्याचेंहि कारण आहे असें आम्हांस वाटत नाहीं. असो; इतर रीतीनें टिळकांस कशा रीतीनें वागविण्यांत आलें याविषयीं त्यांनीं स्वत: सांगितलेली हकीकत दुसरीकडे दिलीच आहे. व एका शब्दांत सांगावयाचें तर असें म्हणतां

येईल कीं टिळकांस नुसती काळेपाण्याचीच नव्हे तर त्याचबरोबर एकांतवासाचीहि कैद भोगावी लागली. सरकारानें टिळकांचे खाण्यापिण्याचे हाल केले नाहींत ही गोष्ट खरी; व तेवढ्याबद्दल सरकारचे आभार मानले पाहिजेत. पण इतर बाबतींत त्यांचा बंदोबस्त फार सक्तीचा होता असें दिसून येईल.

आयर्लंदच्या इतिहासांत हिंदुस्थानच्या इतिहासाला ठिकाठिकाणीं दाखले मिळतात; व ज्यांना आयर्लंदचा वृत्तांत माहीत असेल त्यांना टिळकांचें नांव घेतांच डॅनियल ओकॉनेल याची आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं. डॅनियल ओकॉनेल यासही सरकारच्या अवकृपेमुळें राजकीय गुन्ह्याकरितां शिक्षा झालेली होती. पण त्याला शिक्षेनंतर कसें वागविण्यांत आलें याची हकीगत मौजेची व बोधप्रद असून आजच्या प्रसंगीं तिचा उल्लेख केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. ओकॉनेल यास एक वर्षाच्या साध्या कैदेची शिक्षा झालेली होती; पण केवळ दोषारोप शाबीत होऊन शिक्षा झाल्यानें आपणास जें काय हवें तें मिळालें असें समाधान वाटून शिक्षा भोगण्याच्या बाबतींत मात्र त्यास सर्व प्रकारची सवलत द्यावयाची असें सरकारनें ठरविलें. सर्व आयर्लंदांतील वाटेल तो तुरुंग तुम्ही पसंत करा असें ओकॉनेलच्या मित्रांस खासगी रीतीनें सांगण्यांत आलें, व त्यांनीं पसंत केलेल्याच तुरुगांत त्यास ठेविलें. तुरुंगांतील सोईची जागा त्यास मिळावी म्हणून जेलरलाच दुसरीकडे रहावयास सांगून जेलरचा बंगला या कैद्यास दिला. ओकॉनेलबरोबर शिक्षा झालेल्या इतर लोकांसही त्याजबरोबरच राहूं देण्यांत आलें होतें. या सर्व कैद्यांस बाहेरून हरतऱ्हेचा उत्तम खाना चहा फळफळावळ येत असे. ओकॉनेलकडून फक्त पळून न जाण्याचें वचन घेऊन सर्व तुरुंगाच्या आवारांत हिंडण्या-फिरण्यास त्याला मोकळीक दिली होती. व्यायाम घेण्याकरितां व करमणुकीकरितां तुरुंगांतील बगीचा त्यास बहाल करण्यांत आला होता. तेथें तो आपली नातवंडें घेऊन फुलझाडांच्या ताटव्यांत खेळत बसे! त्याला भेटण्याकरितां लोक नित्य येत; व बागेंत बसून तो त्यांच्या भेटी घेई, आपलें टपाल वाची व चहापार्ट्या देई! रोज नवा धर्मोपदेशक येऊन त्याची सकाळ-संध्याकाळची धर्मोपासना चालवी. तुरुंगांतील कैद्यास मानपत्रें घेऊं देणें म्हणजे शिक्षेची थट्टा होते, एवढ्याच हेतूनें सरकारानें त्याला तुरुंगांत फक्त मानपत्रें घेऊं दिलीं नाहींत! ओकॉनेलबरोबर तुरुगवास भोगणाऱ्या लोकांत वर्तमानपत्राच्या धंद्यांतले लोकच अनेक असल्यामुळें त्यांनीं तुरुंगांत 'जेलखाना-गॅझेट' नांवाचें वर्तमानपत्र सुरूं केलें. जाहीरसभांची हौस भागण्याकरितां बागेंतल्या एका उंचवट्यास 'तारागड' (Tara Hall) असें नांव देऊन फावल्या वेळीं एकानें त्यावर उभे राहून बोलावें व बाकीच्यांनीं ऐकावें असा खेळ ते खेळत! बाहेरच्या भक्त व मित्र मंडळाकडून त्यांच्यावर देणग्यांचा वर्षाव होत असे. एका संगीत-प्रिय मित्रानें तुरुंगांतील आपल्या या मित्राचा आत्मा संगीता-

मृताच्या ओलाव्याविणें सुकून जाईल कीं काय अशा भीतीनें या नऊ कैद्यांस प्रत्येकीं एकेक हार्मोनियमची पेटी पाठविली ! इतक्या अगत्यानें पाठविलेल्या भेटीचा सत्कार तसाच होणें योग्य होतें. म्हणून या हार्मोनियमच्या पेट्या तुरुंगांत जाऊन पोंचतांच, त्या नऊच्या नऊ उघडून या राजकीय कैद्यांनीं एकदम वाजविण्यास सुरुवात केली; तेव्हां आपल्या बंदिवानांच्या आपत्तीची ही सुरेल गोड वार्ता कानीं पडतांच, हा काय प्रकार आहे म्हणून पहावयास तुरुंगाचे अधिकारी धांवून आले ! वरील वर्णनांतील विनोद वगळला तरी, कांहीं विशिष्ट प्रकारच्या अपराध्यांची तुरुंगवासांतही विशिष्ट प्रकारचीच व्यवस्था ठेवणें जरूर व न्यायाचें असतें हें सुधारलेल्या समाजांनीं मान्य केलेलें तत्व अनुभवसिद्ध करण्याइतका पुरावा वरील हकीकतींत आहे.

तथापि, झाल्या गेल्या गोष्टी बोलण्यांत आतां फारसा अर्थ नाहीं. पुढें काय ? हा फक्त एकच प्रश्न शिल्लक रहातो. सर्वांच्या अंतर्यामीं या प्रश्नाचीच स्फूर्ति होत असेल, व अनेकांच्या तोंडून तोच प्रश्न निघतही आहे; पण टिळकांनीं पानसुपारीचे वेळच्या आपल्या भाषणांत सांगितल्याप्रमाणें या प्रश्नाचें उत्तर त्यांना आज देतां येणें शक्य नाहीं. कारण आधीं सहा वर्षांचा काळ हा कांहीं लहान-सहान नाहीं; व त्यांतलीं बहुतेक वर्षें लॉर्ड हिडनहॅम यांजसारख्या तरतरीत व उत्पातप्रिय राज्यकर्त्यांचे कारकीर्दींत गेलेलीं असल्यामुळें, सर्व परिस्थिति पाहून तिचें मनाशीं समालोचन करण्यास टिळकांसारख्या तीक्ष्ण व व्यापक दृष्टीच्या मनुष्यांसही कांहीं काळ लागल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. परेच्छाप्राप्त अशा षड्वार्षिक योगनिद्रेंतून जागृत होऊन पुण्यास परत आल्यावर ' रिप व्हॅन विंकल ' प्रमाणें आपली स्थिति झाल्याचें टिळकांनीं आपल्या भाषणांत सांगितलेंच आहे. पण 'रिप व्हॅन विंकल'च्या दृष्टीस पडणारे फेरबदल बहुतेक मानव चरित्राच्या सामान्य नियमांनीं स्वाभाविकपणें घडून येणारे असे होते. पण टिळक परत आल्यावर त्यांना जे फेरबदल दिसले असतील त्यांनां असलें सौम्य वर्णन साजेल असें आम्हांस वाटत नाहीं तर एखाद्या ज्वालामुखी पर्वताच्या स्फोटानें सृष्टिरचनेंत जें स्थित्यंतर होतें तसेंच कांहींसें हें स्थित्यंतर होय. जळाचें स्थळ व स्थळाचें जळ, बगीचाचें वाळवंट व वाळवंटाचा बगीचा, स्मशानाचें घर घराचें स्मशान—असलें स्थित्यंतर पाहून कोणीही मनुष्य धैर्याचा म्हणून जरी भेदरला नाहीं, तरी तो आश्चर्यस्तंभित झाल्यावांचून मात्र राहूं शकणार नाहीं. एखादी मोठी बोट फुटली असतां एखादा प्रवासी बुडतां बुडतां बचावला जावा व पाण्यामधील उंचशा खडकावर जागा मिळाल्यानें स्वतः बोट, तींतील मनुष्यें व सामानसुमान यांच्या वाताहतीचे अनेकविध स्थिर व चल प्रकार त्याला आपणाभोंवतीं पहाण्यास सांपडावे; आणि असें झालें असतां त्याचें समालोचन जसें दुःखद होईल तसेंच टिळकांचेंही झालें असल्यास नवल नाहीं; तथापि, एका

अँग्लो इंडियन पत्राच्या प्रतिनिधिजवळ त्यांनीं उद्गार काढल्याप्रमाणें त्यांच्या आयुष्यक्रमाशीं संबंध असलेलें हेंही वादळ शांत होईल अशी त्यांना आशा वाटते आणि परवां संध्याकाळच्या सभेंतल्या भाषणांत उल्लेखिल्याप्रमाणें ‘ दृष्टिपूतं न्यसेत् पादं ’ या नीतिवचनाप्रमाणें वागून पुढील मार्गावर पाऊल टाकिलें असतां आपणास पूर्वीप्रमाणेंच लोककल्याणाचें काम करितां येईल, असा त्यांचा दृढविश्वास दिसतो.

असो; तूर्त लोकांत फिरून येऊन पडल्यानें टिळकांना जसा आनंद होत आहे, तसाच सर्व लोकांसही टिळक आपणामध्यें परत आल्यानें आनंद होत आहे. आणि केसरी व टिळक यांचा जरी अंगांगी संबंध असला, तरी त्यांच्या सुटकेबद्दल स्वतः केसरीनें उद्गार काढल्यास औचित्यभंग होईल असें आम्हांस वाटत नाहीं. म्हणून टिळक स्वस्थानीं सुखरूप परत आल्याबद्दल आम्हीं त्यांचें सप्रेम स्वागत करितों. आम्ही केसरी हातीं घेतल्यानंतर नऊ महिन्यांतच नवीन प्रेसअॅक्टाचा अंमल केसरीवर होण्याचें पूर्वचिन्ह दिसून आलें आणि ‘ इशारती ’ च्या रूपानें, मखमाली पिशवींत घातलेल्या प्रेस अॅक्टाच्या पंजाचा आघात केसरीवर घडला; त्यावेळीं आम्ही भावी संकटाचा उल्लेख करितांना खालील उद्गार काढिले होते:—

“ केसरी बंद पडावा अशी ज्याप्रमाणें अधिकारी वर्गास उत्कट इच्छा असणार, त्याप्रमाणें तो बंद न पडावा, आज तीस वर्षें चालू असलेली महाराष्ट्राची ही एक संस्था पुढेंही चालू रहावी, निदान आजपर्यंत या संस्थेचें चालकत्व मुख्यतः ज्यांच्याकडे होतें ते गृहस्थ म्हणजे लोकमान्य टिळक हे कारागृहांतून परत येऊन आपला खाजगी व सार्वजनिक कारभार फिरून आपल्या हातीं घेईपर्यंत तरी ती नष्ट होऊं नये, अशी केसरीच्या हल्लींच्या संपादकाची, त्याच्या सहकारी वर्गाची व केसरीच्या हजारों वाचकांची उत्कट इच्छा असावी, हेंही स्वाभाविकच आहे. पण जगांतील प्रत्येक विषयसंबंधांत परस्परविरुद्ध असणाऱ्या अनेक इच्छा शक्तींपैकीं कोणती एक सफल करावयाची, अथवा त्या सर्व इच्छाशक्तींचा मेळ घालून त्यांस कांहीं निराळीच दिशा दाखवावयाची हें ठरविणारी एक वरिष्ठ व सर्वंकष अशी स्वतंत्र इच्छाशक्ति जगांत वावरत असते; आणि केसरीच्या अस्तित्वासंबंधाचा निर्णयही अर्थात् या वरिष्ठ इच्छाशक्तीवरच अवलंबून आहे. ”

टिळकांनीं परत येऊन केसरी जिवंत पहावा या आमच्या वैयक्तिक व इतरांच्या समवायिक आकांक्षेस यश दिल्याबद्दल त्या वरिष्ठ व सर्वंकष इच्छाशक्तीचे आम्हीं ऋणी आहों; व अशा प्रकारचें खऱ्या प्रामाणिक नम्र भावनेचे उद्गार काढून आम्हीं हा लेख पुरा करितों.

# प्रयत्नांतीं परमेश्वर !

केसरी ता. २७ एप्रिल १९१५

सुप्रसिद्ध ताईमहाराजांच्या खटल्यांतील टिळकांच्या अपिलाचा निकाल प्रिव्हि कौन्सिलनें टिळकांच्या इतर वादींच्यातर्फे दिल्याची बातमी आम्ही चार आठवड्यांपूर्वी प्रसिद्ध केलीच होती, व त्यावेळीं सबंध निकाल पुढें प्रसिद्ध करूं असें आश्वासन दिलें होतें. ह्या आश्वासनाप्रमाणें आज दुसरीकडे प्रिव्हि कौन्सिलच्या ठरावाचा विस्तृत गोषवारा दिला आहे. ठरावाचा हा सारांश वाचून टिळकांच्या हितचिंतकांपैकीं जे कित्येक धड आठवणीचे असतील त्यांना आजच्यासारखा आनंदाचा एक प्रसंग अकरा वर्षांपूर्वी आला होता त्याची आठवण होईल; कारण ता. ८ मार्च सन १९०४ च्या केसरीच्या अंकांत, मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ति ना. सर लॉरेन्स व ना. बॅटी यांनीं टिळकांना खोट्या प्रतिज्ञेच्या व इतर अनेक फौजदारी आरोपांतून दोषमुक्त करून सोडून दिल्याचा ठराव आम्हीं प्रसिद्ध केला होता. पूर्वीचा सुप्रसंग मुंबई हायकोर्टाच्या न्यायबुद्धीमुळें आला, व हल्लींचा हा त्याच हायकोर्टानें केलेला अन्याय खोडून काढणाऱ्या प्रिव्हि कौंसिलच्या न्यायबुद्धीमुळें आला. असा जरी एका अंगानें फरक असला तरी, या दोनही प्रसंगीं एकाच व्यक्तीस म्हणजे टिळकांना अखेर 'ब्रिटिश न्यायकोर्टा' कडूनच योग्य न्याय मिळाला ही गोष्ट दुसऱ्या बाजूनें ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. आणि ता. २० मार्च १९०४ रोजीं येथलि रेमार्केटच्या पटांगणांत भरलेल्या अभिनंदनपर जंगी जाहीरसभेंतलि हजारों लोकांपुढें ब्रिटिश न्यायदेवतेच्या ठिकाणीं, निदान कित्येक बाबतींत तरी आपला दृढ विश्वास असल्याचें जें टिळकांनीं बोलून दाखविलें तेंच फिरून आजहि या दुसऱ्या अनुभवानंतर त्यांना जो कोणी विचारील त्याजपाशीं, ते अधिक दृढ विश्वासानें व आनंदानें कबूल करतील, हें अगदीं उघड आहे. पण या न्यायदेवतेची आराधना करणें, फार कष्टाचें व कालगतीचें काम आहे; विशेषतः ज्या ब्रिटिशांशीं न्यायनीति प्रसंगविशेषीं इतकी निःपक्षपाती अतएव दैवी स्वरूपाची म्हणून वाखाणणें जरूर आहे, त्याच ब्रिटिशांची खुद्द याच ताईमहाराज प्रकरणांत अनुभवास आलेली पोलिटिकल राजनीति मात्र तद्विरुद्ध आहे असें टिळकांस विषयपूर्ततेकारितां म्हणावें लागेल यास नाइलाज आहे.

असो; प्रिव्हि कौन्सिलच्या प्रस्तुतच्या ठरावानें ताईमहाराज प्रकारणचा अखेरचा व कायमचा निकाल लागला, असें आतां मोकळ्या मनानें म्हणतां येत आहे. वर सांगितलेल्या न्या. जेंकिन्स व बॅटी यांच्या ठरावानें, खोटी प्रतिज्ञा करणें, खोटे दस्तऐवज करणें वगैरे टिळकांवर सरकारनें आणलेल्या अनेक

भयंकर काल्पनिक आरोपांतून त्यांची मुक्तता झाली हें खरें; पण तेवढ्यानें अर्थात्च कायमचा निकाल लागण्यासारखा नव्हता. 'औरंगाबादेस शारीर-दत्त-विधान झालें' असे जे शब्द टिळकांनीं मि. आस्टन यांजपुढें शपथेवर उच्चारले ते "खोटेच आहेत असें नाहीं," इतकें फार तर फौजदारी खटल्यांतील अपिलांत हायकोर्टानें ठरविलें. पण ते शब्द "खरेच आहेत" असें ठरविणें ही गोष्ट फक्त दिवाणी न्यायकोर्टाच्या हातीं आहे. अमुक एक शब्द 'खोटे नाहींत' व 'खरे आहेत' या दोन विधानांत कायदेशीर दृष्टीप्रमाणें लौकिकदृष्ट्याही अर्थात्च फार फरक आहे. व या फरकामुळें कायद्याच्या कुशींत व लोकांच्या मनांत सलत राहणारें सल हल्लींच्या प्रिव्हि कौन्सिलच्या निकालानें समूळ काढून टाकलें, हेंच या ठरावाचें विशेष महत्त्व होय. १९०१ च्या जून महिन्यांत औरंगाबादेस टिळकांनीं दत्तविधान ठरविलें असतांहि, पुण्यास परत येतांच अपक्व बुद्धीमुळें कुटाळ व उपद्व्यापी लोकांच्या सल्ल्याला बळी पडून ताईमहाराजांनीं पुण्यास दुसरा दत्तक घेण्याचा घातलेला घाट टिळकांच्या दक्षतेमुळें व निश्चयीपणामुळें फसल्यावर, आणि ताईमहाराजांनीं करवीर छत्रपतींच्या छत्राचा आश्रय करून दुसरा दत्तक घेण्याचा आपला हेतु १९ आगष्ट रोजीं कोल्हापुरास तडीस नेल्यावर, पहिलें दत्तविधान शाबीद व कायदेशीर व दुसरें दत्तविधान झालें असलें तरी बेकायदेशीर ठरविण्याकरितां टिळकांना दिवाणी कोर्टांत फिर्याद मांडणें हा मार्ग प्राप्त झाला; व ता २१ सप्टेंबर १९०१ रोजीं त्यांनीं हल्लींच्या कज्ज्यांतील मूळ फिर्याद दाखल केली. दिवाणी कोर्टांतील कामाचा विलंब लक्षांत घेऊन अपील कोर्टाचे साता समुद्रापलीकडील चारी धाम पुजून यावयाचें म्हटलें तरी या प्रकरणाचा निकाल कित्येक वर्षांच्या पूर्वींच लागला असता. दिवाणी कोर्टांत रीतीप्रमाणें टिळकांची जबानी जरी झालीच असती तरी जगन्नाथमहाराजांचें दत्तविधान शाबीद का नाशाबीद येवढ्याच मुद्याला लौकिकदृष्ट्या महत्त्व आलें असतें; 'टिळक खरे कीं खोटे' अशा स्वरूपाचा मुद्दा लौकिकदृष्ट्या पुढें आला नसता. पण जगन्नाथमहाराजांचें दत्तविधान व पर्यायतः आपला शब्द खरा ठरण्याकरतां दिवाणी कोर्टांत फिर्याद मांडण्याचा अगदीं सरळ व उघड मार्ग टिळकांनीं पत्करिला असतां, तो सोडून देऊन न्यायाची गाडी फौजदारी कोर्टाच्या विषम व कंटकमय अशा आडरानांत नेऊन घालण्याचा प्रयत्न टिळकांच्या सर्व प्रतिपक्षांनीं मिळून केल्यामुळें 'कांट्याचा नायटा' या म्हणीप्रमाणें या प्रकरणास भलतेंच स्वरूप आलें. दत्तविधानाबद्दल वाद माजणें, किंबहुना वर्षांनुवर्षं काम चालवून व प्रिव्हि कौन्सिलपर्यंत मजल जाऊन दत्तक शाबीद अगर नाशाबीद होऊन त्याचा अखेर निकाल लागणें, या गोष्टी हिंदुसमाजास आतां पुष्कळ परिचित व नित्य पाठांतल्या झाल्या आहेत. खुद्द बाबामहाराज यांच्याच दत्तकाचा खटला कोर्टांत जाऊन तेथें त्यांचा हक्क शाबीद करून घ्यावा

लागला होता, ही गोष्ट थोड्या फार लोकांस माहीत असेलच. परंतु प्रस्तुतच्या प्रकरणांत केवळ टिळक आहेत म्हणून मुकदम्याची गाडी फौजदारी कोर्टाकडे खेंचून नेऊन सांपडल्यास या आडरानांत त्यांना गारद करावें, व अशा अप्रत्यक्ष रीतीनें, दिवाणी कोर्टात यश मिळण्याचा पाया टिळकांच्या हाडावर रचावा, अशी सल्ला त्यांच्या प्रतिपक्षांना कित्येक काळ्या व गोऱ्या सल्लागारांनीं दिली, आणि ती त्यांनीं घेतली हें कांहीं क्षुद्र मनुष्यस्वभावाविरुद्ध नाहीं. पण या अपकृत्यांत खुद्द मुंबईसरकारहि सामील झालें हें मात्र आश्चर्य होय; व त्यामुळेंच प्रस्तुतच्या दत्तक प्रकरणास कांहीं भलतेंच महत्त्व प्राप्त झालें. अर्थात् टिळकांच्या बाजूनेंहि दत्तक शाबीद का नाशाबीद यापेक्षां टिळक खरे कीं खोटे याच मुद्यास विशेष महत्त्व आलें. एरवींहि केवळ न्यायाची कड पोंचविण्याकरतां म्हणून जरूर तर टिळकांनीं प्रिव्हि कौन्सिलपर्यंत मजल नेण्यास सोडलें नसतें, हें ज्या कोणास टिळकांचा निश्चयी स्वभाव माहीत आहे ते सहजच कबूल करतील. तसें झालें असतां टिळकांस फक्त थोडीबहुत पैशाची घस सोसावी लागली असती इतकेंच काय तें. पण सरकार मध्यें पडून न्यायाचा गाडा फौजदारी आडरानांत खेंचून नेल्यामुळें, ज्यांच्या मानानें द्रव्यहानी ही कांहींच नव्हे अशी भयंकर संकटें टिळकांना सोसावी लागलीं. पण ईश्वरीकृपा किंवा दैव अनुकूल असल्यास शत्रू अपकार करावयाला गेला असतां त्याचा उलट उपकारच होतो, असें जे म्हणतात तें प्रस्तुत प्रकरणीं अनुभवास आलें ! कारण टिळकांना मूर्तिमंत असत्य ठरविण्याच्या हेतूनें त्यांच्या प्रतिपक्षांनीं व सरकारानें हजारों मोहोरा खर्च करून त्यांच्या अंगास फासण्याकरतां जो काळजाचा लेप तयार केला तो फुकट गेला येवढेंच नव्हे तर, त्या विषारी काजळाचें औषधी अंजन बनून त्यानें टिळकांच्या शीलाचें व सत्यव्रताचें शरीर अधिकच उज्वल केलें. दिवाणी कोर्टात प्रथम फिर्याद मांडतांना ' मी खरा ' अशा तऱ्हेचा अहंकार त्यांच्या मनाला शिवलेला नसला तरी, त्यानंतरच्या शत्रुकृत इतिहासाची समाप्ति झाल्यानंतर आपला शब्द खरा ठरल्याचा आनंद स्वतः टिळकांस झाल्यास, व लोकांनीं त्यांच्या सत्याप्रियतेच्या यशाचा पुकारा केल्यास, ती मानहानी सोसण्यास प्रतिपक्षांनीं उघडच तयार झालें पाहिजे !

अमुक एक दत्तक शाबीत—नाशाबीद झाल्यानें मुंबईसरकारच्या उत्पन्नांत चार आठ आण्यांचीहि भर पडण्याचा संभव नसतां, त्यांना ताईमहाराजप्रकरणांत पडण्याची काय आवश्यकता होती ? असा प्रश्न जर कोणा भोळ्या वाचकांच्या मनांत आला तर त्यांस हेंच स्पष्ट व सरळ उत्तर दिलें पाहिजे कीं, सरकारास या कामीं पैशाचा लोभ नव्हता इतकेंच नव्हे तर उलट लाखों रुपये खर्चण्यासहि तें तयार झालें होतें; व या स्वार्थत्यागानें त्यांना एकच गोष्ट साधावयाची होती ती ही कीं, शक्य तर टिळकांना खोटे ठरवून व एका अनीतिमूलक गुन्ह्याकरतां त्यांना तुरुं-

गांत पाठवून त्यांची मान्यता लोकांच्या दृष्टीनें होईल तितकी कमी करावी !' सरकारानें टिळकांचा इतका पाठलाग करावा असें त्यांनीं सरकारचें काय घोडें मारलें आहे हें आम्हांस कळत नाहीं. पण इतका पैसा व स्वतःची इभ्रत आणि वजन प्रतिपक्षाच्या पारड्यांत घालून टिळकांचें पारडें हलकें करण्याचा सरकारानें कां प्रयत्न करावा याचा लोक जेव्हां विचार करतात, तेव्हां साहजिक रीत्याच ते असें म्हणूं लागतात कीं, टिळकांच्या चारित्र्यावर यशस्वी रीतीनें घाला घालतां आला असता तर तो सरकारास हवा होता, व म्हणूनच त्यांनीं या कामीं केवळ खाजगी पक्षकारांस हातीं धरून त्यांना मदत केली. लोकांचें हें म्हणणें कसेंहि असो; या सर्व खटाटोपास प्रिव्हि कौंसिलच्या प्रस्तुतच्या ठरावानें खमंग चपराक बसली आहे, आणि ज्या जोरानें टिळकांच्या प्रतिपक्षांनीं ही मोहीम त्यांच्यावर केली त्याच जोरानें त्यांनीं आतां माघार घेणें रास्त आहे. मग ईश्वर त्यांस काय बुद्धि देईल तें पहावें. असो; विशेष दुःखाची गोष्ट इतकीच कीं, दिवाणी प्रकरणांत फौजदारी प्रकरणाप्रमाणें मुंबई हायकोर्टाकडूनच टिळकांस न्याय मिळावयास पाहिजे होता, पण तो मिळाला नाहीं. येवढेंच नव्हे तर १९०४ सालीं न्या. जेंकिन्स व बॅटी यांनीं टिळकांस निरपराधी ठरवून त्यांच्यावरील जे भयंकर आरोप काढून टाकले त्याच आरोपांचा एक प्रकारें अप्रत्यक्ष अनुवाद न्या. चंदावरकर व हीटन यांच्या दिवाणी अपिलांतील निकालानें केल्यासारखा झाला. टिळकांची ग्रहदशा त्यावेळीं न संपल्यामुळें म्हणा अगर इतर कारणामुळें म्हणा, उभयतां न्यायमूर्तींच्या हातून कायद्याच्या केवढ्या ढोबळ चुका झाल्या, पुराव्यांत सरस–निरस व खरें–खोटें शोधण्याची त्यांची दृष्टी कशी ढळली, पुराव्याच्या कायद्याच्या केवळ सामान्य तत्त्वांचाहि त्यांच्या हातून किती उपमर्द झाला, आणि हिंदुस्थानांत मनुष्याची मान्यता जितकी अधिक तितकें त्याचें शील हीणकस, असला वस्तुतः खोटा इतकेंच नव्हें तर मनुष्यस्वभावाशीं सर्वस्वीं विरुद्ध सिद्धांत आपल्या मनाशीं बनवून केवळ त्याच्या सहाय्यानें त्यांनीं टिळकांविरुद्ध कसा निकाल दिला, इत्यादि गोष्टींची चर्चा खुद्द प्रिव्हि कौंसिलच्या निकालांतच मुद्देसूद रीतीनें केलेली असल्यामुळें त्यावर आम्हांस स्वतंत्र टीका करण्याचें कारणच उरलें नाहीं. हायकोर्टाचीही चुकी प्रिव्हि कौंसिलनें आपल्या अधिकारानें व अधिकारयुक्तवाणीनें सर्वस्वीं खोडून काढून, व या बाबतींत १४ वर्षेंपर्यंत झालेल्या छळानें तावूनसुलाखून निघालेल्या टिळकांच्या सत्यनिष्ठेवर सात्विक मान्यतेची जिल्हई देऊन त्यांनीं ती टिळकांच्या स्वाधीन केली याकरितां प्रिव्हि कौंसिलचे धन्यवाद गावे तितके थोडेच होणार आहेत !

प्रिव्हिकौंसिलच्या निकालानें ताईमहाराजप्रकरणाचा कायमचा निकाल लागला असल्यामुळें श्रमपरिहाराचा सुखाचा सुस्कारा टिळकांना व त्यांच्या हितचिंतकांस आतां टाकण्यास हरकत नाहीं. विकट पर्वत चढून गेल्यावर त्याच्याच डोक्यावर

पाय देऊन उभे राहून दुःखानें आक्रमिलेल्या मार्गाकडे मागें वळून पाहण्यांत प्रवाशाला जास्त सुख होतें व आनंद वाटतो. त्याचप्रमाणें प्रिव्हि कौन्सिलचा निकाल हा वज्रलेप असल्यामुळेंच १४ वर्षें माजलेल्या या ताईमहाराज–प्रकरणाच्या वक्रगतीकडे दृष्टी देऊन सिंहावलोकन करण्यास केसरीसहि मन मोकळें वाटल्यास नवल नाहीं. या सिंहावलोकनांत जर एक गोष्ट ठळकपणें दिसून येत असेल तर ती हीच कीं, जितका जितका प्रसंग बिकट व भयंकर तितकें तितकें टिळकांचें धैर्य व त्यांचा उद्योग मोठा असून, या प्रकरणीं निष्पन्न झालेल्या प्रत्येक मुद्यावर ब्रिटिश न्यायदेवतेवर एकाग्र निष्ठा ठेऊन अखेर त्यांनीं आपल्याच बाजूनें निकाल मिळविलेला आहे. प्रिव्हि कौन्सिलचा ठराव जो वाचील त्याला हें उघड दिसून येईल कीं, असा एकहि मुद्दा अगर पोटमुद्दा नाहीं कीं, ज्यावर प्रिव्हि कौन्सिलनें टिळकांचें म्हणणें खरें धरून त्यासारखा निकाल दिला नाहीं. या प्रकरणीं टिळकांचा काडीइतकाहि स्वार्थ नव्हता; केवळ मृत्युपंथास लागलेल्या एका स्नेहाच्या विनंतीला मान देऊन त्याचें ऐहिक, व धर्मसमजुतीप्रमाणें पारलौकिक कल्याण होण्याकरितां ज्या गोष्टी करण्याची जबाबदारी टिळकांवर लादली गेली ती तडीला नेण्याला अवश्य त्याच गोष्टी टिळकांनीं केल्याः—या गोष्टी शिक्षा देणाऱ्या कोर्टानींहि मान्य केल्या होत्या व आतां प्रिव्हि कौन्सिलनेंहि त्या ग्राह्य धरिल्याच आहेत. पण "दत्तकाच्या बाबतींत टिळकांनीं जें धोरण ठेविलें तें ठेविलें नसतें तरच उलट त्यांजकडे मित्रद्रोहाचा दोष आला असता" अशा आशयाचा जो शेरा प्रिव्हि कौन्सिलनें अखेर मारला आहे त्याची किंमत आमच्या दृष्टीनें विशेष आहे. लांडी–लबाडी, फसवेगिरी, कपट, खोडसाळपणा अगर अन्यायरूप व अनीतिमूलक असे आचरणाचे कोणतेहि अशिष्ट प्रकार टिळकांच्या अंगीं चिकटविण्याचें न्या. चंदावरकर यांनीं बाकी ठेवलें नव्हतें. परंतु ते सर्व निरर्थक व निराधार असून, या बाबतींत हायकोर्टाच्या निवाड्याचें समर्थन करण्यास काडीइतकी देखील जागा नाहीं, असाहि स्पष्ट शेरा प्रिव्हि कौन्सिलनें दिला आहे हें वाचकांस दिसून येईलच. पण टिळकांनीं केवळ मुख्य मुद्याचीच गोष्ट जिंकली असें नाहीं, तर गेल्या १४ वर्षांत उपस्थित झालेला प्रत्येक मुद्दा त्यांनीं जिंकलेला आहे. उदाहरणार्थ, बाबामहाराजांच्या मृत्युपत्राचें प्रोबेट हा टिळकांच्या अधिकाराचा व कारभाराचा मुख्य पाया असल्यामुळें, ता. २९ जून १९०१ रोजीं ताईमहाराजांनीं हें प्रोबेटच रद्द व्हावें असा ॲस्टनसाहेबांकडे अर्ज केला, व तो त्यांनीं बहालहि केला. पण अखेर हायकोर्टानें ॲस्टनसाहेबांचा निकाल रद्द करून आगस्ट १९०२ मध्यें प्रोबेट कायम केलें. ॲस्टनसाहेबांनीं पुणें सिटी मॅजिस्ट्रेटाकडून नागपूरकर याजवर खोटी फिर्याद केल्याचा खटला सप्टेंबर १९०२ मध्यें भरविला. पण तो प्रथम पुण्यास क्रीमनसाहेबांनीं व पुढें हायकोर्टांत न्या. तय्यबजी व रसेल यांनीं काढून टाकिला. मि. ॲस्टन यांनीं

टिळकांवर एकंदर ५६ गुन्ह्यांचे आरोप आणविले. पैकीं मॅजिस्ट्रेट मि. क्लेमंटस यांनीं दोन मुद्यांवर खोट्या प्रतिज्ञेचा आरोप शाबीद धरून त्यांस शिक्षा दिली. पुढें एक आरोप सेशनजज्ज मि. ल्यूकस यांनींच खोडून टाकून एकावर शिक्षा कायम केली; पण तीहि न्या. जेंकिन्स व बॅटी यांनीं रद्द केली, आणि त्याच अपिलांत जेंकिन्ससाहेबांनीं इतर सर्व आरोपहि अॅड्व्होकेट जनरल यांजकडून काढून घेवविले. तात्पर्य, कायदा, न्याय व नीति या तिहींच्या विरुद्ध वर्तन केल्याच्या दोषारोपांच्या धुळीची जी वावटळ टिळकांच्या प्रतिपक्षांनीं त्यांजवर उठविली तिजपैकीं एकहि कण त्यांच्या अंगाला अखेर चिकटला नाहीं; किंबहुना "प्रतिपक्षाच्या अंगावर पुष्कळसा चिखल फेंकावा म्हणजे त्यांतला एखादा कण तरी अंगावर राहतोच" या इंग्रजी भाषेंतील दुर्जननीतिवचनाला टिळकांनीं मूर्तिमंत अपवादच उत्पन्न केला असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें सर्व होण्यांला टिळकांना १४ वर्षें रात्रंदिवस काळजींत काढावीं लागलीं व ३५–४० हजार रुपये पदरचे खर्चावे लागले, याचा जाब या लोकीं व परलोकीं कोण देईल तो देवो ! पण तूर्त तरी शत्रूंचें शासन कसें होईल या विचारापेक्षां आपला शब्द अखेर खरा ठरला व यश मलीन होणार होतें तें वांचलें येवढाच विचार त्यांचे सर्व श्रम परिहार करण्यास पुरेसा आहे. म्हणून हा दिवस आणून दिल्याबद्दल अमूर्त ब्रिटिश न्यायनीति, व तिला प्रेरणा देणारा अमूर्त परमेश्वर यांचे कृतज्ञताबुद्धीनें आभार मानण्याच्या कामीं टिळकांना त्यांच्या हजारों हितचिंतकांचीहि जोड मिळणार आहे, येवढें सांगून हा लेख पुरा करितों.

# पुणें कोर्ट ऑफ वॉर्डसचा कारभार.

केसरी ता. ३ आक्टोबर १९१६

ब्रिटिश सरकारच्या न्यायबुद्धीला दुसऱ्या कोणी नांवें ठेविल्यास आमच्या मुंबई सरकारास अतिशय राग येईल हें सांगावयास नकोच. पण स्वतः त्यांनींच ब्रिटिश न्यायदेवतेचा अपमान आपल्या अधिकारांत केला तर तो चालतो, असें त्यांच्याच कृतीवरून आम्हास म्हणण्यास फारशी हरकत वाटत नाहीं. दिवाणी कोर्टांचे हुकुमनामे अंमलबजावणीकरतां मुलकी अधिकाऱ्यांकडे आले असतां कलेक्टर लोक ते हुकुमनामे आपल्या अधिकाराच्या बारीक चाळणींत घालून इतके सावकाश चाळूं लागतात कीं, पक्षकारांच्या पदरांत न्यायाचें पीठ पडलेंच तर फार थोडें पडतें, व तेंहि पडतां पडतां वाऱ्यानें बहुधा उडून जातें, हा पुष्कळ लोकांना अनुभव आहेच. पण अलीकडे पुणें कोर्ट ऑफ वॉर्डस्नें ताईमहाराजांच्या खटल्यांत प्रिव्हि कौंसिलनें दिलेल्या निकालासंबंधीं जें वर्तन चालविलें आहे तें पाहिलें म्हणजे न्यायकोर्टाचा याहून अधिक अपमान कोणी करणेंच शक्य नाहीं असें दिसून येईल. या प्रकरणाची हकीकत सांगण्यास फारसा पाल्हाळ करण्याचें कारण नाहीं. कां कीं, या खटल्यांतील कच्ची हकीकत व अखेर प्रिव्हि कौंसिलनें दिलेला निकाल या गोष्टी केसरीच्या वाचकांस पूर्ण माहीत आहेतच; सांगावयाची हकीकत ती कोर्ट ऑफ वॉर्डस्च्या वर्तनापुरतीच; व ती थोडक्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

सन १९०३ सालीं सप्टेंबर महिन्यांत कै. बाबा महाराज यांचें कुटुंब ताईमहाराज या वारल्या. यापूर्वींच म्हणजे सन १९०१ सालीं दोन दत्तकांच्या बाबतींत पुणें फर्स्टक्लास कोर्टांत टिळक व इतर ट्रस्टी यांच्यातर्फे औरंगाबाद येथील दत्तविधान शाबीद करण्याचा दावा दाखल करण्यांत आलेला होता; तरी दाव्याच्या सुनावणीस सुरुवातहि झालेली नव्हती. सर्व कागदपत्र टिळकांवर सुरू असलेल्या फौजदारी मुकदम्याच्या कामाकरितां फौजदारी कोर्टाकडे मागून नेण्यांत आलेले होते. अर्थात् हायकोर्टापर्यंत फौजदारी काम व प्रिव्हि कौंसिलपर्यंत दिवाणी काम चालून कोणता तरी एक दत्तक निर्विवाद रीतीनें शाबीद ठरून बाबामहाराजांच्या इस्टेटीला धनी होण्यास पुष्कळच अवकाश लागणार होता. पण या अवधींत इस्टेटीची व्यवस्था कोणा तरी जबाबदार माणसाच्या हातीं राहणें अवश्य होतें, म्हणून टिळक वगैरे ट्रस्टींनीं आपण होऊन पुणें डि. कोर्टाकडे असा अर्ज केला कीं, अशा वादग्रस्त स्थितींत सरकारच्या हातीं दाव्यांतील मिळकतीची व्यवस्था राहावी. या हेतूनेंच १८२७ चा ८ वा रेग्युलेशन सरकारनें केला आहे म्हणून कलम ९ प्रमाणें ही इस्टेट स्वतः कोर्टानें आपल्या ताब्यांत घ्यावी.

डि. जज्ज मि. ल्यूकस यांना हें म्हणणें रास्त वाटलें, व त्यांनीं स्थावर मिळकती-संबंधानें पुणें, सातारा व बेळगांव या जिल्ह्यांच्या कलेक्टरांना व जंगम मिळकती-संबंधानें पुणें डि. कोर्टाचे नाझर यांस अॅडमिनिस्ट्रेटर नेमलें. बाळामहाराज यांना ताईमहाराज यांनीं अंगावर घालण्यास दागिने पूर्वींच दिले होते ते व पुण्यांतील राहण्याचा वाडा एवढी मिळकत कोर्टानें त्यांजकडे राहूं दिली; मात्र कांहीं दागिन्यांपुरता त्यांजकडून जामीन घेतला. वास्तविक ही सवलत सुद्धां देणें पक्षपातीपणाचें होतें; पण ती वेळच अशी होती कीं, कोर्टानें बाळामहाराजांपासून जामीन घेतला हीच गोष्ट मोठी म्हणावयाची.

असो; पुढें दोन वर्षांनीं मुंबई–कोर्ट आफ वार्डस् अॅक्ट सरकारनें केला, तेव्हां भागानिहाय कोर्ट ऑफ वार्डस् नेमले गेले. त्यांत मध्यभागास रेव्हिन्यू कमिशनर यांनाच नेमलें. व त्यांनीं आपले अधिकार निरनिराळ्या कलेक्टरांना वांटून दिले. तेव्हां पुणें–कलेक्टर यांनीं आपण होऊन दाव्यांतील इस्टेट आपल्या ताब्यांत कोर्ट ऑफ वार्डस् या नात्यानें यावी अशी डि. कोर्टाकडे विनंति केली; व ता. १ आगष्ट १९०८ रोजीं कोर्टानें ती मंजूर केली.या योगानें वास्तविक इस्टेटीच्या वहिवाटीसंबंधानें फरक असा कांहींच झाला नाहीं. पुणें–कलेक्टर हेच पूर्वी १८२७ च्या रेग्युलेशनप्रमाणें अॅडमिनिस्ट्रेटर म्हणून वहिवाट करीत होते तेच आतां कोर्ट ऑफ वॉर्डस या नात्यानें वहिवाट करूं लागले. एका अर्थानें कोर्ट ऑफ वार्डस यांची जबाबदारी अॅडमिनिस्ट्रेटरपेक्षांहि भारी आहे; कारण अॅडमिनिस्ट्रेटरचें काम फक्त इस्टेट संभाळण्याचें असतें. पण कोर्ट ऑफ वार्डस अॅक्टाप्रमाणें कलेक्टर इस्टेट ताब्यांत घेतात ती तिची कायदेशीर व्यवस्था लावण्याकरितां व तिला कर्ज असल्यास कर्जमुक्त करण्याकरतांच. कोर्ट ऑफ वार्डस अॅक्टाचा मूळ हेतुच हा आहे व त्याप्रमाणें न घडेल तर तें अर्थात् अक्षम्यच मानलें पाहिजे. पण या इस्टेटीच्या बाबतींत पाहावें तों पुणें कोर्ट ऑफ वार्डसची दृष्टी इस्टेटीची कायदेशीर व्यवस्था करण्याकडे मुळींच नसून, या प्रकरणांत टिळकांचा संबंध येत असल्यामुळें त्यांचे कायदेशीर प्रयत्न कसे हाणून पडतील, व करवीर सरकारच्या प्रेमामुळें मुंबई सरकारच्या आश्रयास पात्र झालेल्या बाळामहाराजांस हरप्रकारच्या सवलती कशा देतां येतील एवढें पाहण्याकडेच होती. म्हणून प्रारंभापासून या कोर्टाचा सर्व कारभार नागमोडीसारखा वांकडा सुरू झाला. इस्टेट मूळ बाबामहाराजांची, पण पहिलाच जाहीरनामा काढतांना त्यांत 'ताईमहाराजांची इस्टेट' आम्ही ताब्यांत घेतली आहे असे शब्द कोर्ट ऑफ वार्डसनें दडपून दिले. अर्थात् टिळकांच्या वकिलांनीं या गोष्टीस हरकत घेतल्यामुळें कोर्ट ऑफ वार्डसनें तो जाहीरनामा रद्द केला. पण मौज ही कीं, चुकीची खरी दुरुस्ती म्हणजे 'बाबामहाराज यांची इस्टेट' असे शब्द घालून फिरून जाहीरनामा काढावयास पाहिजे होता. पण तसा जाहीरनामा त्यांनीं पुढें चार वर्षेपर्यंत काढला

नाहीं. तो १९१२ सालीं 'बाळामहाराजांची इस्टेट' असे शब्द घालून काढला. याहि गोष्टीस टिळकांच्या वकिलांनीं हरकत घेतली, पण ती सरकारनें मानली नाहीं. बाळामहाराज यांचें नांव जाहीरनाम्यांत घालण्याचें कारण या वेळीं कदाचित् असें दाखवितां येण्यासारखें होतें कीं, यापूर्वीं मुंबई-हायकोर्टानें औरंगाबादचें दत्तविधान नाशावित ठरवून पुणें डि. कोर्टानें बाळामहाराज यांचें दत्तविधान शाबीद ठरविलें होतें. पण हायकोर्ट ही कांहीं न्यायकोर्टपरंपरेची अखेरची पायरी नव्हे व डिस्ट्रिक्ट कोर्ट तर नव्हेच नव्हे. मुंबई-हायकोर्टाच्या निकालावर प्रिव्हि कौन्सिलकडे अपील करण्याचा टिळकांचा अर्ज मंजूर होऊन अपील यापूर्वीं दाखलहि झालें होतें, व पक्षकारांबरोबर कलेक्टरसाहेबांसहि नोटीस देण्यांत आली होती. अर्थात् बाळामहाराज यांच्या नांवानें जाहीरनामा काढण्याची घाई करण्याचें कारण नव्हतें. बरें, प्रिव्हि कौन्सिलच्या निकालापर्यंत न थांबतां खालच्या कोर्टाचा जसजसा निकाल होईल तसतसा त्याचा अंमल करण्याचीच कोर्ट ऑफ वार्डसला प्रामाणिकपणें इच्छा होती असें म्हणावें, तर पुणें फर्स्ट क्लास कोर्टाचा निकाल टिळकांतर्फे झाल्यावर व हायकोर्टाचा निकाल होईपर्यंतच्या अवधींत जगन्नाथमहाराजांचें नांव इस्टेटीस दाखल करून जाहिरनामा काढण्याची बुद्धि कोर्ट ऑफ वार्डसला कां झाली नाहीं? पण बोलून चालून पक्षपात करण्याची जेथें प्रतिज्ञा तेथें अशी बुद्धी कशी व्हावी? तेव्हांचेंहि एक वेळ असो, पण आतां तरी प्रिव्ही कौन्सिलचा निकाल टिळकांतर्फे होऊन दोन वर्षें झालीं तरी त्या निकालाचा अंमल करण्याची बुद्धी कोर्ट ऑफ वार्डसला होत नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय? पण आश्चर्य तरी कसले? टिळकांविरुद्ध द्वेषाग्नीची खाईच सरकारच्या मनांत पेटलेली आहे. तेव्हां प्रिव्ही कौन्सिलच्या निकालालाहि त्यांनीं तींत कां टाकूं नये? प्रिव्ही-कौन्सिलच्या ठरावाला वास्तविक उदात्त व पवित्र स्वरूप आहे; कारण त्या ठरावावर सह्या न्यायाधिशांच्या असल्या तरी त्याची भाषा न्यायाधिशांच्या सल्ल्यावरून स्वतः बादशहांनीं फर्माविलेल्या हुकुमाची असते. अर्थात् प्रिव्ही कौन्सिलच्या ठरावाच्या अंमलबजावणीस अडथळा करणें म्हणजे तो खुद्द बादशहांचा अपमान नाहीं काय? या कामीं टिळकांस खुद्द बादशहांनीं न्यायाचा प्रसाद दिला असतां कोर्ट ऑफ वार्डस तो त्यांच्या पदरांत पडूं देत नाहीं, मग त्यास कोणी श्रीमंताच्या घरच्या कोठावळ्याची, किंवा देवस्थानांतील बडवे व उत्पात यांची उपमा दिल्यास नाकास मिरच्या कां झोंबाव्या? प्रस्तुत प्रकरणीं प्रिव्ही कौन्सिलच्या निकालाचा उपयोग टिळकांस घेऊं न देणाऱ्या कोर्ट ऑफ वार्डसला गंजीवरील कुत्र्याचीहि उपमा सुचते. पण ती देण्यास गंजीवरील कुत्र्यासच अन्याय केल्यासारखा होतो म्हणून ती आम्हीं देत नाहीं. गंजीवरील कुत्र्यास स्वतः गवत खातां येत नाहीं असें असतां तो परक्या बैलासहि खाऊं देत नाहीं एवढ्याचकारितां तो दूषित ठरतो.

पण गंजीवरील कुत्रा स्वतः गंजीवाला गंजीतील पेंढ्या काढून घेऊं लागल्यास त्याला तरी हरकत करीत नाहीं. प्रस्तुत प्रकरणीं स्वतः कोर्ट ऑफ वार्डसला इस्टेटींतील एक पैचा फायदा किंवा अभिलाषबुद्धी नाहीं हें आम्हीं प्रांजलपणें कबूल करतों. बाळामहाराज यांस इस्टेट खाऊं देण्याचें त्याच्या मनांत आहे; पण प्रिव्ही कौन्सिलच्या निकालानें त्याचा नाइलाज होऊन बसला. असें असतां इस्टेटीचे कायदेशीर मालक जगन्नाथमहाराज व टिळक वगैरे त्यांचें ट्रस्टी यांनाहि तें इस्टेटीचा ताबा घेऊं देत नाहीं. मग या इस्टेटीचें तें करणार तरी काय ? प्रिव्ही कौन्सिलच्या निकालानंतर लगेच ट्रस्टींनीं इस्टेट ताब्यांत मागण्याचा अर्ज केला, पण कोर्ट ऑफ वार्डस आधीं उत्तरच देत नाहीं; दिलेंच तर मुंबई सरकारची सबब सांगतें; व मुंबई सरकार तर कांहींच बोलत नाहीं. मग तें गुप्त खलबतें काय काय करीत असेल तें त्याचें त्यासच माहीत. विनंति अर्ज निष्फळ ठरल्यामुळें शेवटीं जगन्नाथमहाराज यांच्या वकिलांना सरकारास कायदेशीर नोटीस द्यावी लागली व नोटीशीची मुदत संपतांच त्यांना सरकारावर दिवाणी दावा लावावा लागणार व ते लावणार. मग दिवाणी कोर्टांत काय ठरेल तें ठरेल.

बरें, कोर्ट ऑफ वॉर्डस्च्या हातांत इस्टेट असतांना तिची व्यवस्था तरी कोर्ट ऑफ वॉर्डस् कायद्याच्या हेतूप्रमाणें फायदेशीरपणानें करावयास पाहिजे होती तीहि केलेली दिसत नाहीं. बाबामहाराजांच्या इस्टेटीचें प्रोबेट काढल्यानंतर, व १८२७ च्या रेग्युलेशनप्रमाणें डि. कोर्टाच्या हातीं इस्टेट जाईपर्यंत, ट्रस्टींनीं कोर्टाच्या परवानगीनें पण आपल्या सह्या गुंतवून हलक्या व्याजाचीं कर्जें काढून भारी व्याजाचीं कर्जें तरी फेडलीं होतीं; पण कोर्ट ऑफ वॉर्डस्च्या हातीं इस्टेट गेल्यापासून त्यांनीं कर्जफेडीची कांहीं व्यवस्था केली असेल तर शपथ. इस्टेटीविरुद्ध कर्जाच्या यादी कोर्ट ऑफ वॉर्डस्च्या हातीं १९०७ सालींच जाऊन पडल्या. असें असतां त्यांनीं कर्जफेड अगर मोबदला कांहींच केला नाहीं. एवढेंच नव्हे तर सावकारांनीं कंटाळून कंटाळून अखेर फिर्यादी लावून इस्टेटीवर हुकुमनामे मिळविले असें असतां, त्यांच्या अंमलबजावणीस मात्र कोर्ट ऑफ वॉर्डसनें अडथळा घातला. कांहीं सावकारांचे हुकुमनामे टिळक वगैरे ट्रस्टींवरच बजावण्याची सावकारांनीं घाई केल्यामुळें टिळकांना आजवर कित्येक हजार रुपये इस्टेटीच्या कर्जफेडीकरितां पदरचे भरावे लागले आहेत; व कांहींची अंमलबजावणी अजून चालूच आहे. पण कांहीं हुकुमनामे इस्टेटीवर दिले गेले असतांहि कोर्ट ऑफ वॉर्डस पैसे देत नाहीं, म्हणून ते अजून खडेच राहिले आहेत. कोर्ट ऑफ वॉर्डसच्या हातीं इस्टेटीचा पैसा नाहीं असें नाहीं. हजारों रुपये आहेत. एवढेंच नव्हे तर त्या पैशानें ३॥ टक्यांच्या कांहीं प्रामिसरी नोटा विकत घेण्याचा शहाणा कारभारहि कोर्ट ऑफ वॉर्डसनें केला आहे. पण इस्टेटीवरील हुकुमनाम्यांस ६ टक्के व्याज चालू असतां एक पैचीहि कर्जफेड त्यांचे हातून होत नाहीं ! नाहीं

म्हणावयास आनंदाश्रमाच्या एका हुकुमनाम्याची मात्र त्यांनीं फेड केली; पण तोहि पक्षपातच; कारण बाकीच्या सावकारांनीं पैसे मिळूं नयेत असें काय पाप केलें होतें ? पण याहून मौज ही कीं, प्रिव्हि कौन्सिलचें अपील चालविण्याकरितां खुद्द बाळामहाराजांस १५ हजार रु. कोर्ट ऑफ वॉर्ड्सनें दिले आणि टिळकांना मात्र अपिलाचा हजारों रुपये खर्च केवळ पदरचा करावा लागला. आतां प्रिव्ही कौंसिलनें टिळकांसारखा निकाल देऊन जगन्नाथ महाराज यांस खरा दत्तक ठरविलें, व इकडे मुंबई हायकोर्टानेंहि निकालाचा अनुवाद करून बाळामहाराजांचें दत्तविधान स्पष्ट बेकायदेशीर ठरविलें. तेव्हां आतां कोर्ट वॉर्ड्सनें हे १५ हजार रुपये वाटेच्या वाटसरास उचलून दिले असेंच ठरतें कीं नाहीं ? आपल्या ताब्यांत इस्टेट असतां इस्टेट संभाळून फक्त कर्जफेडीची कसोशी करणें, व दोनहि दत्तक मुलांसंबंधानें सर्वस्वी तटस्थपणा पत्करणें हेंच कोर्ट ऑफ वॉर्डसच्या ब्रीदास शोभण्यासारखें होतें. पण जी गोष्ट त्यांनीं करावयास पाहिजे होती ती मुळींच केली नाहीं व जी मुळींच करावयास नको होती तीच त्यांनीं बरोबर केली. ब्रिटिश राज्यांत जर खरोखरच न्याय असला तर या दुहेरी अपराधाचा जाब त्यांना द्यावा लागेल, तो चुकणार नाहीं. सरकार सर्व शक्तिमान् आहे हें आम्हांस माहीत आहे; तथापि तें कायदे करून व न्यायकोर्टें स्थापून स्वतःला बंधन लावून घेतें म्हणून तरी आम्ही बोलणार; हीच मोगलाई असती तर मग आम्ही काय म्हणणार होतों ?

असो; कोर्ट ऑफ वॉर्डस्चा हा सर्व कारभार झाला अशा रीतीनें होण्यास मुख्य कारण टिळक हे या प्रकरणांत आहेत व जगन्नाथ महाराज यांचें दत्तविधान त्यांनीं करविलें एवढेंच काय तें. पण राजकीय बाबतींत टिळकांविरुद्ध असलेला द्वेष सरकारनें खाजगी पक्षकारांच्या न्यायमनसुब्याच्या कामीं घुसडावा हें सरकारचा लौकिकास, अब्रूस किंवा इभ्रतीस मुळींच शोभण्यासारखें नाहीं. प्रस्तुतच्या विवेक करण्याइतकें स्वतः त्यांना जर आपलें डोकें ठिकाणावर ठेवतां येत नाहीं, तर विवेकशीलतेचा उपदेश लोकांना करण्याचा त्यांना काय अधिकार आहे ?

# टिळकांचा एकसष्टावा जन्मदिवस.

केसरी ता. २६ जुलई १९१६

गेल्या रविवारीं टिळकांच्या घरीं जो अभिनंदनसमारंभ झाला तो अनेक दृष्टींनीं अपूर्व होय. टिळकांचा एकसष्टावा जन्मदिवस त्यांच्या हयातींत उगवेल अशी अपेक्षा खुद्द टिळकांनीं किंवा त्यांच्या स्नेह्यांनीं केव्हांहि केली असेल असें म्हणण्याचें धाडस आम्हांस करवत नाहीं. टिळकांची प्रकृति पहिल्यापासून सुदृढ असली तरी त्यांच्या बरोबरीची बहुतेक सर्व मित्रमंडळी दुर्दैवानें अल्पायुषी ठरून त्यांच्या देखत गेली, या गोष्टीचा परिणाम त्यांच्या मनावर न होणें अशक्य होतें. सन १८९६ सालच्या मार्च महिन्यांत प्रस्तुत लेखक टिळकांच्या बोलावण्यावरून साताऱ्याहून वकिलीचा धंदा सोडून व ' मराठा ' पत्राचें संपादकत्व पत्करून पुण्यास आला त्या वेळीं टिळकांनीं त्यास लिहिलेल्या पहिल्या पत्रांतील एक वाक्य त्यास अद्यापि चांगलें आठवतें. तें वाक्य असें होतें. " I want in You not a servant but a friend for the last days, as it may be, of my life " " तुम्ही येथें येणार ते नोकर या नात्यानें नव्हे, तर माझ्या शेवटच्या दिवसांत मला ( सहकारी ) स्नेही पाहिजे म्हणून ! " वास्तविक या वेळीं टिळकांचें वय अवघें चाळीस वर्षांचेंच होतें. ' केसरी ' व ' मराठा ' पत्रें हातीं घेऊन त्यांना या वेळीं फक्त पांच वर्षें झालीं होतीं. त्यांचा वकिलीचा वर्ग जोरांत सुरू होता. पुणें शहरम्युनिसिपालिटींतील व मुंबई–कायदे–कौन्सिलांतील त्यांच्या पहिल्या निवडणुकीस पुरें एक वर्षहि झालें नव्हतें, आणि खासगी किंवा सार्वजनिक अशी कोणतीहि आपत्ति त्यांच्यावर अद्यापि आलेली नव्हती. असें असतां त्यांना 'शेवटच्या दिवसा' ची छाया आपणावर पडूं लागली आहे असा भास, किंबहुना भीति वाटूं लागण्याचें कारण त्यांच्या अंगांतील जीवनसत्व खरोखर कमी झालें होतें हें नव्हे, तर आपल्या बरोबरीचे ' स्नेही–सोबती ' अल्पायुषी झालेले त्यांनीं पाहिले हेंच होय. त्यांच्या स्नेह्यांपैकीं चिपळूणकर, आपटे धारप हे १८९५ पूर्वीं चाळिशीच्या आंतच वारले. प्रो. केळकर हे १८९५ च्या मे महिन्यांत आपल्या वयाच्या ३५ व्या वर्षीं वारले. त्यांना वारून अवघे पांच आठवडे झाले नाहींत तोंच जून महिन्यांत प्रो. आगरकर हे वयाच्या ३९ व्या वर्षीं वारले. पुढें सहा सात महिन्यांच्या आंतच प्रो. नामजोशी हे वयाच्या ४३ व्या वर्षीं वारले. या अकाल–मृत्युपरंपरेचा परिणाम टिळकांच्या मनावर काय झाला हें केसरींतील नामजोशांच्या मृत्युलेखांतील एक दोन वाक्यांवरून दिसून येण्यासारखें आहे. या लेखांत टिळक लिहितात, " सन १८८० सालीं ज्या पांच सात लोकांनीं लोकसेवेंत आपलें आयुष्य

खर्चण्याचा निश्चय केला त्यांपैकीं आज हा मृत्युलेख लिहिणाराखेरीज दुसरा कोणीहि शिल्लक नाहीं हें त्याचें व राष्ट्राचें केवढें दुर्दैव होय याची कल्पना करणें अशक्य आहे. " एखाद्या संस्थेचे आधारस्तंभ असे एकामागून एक ढांसळून पडण्यास सामान्य कारण पुरेसें नाहीं, तर त्यास खरोखरच कांहीं तरी "गूढ कारण" असावें, असल्या दैववादाचा अनुवाद करण्याची जरूरी टिळकांस या वेळीं भासावी यांत आश्चर्य कसलें ? केसरीचे संपादक या नात्यानें टिळकांना वरील गृहस्थांचे मृत्युलेख जेव्हां एकावर एक लिहावे लागले तेव्हां त्यांच्या मनावर सहजच उदासीनतेचें आवरण आलें. न्या. रानडे व डॉ. भांडारकर यांच्या दरम्यान ' महाराष्ट्रीय पदवीधर अल्पायुषी कां होतात ' याविषयींचा एक वाद यापूर्वीं नुकताच माजला होता; व उभयतांपैकीं प्रत्येकाचीं कारणें जरी वेगवेगळीं होतीं तरी दोघांच्याहि मतप्रतिपादनानें महाराष्ट्रीय पदवीधरांचें अल्पायुषित्व मात्र जोरानें सिद्ध होत होतें !

असो; ही उदासीनतेची छटा कर्तव्य-प्रवाहात लवकरच धुवून गेली; व टिळकांचें कार्य बहुधा सर्व यापुढेंच व्हावें असा योगायोग होता ! १८९७ सालीं म्हणजे टिळकांच्या ४२ व्या वर्षीं त्यांच्यावरील राजद्रोहाचा पहिला खटला झाला; व तुरुंगवासांतील पहिल्या सात आठ महिन्यांमध्यें त्यांना ज्या रीतीनें वागविण्यांत आलें त्यावरून पाहतां टिळक कारागृहांतून जिवंत परत येतील असें कोणासहि वाटलें नसावें. १८९७–९८ सालच्या तुरुंगवासाचे परिणाम त्यांस बरेच दिवस भोगावे लागले, पण त्यानंतरहि त्यांचे दिवस सुखाचे गेले असें नाहीं. १९०१ च्या अखेरीस त्यांच्यामागें एक हृद्रोग लागला तो त्यांस पुरा बारा वर्षें भोंवला. व हल्लीं जरी तो बराच हटला आहे, तरी त्याची बाधा सर्वांशीं नाहींशी झालेली नाहीं. हा हृद्रोग म्हणजे ताईमहाराजांचा खटला होय. १९०१ पासून, म्हणजे ॲस्टनसाहेबापुढें बाबामहाराजांच्या इस्टेटीच्या प्रोबेटच्या कामीं टिळकांची जबानी सुरू झाल्यापासून, तों १९०४ सालापर्यंत, म्हणजे मुंबई-हायकोर्टांत सर्व फौजदारी आरोप नाहींसे होईपर्यंतचीं तीन वर्षें टिळक यांना अत्यंत चिंतेचीं गेलीं. कारण राजकीय गुन्ह्याकरितां तुरुंगवास भोगावा लागणें वेगळें व खासगी गुन्ह्याकरितां तो भोगावा लागणें वेगळें. हीं तीन वर्षें टिळकांना आरोपी या नात्यांत काढावीं लागलीं. खालच्या दोन कोर्टांनीं त्यांना गुन्हेगार ठरविलें व चार दिवस त्यांना प्रत्यक्ष हकनाक तुरुंगवासहि भोगावा लागला. १९०४ नंतर खटल्याला दिवाणी दाव्याचें स्वरूप आल्यानें टिळकांच्या मनावरील ताण बराच कमी झाला; पण पुणें फर्स्ट क्लास कोर्टानें त्यांच्यातर्फे दिलेला हुकूमनामा न्या. चंदावरकर व हीटन यांनीं फिरवून त्यांना फिरून चिंतेंत पाडलें. १९१४ सालीं प्रीव्हिकौन्सिलनें त्यांचा पक्ष हाच सत्पक्ष आहे असें ठरवून मुकदम्याचा कायमचा निकाल लावून टिळकांना खरें केलें; तरी शक्य तर

प्रीव्हिकौन्सिलच्याहि निकालास धाब्यावर बसवून अन्यायानें व कांहीं अधिकाऱ्यांच्या पाठिंब्याच्या जोरावर तो निष्फळ करण्याचा त्यांच्या प्रतिपक्षाचा प्रयत्न अद्यापि चालूच आहे !

सार्वजनिक बाबतींत १८९८ पासून पुढील नऊ वर्षें टिळकांना सुखाचीं गेलीं, परंतु सुरतेच्या राष्ट्रीय सभेपासून फिरून त्यांच्यावर आपत्तिचक्र उलटलें, व तें पुढें सहा वर्षेंपर्यंत टिकलें. १९०८ सालीं त्यांच्यावर राजद्रोहाचा दुसरा खटला होऊन त्यांना सहा वर्षांची काळेपाण्याची शिक्षा झाली. ही शिक्षा देतांना न्या. दावर यांनीं त्यांच्या उतारवयाचा उल्लेख केलेला पुष्कळांच्या स्मरणांत असेलच. न्यायाधिशांनीं कमी म्हणून दिलेली सहा वर्षांची शिक्षा वास्तविक पाहतां भारीच होती; व सर जॉर्ज क्लार्क यांना सुबुद्धि सुचून जर मंडालेस टिळकांची बरदास्त बरी ठेवली गेली तशी ठेवली गेली नसती तर टिळकांची इतिश्री बंदिवासांतच झाली असती. असो; वयाच्या अठ्ठावन्नाव्या वर्षीं टिळक तुरुंगांतून सुटून आले व तेव्हांपासून त्यांचें वर्ष दीड वर्ष शांततेंत गेलें. तरी शरीरव्याधीमुळें अलीकडे ते बरेच जेरीस आलेले आहेत. पूर्वीं प्रकृति त्यांच्या आधीन असे; ती स्थिति पालटून आतां ते प्रकृतीच्या आधीन झालेले आहेत ! वरील सर्व हकिकतीवरून टिळकांचीं गेलीं वीस वर्षें बहुशः दगदगींत गेल्यामुळें त्यांचें आयुष्य पांच दहा वर्षांनीं तरी कमी झालें असावें हें उघड दिसून येईल. पण पुष्कळांना वरील हिशेबाचें कांहींच वाटणार नाहीं; म्हणजे टिळकांच्या आयुष्याचीं साठापुढचीं किती वर्षें कमी झालीं या गोष्टीला महत्त्व न देतां टिळक साठ वर्षें होईपर्यंत तरी जगले या गोष्टीचेंच त्यांना सानंद कौतुक वाटेल, आणि तें खरेंहि आहे. आमच्या प्रांतांतच काय पण इतर प्रांतांतूनहि प्रमुख अशा सार्वजनिक पुढाऱ्यांनीं वृद्धपण गांठल्याचीं उदाहरणें फारशीं सांपडत नाहींत. डॉ. दादाभाई व भांडारकर हे दोघेहि सुदैवानें अद्यापि हयात असून एक नव्वदांच्या घराला व दुसरे ऐशींच्या घराला पोंचले आहेत; पण हीं उदाहरणें केवळ अपवादात्मक मानण्यास हरकत नाहीं. शिवाय दादाभाईंचा मेहनतीचा उद्योग सुमारें वीस वर्षांपूर्वींच संपलेला असून, ते १९०६ सालीं कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेस अध्यक्ष म्हणून आले तेव्हांच अगदीं क्षीण असे झाले होते. व आज जरी ते पांच चार मिनिटें कोणाशीं संभाषण करूं शकतात, किंवा चार दोन पत्रें वाचलेलीं ऐकून किंवा सांगून सही करूं शकतात तरी ते केवळ शरपंजरींच पडलेले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. भांडारकर हे जरी उद्योगशील आहेत तरी सार्वजनिक कामांत पडणाऱ्या मनुष्याला दैवाशीं जी धक्काबुक्की किंवा जो झगडा करावा लागतो तो त्यांस केव्हांहि करावा लागलेला नाहीं. तथापि तेहि आतां क्षीणच झालेले आहेत. असो; दादाभाई व भाण्डारकर यांच्या वयांत विलायतेंत ग्लॅडस्टनसाहेबासारखे मुत्सद्दी मुख्य प्रधानकीसारखीं दगदगीचीं, व होमरूलच्या

लढायांसारखीं जबर मेहनतीचीं कामें करूं शकतात. तसेंच हल्लींच्या प्रधान-मंडळांतील मुख्य प्रधान ॲस्किथसाहेब ६३ वर्षांचे आहेत, लॉर्ड लँन्सडाऊन हे ७१ वर्षांचे आहेत, लॉर्ड मोर्ले ७७ वर्षांचे आहेत, आणि लॉर्ड हॉल्डेन हे ५९ वर्षांचे आहेत; फक्त हरकामी व सर्वाधिकारी लॉईड जॉर्ज व ऑस्टिन चेंबर्लेन हे ५३ वर्षांचे आहेत. या गोष्टी पाहिल्या म्हणजे हिंदुस्थान व इंग्लंड या देशांच्या हवेंतील फरक हाच त्यांतील सार्वजनिक कामांत पडणाऱ्या पुढाऱ्यांच्या आयुर्दायमानांतील फरकास कारणीभूत आहे असें मानावें लागतें. तें कसेंहि असो; आपल्याइकडील सुशिक्षित व उद्योगी लोकांनीं साठ वर्षांपर्यंत मजल मारली म्हणजे पुष्कळ झाली, एवढी गोष्ट खरी.

अशा रीतीनें टिळकांचा एकसष्टावा जन्मदिवस उगवणें ही गोष्ट विशेष आनंदाची असल्यानें तो आनंद व्यक्त करण्याचें साधनहि कांहीं तरी विशेषच असलें पाहिजे—कोरडें अभिनंदन हें टिळकांची योग्यता व लोकांचें प्रेम या दोहोंनाहि शोभणार नाहीं, त्या अभिनंदनांत स्वार्थत्यागपूर्वक प्रत्युपकार करण्याची बुद्धि दिसून आली पाहिजे—असें कोणासहि वाटणें स्वाभाविक होतें. यामुळें टिळकांना कांहीं तरी आहेर करावा अशी कल्पना निघाली, व ती इतकी सर्वसंमत ठरली कीं, ज्या शेंकडों लोकांपाशीं तिचा उच्चार झाला त्यांतील एकानेंहि तिच्याविरुद्ध एक अक्षरहि काढलें नाहीं. आहेर हा सन्मानदर्शक तर असतोच, पण टिळकांना एकसष्टाव्या जन्मदिवशीं देण्याचा आहेर पोकळ सन्मानदर्शकच नसावा, तर तो भरीव व मौल्यवान असा असला पाहिजे; किंबहुना त्या आहेरास त्यांच्या आजपर्यंतच्या सार्वजनिक कामगिरीचें बक्षीस असेंहि स्वरूप आलें तरी शोभेल असें लोकांस वाटूं लागलें. टिळकांची उपजीविका सुदैवानें आज स्वतंत्र साधनांनीं होऊं शकते, तिजकरितां त्यांना लोकांनीं प्रत्यक्ष दिलेल्या तनख्यावर अवलंबून राहावें लागत नाहीं ही गोष्ट खरी. तरी पण सरकार ज्याप्रमाणें आपल्या नोकरांस तीस वर्षांच्या नोकरीच्या अखेर पेन्शन देतें, त्याप्रमाणें राष्ट्रानेंहि राष्ट्रसेवकांस त्यांच्या उतारवयांत पेन्शन कां देऊं नये? टिळक सरकारी नोकरींत असते तर त्यांना आज सालिना पांच हजार रुपये पेन्शन मिळणें अशक्य नव्हतें हें तर झालेंच; पण टिळकांनीं राष्ट्राची सेवा जितक्या इमानानें व मनोभावानें केली तितक्या इमानानें व मनोभावानें किती सरकारी नोकर ती करीत असतील? सालाचे पांच हजार रुपये उत्पन्न म्हटलें म्हणजे त्याला सव्वा लाखाचें तरी मांडवल पाहिजे. अर्थात् टिळकांना सालिना राष्ट्राकडून पांच हजार रुपये पेन्शन मिळावें असें असेल तर त्यांकरितां एक किंवा सव्वा लक्षाची तरतूद होणें जरूर. अशा उघड्या हिशेबानें आहेराची रक्कम या कल्पनेच्या उत्पादकांकडून एक लक्ष ठरविली गेली. ही रक्कम जुळल्यास त्यांना ती ६१ व्या जन्मदिवशीं नजर करावी व खरोखरच त्यांनींहि ती केवळ खासगी

म्हणून स्वीकारावी अशी कांहींची अत्यंत उत्कट इच्छा होती. तथापि त्याबरोबर हेंहि सांगितलें पाहिजे कीं, ज्यांना अशी उत्कट इच्छा होती त्यांनादेखील मनां-तून अशी पक्की भीति होती कीं, टिळक हे आहेराच्या रकमेपैकीं कांहीं झालें तरी एका पैलादेखील शिवणार नाहींत; तर उलट त्यांत कदाचित् पदरची यथा-शक्ति भरच घालून ती सार्वजनिक कार्याकडे लावतील. असो; रकमेचा उप-योग टिळकांनीं कसा करावा याबद्दल जरी मतभेद किंवा मतवैचित्र्य असलें तरी निदान एक लक्ष रुपये तरी जमवून टिळकांना सन्मानार्थ आहेरादाखल द्यावे या गोष्टीबद्दल सर्वांचें ऐकमत्यच होतें; व ही रक्कम अवघ्या दोन तीन आठ-वड्यांत जुळली याहून या कल्पनेच्या पसंतीचा आणखी पुरावा तो कोणता ?

आम्ही इकडे ज्याला आहेर म्हणतों त्याला इंग्रजींत पर्स ( पैशाची थैली अर्थात पैशाची देणगी ) असें नांव आहे व मोठ्या कामगिरीबद्दल मोठें बक्षीस म्हणून ही ' पर्स ' दिल्याचीं उदाहरणें परदेशांच्या इतिहासांत अनेक आढळतात. लॉर्ड किचनेर यांना खार्टूमच्या लढाईत यश मिळविल्यानंतर व लॉर्ड रॉबर्ट्स यांना बोअर–युद्धसमाप्तीनंतर ब्रिटिश पार्लमेंटनें लाखों रुपयांच्या देणग्या दिल्याचें प्रसिद्धच आहे. पण प्रस्तुत प्रकरणीं याहून समर्पक अशीं उदाहरणें आह्मास आठ-वतात तीं आयरिश पुढारी ग्रॅटन व पार्नेल यांना आयरिश राष्ट्रानें बक्षिसादाखल मोठमोठ्या रकमा नजर केल्याविषयींचीं होत. आयरिश पार्लमेंटला स्वातंत्र्य मिळ-वून देण्याची मोठी चळवळ सन १७८२ सालीं यशस्वी झाल्यानंतर लोकपक्षाचा पुढारी हेनरी ग्रॅटन यास आयरिश पार्लमेंटनें पन्नास हजार पौंडांची देणगी मंजूर केली. यापूर्वीं ग्रॅटन हा उपजीविकेकरतां वकिलाचें काम करून राष्ट्रसेवा करीत असे. पण केवळ उपजीविकेचें साधन निर्माण करण्यांत कर्त्या राष्ट्रसेवकाचा जो वेळ जातो तो व्यर्थ जातो, त्याचा अपव्ययच होतो असें म्हणण्यास हरकत नाहीं; याकरितां राष्ट्रानें राष्ट्रसेवकाच्या पोटापाण्याची तरतूद करावी व राष्ट्रसेवकानें दिव-साचे चोवीसच्या चोवीस तास राष्ट्रसेवेच्या विचारांत व आचारांत घालवावे ही योजना खरोखरच सोपपत्तिक व समंजसपणाची आहे. आणि हीच गोष्ट लक्षांत आणून आयरिश पार्लमेंटनें ग्रॅटनला पन्नास हजार पौंडांची म्हणजे साडेसात लक्ष रुपयांची देणगी दिली. ग्रॅटन हा प्रथम ही देणगी घेईना, पण अखेर त्यानें ती घेतली. त्या रकमेंतून त्यानें एक जमीनदारी खरेदी केली, व वकिली सोडून देऊन त्यानें पुढील सर्व आयुष्य केवळ राष्ट्रसेवेंतच घालविलें. या देणगीच्या वेळीं ग्रॅटन हा अवघ्या छत्तीस वर्षांचा होता ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. दुसरें उदाहरण पार्नेलचें होय: पार्नेल यानें पुष्कळ वर्षांच्या श्रमानें व साहसानें आयर्लंदची राष्ट्रीय चळवळ यशस्वी केल्यानंतर त्याला चाळीस हजार पौंडांची म्हणजे सहा लक्ष रुपयांची देणगी देण्यांत आली; व हा पैसा त्याचा जमीनजुमला सावकराकडे गहाणांत पडला

होता तो सोडविण्याकडे खर्चण्यांत आला. अशा प्रकारचीं उदाहरणें इकडेहि घडलेलीं आहेत. सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं मुंबई टाईम्सपत्राचे संपादक रॉबर्ट नाईट हे मुंबई सोडून कलकत्त्यास 'स्टेटस्मन'पत्राचें संपादकत्व पत्करून जाऊं लागले तेव्हां त्यांच्या कामगिरीबद्दल मुंबईच्या लोकांनीं एक लक्ष रुपये नजर केले होते. तसेंच प. पू. दादाभाई नौरोजी हे जेव्हां सर्व धंदा सोडून देशाचें काम करण्यास विलायतेस जाऊं लागले तेव्हां त्यांनाहि त्यांच्या मित्रमंडळींनीं बरीच रक्कम जमा करून नजर केली होती असें सांगतात. लॉर्ड रॉबर्टस, किचनेर, ग्रॅटन, पार्नेल, रॉबर्ट नाईट वगैरे लोकांना दिलेल्या आहेराचा उपयोग, अर्थात् तो देणारांच्या इच्छेनुरूपच कां होईना, त्या गृहस्थांनीं खासगी कामाकडे केला. टिळकांनीं दिलेल्या आहेराचा उपयोग अशा खासगी नात्यानें करावा अशी पुष्कळांची इच्छा होती हें वर सांगण्यांत आलेंच आहे. पण अशा देणगीचा उपयोग खासगी कामाकडे करण्याची टिळकांची इच्छा नाहीं, व सुदैवानें त्यांना अद्यापि तशी जरूरीहि नाहीं. त्यांना एखादी जमीनदारी विकत घेण्याची हौस नाहीं, किंवा त्यांचें घरदार ईश्वरकृपेनें अद्यापि गहाण पडलेलें नाहीं. शिवाय आज 'केसरी' मुळें टिळकांना निर्वाहाचें जें स्वतंत्र साधन आहे तेंहि 'केसरी' चे वर्गणीदार, म्हणजे एका दृष्टीनें लोकच, त्यांना मिळवून देतात ही गोष्टहि कांहीं खोटी नाहीं. तेव्हां लोकांनीं आहेर म्हणून दिलेल्या देणगीच्या पैशाचा खासगी रीतीनें उपयोग करूं नये असा जो टिळकांनीं निश्चय केला तो सर्व दृष्टींनीं योग्यच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

तथापि, आहेराचा खाजगी उपयोग न करितां केवळ ट्रस्टी या नात्यानें त्याचा स्वीकार करण्यानें या आहेरास टिळकांनीं एक निराळें व नवीन स्वरूपच दिलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. तें स्वरूप म्हटलें म्हणजे राष्ट्रकार्यार्थ उभारलेल्या कायमफंडाचें होय. स्वतःस दिलेल्या आहेराचें टिळकांनीं स्वत्व—परिवर्तन केल्यानें व त्यांत पदरचें एखादें तुलसीपत्र टाकण्याचेंहि ठरविल्यानें या कायमफंडास लोकांनीं आणखी वर्गणी देऊन तो वाढवावा, अशी जाहीर विनंति करण्यासहि आतां हरकत उरलेली नाहीं. टिळकांनीं आपल्या उत्तरांत आश्वासन दिल्याप्रमाणें प्रस्तुत फंडाचें ट्रस्ट डीड होऊन त्याची योजना व नियम प्रसिद्ध झाल्यावर या फंडास पुनः एक उचल आपोआपच मिळेल. केवळ सार्वजनिक व सर्वस्वीं कायदेशीर अशा कार्याकरितां आपल्या देशबांधवांकडे द्रव्ययाचना करण्यास मनुष्यास जो जोम व उत्साह वाटतो त्या जोमानें व उत्साहानें कदाचित् टिळकहि पुढेंमागें या फंडाच्या वृद्धीकरितां याचना करतील व ती केल्यास लोक त्या याचनेस त्यांच्या व टिळकांच्या नात्यास योग्य असाच जबाब देतील याविषयीं कोणीहि खातरजमा देऊं शकेल. कारण प्रस्तुत आहेराच्या बाबतींत लोकांनीं जो उदारपणा व स्वार्थत्याग करण्याची तत्परता दाखविली ती खरोखरच

अवर्णनीय होती. इतक्या थोड्या वेळांत बिनबोभाट एवढी मोठी रक्कम जमा झाल्याची उदाहरणें पुष्कळशीं सांपडतील असें वाटत नाहीं. सरकार, उदार संस्थानिक, धनिक लोक वगैरेंची गोष्ट स्वतंत्र आहे; कारण लाखांचा आंकडा त्यांच्या खिसगणतींत नसतो. पण टिळकांच्या आहेराची रक्कम केवळ मध्यम वर्गांतील लोकांकडूनच जमलेली आहे; सरकार, संस्थानिक, सरदार, लक्षाधीश यांचा या रकमेस नुसता चुकून किंवा दुरूनहि स्पर्श झालेला नाहीं ही विशेष गोष्ट या कामीं लक्षांत ठेवावयास पाहिजे. प्रस्तुतच्या आहेराची मूळ कल्पना शुक्रवार ता. ३० जून रोजीं रात्रीं आठ वाजतां सार्वजनिक सभेच्या माडीवर कांहीं मित्रमंडळी टिळकांचा ६१ वा जन्म–दिवस कसा साजरा करावा याची चर्चा करीत असतां निघाली; व रविवार ता. २३ जुलै रोजीं रात्रीं आठ वाजेपर्यंत ८७३३६८३८१ रुपये नगद वसूल झाले ही गोष्ट चिरस्मरणीय होऊन राहील यांत शंका नाहीं. कल्पना निघाल्यावर पहिले तीन चार दिवस पुण्यांतील वर्गणीचा अंदाज कायम करण्यांत गेले. कारण पुण्यास चांगलासा आंकडा जुळल्याशिवाय बाहेरगांवच्या मित्रमंडळीपुढें ही कल्पना ठेवून वर्गणी मागण्यास पुणेंकरांस अधिकार पोंचलाच नसता. पुण्यानंतर मुंबई येथील मित्रमंडळीमध्यें चर्चा व अंदाज करण्यांत चार दिवस गेले, व यानंतर बाहेरगांवच्या मंडळीस ही बातमी कळविण्यास सुरुवात झाली. अर्थात् पुण्यामुंबईच्या लोकांच्या वर्गण्या गोळा करण्यास कदाचित् पुरे दोन आठवडे मिळाले असले तरी बाहेरगांवच्या लोकांस पुरता एक आठवडाहि मिळाला नाहीं. आणि बऱ्याच ठिकाणच्या लोकांना तर आहेराची कल्पना ता. १८ जुलैचा केसरी हातीं पडल्यावर आणि ती देखील मोघम शब्दांनींच कळली. अर्थात् त्यांना वर्गणी पाठविण्यास अवघे दोन तीन दिवसहि नव्हते. हें तारेनें आलेल्या मनीऑर्डरींच्या संख्येवरून उघड होत आहे. असो; आहेरासंबंधीं पहिली एक हजारांची रक्कम मुंबई बँकेंत तारीख ४ जुलै रोजीं जमा झाली. त्यानंतर पुढें कांहीं तारखांस येथें खजिनदाराकडे पैसे रोख वसूल कसकसे झाले हें खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| तारीख | जमा. |
|---|---|
| ता. १८ ( जुलै ) | ४९३१ |
| ,, १९ | १०७४५ |
| ,, २० | ४७८७ |
| ,, २१ | ७८५५ |
| ,, २२ | १९८० |
| ,, २३ | ४९४६२ |

रविवारीं तर रुपये मोजून घेण्यास फुरसत नाहीं असाहि कांहीं काळ गेला. नक्की वटबेरीज करण्याचे प्रयत्न प्रत्येक वेळीं फुकट जात; कारण बेरीज करितां

 ३२८७९१

करितां नवीन रक्कम जमा झाल्यानें बेरीज फुकट जाई. संध्याकाळीं सभेंत आहेराचा नक्की आंकडा जाहीर करण्यास रा. केळकर उभे राहिले. ते बोलत असतां मध्येंच त्यांच्या हातांत सातशें रुपयांचें एक पाकीट एका गृहस्थानें आणून दिलें! आहेराची कल्पना अगदीं आयत्या वेळीं निघालेली, पैसे देण्यास वेळ थोडा व जागजागीं सरकारी अधिकाऱ्यांचा तीव्र विरोध, असें असतांहि सोमवार ता. २४ जुलै रोजीं रात्रीं आठ वाजेपर्यंत एकंदर जमा ८८९७४ रु. झाली याचें कारण केवळ लोकांची टिळकांवर असलेली भक्ति हेंच होय. असल्या भक्तीमुळें आपणावर उतार वयांत न उचलण्यासारखें नवीन ओझें लोक घालीत आहेत असें टिळकांना वाटणें स्वाभाविक आहे. पण परवांच्या समारंभांत मानपत्र वाचल्यानंतर रा. गंगाधरराव देशपांडे यांनीं सांगितल्याप्रमाणें लोकांनीं टिळकांना जो हा आहेर केला तो भावी सेवेच्या किंवा उपकाराच्या अपेक्षेनें नव्हे, तर त्यांजकडून पूर्वीं होऊन गेलेल्या सेवेच्या व उपकाराच्या आठवणीनेंच होय. या आहेरानें टिळकांकडून लिहून घेतल्या जाणाऱ्या एखाद्या नव्या कर्जरोख्याचा स्टँप विकत घेतला गेला नसून, त्यांच्याकडून पूर्वींच झालेल्या कर्जफेडीच्या पावतीतिकिटाची ती किंमत आहे.

अशा कौतुकास्पद रीतीनें टिळकांच्या ६१ व्या जन्मदिवसाचा समारंभ साजरा झाला. उतार वयांतला वाढदिवस म्हणजे सुखाच्या कोंदणांत बसविलेलें दुःखच होय. तरण्याला म्हातारा हो म्हणून आशिर्वाद देतांना ज्या वृद्धपणाची कल्पना मनांत असते तिच्यापेक्षां वेगळ्या वार्धक्याचा अनुभव स्वतः वार्धक्याला पोंचलेल्या मनुष्यास येत असतो. त्याला दीर्घायुष्याची इच्छा असते, पण तेवढ्यानें वार्धक्यपीडा सुसह होत नाहीं; म्हणून दीर्घायुष्याचा आशीर्वाद कोणी कोणास दिल्यास तो स्वीकारणारास दीर्घायुष्यापेक्षां मला यानें नुसत्या आरोग्याचा आशिर्वादच कां दिला नाहीं, असेंहि वाटण्याचा संभव असतो. पण टिळकांना वृद्धपणीं नुसतें आरोग्यच नव्हे तर इतर उपाधीहि जाच करीत आहेत, त्यांच्या ६१ व्या जन्मदिवशींच जामीनकी मागणाऱ्याच कां होईना पण एका नव्या खटल्याची नोटीस बजाविली जावी हा योगायोग खरोखर विलक्षण नाहीं असें कोण म्हणेल? पण संकटानें टिळकांस नवीन स्फुरण येत असल्यानें या नवीन खटल्यामुळें त्यांच्या प्रकृतीस अपकारापेक्षां उपकारच अधिक होण्याचा संभव आहे. पण हें नवें संकटहि जुन्या अनेक संकटांप्रमाणेंच नाहींसें होऊन टिळकांना पूर्ण आरोग्यासह आयुष्य लाभो अशा प्रकारची आशा केसरीच्या सर्व वाचकांतर्फे प्रकट करून हा लेख पुरा करितों.

# टिळकांची विलायतची सफर.

'अरविंद' १९२०

लो. टिळकांचा इकडील वर्तनक्रम सर्व लोकांना परिचितच होता. कारण, बाहेर कोठेंहि चारचौघांत मिसळून सर्वस्वीं त्यांच्यापैकीं एक असल्याप्रमाणेंच ते वागत. प्रत्यक्ष त्यांच्या खासगी घरींही ते असतील तेथपर्यंत सर्व तऱ्हेच्या लोकांचा सर्व काल प्रवेश असे. म्हणून त्यांना प्रेक्षकांपासून खासगी असें कांहींच राखून ठेवितां येत नसे व तसें ठेवण्याची त्यांची फारशी इच्छाही नसे. परंतु सुमारें चौदा महिने ते हिंदुस्थानाबाहेर म्हणजे विलायतेंत होते. त्यावेळचा त्यांचा वर्तनक्रम कसा असेल याविषयीं लोकांना एक प्रकारचें कुतूहल वाटत असें, असे अनेक लोकांनीं विलायतेस मला पाठविलेल्या पत्रांवरून व इकडे आल्यावर विचारलेल्या प्रश्नांवरून दिसून आलें होतें. 'अरविंद' मासिकाच्या संपादकांनीं "लो. टिळकांविषयीं कांहीं अपूर्व असें लिहा." अशी विनंती केल्यावरून टिळकांची विलायतेंतील रहाणी ही गोष्ट बऱ्याच वाचकांना 'अपूर्व' वाटण्यासारखी आहे अशा समजुतीनें ती खालीं देतों.

टिळक विलायतेस गेले त्यावेळीं पुष्कळांना अशी शंका वाटत असे कीं, टिळकांची रहाणी पूर्णपणें देशी पद्धतीची असल्यामुळें त्यांचें तिकडे पदोपदीं नडेल. ते लोकांना हंसतील ! लोक त्यांना हंसतील ! मिळून त्यांच्या सफरीचा सगळा गोंधळ उडेल. पण अनुभवांतीं हा अंदाज सर्वस्वीं फसला. टिळकांची रहाणी देशी रिवाजाची असली तरी युरोपिअन लोकांच्या रहाणीची त्यांना ऐकून व वाचून फार सूक्ष्म माहिती होती. यामुळें त्यांनी तिकडील लोकांविषयीं उपहासबुद्धि दर्शविली नाहीं. तसेंच आपण परक्या समाजांत गेलों असतां कसें वागावें, ह्याचीही त्यांना पूर्ण जाणीव असल्यानें त्यांचें इंग्लिश समाजांतील वर्तन तिकडील शिष्टाचारास अनुसरून राहिलें व ज्या गोष्टी देशी रिवाजाच्या त्या तशाच तिकडेही त्यांना राखाव्या लागल्या. त्या लोकांना पटतील असाच त्यांचा आत्मविश्वास असे. सभ्यता ही केव्हांही व कोठेंही झाले तरी शिष्टाचाराचा आत्मा आहे व देशदेशच्या रितीभाती कितीही भिन्न भिन्न असल्या तरि सभ्यता म्हणून म्हणतात ती कोणच्याही देशांत एकाच स्वरूपांत आढळते. नम्रता, आदरबुद्धि, लीनपणा, सहिष्णुत्व, मनाचा मोठेपणा, कांहीं मर्यादेपर्यंत वाईटही चांगल्याच बुद्धीनें झालेलें आहे असें मानण्याची तयारी, व साधारणतः शारीरिक स्वच्छतेविषयीं अगत्य, इतक्या सर्व गोष्टी मिळून सभ्यता बनते असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि या दृष्टीनें इंग्लंड फ्रान्सपासून तों चीन जपानपर्यंत कोणच्याही देशांत तुम्हीं जा, तुम्हांला खरी सभ्यता व शिष्टाचार फारसे वेगवेगळ्या

स्वरूपांत दिसणार नाहींत. विदेशी मनुष्यांचा संबंध आला असतां आत्मविश्वासाचें तत्वही बरेंच महत्त्वाचें ठरतें. कारण एकाकरितां दुसरा रीतरिवाज किंवा पोषाख बदलीत नाहीं. तरी पण आपला स्वतःचा पोषाख चांगला आहे, त्याला नांव ठेवण्यासारखें कांहीं नाहीं असा आत्मविश्वास मनुष्याच्या ठिकाणीं असला तरच तो दुसऱ्याशीं वागतांना शरमिंदा होत नाहीं. आणि माझें तें निदान माझ्यापुरतें तरी बरोबर आहे अशी स्थिर बुद्धि ज्याच्या मनांत असते तोच मिथ्यानुकरणापासून अलिप्त राहतो. दुसऱ्याचें अनुकरण करण्यास जाऊन जो फसला त्याच्यासारखी फजिती मात्र दुसऱ्या कोणाची नाहीं.

लो. टिळक विलायतेस गेले त्यापूर्वी बॅ. बॅप्टिस्टा हे तेथें डेप्युटेशनच्या कार्याकरितां गेले होते व त्यांनीं टिळकांकरितां घर भाड्यानें घेऊन चालचलाऊ बिऱ्हाड सजवून ठेविलें होतें. त्यांचें पहिलें वसतिस्थान लंडनच्या पश्चिम भागांत 'मैदाव्हेल' या मोहल्लयांत होतें. घर स्वतंत्र असून त्यांत सर्व सोयी होत्या. पण हिंदी मनुष्याला हिंदी रिवाजानें रहावयाचें असल्यास विलायतेंतही फारशा सोयी लागत नाहींत. साध्या रहाणीचा फायदा मनुष्याला जगभर मिळतो. हिंदुस्थानांतल्याप्रमाणेंच लंडनमध्येंही टिळक दोन वेळ चहा व दोन वेळ जेवण याशिवाय कांहींही खात नसत. येऊन जाऊन त्यांच्या जेवणाचीच थोडीशी अडचण पडण्यासारखी होती. कारण शरीररोगामुळें त्यांना सातूच्या पिठाच्या पुऱ्यांशिवाय दुसरें कांहीं खावयाचें नव्हतें. पण ही अडचण लवकरच भागली. कारण टिळकांनीं शुश्रूषेकरितां बरोबर नेलेल्या गृहस्थांनीं सैपाकीण इंग्रज बाईला हा पदार्थ तयार करण्याला लवकरच शिकविलें. ही सैपाकीण बाई, तिची मुलगी व तिचा नवरा असें सर्व कुटुंबच्या कुटुंब टिळकांच्या नोकरीस असल्यामुळें टिळकांची सर्व परिचर्या त्यांजकडून होई. हिंदी लोकांशीं कसें वागावें, हें त्यांना शिकावयास मिळाल्यामुळें टिळक दुसरीकडे राहावयास गेल्यावरही या इंग्रज नवराबायकोनीं ( मि. आणि मिसेस मॅकनाल्टि ) तीच जागा आपणांकडे ठेवून तेथें हिंदी लोकांकरितां बोर्डिंग काढलें. या कुटुंबानें टिळकांची परिचर्या केली ही त्यांना एक शिफारसच होऊन राहिली होती. टिळक घर सोडून गेल्यानंतर त्यांनीं टिळकांचा फोटो जेवणाच्या दिवाणखान्यांत सजवून ठेवला होता.

टिळकांच्या पोषाखाच्या दृष्टीनें बूट व पाटलोण व लांब कोट एवढा फरक विलायतेंत पडला होता. उपरण्यास रजा मिळाली होती. पण शिरोभूषण पगडी ही मात्र डोक्यावर राहिली. बूट पाटलोण हे विलायतेंत अपरिहार्यच आहेत. कोणच्याही देशाचा पोषाख पुष्कळसा तेथील हवामानावरूनच बनलेला असतो. इंग्लंडांत लोंकरीचे स्टॉकिंग्स् व बूट न घालतां ऐन उन्हाळ्यांत भर दोन प्रहरीं घरांत कांहीं वेळ असतां येईल; नाहीं असें नाहीं. पण मोकळ्या पायानें किंवा जोडा घालून उन्हाळ्यांतही सर्व दिवसभर वावरतां येणार नाहीं. तीच गोष्ट

पाटलोणीची. पाय चांगले लपेटणारें असें लांबलचक धोतर नेसून उन्हाळ्यांत लंडनच्या रस्त्यांतून फिरतां येईल; पण तेथील हवा इतकी चंचल आहे कीं, केव्हां गारठा पडेल याचा नेम नाहीं. व गारठ्याच्या हवेला विजार पाटलोणीसारखा बंदिस्त कपडाच हवा. दक्षिणी पगडी व साहेबी टोपी यांत अधिक कुरूप कोणतें हा प्रश्नच आहे. पण तुमची हॅंगाडी टोपी जशी तुम्हांला वाईट वाटत नाहीं तशीच आमची पगडी आम्हांला; अशा आत्मविश्वासानें मान ताठ करून मनुष्य चालला तर लंडनच्या रस्त्यांतही त्याला कोणी सहसा हंसणार नाहीं. नेकटाय वगैरे बाबींना टिळकांनीं सर्वस्वीं फांटा दिलेला होता. हवामान लक्षांत घेतां बूट पाटलोण या गोष्टी केवळ सोयीच्या म्हणतां येतील, पण नेकटाय ही मात्र अनुकरणाच्या दास्यत्वाची पक्की खूण आहे. खुद्द विलायतेंतही नेकटाय न घालणारे असे धर्मोपदेशक वगैरे लोक असतात; त्यांचें पाहून नेकटाय न घालणारे टिळक हेही एक प्रीस्ट किंवा धर्मोपदेशक आहेत असें प्रेक्षक मानीत व हंसत नसत.

घरच्या वागणुकींत ठेबलावर जेवणें ही एक गोष्ट वगळली असतां टिळकांच्या इकडच्या व तिकडच्या वागणुकींत कांहींच फरक नव्हता. जेवतांना ते जिंजर किंवा सोडा वॉटर घेत; पण हे पदार्थ ते केंव्हां केव्हां घेत असल्यामुळें या बाबतींत फरक असा कांहींच नव्हता.

इंग्लंडांत बारा चौदा महिन्यांत टिळकांनीं काय काय काम केलें हें येथें सविस्तर मी सांगत नाहीं. मुख्य मुद्दा वागणुकीसंबंधाचा आहे. इकडेही गव्हरनरपर्यंत लहान थोर दर्जाच्या युरोपिअन लोकांशीं भेटण्याबोलण्याचा टिळकांना परिपाठ असल्यामुळें तिकडे इंग्रज लोकांशीं वागतांना टिळकांचें कोठेंच अडलें नाहीं. दिवाणखान्यांत शिरतांना आधीं कोणी शिरावें, मागून कोणी जावें, बाहेर पडतांनां आधीं मागें कोण असल्या सूक्ष्म रिती रिवाजांकडे टिळकांनीं जसें इकडे केव्हांही लक्ष दिलें नाहीं तसेंच तिकडेही भेटणें बोलणें अर्थात् कामापुरतें व कामही ठराविक म्हणजे राजकीय विषयाचा वादविवाद करणें हें असल्यामुळें आणि टिळकांचें बोलणें मुद्देसूद व कुशाग्रबुद्धि दिसून येणारें असल्यामुळें परक्या मनुष्यावर त्यांची छाप तेव्हांच हटकून पडे; व बुद्धीची छाप मनावर पडल्यानंतर किरकोळ गोष्टींकडे लक्ष देण्याला सभ्य मनुष्याला अवसरच मिळत नाहीं. शिवाय कारणाखेरीज या बारा चवदा महिन्यांत कोणाकडे ते गेले आले नाहींत. कोरड्या शिष्टपणाच्या संभाषणांत उगाच बोलून हवेंत सोडण्यासारख्या पुष्कळ गोष्टी असतात; पण या दृष्टीनें टिळकांचें विलायतेंत एकाही इंग्रजाशीं भाषण झालें असेल असें वाटत नाहीं. टिळकांना उपहाराचीं व जेवणाचीं क्वचित् आमंत्रणें येत व या प्रसंगीं इतर लोक जेवीत असतां टिळकांना स्वतः एखाददुसरें फळ तोंडांत उचलून टाकण्याखेरीज दुसरा उद्योग नसल्यामुळें रिकाम्या गप्पागोष्टी बोलण्याला वेळ होई व त्याचा मात्र या कामीं उपयोग होत असे. टिळकांना दूरचें न्याहाळत नसे हें

प्रसिद्ध आहे, पण इकडच्याप्रमाणें तिकडेही या शारीक अदूर दृष्टीची वाण त्यांनीं चाणाक्षपणानें भरून काढली होती. लंडनच्या नकाशाचा व लंडन गाईडचा त्यांनीं एक प्रकारें अभ्यासच केला होता. यामुळें एकाद्या नवीन ठिकाणच्या पत्त्यासंबंधानें ते एखाद्या माहितगारासारखे वागत; पण लंडनचे रस्ते, आगगाड्या वगैरे इतक्या गोंधळून टाकण्यासारख्या आहेत कीं, तेथें टिळकांपेक्षांही चाणाक्ष मनुष्य प्रथम गोंधळूनच जावयाचा. पण अंग कमकुवत झालेलें, पाय लटपटणारे अशी स्थिती असल्यामुळें कोणीतरी बरोबर घेतल्याशिवाय ते कधींही बाहेरच पडत नसत. यामुळें टिळकांचा अंदाज कोठें चुकला तर तो सुधारून घेण्यास जोडीदार असे.

बारा चौदा महिने लंडनमध्यें राहून तें शहर इतकें थोडें पाहिलेला मनुष्य टिळकांप्रमाणें दुसरा क्वचितच मिळेल. कामाशिवाय टिळक सहसा बाहेर पडत नसत व काम होतांच घरीं परत येत. सहज खेप टाकावयाची तर ती हेरल्ड पत्राच्या कचेरीकडे म्हणजे लॅन्सबरींना किंवा वृद्ध सोशियालिस्ट हाइंडमन यांना भेटण्याकरितां. इंडिया ऑफीसच्या लायब्ररीत ते एक दोन वेळ गेले होते, कारण तेथें संशोधक विद्वान ग्रहस्थ थॉमस हा लायब्ररिअन आहे. एरवीं त्यांनीं नाटकगृहें, बगीचे, इमारती, फार काय पण ऐतिहासिक महत्वाचीं स्थळें हींसुद्धां वर्ज्यच केलीं होतीं.. ‘ ग्रामं गच्छन् तृणं स्पृशति ’ या न्यायानें सभांना किंवा आगाऊ मुलाखती ठरलेल्या गृहस्थांच्या भेटीला जातांना त्यांनीं जें लंडन पाहिलें असेल तेवढेंच ! निवृत्तिपर मनाला शरीराच्या दुर्बळतेची जोड मिळाल्यामुळें अमुक एक गोष्ट म्हणून आपण पहावयास जाऊं अशी उत्सुकता त्यांना केव्हांच वाटली नाहीं. लौकिक मनुष्याच्या दृष्टीनें टिळकांची विलायतची खेप बहुधा फुकटच गेली. पण टिळक ‘ विलायते’ला गेलेच नव्हते; ते कांहीं एक अवश्य कर्तव्य करण्याला गेले होते !

# लो. टिळक यांचा मृत्यु.

केसरी ता. ३ आगस्ट १९२०

वरील मथळ्याचे भयंकर शब्द पाहतांच 'केसरी' च्या वाचकांच्या डोळ्यांस अंधारी येऊन त्यांच्या हातून हा कागद गळून पडेल, व त्यांचें देहभान जाऊन त्यांस पुढील मजकूर वाचवणारहि नाहीं हें आम्ही जाणतों. तथापि ह्या मृत्यु-लोकच्या वस्तींतील मनुष्यकृत्यें देहावसान होईपर्यंत करावींच लागतात, तीं चुकत नाहींत. लो. टिळक यांच्या मृत्यूसंबंधाची बातमी वाचल्यानंतरहि त्यांच्या आजारीपणाची सविस्तर हकीकत, उद्वेगाचा काल लोटल्यानंतर तरी, त्यांना वाचावीशी वाटणार. किंबहुना टिळकांवरील त्यांच्या प्रेमामुळें त्यांना ती सविस्तर कळावी अशी इच्छाहि असणार. याकरितां ही दुःखकारक हकीकत आम्हालाहि लिहिण्यावांचून सुटका नाहीं, म्हणून ती हकीकत खालीं देत आहों. केसरीशीं प्रस्तुत लेखकाचा २४ वर्षांपूर्वीं प्रथम संबंध आला. त्या अवधींत इतकी दुःखद हकीकत त्याला आजच प्रथम लिहावी लागत आहे; व त्याची अशी खात्री आहे कीं, केसरीच्या वाचकांनींहि आजवर इतकी दुःखद हकीकत दुसरी वाचली नसेल. कारण केसरीच्या वाचकांचें लोकमान्यांवरील प्रेम स्वतः लोकमान्यांच्या लोकां-वरील प्रेमाइतकेंच लोकोत्तर होतें !

यापूर्वीं एकदोन आठवडे लोकमान्यांच्या आजारीपणाची त्रोटक वार्ता आम्ही केसरींत देत होतों, व ही वार्ता जशी त्रोटक तसाच त्यांचा आजारीपणाहि नैमि-त्तिक व चालचलाऊ होता. पण मुंबईहून आलेल्या तारेवरून मागील अंकांतील आमची याविषयींची बातमी छापून गेल्यानंतर सुमारें तास अर्ध्या तासाच्या आंतच लोकमान्यांच्या आजारास मुंबईस विशेष तीव्रता येण्यास सुरवात झाली असें दुसरे दिवशीं पुण्यास आलेल्या तारेवरून समजलें. टिळकांचा आजार साधा नाहीं, चिंता वाटण्यासारखा आहे, ही गोष्ट त्यांना औषधोपचार करणाऱ्या डॉक्टर मंडळींना सोमवार ता. २६ रोजीं मध्यरात्रीनंतर उमगली, व तेथपासून त्यांचा आजार एकसारखा वाढत जाऊन त्याचा असा हा दुःखकारक परिणाम गेल्या शनवारीं उत्तर रात्रीं झाला. यामुळें केसरीच्या मागील अंकीं 'लोक-मान्यांची प्रकृति मलेरियाच्या तापानें थोडी बिघडली आहे तथापि काळजी करण्यांचें कारण नाहीं' असें वांचून पुढच्याच अंकांत त्यांच्या मृत्यूची काळीज करपून सोडणारी बातमी त्यांना वाचावी लागत आहे! दरम्यानच्या अवधींत मुंबई पुणें येथील इंग्रजी मराठी दैनिक पत्रांतून टिळकांचा आजार वाढल्याची बातमी बाहेरगांवीं ज्या लोकांस समजली त्यांचीं मात्र मनें प्रस्तुतची भयंकर बातमी ऐकण्याला किंचित् तरी तयार झालेलीं असण्याचा संभव आहे. पण ज्या

गांवीं हीं दैनिक पत्रें जात नाहींत किंवा जेथें तार पोंचूं शकत नाहीं अशा गांवच्या केसरीच्या वाचकांस आजचा हा अंक म्हणजे अकल्पित वज्राघात असाच वाटेल यांत शंका नाहीं.

लोकमान्यांच्या प्रस्तुतच्या आजाराची पूर्वपीठिका सुमारें १ महिन्याची आहे. याहिपूर्वीं हरएक प्रकारची दगदग, जिकीर व सार्वजनिक कामकाजाचे श्रम यांमुळें केवळ उतार वयानें सहजच नाजूक व कमकुवत झालेल्या त्यांच्या प्रकृतींत भर पडून त्यांची काय स्थिति झाली होती याविषयीं आम्ही येथें कांहीं सविस्तर सांगत असत नाहीं. पण त्यांची चर्या पाहणारास अलीकडे एक गोष्ट ढळढळीत दिसून येत असे कीं, टिळकांची प्रकृति खालावली आहे, तिच्यांत पूर्वींची रग व सोशिकपणा राहिलेला नाहीं, व देहस्वभावामुळें ते तडफेनें अनेक उद्योग पूर्वींसारखे करीत असले व त्याचा प्रत्यक्ष परिणाम हातोहात लोकांच्या नजरेस न दिसला तरी त्यांच्या प्रकृतीवर तो नकळत पण खास होतो. अशा स्थितींत त्यांनीं हातीं घेतलेला शेवटचा उद्योग म्हणजे. श्री. जगन्नाथमहाराज यांच्या इस्टेटीसंबंधानें कोल्हापुरकरमहाराज छत्रपति व श्री. बाळामहाराज यांनीं हायकोर्टाकडे केलेल्या अर्जास प्रत्युत्तर देऊन तो हाणून पाडणें हा होय. टिळकांना मलेरियाचा ताप सुमारें १॥ महिन्यापूर्वीं येऊं लागला. पण ताप यावा, घाम निघावा, ताप कमी व्हावा, थोडी हुशारी वाटावी, फिरून ताप यावा, असा क्रम सुरू असल्यामुळें औषधोपचार व्यवस्थित होत होता तरी टिळकांनीं त्यास फारसें जुमानलें नाहीं, उलट वर नमूद केलेल्या अर्जाचें सविस्तर उत्तर अनेक कागदपत्र, तहनामे, कायद्याचे आधार, वगैरे परिश्रमपूर्वक पाहून ते अनेक दिवस लिहीत होते. या अर्जाची हायकोर्टांतील सुनावणीची तारीख १४ जुलै रोजीं असल्यामुळें व ताप थोडा हटला म्हणून हवेचा फेरबदल करावा याहि हेतूनें ते मुंबईस ता. १२ जुलै रोजीं जाऊन नेहमींप्रमाणें सरदारगृहांत उतरले. पुढें रीतीप्रमाणें स्वतः तयार केलेल्या "ब्रीफ" वरून बॅरिस्टर लोकांना कज्जा समजावून दिला, व ठरल्याप्रमाणें सुनावणी होऊन बुधवार ता. २१ जुलै रोजीं दोन प्रहरीं त्रिवर्ग न्यायमूर्तींनीं कोल्हापूरमहाराजांचा अर्ज काढून टाकून श्री जगन्नाथमहाराजांचा खर्चहि देवविला व टिळकांना मोठेंच यश मिळवून दिलें. मोठेंच यश म्हणावयाचें कारण इतकेंच कीं, हा अर्ज हायकोर्टानें बहाल केला असता तर श्री. जगन्नाथमहाराज यांची दत्तक–घराण्यांतील सर्व इस्टेट जाऊन ते आपल्या दत्तक वडिलांच्या केवळ श्राद्धपक्षाचे धनी होऊन राहिले असते ! टिळकांनीं सरकाराशीं व इतर अनेक शत्रूंशीं १५ वर्षें लढून व हजारों रुपये खर्च करून थेट प्रिव्हीकौन्सिलपर्यंत भांडून एवढा मोठा जो दत्तकाचा मुकदमा जिंकला, त्या सर्वाला या एका अर्जानें पाणी लावून टिळकांचे १५ वर्षांचे श्रम व श्री. जगन्नाथमहाराज यांचें सर्व भावी आयुष्य यांचें मातेरें करून सोडण्याचा

कोल्हापुरकरमहारांचा हा खुनशी डाव व कावा होता. पण श्री. जगन्नाथमहाराज यांच्या नशिबानें व टिळकांच्या कर्तबगारीनें हा डाव सपशेल फसला. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, हायकोर्टानें दिलेला हा निकाल ऐकून टिळकांना आनंद व्हावा हें स्वाभाविकच आहे; पण दैवाला विचित्रता आवडते म्हणूनच कीं काय इकडे ही यशप्राप्ति झाली व त्याबरोबरच टिळकांच्या शेवटच्या दारुण परिणामी आजारास प्रारंभ झाला. मंगळवारीं ता. २० जुलै रोजीं लोकमान्य संध्याकाळीं सहज हवा खाण्याकरितां मोटारींत बसून बरेच दूरवर हिंडून आले. सहल करितांना वारा लागला म्हणून असो किंवा इतर कांहीं कारणांनीं असो, त्याच दिवशीं रात्रीं त्यांना थोडा ताप आला व बुधवारपासून त्यांनीं जें अंथरूण धरिलें तें अखेरपर्यंत त्यांना सुटलें नाहीं. या वेळीं वर दर्शविलेला हायकोर्टांतील मुकदमा न निघता तर टिळक सोलापूर, यवत, अगर इतर अशाच कोरड्या हवेच्या ठिकाणीं जाणार होते. पण या मुकदम्यामुळें त्यांना मुंबईस जावें लागलें ही गोष्ट खरी. तथापि त्याबरोबर हेंहि सांगितलें पाहिजे कीं, आजारांत मुंबईस मुक्काम पडल्यामुळें इतर कोठेंहि औषधोपचाराची जी मनासारखी उत्कृष्ट सोय होणें शक्य नव्हतें ती अवचित लाभली एवढी तरी दुःखांत समाधान मानण्यास जागा आहे. मुंबई शहर लोकमान्यांना पुण्याइतकेंच प्रिय व मुंबईस त्यांच्या स्नेही मंडळींचा गोतावळा पुण्याप्रमाणेंच समृद्ध व प्रेमळ. त्यांतून मुंबईच्या स्नेही मंडळींत वैद्यकशास्त्रांत अत्यंत निष्णात असलेल्या लोकांचा भरणा मुबलक. यामुळें आपला आजार वाढतो हें कळतांच खुद्द टिळकांच्याहि तोंडून असे उद्गार निघाले कीं, मला मुंबईला येण्याची बुद्धि झाली ती माझ्या हिताचीच झाली. पण जेथें आयुष्यच संपलें तेथें डॉक्टर व वैद्य काय करणार ?

असो. बुधवारपासून सोमवारपर्यंत जो ताप मलेरियाचा म्हणून आज नाहीं उद्यां तरी खास बरा होईल असें वाटत होतें तोच सोमवारपासून दोषी असा भासूं लागला. न्यूमोनिया अथवा नवज्वर याचीं लक्षणें स्पष्टपणें दिसूं लागलीं. उजव्या फुप्फुसाच्या खालचा थोडासा भाग सुजला असें आढळून आलें. पुढें तो विकार थोडा कमी वाटतो तों कोठा फुगला व त्यामुळें उचकी लागून काळजावर दडपण पडूं लागलें अशी शंका आली. त्यावरहि ताबडतोब उपाय सुरू होऊन ओकारीचें औषध दिल्यावर कोठा पूर्ववत् झाला पण वात उद्भवला, व हा मात्र शेवटपर्यंत टिकला; कमी असा केव्हांच झाला नाहीं. या १० दिवसांत ज्वर केव्हांहि १०४ डिग्रीवर वाढला नाहीं व मंगळवारीं तर घाम आल्यानें उतार पडणार अशी आशा वाटूं लागली. पण ज्वर हा निमित्तमात्र असून खरा विकार म्हटला म्हणजे शक्तिपात हाच ठरला, व तो मात्र कोणत्याहि उपायानें हटला नाहीं. किंबहुना त्यामुळेंच इतर सर्व उपविकार मधूनमधून बळावले असेंहि म्हणतां येईल. नाडी मधून मधून सुटल्यासारखी वाटे पण शनिवार दोन

प्रहरापर्यंत तिनें एकंदरीनें दगा दिला नाहीं. शुद्धि मात्र बुधवारपासून पुढें फारशी नव्हती. पण हाका मारणें, ओळखीचा माणूस डोळ्यांसमोर येणें वगैरे उद्बोधक कारणें घडलीं असतां कांहीं वेळ खडखडीत शुद्धि येऊन पूर्वींची निराशा समूळ नष्ट होई. तात्पर्य, नक्की नांव ठेवण्यासारखा रोग तर नाहीं, पण शक्ती मात्र पळापळानें क्षीण होत चालली याचें बरेंचसें कारण वयोमान आणि न कळत क्षीण झालेली व झिजलेली शरीरप्रकृति याहून दुसरें कांहीं म्हणतां आलें नाहीं. घड्याळ एकसारखें नीट चालत असतां तें जसे अकस्मात् बंद पडल्यानें आश्चर्य वाटतें. काल चांगलें चालत होतें मग आज कां थांबावें असा प्रश्न विचारावासा वाटतो. पण इतके दिवस पुष्कळ चाललें म्हणून यापुढेंहि तें चालावें असें अनुमान करण्यापेक्षां इतके दिवस चाललें म्हणूनच पुढें चालणार नाहीं हें अनुमानच अधिक सयुक्तिक ठरतें. तोच न्याय टिळकांच्या काय किंवा त्यांच्या वयोमानास पोंचलेल्या इतर कोणाच्याहि शरीरप्रकृतीस लागू पडतो. टिळकांना मधुमेहाचा विकार आज १२।१५ वर्षें होता तरी औषधें व विशेषतः पथ्य यांनीं तो इतका ताब्यांत ठेवला होता कीं, त्याचीं स्फुट लक्षणें अलीकडे दिसेनाशींहि झालीं होती. पण रोगानें बाहेर तोंड न दाखविलें तरी तो आंतून न कळत शरीर पोखरीत असतो, व दुसऱ्या एखाद्या विकाराचा जड पाय या शरीरावर पडतांच तें मोडून जातें तीच गोष्ट टिळकांच्या प्रकृतीची झाली होती. दिसावयाला ते आपल्या विकाराचेहि वस्ताद बनले होते, पण इकडे त्यांचा विकार हाहि एखाद्या गुप्त शत्रूप्रमाणें त्यांजवर घाला घालण्याला तयारी करून टपून बसला होता. कसेंहि असो; सिद्धांतवाद केला किंवा अनुभवाचे बोललों तरी अखेर ‘आयुष्याची दोरी तुटली’ या एका सूत्रवाक्यानें टिळकांच्या आजाराचा सर्व ग्रंथ लावल्याखेरीज गत्यंतर नाहीं.

पण निरुपायानें दैववादित्वाची ही भाषा बोलावी लागत असतांहि टिळकांना जगविण्याकरितां प्रयत्नवादाचीहि शिकस्त झाली असेंच आम्ही म्हणतों. कारण औषधोपचार व शुश्रूषा या दोहोंच्याहि बाबतींत टिळकांच्या ऋणानुबंधी परिचरांनीं जी सेवा केली ती बिनमोल होती. किंबहुना ती एखाद्या राजालाहि दुर्मिळ होती, असें आम्हीं मोठ्या अभिमानानें म्हणतों. अधिकार व पैसा यांच्या बळावर राजाला छप्पन डॉक्टर—वैद्यांचा किंवा शेंकडों परिचारकांचा तांडा मिळूं शकेल. पण प्रेम व जिव्हाळा जें काम करूं शकतो तें हुकमत किंवा पैसा यांपैकीं कोणीहि करूं शकत नाहीं. टिळकांना ताप आला असें कळल्यापासून त्यांच्या स्नेही डॉक्टर मंडळींनीं सरदारगृहांत जें एकदां पाऊल ठेवलें तें बाहेर काढलेंच नाहीं. आठवडाभर दवाखान्याचा सर्व धंदा बुडवून, हजारों रुपयांचें हातोहात नुकसान करून, व आशेनें वाटेकडे डोळे लावून बसलेल्या इतर शेंकडों रोग्यांना उसन्या कठोरपणानें डोळ्याआड करून ही डॉक्टरमंडळी रात्रंदिवस एका पावलावर

उभी राहून टिळकांची सेवा अगदीं एकनिष्ठेनें करीत होती. डॉ. नानासाहेब देशमुख, डॉ. राघवेंद्र राव, डॉ. गोपाळराव देशमुख, डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर, डॉ. एरूळकर, डॉ. आठवले, डॉ. वेलणकर, डॉ. वेलकर, डॉ. साठे, डॉ. ढवळे, डॉ. पुरोहित, डॉ. चंदुलाल देसाई, डॉ. बखले, डॉ. गडबोले, डॉ. खेर, डॉ. सावरकर वगैरे मंडळीच्या डोळ्यांपुढें या आठ दिवसांत दुसरा विषय नव्हता. टिळकांना न कळतांहि त्यांच्याकरितां कोण काय करितें याला फक्त एकच उपमा व ती स्वतः टिळक लोकांना न कळत त्यांची सेवा अहर्निश कशी करीत असत, याचीच होय, दुसरी लाभणार नाहीं. जी गोष्ट डॉक्टर वैद्यांची तीच परिचारकांची. गेल्या १० दिवसांत असा एक क्षणहि, एक निमिषमात्रहि, असें गेलें नाहीं कीं, ज्यावेळीं कमर बांधून उभे राहिलेल्या, सर्व प्रकारच्या सेवेस सिद्ध असलेल्या निदान दोन परिचारकांची दृष्टि टिळकांवर लागून राहिलेली नव्हती. टिळकांच्या सेवेचा मान मला मिळेल का अशी आशा वाटणारे किंवा ती प्रत्यक्ष न लाभल्यानें स्वतःस हतभागी म्हणून मानणारे किती तरी परिचारक सरदारगृहांत तिष्ठत होते. स्वयंसेवकांचीहि तीच गोष्ट. टिळकांच्या उपयोगीं पडण्यासारखें एखादें काम चुकून तरी आपल्याला कोणी सांगेल का अशी हौस बाळगणाऱ्या अनेक स्वयंसेवकांची टिळकांच्या खोलीच्या दरवाजापासून तों चार मजले उतरून रस्त्यावर सरदारगृहाच्या दारापर्यंत अखंड रांग लागून राहिली होती. सरदारगृहाचे मालक रा. विसुभाऊ साळवेकर यांनीं ठेवलेल्या व्यवस्थेची गोष्ट तर बोलावयासच नको. अशी व्यवस्था टिळकांच्या खुद्द घरींहि झाली नसती. टिळक व सरदारगृह यांचा ऋणानुबंध आज कमींतकमी १२ वर्षांचा आहे. यमाच्या दूतांनीं आज जसें त्यांना सरदारगृहांतून ओढून नेलें त्याप्रमाणें १९०८ सालच्या खटल्याचे वेळीं सरकारच्या दूतांनींहि त्यांना सरदारगृहांतून खेंचून नेलें होतें. भावी किंवा वर्तमान कोणत्याहि संकटाच्या काळीं मुंबईस टिळकांना सरदारगृहानें स्वतःच्या घराहूनहि अधिक आश्रय दिला होता. राष्ट्रीय पक्षांतील कोणत्याहि कट्टया मनुष्याप्रमाणें सरकारची यत्किंचितहि भीड किंवा भीति न धरितां सरदारगृहाच्या उदार मालकांनीं नेहमीं टिळकांस आपलें व आपणांस टिळकांचें उघडपणानें म्हणविलें होतें. अर्थात अशा जिवावरच्या दुखण्यांत टिळक आपल्या घरीं पाहुणे असल्यानें एक प्रकारचा सप्रेमाभिमान वाटून त्यांनीं सरदारगृहाचे सर्व नोकर, सर्व उपकरणें व सुखसोईचीं सर्व साधनें या १० दिवसांत टिळकांना वाहिलीं होतीं. अशा एकनिष्ठ स्नेहाला व सेवेला अखेर यश आलें नाहीं ही गोष्ट दैवाधीन, पण रा. साळवेकर यांनीं घरच्या माणसापेक्षांहि टिळकांची सेवा अधिक केली हें आल्यागेल्यालाहि दिसण्याइतकें ढळढळीत होतें. तात्पर्य, टिळकांना या आजारांत एका आयुष्यापेक्षां दुसरें कांहीं

कमी पडलें नाहीं हें म्हणण्यांत दैववादाच्या अंगिकारापेक्षां उद्योगवादाचीच स्तुति आम्हाला अधिक अभिप्रेत आहे.

पण टिळकांच्या आजारानें नुसतें सरदारगृहच काय पण सगळें मुंबई शहर, किंबहुना या आजाराच्या वार्तेनें सर्व हिंदुस्थान, हलून गेलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. बुधवारीं सकाळीं मुंबईच्या क्रानिकल पत्रानें प्रसिद्ध केलेली टिळकांच्या चिंताजनक आजाराची बातमी जसजशी लोकांच्या वाचण्यांत येऊन फैलावूं लागली तसतशा कच्ची हकीकत विचारणाऱ्या व सहानुभूति दर्शविणाऱ्या तारांवर तारा येऊन मुंबईस थडकूं लागल्या. ता. २७ पासून पुढील ४ दिवसांत शेंकडों तारा आल्या व इतक्यांचीं उत्तरें गेलीं तरी अजून नव्या तारा येतच होत्या, एकदां तार पाठविलेले गृहस्थ फिरून तारा करून अधिक तपशील मागत होते आणि तारा घेणें व तारा देणें हा औषधोपचार व शुश्रूषा यांच्या-इतकाच व्यापक कार्यक्रम होऊन बसला होता. पण केवळ तारा पाठवून किंवा मागवून ज्यांचें समाधान होणें शक्य नव्हतें असें कांहीं गृहस्थ मुंबईस एकदोन दिवसांतच आले. अशांपैकीं प्रमुख म्हटलें म्हणजे श्रीमंत दादासाहेब खापर्डे, रा. दासासाहेब करंदीकर, डॉ. मुंजे, रा. माधवरावजी अणे, रा. गंगाधरराव देशपांडे, इत्यादि होत. पुण्याहून रा. विध्वंस, रा. वासुदेवराव जोशी, रा. केळकर व रा. गोखले, वगैरे मंडळी आजारीपणा वाढत असल्याच्या तारा पुण्यास पोंचण्याच्या आधींच मुंबईस गेलीं होती. रा. खाडिलकर यांना सांगलीस तार मिळतांच ते ताबडतोब मुंबईस निघून आले, व पुण्यास पहिली तार पोंचतांच रा. शिवरामपंत परांजपे, वैद्य कवडेशास्त्री, डॉ. बाबासाहेब परांजपे वगैरे मंडळी जाऊन पोंचली. लाला लजपतराज यांना तार पोंचून निघण्यास अर्थातच उशीर लागला म्हणून ते मात्र टिळकांच्या भेटीस अंतरले. खुद्द मुंबईस रहाणारी टिळकांच्या परिचयाची व लोभांतील मंडळी तर सरदारगृहांत बहुतेक दिवसभर पडूनच होती. पण एरवीं भेटीचा योग फार न येणारी मंडळीहि या वेळीं मुद्दाम समक्ष येऊन विचारपूस करून गेली. महात्मा गांधी हे उत्तरहिंदुस्थानांतून मुंबईस ता. २९ रोजीं आले तेव्हांपासून ते व श्रीमती सरलादेवी रोज एकदोन खेपा घालीत. तसेंच सर नारायणराव चंदावरकर, बॅरिस्टर जिना, मौलाना शौकत अली, ना. रँगलर परांजपे, ना. कामत, डॉ. किश्चलु, मि. छोटानी, मि. खत्री, मि. दळवी, मि. जम्नादास द्वारकादास, रा. ब. पी. बी. जोशी, शेट हंसराज प्रागजी, शेट लक्ष्मीदास तेरसी, मि. शंकरलाल बँकर, मि. कृष्णलाल देसाई, मि. इंदुलाल याज्ञिक, रा. अ. ब. कोल्हटकर, रा. तुळजापूरकर वगैरे शेंकडो मंडळी सरदारगृहांत येऊन टिळकांच्या प्रकृति संबंधानें विचारपूस करून व सहानुभूति दर्शवून गेली. डॉक्टर व वैद्य, यांच्या प्रयत्नांच्या भरीला आपणही कांहीं प्रयत्न करावा अशा इच्छेनें कांहीं गृहस्थांनीं देवपूजा, रुद्राभिषेक, शांतिपाठ जप, प्रार्थना वगैरे

चालू ठेवून तीर्थ, अंगारा, प्रसाद वगैरे दैवी औषधें टिळकांच्या आरोग्याकरितां आणून देण्याचा परिपाठ ठेविला होता. पुणें, नाशिक, सातारा, ठाणें, जुन्नर, परतवाडा, कल्लोळ, दहीवडी, मद्रास, महाड वगैरे ठिकाणीं व इतरहि अनेक जागीं अनुष्ठानें सुरू झालीं. मुंबईतील व बाहेरचेहि ज्योतिषी टिळकांच्या कुंडलीवरून किंवा प्रश्नावरून भविष्य वर्तवून त्यांच्या योगानें डॉक्टर लोकांच्या मानवी उपचारास उत्तेजन देत होते. तात्पर्य, मुंबईस व बाहेर प्रत्यक्ष क्रियेनें किंवा इच्छाशक्तीनें टिळकांच्या आजारास उतार पडण्यास जी जी म्हणून मदत करतां येण्यासारखी होती ती सर्व लोक करीत होते. दानधर्मावर श्रद्धा असणाऱ्या गृहस्थांनीं दानधर्म करून आरोग्य चिंतिलें. एका मारवाडी गृहस्थांनीं छोट्या मालवीजींच्या हस्तें १००० रुपये, एका सिंधी व्यापाऱ्यानें रा. बर्वे यांच्या हस्तें २५० रुपये, व पोतदार शेट यांनीं १०१ रुपये टिळकांचा हस्तस्पर्श करून गोरगरिबांस अन्नसंतर्पण करण्याकरितां पाठवून दिले.

पण या सर्वांचा अखेर कांहींएक उपयोग झाला नाहीं. विकारांपैकीं त्यांतल्या त्यांस शेवटचा विकार म्हणजे काळजांत कळ निघणें हा ता. २९ रोजीं दोनतीन वेळां घडून आला व दोन वेळां तर कळ अतिशय येऊन प्राणांतिक अवस्था झालीहि. पण डॉक्टर मंडळींनीं सर्व गोष्टी अंदाजून योजनाहि तयार ठेविली असल्यामुळें काळजांत कळ निघाल्यापासून एका क्षणाच्या आंत औषध पोंचल्यामुळें तोहि विकार हटला. केवळ ग्लानि व अर्धबेशुद्धि एवढेंच विकार शिल्लक उरल्यानें ते आज नाहीं उद्यां कमी होतील, असा भरंवसा वाटूं लागला होता, व त्याच अनुरोधानें प्रकृति किंचित् सुधारत असून आशा वाटत आहे अशा अर्थाची बातमी सरदारगृहाच्या बोर्डावर लावली जात असे, वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केली जाई आणि बाहेरगांवच्या स्नेही मंडळींनांहि तारेनें कळविण्यांत येत असे. हीं आश्वासनें केवळ कांहीं तरी आशा दाखवावयाची म्हणून दिलेली नसून डॉक्टर मंडळींना खरोखरच मनांतून आशा वाटत होती कीं, आपण लोकमान्यांना या प्राणसंकटांतून हटकून ओढून बाहेर काढूं, व या आधारावर पुण्याहून मुंबईस गेलेली कांहीं मित्र मंडळी परतहि फिरली. पण शेवटीं टिळकांच्या प्रकृतीचा डॉक्टरांचा अंदाज चुकला म्हणण्यापेक्षां प्रकृतीनें ता. ३१ रोजीं दोन प्रहरापासून एकदम उलट खाल्ली हेंच म्हणणें अधिक यथार्थ होय. संध्याकाळच्या सुमारास असें निश्चित दिसून आलें कीं, टिळकांची ग्लानि केवळ अशक्तपणाची नसून वातविकाराचीच आहे. त्या रात्रीं सुमारें ९ वाजल्यापासून मात्र निराशा फारच बळावत चालली. टिळकांना श्वास लागला व अखेर मध्यरात्रीनंतर १२ वाजून ४० मिनिटांनीं त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. या वेळीं त्यांच्या मुली, मुलगे, जांवई आणि मुंबई-पुण्यांतील बरीच स्नेही मंडळी त्यांचे सन्निध होती. पुण्यांतील इतर कांहीं स्नेही मंडळी मात्र वर दर्शविल्याप्रमाणें आशेच्या आधारावर पुण्यास परत

गेल्यामुळें अखेरच्या भेटीला अंतरली याचें त्यांनां विशेष दुःख झालें असल्यास नवल नाहीं.

डॉक्टर देशमुख भडकमकरप्रभृति मंडळींनीं शेवटीं जव्हां 'टिळक आतां मनुष्याधीन स्थितींत राहिलेले नसून ईश्वराधीन झाले' असे उद्गार काढले त्या वेळीं त्यांची ती शोकग्रस्त स्थिति पाहून दुसऱ्या मनुष्याला स्वतःचें दुःख विसरून यांच्याविषयीं चिंता करावी असें वाटूं लागलें. इतर स्नेही मंडळी आपापल्या परीनें श्रम करीत होती हें तर खरेंच. परंतु त्यांच्या श्रमांत आणि डॉक्टर मंडळींच्या श्रमांत पुष्कळच तफावत होती, कारण डॉक्टर लोकांचे आज ८।१० दिवस टिळकांना अखंड सांनिध्य होतें व त्यांनीं टिळकांना एक क्षणभरहि दृष्टि-आड किंवा निदान मनाआड होऊं दिलें नाहीं. प्रतिक्षणीं निरीक्षण किंवा योजना किंवा प्रत्यक्ष उपचार यापैकीं त्यांचें एकना एक चालूच होतें. अर्थात् तज्ञपणा व ममत्व यांचा त्यांच्या ठिकाणीं विशेष प्रकारचा मिलाफ झाला असल्यामुळें त्यांना झालेलें निराशेचें दुःख इतरांपेक्षां अधिक तीव्र असावें यांत नवल नाहीं.

डॉ. मंडळी बाजूस सरल्यावर जवळच्या मंडळींनी टिळकांचें शरीर पलंगा-वरून उचलून खालीं ठेवलें; व पुढील कार्याविषयीं योजना करण्याकरितां खालच्या मजल्यावर सर्व मंडळी एकत्र झाली. स्मशानयात्रा अर्थातच सकाळपर्यंत पुढें ढकलणें अवश्य होतें. पण टिळकांच्या मृत्यूची बातमी पुण्यास तावडतोब टेलि-फोननें कळविण्यांत आल्यापुढें शेंकडों मंडळी सकाळच्या मेलनें किंवा त्यानंत-रच्या गाडीनें मुंबईस स्मशानयात्रेकरितां हटकून येणार अशी खात्री होती. स्मशानयात्रा पुण्यास करावयाची ती न होतां निदान मुंबईस त्या यात्रेकरितां हजर राहून टिळकांबद्दलचा आपला आदर दाखविण्याची अखेरची एकच संधि ती त्यांची घालविणें योग्य नाहीं असें ठरवून स्मशानयात्रेचा समारंभ निदान दोन प्रहरीं एक वाजेपर्यंत तरी करूं नये, व शव चांगल्या स्थितींत रहावें याकरितां जरूर तर लांकडी पेटींत घालून खालवर बर्फानें आच्छादून ठेवावें असें ठरल. या सुमारास महात्मा गांधी हे सरदारगृहांत येऊन दाखल झाले, व सर्वांच्या विचारें असें ठरलें कीं, स्मशानयात्रेच्या प्रसंगीं भाषणें वगैरे करण्यास प्रशस्त अस मैदान स्मशानयात्रेच्या मार्गावर कोठें नसल्यामुळें हीं कार्यक्रमांतून वगळावीं आणि शिरस्त्याप्रमाणें पोलिस अधिकाऱ्यांच्या संमतीनें स्मशानयात्रेचा मार्ग लोकांच्या सोयीकरितां थोडा लांबचा धरून निश्चित करावा. या कामीं पोलिस अधिकाऱ्यांचा सल्ला घेण्याकारितां डॉक्टर साठ्ये व वेलकर हे कचेरीकडे गेले व स्मशानयात्रेच्या कार्यक्रमाची बातमी लोकांना कळविण्याकारितां हस्तपत्रकें वगैरे काढण्याच्या उद्योगास रा. मंडलीक हे लागले. या सुमारास सरदारगृहाच्या दरवाजाशीं अनपेक्षित रीतीनें शेंकडों लोकांची गर्दी जमली होती. शनवारची रात्र असल्यामुळें नाटकगृहांतून नाटकप्रयोग चालू होते तेथें टिळकांच्या मृत्यूची

बातमी जाऊन पोंचतांच चोहोंकडे एकदम नाटकप्रयोग बंद करण्यांत आले. व तेथून बरीच मंडळी सरदारगृहाकडे येऊं लागली. या जमलेल्या मंडळींची इच्छा लोकमान्यांच्या शरीराचें अखेरचें दर्शन घेण्याची फार होती, व त्यांच्या आग्रहाची मजल येथवर गेली कीं, सरदारगृहाचे लोखंडी दरवाजे मोडून मंडळी आंत घुसूं पाहूं लागली. तेव्हां म. गांधी व रा. केळकर यांनी खालीं जाऊन अशा अवेळीं अडचणीच्या खासगी जागी इतक्या गर्दीचा प्रवेश होणें अशक्य आहे, उजाडल्यानंतर तेथेंच किंवा निदान स्मशानयात्रेच्या प्रसंगीं तरी टिळकांचें दर्शन रस्त्यांत जमणाऱ्या हजारों लोकांना होईल अशी आम्ही व्यवस्था करूं असें आश्वासन देऊन कशी तरी समजूत घातल्यावर लोक आपापल्या घरीं निघून गेले. रात्र ओसरण्याच्या आधींच टिळकांच्या मृत्यूची बातमी जिकडे तिकडे आपोआप पसरली गेली व उजाडण्याच्या आधींपासूनच लोकांचे थवेच्याथवे खालीं जमूं लागले. शेवटीं टिळकांचें प्राणोत्क्रमण जेथें झाले त्या लगतच्या खोलींतील सर्व सामान काढून टाकून त्यांचें शव समोर दिसेल अशा रीतीनें उंच आसनावर ठेवलें, अंगावर शूभ्र शालजोडी पांघरावयास घालून हाताशीं भगवद्गीतेचें पुस्तक ठेवण्यांत आले व खालून दोनदोन चारचार मंडळी वर दर्शनास सोडण्यांत येऊं लागली.

---

# कै लो. बाळ गंगाधर टिळक.

**केसरी ता० ३ आगस्ट १९२०**

" We all feel the loss as national. He has died fighting disease as bravely as he fought for his country courageously. He has made his mark in history. "—Sir N. G. Chandavarkar.

सर नारायणराव चंदावरकर यांनीं काल आम्हास जें सहानुभूतिपूर्वक दुखवट्याचें पत्र लिहिले त्यांत ते म्हणतातः—" टिळकांच्या मृत्यूनें राष्ट्रीय हानि झाली असें सर्वांसच वाटत आहे. ज्या धैर्यानें त्यांनीं आपल्या देशाकरितां युद्ध केलें तेंच धैर्य अखेर मृत्युसमर्थी रोगाशीं झुंजतांना त्यांनीं दाखविलें. टिळकांनी आपलें नांव इतिहासांत स्मरणीय करून ठेविलें आहे. "

लो. टिळकांच्या चरित्राला खाजगीपेक्षां सार्वजनिक बाजू किंवा पैलूच अधिक आहेत. लोकांना माहित नाहींत अशा त्यांच्या चरित्रांतील गोष्टी इतक्या थोड्या

आहेत कीं, एखाद्या संशोधकाला त्या कदाचित् मुद्दाम शोधूनच काढाव्या लागतील. टिळकांच्या चरित्रांतील संस्मरणीय अशा बहुतेक प्रत्येक गोष्टीचा संबंध जनतेशीं आलेला असल्यामुळें ती प्रत्येक गोष्ट घडली त्या त्या वेळीं ती लोकांना जाहीर झाली होती इतकेंच नव्हे तर तिनें आपल्या परीनें त्या वेळीं लोकांना चटकाहि लावून सोडला होता. अशाहि गोष्टी कालांतरानें विस्मरणांतून जाऊं शकतात. परंतु एक तर त्यांचीं लहानसहान चरित्रें वेळोवेळीं त्यांच्या हयातींत लिहिलीं गेलीं. शिवाय खळबळीच्या प्रसंगीं त्यांच्या चरित्रविषयक गोष्टींचा पाढा मित्रांनीं वाचलेला व त्यांचा आढावा शत्रूंनीं काढलेला आहे यामुळें टिळकांचें चरित्र आतां महाराष्ट्रीयानांच काय पण परप्रांतीय हिंदी लोकांनाहि अवगत आहे. तथापि त्यांचा जन्मवृत्तांत थोडक्यांत कालक्रमवार व सुसंगत रीतीनें आज आम्ही मुद्दाम देत आहों.

टिळकांचा जन्म सन १८५६ सालीं जुलैच्या २३ तारखेस झाला. त्यांच्या जन्माची हिंदू तिथि १७७८ आषाढ वद्य षष्ठी ही आहे. इंग्रजी तिथीप्रमाणें टिळकांचा पासष्ठावा वाढदिवस नुकताच एका आठवड्यापूर्वी साजरा करण्यांत आला, व जे लोक हा समारंभ तिथीला अनुसरून करितात त्यांना तो पुढच्या आठवड्यांत करावयाचा होता. अशा रीतीनें हिंदु व इंग्रजी कालगणनापद्धतीच्या कात्रींत किंवा संधींत टिळकांचा मृत्यु झालेला आहे व हेंच वर्णन एका निराळ्या अर्थानें त्यांच्या जन्मकालाला म्हणजे सन १८५६ या सालालाहि लागू पडतें. कारण टिळक जन्मले त्या वेळीं हिंदुस्थानच्या खऱ्या चतुःसीमेंत राज्यवृद्धि करण्याच्या इंग्रजी धोरणाची परमसीमा झालेली असून या धोरणाच्या निषेधाची जी चळवळ अद्यापी संपलेली नाहीं तिचा जन्म ज्या बंडानें झाला तें अद्यापी व्हावयाचें होतें. १८४८ हें साल युरोप खंडांत क्रांतिकारक विचारांचें उगमस्थान मानण्यांत येतें तेंच हिंदुस्थानच्या इतिहासांत स्वदेशी राज्यांच्या विनाशाच्या परिसमाप्तीचें म्हणून गणलें जातें. तेथून पुढें नऊच वर्षांनीं म्हणजे सन १८५७ सालीं बंड झालें. या दोन कालमर्यादांच्या संधींत अर्थातच हजारों लोक जन्मले असतील; पण इंग्रजी राज्यपद्धतीच्या परिणामकारक अशा निषेधाचें श्रेय त्यापैकीं टिळकांच्या वांट्याला जितकें आलें तितकें इतर कोणाच्याहि वांट्याला आलेलें नाहीं.

टिळकांची जन्मभूमि रत्नागिरी शहर होय. ज्या चित्पावन ब्राह्मण वर्गांत टिळकांचा जन्म झाला त्यांचें रत्नागिरी शहर हें आगर मानलें जातें. चित्पावनांची पौराणिक जन्मभूमि चिपळूण असली तरी ऐतिहासिक जन्मभूमि रत्नागिरी होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्रज व चित्पावन ब्राह्मण या दोन मनुष्य वर्गांच्या जन्मग्रहांचें काय वांकडे असेल ते असो, ते एकमेकांस पाण्यांत पाहतात, एवढी गोष्ट मात्र खरी. पण याचें कारण हुडकण्याला कोणी ज्योतिषीच बघावयास पाहिजे

असें नाहीं. महाराष्ट्रांत आज इंग्रज राजे आहेत तेथें त्यांच्या पूर्वीं चित्पावन राजे होते ही ठळक गोष्ट लक्षांत आणिली म्हणजे उभयतांना एकमेक हे आपले वैरी कां वाटतात हें कळून येईल. इंग्रजांनीं चित्पावनांचें राज्य घेतलें, ही गोष्ट सिद्ध आहे. चित्पावनांना इंग्रजांचें राज्य घ्यावयाचें आहे असा त्यांजविषयीं इंग्रजांचा संशय आहे. संशयावरून उभयतांमधील वैराचा खुलासा आपोआप होतो. शिवाय सभ्य गुणी व समदोषी माणसें स्वार्थामुळें एकमेकांविषयीं आदर न बाळगितां विरोधी भाव ठेवितात. चित्पावनांमध्यें गुणाप्रमाणें दोषहि अनेक आहेत. इंग्रजांप्रमाणें ते स्वावलंबी, मेहनती, कोठेंही पुढें घुसणारे, दीर्घसूचना मनांत असणारे पण कांहीं अंशीं आपल्यापुरतें पाहणारे, बुद्धिवान पण संकुचित दिलाचे लोक आहेत. एवंगुणदोषविशिष्ट दोन लोक एकाच क्षेत्रांत एकाच काळीं वावरत असतां त्यांच्या हेतूंत परस्पर विरोधच यावा यांत नवल नाहीं. टिळक व इंग्रज लोक परस्परांना कोणत्या भावनेनें लेखीत होते हें प्रसिद्ध आहे. सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, जुन्या नव्या कालाच्या संधींत जन्मलेल्या इतर लोकांपेक्षां राजकर्त्यांना विरोध करण्याचें श्रेय जसें टिळकांना अधिक लाभलें, तसेंच चित्पावनांच्या जन्मभूमींत म्हणजे रत्नागिरी प्रांतांत जन्मलेल्या इतर कोणाहि चित्पवनापेक्षां राजकीय चळवळीचें श्रेय टिळकांनाच अधिक लाभलें असून, या जन्मभूमीला गेल्या ६० वर्षांत त्यांना जरी भेट देतां आली नाहीं तरी तिचें नांव त्यांनीं आपल्या कर्तृत्वानें उज्वल केलें यांत शंका नाहीं.

टिळकांचें मूळ गांव दापोली तालुक्यांत चिखलगांव नांवाचें आहे. तेथें त्यांची वडिलार्जित खोती आहे. परंतु खोतकीपेक्षां विद्याव्यासंगाकडेच त्यांच्या आजापणज्यांचाहि ओढा होता. गणित व संस्कृत या दोन विषयांतील प्रावीण्य लोकमान्यांना वडिलार्जित मिळालें होतें. त्यांचे वडिल गंगाधरपंत यांचा धंदा - शिक्षणाचा असून ते वैय्याकरण असल्यामुळें त्यांना शास्त्री असेंहि म्हणत. लहानपणीं वडिलांप्रमाणें बळवंतरावजींनीं संस्कृताचें अध्ययन जुन्या शास्त्री पद्धतीनें केलें असल्यामुळें त्यांचें संस्कृताचें ज्ञान आधींच पक्कें होतें. पण पुढें कॉलेजांतील अभ्यास करितांना पाश्चात्य चिकित्सक पद्धतीहि त्यांनीं उचलली व आपल्या संस्कृताच्या अभ्यासाचा एकांगीपणा काढून टाकला. आपल्या वयाचा दहाव्या वर्षापासून टिळक पुण्यास आले व तेथून त्यांचा सर्व जन्म पुण्यासच गेला. वयाच्या १६ व्या वर्षीं मॅट्रिक्युलेशन परीक्षा दिल्यावर १८७३ सालीं टिळक डेक्कन कॉलेजांत गेले. व तेथें त्यांनीं विद्येबरोबर उत्कृष्ट प्रकारची शरीरसंपत्ति मिळविली. हरएक प्रकारची तालीम, पोहण्याचा अभ्यास व विद्यार्थीदशेंतील हूडपणाचे खेळ खेळून ते कॉलेजांतून बाहेर पडले. पण बी. ए झाल्यावर एम. ए च्या मार्गाकडे सरळ न जातां ते एल्. एल्. बीच्या अभ्यासाकडे वळले. यावरून पुढें शिक्षण विषयक व्यासंग करण्याचा त्यांचा हेतु प्रथमपासूनचा नसावा असें अनुमान कांहीं

लोक करितात व तेंच खरें असण्याचा संभव आहे. त्यांचे वडील व चुलते यांच्या मनांत बळवंतरावजींनीं मुनसफ व्हावें असें होतें. पण स्वतः बळवंतरावजींच्या मनांत सरकारी नोकरी करण्याची कल्पना केव्हांहि आल्याचें दिसत नाहीं. मात्र एल. एल. बी. होऊन वकिली करण्याचें त्यांचे मनांत आलेलें असल्यास नवल नाहीं. त्यांच्या खेळीमेळींतल्या सहाध्यायी लोकांनीं ही दिशा पत्करली होती. त्यांच्या वडिलांचे ऋणानुबंधी व त्या काळांतील मुंबईचे एक पुढारी कै. रावसाहेब मंडलिक यांचें प्रतिष्ठित व बाणेदार उदाहरण डोळ्यांपुढें असून तें गिरवावे असें टिळकांच्या मनांत येई असें मानण्यास जागा आहे. पण पुढें पुढें एका बाजूस मंडलिकांचें उदाहरण तर दुसऱ्या बाजूस विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें उदाहरण अशीं वेगवेगळीं उदाहरणें डोळ्यांपुढें आल्यावर आणि वकिली करून पैसे मिळविण्याचा तगादा करण्याचा प्रेमाचा आग्रह करणारे वडील हयात नसल्यानें, टिळकांसारख्या स्वतंत्र प्रवृत्तीच्या मनुष्यानें चिपळूणकरांचे उज्वल व अगदीं नवीन ध्येय अखेर अंगिकारलें व मंडलिकांचें गतानुगतिकत्वाचें ध्येय झिडकारलें हे स्वाभाविक दिसतें. कांहीं तरी आपलें व नवें म्हणून करावें याविषयींची टिळकांची हौस जी पासष्टाव्या वर्षीं शिल्लक राहिली होती ती तरुणपणाच्या ऐन उमेदींत इतकी जाज्वल्य असल्यास त्यांत काय नवल ?

टिळकांचें सर्व चरित्र राजकारणी पुरुषाचें झालें आहे हें खरें; तथापि आपण राजकारणी चळवळींत पडावें या गोष्टीची आवड त्यांना अगदीं प्रथमपासून होती असें नाहीं. ते नेहमीं म्हणून दाखवीत कीं, “ पहा, यदृच्छेनें मनुष्याचें चरित्र कसें बनतें तें. आपण शिक्षक, प्रोफेसर व्हावें, कोणत्याहि विषयांत संशोधन करून नवीन मतें प्रतिपादन करणारे ग्रंथ लिहावे असें मला वाटे. पण शेवटीं पहावें तों स्वतः काढलेली शाळा व कॉलेज हीं सोडून देऊन राजकारणांत मी पडलों! मला लिहिण्याचा मनापासून कंटाळा, असें असतां माझा सर्व जन्म वर्तमानपत्राच्या संपादकाचा धंदा करण्यांत गेला. ” पण खरोखर हा यदृच्छेचाच सर्व खेळ म्हणवत नाहीं. कारण टिळकांना प्रोफेसर व ग्रंथकार व्हावयाचें होतें तें कशाकरितां व त्यांनीं वर्तमानपत्रें हातीं घेतलीं व स्वतःस न आवडणारें लिहिण्याचें काम अंगावर लादून घेतलें तें तरी कशाकरितां, याचा सूक्ष्म विचार केल्यास मूळ हेतु व प्रत्यक्ष क्रिया यांत फारसें अंतर नाहीं असेंच दिसून येईल. टिळकांना प्रोफेसर होऊन जे ग्रंथ लिहावयाचे होते ते कशाकरितां ? तर ज्या परकीय विचारांच्या वजनाच्या दडपणाखालीं आपली बुद्धि आज सांपडली आहे तें वजन शक्य तितकें दूर फेंकून देण्याकरितां ! इंग्रजांचें वर्चस्व त्यांना लहानपणीं प्रत्यक्षपणें शाळा, कॉलेजें व अध्ययनांचे ग्रंथ यांत ढळढळीतपणें दिसून येणें साहजिक होतें. आणि त्यांना सहजच वाटे कीं, आमच्या लोकांची स्वतःची बुद्धि कांहीं कमी नाहीं, आमची संस्कृति व विद्या दोनहि ओजस्वी; असें असतां कोणत्याहि

विषयांत पहावें तों आपला इंग्रजी प्रोफेसर अग्रेसर, त्यालाच अग्रपूजेचा मान. त्यालाच सर्वजण निमूटपणें स्तुति व आदर यांचा करभार देतात, व त्याचे सिद्धांतरूपी हुकूम कितीहि खोडसाळ, तर्काप्रतिष्ठित व हिंदी लोकांस कमीपणा आणणारे असले तरी शिरसावंद्य मानतात, याची लोकमान्य टिळकांना विद्यार्थीदशेंतच चीड आली. एका वर्डस्वर्थखेरीज इतर कोणाहि प्रोफेसराविषयीं त्यांना यत्किंचितहि आदर वाटत नसे. त्यांचा अध्ययनाचा विषय गणित आणि या विषयाचे त्यांना मिळालेले दोनहि प्रोफेसर बुद्धिसामर्थ्याच्या दृष्टीनें तुच्छ व तिरस्करणीय असे असतां, हे प्रोफेसर भाराभर पगार घेतात येवढेंच नव्हे तर वरती आपला श्रेष्ठपणा मिरवितात असली गोष्ट टिळकांसारख्या तेजस्वी व मानधन पुरुषास कशी आवडेल? असले गचाळ इंग्रज इकडे ग्रंथकार व शिक्षक म्हणून मिरवूं शकतात याचें मूळ कारण परकी राज्य व विशेषत: इंग्रजांची स्वार्थी व घातुक राज्यपद्धति हें त्यांना विद्यार्थिदशेंतहि माहीत नसेल असें नाहीं. कॉलेजांतील विद्यार्थिदशेंत त्यांनीं आपल्या स्नेह्यासोबत्यांत केलेली राजकारणी टीका इतकी कडक असे कीं, कदाचित् पुढें प्रौढपणीं त्यांनीं दिलेलीं जाहीर व्याख्यानें व केसरींतून लिहिलेले लेख हे कांहींच नाहींत. पण जी काठी ज्या वेळीं हाताशीं सांपडेल तीच उचलून, या परकी वरचढपणाच्या वाघाच्या डोक्यांत हाणावयाची हें त्यांचें व्रत व धोरण आतां सर्व लोकांस माहीत झालेंच आहे. त्यालाच अनुसरून पूर्वीं शाळा काढावयाची, शिक्षक बनून तरुणपिढीचीं मनें आपल्या हातीं आणावयाचीं, आणि उत्कृष्ट ग्रंथ लिहून हिंदु विद्या संस्कृति, बुद्धिमत्ता व नूतन विषय व नूतन पद्धति ग्रहण करण्याची पात्रता अंगांत सिद्ध करून आपल्या राष्ट्राच्या उत्कर्षांत भर टाकावयाची या उपक्रमास शाळा काढणें हा केवळ हाताशीं असलेला सुलभ व अत्यंत उपयुक्त मार्ग म्हणून अंगिकारिला असल्यास तें योग्यच होतें. हाच उपक्रम हातीं घेण्याचें दुसरें एक कारण म्हणजे त्यांना या वेळीं मिळालेली विष्णुशास्त्री चिपळुणकरासारख्या जाज्वल्य देशभक्ताची स्फूर्ति व आगरकर वगैरे समान विचारांच्या समवयस्क मित्रांची संगति. या उपक्रमास प्रारंभ करून थोडे दिवस होतात न होतात तोंच छापखाना, वर्तमानपत्र वगैरे राजकारणाच्या इतर साधनांकडेहि त्यांनीं लक्ष पुरविलें. राजकीय चळवळीस शाळा, कॉलेज, प्रोफेसरी, संशोधन व ग्रंथकर्तृत्व या साधन समुच्चयापेक्षांहि, वर्तमानपत्रें, छापखाने, सभा व संस्था यांचा उपयोग अधिक होतो व आपणास तो अधिक करतांहि येईल असें आढळून येतांच, त्यांनीं पहिल्या साधनसमुच्चयाचा त्यागहि केला ही गोष्ट प्रसिद्ध आहे. सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, मी मूळ योजिलें एक व केलें भलतेंच असें म्हणून टिळक हे कित्येक वेळीं यदृच्छाप्रभावाचें तें एक उदाहरण म्हणून देत, व तें सिद्ध करण्याकरितां स्वत:कडे विसंगत वर्तनाचा दोषहि घेण्यास तयार होत; तरी पण वरील साधन-

समुच्चयांतील श्रेष्ठ कनिष्ठ पायरी किंवा तरतमभाव लक्षांत घेतां टिळकांचें वर्तन विसंगत नव्हतें तर सुसंगतच होतें असें म्हणावें लागेल. कोणीहि राष्ट्रभक्त कितीहि बुद्धिवान् स्वयंस्फूर्त किंवा कल्पक असला तरी त्याला कल्पनेनें आपला सर्व चरित्रक्रम अगदीं बाळपणींच योजून आपली वर्षमासचर्या आगाऊ लिहून ठेवितां येते असें नाहीं. जगाच्या आजवरच्या इतिहासांत असलें एकहि उदाहरण सांपडावयाचें नाहीं. कारण हेंच कीं, झाडाच्या एका कोंबांतूनच पुढें जसा दुसरा कोंब फुटतो तसेंच कार्यांतून कार्य निघत असतें. उद्योग हा जितका हेतु-मूलक तितका निमित्तानुबंधीहि असतो. या दृष्टीनें पाहतां असेंच दिसून येईल कीं, टिळकांचा चरित्रहेतु विद्यार्थिदशेंत व वार्धक्यांत म्हणजे एक स्वकीयोत्कर्ष च परपरीभव हाच होता. व सर्व आयुष्यांत त्यांनीं जीं ठळक कृत्यें केलीं तीं सर्व एकाच हेतूचा अनेक रूपांनीं झालेला विकास होता.

सन १८७९ च्या सुमारास म्हणजे टिळक एलएल. बी. चा अभ्यास करीत असतां व पुढील आयुष्यक्रमाविषयीं त्यांचे विचार चालू असतां, कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हेहि आपल्या सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन पुण्यास येऊन राहिले होते. आणि स्वतंत्र इंग्रजी शाळा काढण्याचा त्यांचाहि विचार चालू होता. एकट्यानेंच नवी शाळा काढणें थोडें कठीण म्हणून, तुह्मी नवीन शाळा कशाला काढतां आमच्याच शाळेंत या व ती हातीं घ्या, अशी पुणें नेटिव इन्स्टिटयूटचे त्या वेळचे चालक रा. भावे यांनीं सूचना केली होती. परंतु याच वेळीं टिळक, आगरकर वगैरे मंडळींची मदत मिळण्याचा योग दिसून आल्या-वरून स्वतंत्र शाळा काढण्याचेंच शास्त्रीबोवांनीं अखेर ठरविलें व त्याप्रमाणें ता. २ जानेवारी सन १८८० रोजीं मोरोबादादांचे वाड्यांत प्रसिद्ध न्यू इंग्लिश-स्कूलची स्थापना झाली. टिळकांचे स्नेही व आप्त यांनीं या शाळेच्या फंदांत तुम्हीं पडूं नका असा उपदेश चालविला होता, तथापि त्यांचें व शास्त्रीबोवांचें ठरल्याप्रमाणें ते शाळेस येऊन मिळाले.

शाळेचें काम सुरळीत सुरू होऊन ती लगेच लोकप्रियहि झाली. पण आम्हीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें कार्यांतून कार्याचा उगम होत असल्यामुळें केवळ शाळेंत शिकवून या विद्वान, तरुण, तरतरीत मंडळींचें समाधान होणें शक्य नव्हतें. शाळेच्या इमारतींतून किंबहुना विद्यार्थी शिकविण्याच्या वर्गांत बसून या देशभ-क्तांची दृष्टि राष्ट्रांत बाहेर काय चाललें आहे इकडे एकसारखी लागून राहिलेली असे. युरोपिअन प्रोफेसर आपल्या व्याख्यानांतून खाल्ल्या घरचे वासे मोजल्या-प्रमाणें विद्यार्थ्यांना भलता उपदेश व त्यांच्या स्वकीयांचीच निंदा शिकवीत. या क्रियेला जें ठणठणीत प्रतिक्रियारूप उत्तर पाहिजे होतें तें न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक व विद्यार्थी यांच्या संवादांत व परिचयांत मिळूं लागलें. पण केवळ विद्यार्थ्यांस शिकवून शहाणे करण्यानें या मंडळींचें समाधान होणें शक्य नसल्या-

मुळें त्यांना छापखाना व वर्तमानपत्रें यांची अवश्यकता भासूं लागली. कोणत्याहि उदयोन्मुख राष्ट्राच्या बाळपणच्या चळवळींत छापखाने, लेखनकला व वक्तृत्व यांचीच आवड विशेष दिसून येते. डोक्यांतच कांहीं कल्पना नसली तर हातांशीं लिहिण्याचें सामान, समोर श्रोतृगण व देशभर पसरलेले लोक असले तरी स्फुट असा उद्गार निघूं शकत नाहीं. याच्या उलट डोक्यांत विचार खळबळूं लागले, व ते लोकांना सांगून त्यांना शहाणें करून त्यांजकडून समाजोपयुक्त कार्य करवून घेण्याची मनांत तीव्र इच्छा असली म्हणजे ओंठ आपोआप हलूं लागतात, बोटें लिहूं लागतात व पाण्यांत टाकलेल्या तेलाच्या बिंदूप्रमाणें आपले विचार आटोक्यांतील सर्व मनुष्यमात्रावर पसरण्याच्या इच्छेनें छापखाने, वर्तमानपत्रें यांसारख्या साधनांचा हव्यास सुचतो. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं या बाबतींत निबंधमालेच्या द्वारें घालून दिलेलें उदाहरण सर्वांच्या डोळ्यांपुढें होतेंच; म्हणून त्याच दिशेनें संघटित प्रयत्न करण्याकरितां केसरी हें मराठी व मराठा हें इंग्रजी अशीं दोन पत्रें काढण्याचें ठरून तीं स्वतःच्या मालकीच्या छापखान्यावर सन १८८१ च्या जानेवारीपासून म्हणजे न्यू इंग्लिश स्कूल निघाल्यापासून एक वर्षाच्या आंतच प्रसिद्ध होऊं लागलीं. हीं वर्तमानपत्रें प्रचलित विषयांची चर्चा करण्याकरितां निघाल्यामुळें त्यांत त्या वेळीं लोकांच्या तोंडीं होऊन राहिलेल्या कोल्हापूर–प्रकरणावर कडक लेख आले, व त्याचा शेवट फौजदारी खटल्यांत होऊन टिळक व आगरकर यांना जबाबदार संपादक या नात्यानें चार महिन्यांच्या साध्या कैदेची शिक्षा झाली. खटल्याच्या रूपानें सरकारानें टिळकांवर १८८१ पासून जें शस्त्र उचललें तें १९१६ सालपर्यंत खालीं ठेवलें नाहीं. या अवधींत टिळकांवर जे तीन फौजदारी खटले झाले ते राजद्रोहाच्या गुन्ह्याकरितां म्हणून झाले. पैकीं दोहोंत मिळून टिळकांना सात वर्षे तुरुंगांत काढावीं लागलीं. तिसरा खटला तुरुंगांत घालण्याकरितां केलेला नसून राजद्रोह फिरून न करण्याबद्दल जामिनकी मागण्याच्या स्वरूपाचा होता. त्यांत अखेर टिळकांस यश आलें. पण पुढें लौकरच डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टाअन्वयें आपले अधिकार गाजवून टिळकांना भाषणाची बंदी करून सरकारनें त्यांच्या शरीराला नसला तरी मनाला तुरुंगवास घडविला. सांगण्याचें तात्पर्य हेंच कीं, टिळकांनीं शिक्षक, प्रोफेसर होण्याकरितां म्हणून संस्था काढली तिच्या दुसऱ्या वर्षापासूनच त्यांची शाळेबाहेरील म्हणजे समाजविषयक चळवळच सरकारास अधिक तीव्र व दुःसह अशी ठरली. आणि या शाळेंतून पुढें निघालेलें फर्ग्युसन कॉलेज त्यांनीं पुढें चार वर्षांत सोडलें तरी राजकीय व राष्ट्रीय चळवळ ही त्यांनीं जन्मभर सोडली नाहीं. पौराणिक कथेंतील मनूनें उचलून प्रथम चुळकाभर पाण्यांत टाकलेल्या पण होतां होतां समुद्रहि व्यापून तो अपुरा पाडणाऱ्या माशाप्रमाणें टिळकांची बुद्धि व चळवळ हीं न्यू इंग्लिश स्कूलच्या दहावीस विद्यार्थ्यांच्या

एका वर्गांत प्रथम १८८० सालीं जी प्रकट झाली तिनें हां हां म्हणतां एकामागून एक आपलें शहर, आपला जिल्हा, आपला प्रांत व आपला देश आक्रमून तिनें त्यांची कीर्ति परदेशांतहि पसरविली.

सरकारास टिळक हे जोरदार प्रतिपक्षी भासूं लागल्यामुळेंच वर सांगितल्याप्रमाणें त्यांनीं टिळकांवर कायद्याचें शस्त्र निरंतर उगारलेलें ठेवलें असून राजद्रोहाकरितां तीन वेळ खटले करून सात वर्षें तुरुंगांत लोळविलें. तसेंच श्री बाबामहाराजांच्या दत्तक पुत्राच्या संबंधानें हें शस्त्र अप्रत्यक्ष रीतीनें चालवून सरकारानें टिळकांवर फौजदारी खटला भरला व दिवाणी दाव्यांत कसून व सर्व शक्ति एकवटून विरोध केला. टिळकांविरुद्ध सरकारनें आरंभिलेल्या या गनिमी काव्याच्या युद्धास सन १९०१ सालीं सुरुवात झाली असून तें अद्यापहि संपलेलें नाहीं. या १९ वर्षांच्या युद्धांत मात्र टिळक हे सर्वस्वीं यशस्वी झाले व यांतील एक मोठी लढाई त्यांनीं आपल्या मरणापूर्वीं अवघ्या दहा दिवसांपूर्वीं जिंकली. या युद्धाला झालें तरी टिळक व सरकार यांचा बेबनाव, म्हणजे अर्थात् टिळकांची राष्ट्रभक्ति व राजकीय चळवळ हींच कारणभूत होत. गणित करून पाहतां टिळकांचे तुरुंगवासांत जितके दिवस फुकट गेलें तितके दिवस या निष्कारण खासगी युद्धाच्या विचारांत, काळजींत व भांडणांत टिळकांना घालविण्याला सरकारनें भाग पाडलें. राष्ट्राच्या दृष्टीनें हा फारच मोठा अपव्यय झाला. तथापि टिळकांच्या अंगचे व्यक्ति या नात्यानें अनेक गुण म्हणजे धैर्य, चिकाटी, इमानी व करारी स्वभाव, धाडस, स्वार्थत्याग, आपल्या शब्दाचा अभिमान वगैरे सिद्ध करण्यापलीकडे या चरित्रखंडाचा संबंध त्यांच्या सार्वजनिक चरित्राशीं येत नाहीं म्हणून त्याचा या ठिकाणीं आम्हीं विशेष उल्लेखहि करीत नाहीं.

न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज यांच्याशीं असलेला संबंध अंतस्थ कलहामुळें १८९० सालीं त्यांना सोडावा लागला; पण शाळेंत जन्मलेल्या 'केसरी,' 'मराठा' पत्रांशीं त्यांचा पूर्वीं तुरळक असलेला संबंध सन १८९१ पासून अधिक निकट जडला. याचेंहि कारण टिळकांना संपादक होण्याची हौस होती हें नव्हे, तर सार्वजनिक चळवळ व स्वमतप्रस्थापनेकरितां युद्ध करण्याची हौस त्यांना होती हें होय. केसरीचा फैलाव होऊन त्यांच्या व्यवहारांत थोडी बहुत बचत होऊन टिळकांचा प्रपंच त्यावर चालूं लागला ही गोष्ट आज सुमारें वीस वर्षें खरी आहे. पण त्यापूर्वीं आठ वर्षें तरी ती खरी नव्हती. १८९१ सालीं 'केसरी–मराठा' आपल्याकडे घेण्याची इच्छा टिळकांना होण्यास योगक्षेमाची काळजी हें कारण नसून, सार्वजनिक चळवळीचें एक उत्कृष्ट व जोरदार साधन आपल्या हातीं रहावें अशाविषयीं इच्छाच होय. आणि प्रपंच भागविण्याकरितां पुण्यास वकिलीचे विद्यार्थी शिकविण्याचा वर्ग आणि मोंगलाईत लातूर येथें कापूस पिंजण्याचा एक कारखाना अशीं स्वतंत्र साधनें तयार करून केवळ सार्वजनिक कार्याच्या

हौसेनें टिळकांनीं १८९१ सालीं ' केसरी ' व ' मराठा ' हीं पत्रें मालकी हक्कानें सात हजार रुपायांच्या बोजासह आपणाकडे घेतलीं ! हें कर्ज पुढें दहा वर्षेपर्यंत टिळक फेडीत होते. दरम्यान १८९७ सालीं त्यांच्यावर राजद्रोहाचा पहिला खटला झाला त्यावेळीं या वर्तमानपत्रांस कर्ज व पदरच्या गांठीस शिलकी एक रुपयाहि नाहीं अशी टिळकांची स्थिति होती ! १८९१ सालीं ' केसरी ' पत्राचे वर्गणीदार सुमारें चार हजार होते ते टिळकांनीं ' केसरी ' हातीं घेतल्यापासून वाढूं लागले, व पहिल्या राजद्रोहाच्या खटल्याचे वेळीं ही संख्या जवळ जवळ सात हजारांपर्यंत गेली होती. टिळक तुरुंगांतून १८९८ सालीं सुटून आल्यानंतर वर्तमानपत्राच्या मालकीचें जुनें कर्ज फिटलें होतें. पण लातूर येथील कारखाना दुसऱ्याच्या स्वाधीन असल्यामुळें तो आंतबट्ट्याचा व्यापार ठरला, आणि पुण्यांतील प्लेगमुळें लवकरच वकिलीचा वर्गहि बंद करावा लागला. अर्थात् ' केसरी ' हें एकच निर्वाहाचें साधन होऊन राहिल्यामुळें त्याच्या अन्तर्व्यवस्थेकडे टिळकांना जातीनें अधिक लक्ष घालावें लागलें व यामुळें घरीं स्वतंत्र कचेरी व बाहेर आपल्या मालकीचा छापखाना काढून केसरीचा सर्व व्यवहार आपले भाचे रा. धोंडोपंत विद्वांस यांच्या हातानें सुरू केला. पुढें खासगी मालकीच्या घरांतच कचेरी छापखाना वगैरे एकत्र करण्याची सोय झाली. कालांतरानें या जागीं म्हणजे श्रीं. गायकवाड सरकार यांजकडून खरेदी घेतलेल्या वाड्यांत नव्या इमारती यंत्र वगैरे सुधारणा सुरू झाल्या व त्यांतल्या अद्यापहि कांहीं पुऱ्या व्हावयाच्या आहेत; टिळकांनीं विलायतेहून येतांना स्वतः पाहून पारखून दर ताशीं हजारों प्रती छापणारें एक मोठें यंत्र आणविलें असून तें नुकतेंच उभें करण्यांत आलें आहे. त्यावर पुढील वर्षापासून आठवड्यांतून दोन वेळा केसरी काढण्याची त्यांची योजना लोकांस विदित आहेच. ही योजना सिद्धीस जाऊन नव्या यंत्रावर नवा केसरी त्यांच्या डोळ्यां देखत निघाला नाहीं याविषयीं मात्र सर्वांनाच हळहळ वाटत असेल.

सन १८९९ पासून केसरी हें चरितार्थाचें एकच साधन असतां त्यावर टिळकांचा गृहप्रपंच तर चाललाच, पण ताईमहाराजांच्या खटल्यासारखीं व चिरोल खटल्यासारखीं खर्चाचीं प्रकरणें निस्तरण्याची त्यांना हिंमत आली व आधार मिळाला. याशिवाय सार्वजनिक चळवळीमध्यें टिळकांना स्वतःकरितां व दुसऱ्या अनेकांकरितां अनेक प्रकरणीं जो खर्च करावा लागला त्यालाहि आधार केसरीच होय. अशा रीतीनें न्यू स्कूलमधून बाहेर पडल्याबरोबर जें राष्ट्रीय चळवळीचें साधन टिळकांनीं हातीं घेतलें तें त्यांनीं सर्वांगांनीं पूर्ण यशस्वी करून दाखविलें हें त्यांच्या खासगी व्यावहारिक ज्ञानाचें व चातुर्याचें लक्षण तर खरेंच, पण राष्ट्रभक्तिप्रेरित कर्मयोगित्वालाहि भूषणावह आहे. केसरी पत्र मराठी भाषेंत असल्यामुळें केवळ एका प्रांतांतल्या निम्याहून कमी भागांत त्याचा प्रसार आहे.

तथापि त्याच्या वाचकांची संख्या हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि तीनचार वर्तमानपत्रांच्या वाचकांहून अधिक भरावी असा आमचा अंदाज आहे. शिवाय हिंदी, गुजराथी वगैरे इतर भाषांतून केसरीच्या बरोबर भाषांतराच्या आवृत्त्या निघतील तर त्यासहि सदर भाषा प्रचलित असणाऱ्या प्रांतांतील इतर कोणत्याही वर्तमानपत्रांपेक्षां अधिक वाचकवर्ग मिळतील असें कित्येक तज्ज्ञ बोलतांना ऐकण्यांत आलें आहे. मात्र ही योजना अनेक अडचणींमुळें अमलांत आली नाहीं ही गोष्ट वेगळी. सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, ज्या हेतूंनीं टिळकांनीं केसरी काढला तो त्यांनीं केसरी हातीं घेतल्यापासून पुढें वीस वर्षांत पूर्णपणें यशस्वी करून दाखविला, व हा हेतु म्हटला म्हणजे सार्वजनिक चळवळ व राष्ट्रीय जागृति. तथापि केवळ राष्ट्रीय हेतूच्या सिद्धीचें एक साधन यापलीकडे वर्तमानपत्राची योग्यता ते मानीत नसत. लेखांनीं लोकांना नवीन कल्पना शिकवितां येतात व जागृति उत्पन्न करितां येते. पण त्या कल्पनांना दृश्य स्वरूप यावयाचें व ती जागृति परिणामकारक व्हावयाची तर लेख लिहिण्याप्रमाणें इतर उद्योग करणें हेंहि साधन नव्हे—महत्त्वाचें साधन—आहे असें ते मानीत. वर्तमानपत्रांतून नव्या कल्पनांचा ध्वनि निघाला तरी वाचकवर्गांतून त्याच्या उलट संवादी प्रतिध्वनि शब्दानें व कृतीनेंहि निघाला पाहिजे, शिकवणीच्या आघाताला शिक्षितांच्या कणखर मनोभूमींतून तितक्याच प्रत्याघाताचें पाठबळ मिळालें पाहिजे, म्हणजे त्या दोहोंच्या दाबांत कार्य यशस्वी होतें, अशा समजुतीनें टिळकांनीं अवांतर कामहि पुष्कळच केलें. 'सर्व आठवडाभर पुढच्या केसरींत लिहिण्याचा विषय माझ्या डोक्यांत घोळत असतो' असें ते म्हणत. पण केसरींत लिहिण्याचें काम फार तर एखादुसरा दिवस पुरून बाकी जो वेळ उरे त्याचें टिळकांसारखा उद्योगी मनुष्य काय करीत असेल याचा कोणीं विचार करूं लागल्यास त्याला असेंच दिसून येईल कीं, प्रत्यक्ष लेख लिहिण्यापेक्षांहि अवांतर उद्योगाचाच त्यांचा व्याप अधिक होता. व हा व्याप असा होता म्हणूनच केसरी ज्यांनीं जन्मांत कधींहि वाचला नाहीं अशा परप्रांतीचे लोकांचेंहि मन त्यांनीं आकर्षण करून घेतलें होतें. लेखकनकला हें त्यांच्या आंगच्या गुणांचें फक्त एक उपलक्षण होय. व हिंदुस्थानांतील सर्व आबालवृद्धांना त्यांचें नांव जें केवळ परिचित नव्हे तर प्रियहि झालें होतें त्याचें कारण त्यांच्या आंगचे अनेक गुण होत. हे गुण म्हटले म्हणजे मुख्यतः देशभक्ति, धैर्य, करारीपणा व स्वार्थत्याग हे होत. या गुणांपुढें त्यांचें लेखनचातुर्य व वक्तृत्व हीं केव्हांहि फिकींच पडतात.

राष्ट्रीय दृष्टि व मर्मज्ञान हीं सोडलीं तर टिळकांच्या लेखांत चित्ताकर्षक असें फारसें उरत नाहीं असें म्हणणारे अनेक टीकाकार आम्हीं पाहिले आहेत. तसेंच त्यांचें वक्तृत्व प्रसंगोपात्त त्यांतील आवेशामुळें व मनाच्या निर्भयतेमुळें फारच परिणामकारक होत असलें तरी खऱ्या वक्तृत्वकलेचें ढंग किंवा नटवेपणा त्यामध्यें

नव्हता म्हणून प्रसिद्ध वक्त्यांच्या मालिकेंतून त्यांचें नांव वगळणारे त्यांचेच कांहीं लेही आम्हांला आढळले आहेत. पण त्यांच्या उपनिर्दिष्ट गुणचतुष्टयासंबंधानें मात्र त्यांच्या मित्रांतच काय पण शत्रूंतहि मतभेद नाहीं ही गोष्ट प्रसिद्ध आहे. सरकारी अधिकारी सरकारी नात्यानें अर्थातच त्यांची कोणत्याहि गुणाकरितां स्तुति करूं शकत नाहींत हें ठीकच आहे. पण खासगी रीतीनें बोलण्याचा प्रसंग आला असतां वरील किंवा इतर अनेक गुणांसंबंधानें अधिकाऱ्यांनीं आदरच दर्शविलेला आहे, असें अनेक प्रत्यक्ष माहितगार माणसांच्या तोंडून आम्हीं ऐकलें आहे. इतकेंच नव्हे तर ही गोष्ट स्वानुभवानें आम्हासहि माहीत आहे. कालच मुंबईच्या 'टाइम्स' पत्रानें टिळकांच्या मृत्यूसंबंधानें एक स्फुट लेख लिहिला आहे. त्यांत अर्थात टिळकांच्या राजकीय चारित्र्याबद्दल वाटेल तीं अद्वातद्वा व प्रस्तुत प्रसंगाला अत्यंत अनुचित अशीं विधानें केलीं आहेत. पण खुद्द टाइम्सला तो कट्टा शत्रु होऊनहि टिळकांचे कांहीं गुण नाकबूल करतां आले नाहींत. त्याबद्दल कबुलीच द्यावी लागली आहे. टाइम्स म्हणतो, 'टिळकांची बुद्धिशक्ति वाखाणण्यासारखी होती. त्यांच्या संशोधक ग्रंथांची मोठमोठ्या प्रसिद्ध विद्वान पंडितांनीं मान्यतादर्शक स्तुतीच केली आहे. जें चळवळीचें काम त्यांनीं जन्मभर केलें त्यांत त्यांचें धैर्य धाडस व अखंड उत्साह दिसून आला. त्यांचीं भाषणें व लेख ऐकणारांना व वाचणारांनाहि त्याच्या पुनः पुनः आवृत्त्या किंवा रूपांतरें झालीं तरी त्यांच्या मनावर त्यांचा परिणाम किती होतो याचें कोणालाहि आश्चर्यच वाटतें. त्यांची भाषापद्धति अननुकरणीय आहे" अशा कर्तृत्ववान् धैर्यशील व उद्योगी पुरुषाच्या हातून ( टाइम्सकाराच्या मताप्रमाणें ) अनेक अनिष्ट गोष्टी घडाव्या याबद्दल त्यानें खेद प्रदर्शित केला आहे. तसें तो म्हणणारच, व त्यास उत्तर देणेंहि फारसें कठीण नाहीं. प्रस्तुत आपणाला ग्राह्य मुद्दा हाच कीं, टिळकांच्या वैऱ्यांना देखील त्यांच्या कांहीं बिनमोल गुणांची स्तुति केल्याशिवाय आपल्या निंदेला यावा तितका उठाव येत नाहीं असें वाटतें यावरूनच त्यांचे गुण किती खरे व सर्वसंमत होते हें दिसून येईल.

अशा गुणांचा उपयोग कशा प्रकारें व्हावा हा मुद्दा अर्थात वादग्रस्तच असणार. किंबहुना टिळक व त्यांचे प्रतिपक्षी यांच्या दरम्यान जें आजन्म युद्ध चालू होतें त्याचें कारण हा मतभेदच होय. सरकारला वाटे कीं, असला बुद्धिमान धाडशी व कर्तृवान पुरुष आपल्याला लाभता तर काय बहार झाली असती. किंबहुना सरकार व टिळक यांच्यामधील मतैक्याचा क्षणिक व किंचिन्मात्र स्पर्श ज्या एखाद्या विषयाला चुकून कधीं काळीं झाला त्यांत सरकारनें या मतैक्याला किंमत देऊन त्याचा प्रत्यक्ष उपयोग करून घेण्याचीच इच्छा दर्शविली. समाजसुधारकांना समाजसुधारणा हा विषय प्रिय असल्यामुळें त्यांनाहि सहजच वाटे कीं, अशा धीट व कर्तबगार मनुष्यानें सुधारणांचा प्रश्न हातीं घेतला असता तर

त्यानें त्याची अपूर्व प्रगति केली असती. सरकारप्रमाणें समाजसुधारकहि प्रसंग-विशेषीं टिळकांविषयीं आदर प्रदर्शित करीत व त्यांच्याकडून चुकून लाभणाऱ्या सहानुभूतिलेशाचा शक्य तो उपयोग करून घेत. फार काय स्वतः टिळकांना असें अनेक वेळां म्हणतांना आम्हीं ऐकलें आहे कीं, "सुधारणा कां होईना पण तिचाहि फैलाव करण्याचा उद्योग यशस्वी होण्यास जो उत्साह व चिकाटी लागते ती सुधारक दाखवीत नाहींत; हे गुण अंगीं असणाऱ्या लोकांच्या संख्येच्या मानानें सुधारणेचें पाऊल बरेंच पुढें पडलें आहे असें त्यांनीं मानलें पाहिजे. मी स्वतः सामाजिक सुधारणेच्या उद्योगांत पडलों असतों तर त्यांतहि मी काम करून दाखविलें असतें. सर्व सुधारकांचें मिळून एखाददुसरें वर्तमानपत्र, पण त्यालाहि यशस्वी करण्यास जो संघटित उद्योग व उत्साह लागतो तो त्यांच्यांत दिसून येत नाहीं. यामुळेंच केवळ सुधारणामतवादी वर्तमानपत्रें मागें पडतात" इत्यादि. पण टिळकांनीं सरकारी नोकरी न करण्याचें जें कारण तेंच त्यांनीं समाजसुधारणा हातीं न घेण्याचें कारण. या मतभेदामुळें त्यांचें चरित्र सरकारला व समाजसुधारकांना अनेक प्रसंगीं व अनेक बाजूंनीं अत्यंत अप्रिय झालें, व कित्येक प्रामाणिक मताच्या व सच्चारित्र्याच्या सुधारकांना टिळकांशीं निकट स्नेह-संबंध ठेवतां आला नाहीं ही गोष्ट अगदीं खरी. तथापि टिळकांवर एकांगी उद्योगाचा आरोप करणाऱ्या लोकांनाहि, टिळक हे टिळकांनीं ग्राह्य मानलेल्या देशभक्तीच्या साध्याकरितांच आपलें आयुष्य खर्चीत होते हें नाकबूल करतां आलें नाहीं. उदाहरणार्थ सर नारायणराव चंदावरकर यांचीं व टिळकांचीं मतें जुळण्याचा योग साऱ्या जन्मांत क्वचितच आला असेल. तथापि अलीकडे त्यांच्याहि तोंडून टिळकांविषयीं 'ग्रेट' म्हणजे 'महानुभाव' असें व्यक्तिवर्णन निघतें. त्याचें कारण हेंच कीं, टिळकांच्या अंगीं दोष असले तरी ते मोठ्या माणसाचे दोष आहेत व त्यांचा हा मोठेपणा त्यांच्या देशभक्तीवर व स्वार्थ-त्यागावर अधिष्ठित झालेला आहे !

लोकोत्तर देशभक्तीला लोकमत 'शंभर खून माफ' करीत असतें. खून याचा अर्थ ढोबळ चुका. टिळकांवर प्रेम करणाऱ्या लोकांनां ते निर्दोष दिसतात व त्यांच्या हातून आजवर एकहि चूक झाली नाहीं असें प्रामाणिकपणानें वाटतें ही गोष्ट प्रसिद्ध आहे. उलट टिळकांच्या प्रतिपक्षांना ते दोषपूर्ण दिसतात; पण लोकमताचीं डोळे फिरविणारीं हीं उंच दोनहि टोकें सोडून देऊन स्थिर बुद्धीच्या भूमीवर उभा राहून कोणी विचार करूं लागला तर त्याला टिळकांच्या अंगचे गुण त्यांजवर आरोपित झालेल्या दोषांपेक्षां किती तरी पटीनें अधिक भरतात असें दिसून येईल; इतकेंच नव्हे तर या लोकोत्तर, गुणसंपन्न, बुद्धिवान, देशभक्त मनुष्याच्या अंगीं सद्यःस्थितींत देशाला सर्वांत अत्यंत उपयोगी पडणारा व खरो-खरच दुर्मिळ असा एक गुण होता असेंहि त्याला कबूल करावें लागेल. हा गुण

म्हणजे सरकाराशीं वागतांना टिळकांनीं दाखविलेला पराकाष्ठेचा निर्भिडपणा. सरकाराविषयीं प्रजाजनांच्या मनांत अनेक वर्षांच्या संवयींमुळें भिनलेली फाजील नम्रता व फाजील आदबशीरपणा नांगरून टाकून, टिळकांनीं राष्ट्रीय स्वाभिमानाच्या वाढत्या वृक्षांच्या मुळ्यांना मनोभूमि हवी तशी उलथीपालथी करून दिली ही त्यांची कामगिरी बिनमोल व बिनतोड आहे. टिळक लेखांत व व्याख्यानांत सरकारचा अधिक्षेप करीत तेव्हां लोकांना असें कधींच वाटलें नाहीं कीं, हा अधिक्षेप अयोग्य आहे. पण त्यांना नेहमीं एकच नवल वाटे व तें हेंच कीं, आजपर्यंत इतके लोक होऊन गेले, विद्वान झाले, पंडित झाले, व्यवहारज्ञ झाले, समयज्ञ झाले, देशभक्तहि झाले, तरीपण सरकाराला असें निर्भीडपणें व टाकून बोलणारा मनुष्य हाच पहिला. सरकाराविरुद्ध स्पष्ट बोलण्याचें व्रत टिळकांनीं प्रथमपासून धरलें तें अखेरपर्यंत पाळलें होतें. टाइम्सकारांनींहि टिळकांचे दोष दाखवितांना त्यांच्या चरित्राचें वर्णन " A life of campaigning terrorism to which we know no parllel in constitutional history " अशा शब्दांनीं केलें आहे याचा सोप्या शब्दांत अर्थ असा कीं, " टिळकांच्या राजकीय मोहिमेचा दरारा मोठा कठिण; कोणत्याही देशाच्या राजकीय घडामोडींच्या इतिहासांत त्याला तोड सापडावयाची नाहीं. " आपल्याहून वेगळ्या दृष्टीनें कां होईना पण टाइम्सकारांनीं केलेलें टिळकांचें हें वर्णन टिळकांना खरोखरच अत्यंत भूषणास्पद आहे असें आम्हीं तरी मानतों. राजकीय चळवळीची मोहिम करावी तर सर्व हिंदुस्थानांत एक टिळकांनींच करावी. सरकार इतर अंगांनीं सामर्थ्यवान असेल पण टिळकांच्या राजकीय मोहिमेची त्यांच्या मनांत धडकी भरत असे टाइम्सनें याचा अजाणत पुरावाच वरील वर्णनांत दिला आहे. सरकार प्रबळ असतां या मोहिमांची भीति वास्तविक त्यांना इतकी कां वाटावी ? त्याचें कारण हेंच कीं, त्या मोहिमेंत निर्भयता व धाडसीपणा हीं तर असतच, पण कायद्याच्या दृष्टीनें अत्यंत सुबक असें कौशल्यहि त्यांत असे. सरकारच्या बाजूला सर्व साधनें भरपूर, पैसा वाटेल तितका, पैशानें वश होणारीं बुद्धिवान् व धाडसी मनुष्यें पदरीं हवीं तितकीं, अधिकाराचें शस्त्रागार नेहमीं भरलेलें, हिंदुस्थानाच्या आंत बाहेर सद्दी जोरावर, साम्राज्याचे ग्रह उच्चीचे आलेले व बिचाऱ्या हिंदुस्थानचे ग्रह नीचीचे व पुरें अधःपतन पावलेले; याच्या उलट बिचाऱ्या टिळकांजवळ कांहीं नाहीं. येऊन जाऊन डोकें, जीभ व एक लेखणी असें असतां या निर्धन, निःशस्त्र, निःसैनिक वीराच्या मोहिमेचें भय टाइम्सनें म्हटल्याप्रमाणें कोणाला कां वाटावें ? पण तें वाटत होतें खरें. सरकार अशा गोष्टी स्वतः तोंडानें बोलून न दाखवितां नेहमीं आपल्या हस्तकांच्या किंवा तिऱ्हाइतांच्या तोंडून बोलून दाखवितें. ध्वनिभ्रम उत्पन्न करण्याची ही जी कला त्यांना पुरी साध्य झाली आहे, तिला अनुसरून त्यांनीं टाइम्सकारांप्रमाणें इतर

अनेकांच्या तोंडून त्यांचे वर्णन केलेलें आहे. चिरोलसाहेबांनीं आपल्या " हिंदुस्थानांतील असंतोष" या प्रसिद्ध पुस्तकांत टिळकांना "Father af Indian unrest" म्हणजे " एकंदर हिंदुस्थानांतील प्रक्षोभाचे जनक " अशी पदवी दिली आहे. तसेंच रौलॅट कमिटीच्या रिपोर्टांतही क्रांतिकारक चळवळीचें मंथन करून त्यांतून काढलेल्या श्रीखंडाचा टिळा टिळकांच्या कपाळीं लावून त्यांचीच अग्रपूजा केली आहे. यावर फिरून आमचें म्हणणें हेंच कीं, दोष देण्याच्या हेतूनें जरी हें वर्णन करणारानें केलें तरी राष्ट्राच्या दृष्टीनें आणि टिळकांच्या अभिमानी भक्तांच्या दृष्टीनें खरोखरच हें वर्णन टिळकांना बहुमानाचें पदक दिल्याप्रमाणें आहे. हिंदुस्थानांत असा एकहि मनुष्य आज नसेल कीं, कर्तृत्वाच्या दृष्टीनें अशा प्रकारच्या स्तुतीचा हा उंची दागिना, बहुमानाची ही थोर पदवी मिळणार असेल तर त्याबरोबर सरकारकडून येणारे हे व असले इतर शेंकडों दोषारोप खुषीनें पतकरणार नाहीं! टिळक व सरकार यांजमधील संबंधाची ही गोष्ट ज्यानें जाणली नाहीं व तिचें कौतुक केलें नाहीं त्याला टिळकांच्या चरित्रांतील मर्मच कळलें नाहीं असें आम्हीं म्हणतो!! सरकाराकडून अशी निंदा करून घेण्याचें भाग्य अनेक शतकांतून एखाद्यालाच लाभतें. ज्यानें आपलें चारित्र्य परिट—घडीप्रमाणें संभाळून सरकाराशीं व इतर अनेक शत्रूंशीं जन्मभर युद्ध करून एकंदर राष्ट्रीय प्रक्षोभाचा जन्मदाता किंवा आद्यगुरु ही पदवी सरकारकडून मिळवून आमरण टिकविली त्याची स्तुति करण्याला त्याच्या मित्रांनीं निराळे शब्द कधीं खर्ची घालण्याचा प्रयत्नहि करूं नये असें आम्हांला वाटतें. लोकमान्य ही पदवी एका अर्थानें स्पृहणीय आहे, पण 'राष्ट्रीय चळवळीचें आद्य कारण'ही पदवी तिच्याहूनहि खरोखर अधिक स्पृहणीय नाहीं काय? " Father of Indian unrest " हा शब्द टिळकांना स्वतःलाहि स्पृहणीयच असला पाहिजे. त्यांनीं चिरोल साहेबांवर फिर्याद मांडली तेव्हां वरील शब्दांनीं आपली बदनामी झाली अशी तक्रार केली नाहीं. केवळ खासगी चारित्र्यावर शिंतोडे उडविण्यासारखीं व त्यांतूनहि खोटीं अशीं जीं विधानें चिरोलसाहेबांच्या बुकांत ग्रथित आहेत त्यांपुरतीच त्यांची फिर्याद होती. " फादर ऑफ इंडिअन अनरेस्ट " " राष्ट्रीय प्रक्षोभाचे आद्य गुरु " हे शब्द कोणी कितीहि घोळ घोळून म्हटले तरी त्यांतून निंदेचा लवलेशही निघूं शकत नाहीं. कोणी कितीहि लावून बोलण्याच्या अर्थानें ते म्हटले तरी त्यांनीं टिळकांच्या कीर्तिरूप देहाला टांचणी टोंचण्याइतकीहि इजा होऊं शकत नाहीं. लोकमान्य हा शब्द प्रौढ असला तरी तो लिवलिवीत ( Passive ) आहे, आणि " फादर ऑफ इंडिअन अनरेन्ट " या शब्दांत टिळकांच्या पराक्रमाचें जें खोल व गंभीर गुणवर्णन आहे, तें लोकमान्य या शब्दांत खाचित नाहीं. या चार इंग्रजी शब्दांतून निघणारा जोरकस अर्थ समर्पक रीतीनें प्रगट करणारा एकच सुटसुटीत व ठसठशीत शब्द कोणी सुचवील तर

आम्ही, महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षातर्फे त्याचे ऋणी होऊं; व यापुढील टिळकांचा उल्लेख लोकमान्य या शब्दांनीं न करतां त्याहूनही उज्ज्वल अशा या नवीन पदवीनेंच शक्य तर करीत जावा अशी महाराष्ट्रास विनंति करूं. राष्ट्राच्या स्वाभिमानबुद्धीचा त्यांनीं क्षोभ उत्पन्न केला म्हणूनच ते लोकमान्य झाले ही गोष्ट खरी, परंतु मान्यता, व मान्यतेचें कारण जो पराक्रम, यांचा जो दूरान्वय लोकमान्य या साध्या नावांत घडतो तो आमच्या मनाला पटत नाहीं. तरुण महाराष्ट्रापुढें टिळकांचें उदाहरण ध्येयरूपानें राहिलें पाहिजे. पण तें ठेवितांना टिळकांना मिळत असलेल्या बहुमानापेक्षां त्यांनीं राजकारणांत जो पराक्रम केला तोच तरुण पिढीच्या नजरेपुढें त्यांच्या पदवीच्या रूपानें विशेष ठळकपणें आला पाहिजे.

टिळकांच्या शत्रूंनाही मान्य झालेले टिळकांचे गुण सिद्ध करून दाखविण्याला याहून अधिक विवेचन करण्याचें कारण नाहीं. त्यांनीं गेल्या ४० वर्षांत जीं जीं नांव घेण्यासारखीं कामें केलीं तीं सर्व वरील गुणांचीं उदाहरणें असून कोठें धैर्य तर कोठें देशभक्ति, कोठें करारीपणा तर कोठें स्वार्थत्याग, या निरनिराळ्या गुणांनीं निरनिराळ्या प्रसंगीं विशेष कामगिरी बजावली आहे. कालानुक्रमाला अनुसरून त्यांनीं केलेल्या कामगिरीचा नुसता उल्लेख केला तरी तिचें महत्त्व लक्षांत येण्यास पुरें आहे. १८८२सालीं कोल्हापूर–प्रकरणाच्या वेळीं टिळक अवघे २६वर्षांचे होते पण इतक्या अल्प वयांत या खटल्याच्या कामीं त्यांनीं कायद्याचें ज्ञान व शिक्षा सोसण्याचें धैर्य तर दाखविलेंच, पण इमानदारी राखून केवळ इमानाखातर आपल्या हातीं आलेला आपल्या बचावाचा पुरावा आपल्या हातानें जाळला! या गोष्टीचा संबंध पुढें फर्ग्यूसन कॉलेजकरितां एक मोठी देणगी मिळून कॉलेज स्थापन होण्यास कसा कारण झाला हें जुन्या पिढीच्या लोकांस चांगलें माहीत आहे. १८८८–८९ सालीं टिळकांनीं क्राफर्ड–मामलेदार प्रकरणीं जी कामगिरी केली तिनें त्यांच्या अंगच्या उद्योगशीलतेचा पुरावा पुण्याच्या लोकांस पटविला. क्राफर्ड–प्रकरणांत मुख्यतः साहेब मजकूर दोषी असतां ते शिक्षेवांचून सुटले व बिचाऱ्या मामलेदारांवर मात्र बडतर्फी आदळली. हा अन्याय सहन न होऊन त्यांनीं अर्ज लिहून व सभा भरवून मामलेदारांची दाद पार्लमेंटपर्यंत लावून मुंबईसरकारकडून 'मामलेदार्स इंडेम्निटी' ॲक्ट पास करवून घेतला. १८९१ सालीं संमतिबिलाच्या युद्धप्रसंगीं टिळकांनीं डॉ. भांडारकरप्रभृति पंडितांशीं वाद केला त्यांत त्यांची कुशाग्रबुद्धि, संस्कृत ग्रंथांचें परिशीलन व वादविवादाची उत्कृष्ट हातोटी लोकनिदर्शनास आली. "संमतीचें वय" वाढविण्यास तात्विक व नैतिक दृष्ट्या टिळकांची संमति होती. पण ते व सुधारक मंडळी यांच्यांतील वादाचा मुख्य मुद्दा सरकारनें धार्मिक विषयांत हात घालूं नये, सुधारणा इष्ट असली तरी शक्य तितकी ती लोकमतानेंच घडवून आणावी एवढाच होता. या वादामुळेंच टिळकांचें नांव मुंबई इलाख्याबाहेर प्रथम प्रसिद्धीस आलें १८९२–९४ या सालीं

हिंदू-मुसलमान लोकांमधील तंटे विकोपास गेले. या प्रसंगीं खरा दोष वास्तविक सरकारी अधिकाऱ्यांकडे असून त्यांच्या चिथावणीमुळें मुसलमान लोक दुराग्रह धरितात हें मत सर्व लोकांना मान्य होतें व केवळ मुसलमानांचीं मनें बिथरतील म्हणून हिंदूंच्या सभा वगैरे भरवूं नये, असें म्हणणें चूक असें टिळकांचें मत होतें. टिळकांनीं केलेल्या त्या वेळच्या उद्योगामुळें, विशेषतः त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या कांहीं सरकारी कागदपत्रांमुळें, सरकारचा पक्षपात चव्हाट्यावर आला; आणि बिचाऱ्या हिंदु लोकांना आपला कोणी तरी वाली आहे असें कळून आलें. गणपत्युत्सवाचें मूळ हिंदु--मुसलमानांच्या तंट्यांत होतें हें म्हणणें क्षणभर खरें म्हणून घेऊन चाललें तरी उत्सवाच्या मुळाशीं योग्य प्रकारचा हिंदुत्वाचा स्वाभिमानहि होता. शिवाय मुसलमानांचीं मनें दुखविलीं गेलीं हें वर्णन तेव्हां थोडेंबहुत खरें असलें तरी, त्या वेळीं टिळकांनीं स्वीकारलेलें धोरण मुसलमानांपेक्षां सरकाराविरुद्धच अधिक होतें आणि तें योग्यहि होतें अशी कबूली अलीकडे मुसलमान पुढाऱ्यांनीं उघड दिली असून, त्या योगानें टिळकांवरील पूर्वीच्या काल्पनिक दोषारोपाचें परस्पर खंडन झालें आहे. अफझुलखानवधासंबंधीं अशीच गोष्ट आहे. त्या वादांत टिळकांनीं स्वीकारलेला पक्ष राष्ट्र या नात्यानें मराठ्यांच्या स्वाभिमानाला योग्य असाच होता. प्रो. करकेरिया वगैरे तिऱ्हाईत पार्शी इतिहासकारांनीं याच पक्षाला तेव्हां पुष्टि दिली होती, व अलीकडे स्वतः इंग्रज इतिहासज्ञ लोकहि किंचित् निःपक्षपातें दृष्टीनें पाहूं लागल्याबरोबर त्यांनाहि शिवाजीचीच तरफदारी करावी लागली हें किंकेड रॉलिन्सनप्रभृतींच्या लेखांवरून ध्यानांत येण्यासारखें आहे.

१८९४ सालीं सुप्रसिद्ध बापट कमिशन–प्रकरणांत ब्रिटिश सरकारचा प्रत्यक्ष संबंध नव्हता. तथापि हें कमिशन नेमून बापटांचें पारिपत्य करण्याबरोबरच खुद्द बडोदाधिपति सयाजीराव यांच्यावर कोणास काय शिंतोडे उडवावयाचे होते व पोलिटिकल खात्याला आपला हात कसा साधून घ्यावयाचा होता या गोष्टी इकडे लोकांना फारशा माहीत नाहींत. पण बापटांना फरारी होण्याचें कसें भाग पडलें, टिळक व वासुदेवराव जोशी यांनीं धोका सोसून बडोद्यांस ठाणें मांडून बापटांना कसें सहाय्य केलें व त्यांत अप्रत्यक्ष रीत्या महाराजांचा बचाव कसा झाला, टिळकांनीं रात्रीचा दिवस करून बापटांचे वकील रा. खरे वगैरेंना बिनमोल सहाय्य कसे केलें, व प्रतिपक्षी फेरोशहा मेथा वगैरे वकीलांचा पाडाव कसा केला या गोष्टींचा कोणी इतिहास लिहिल्यास खरोखरच तो मोठा मनोरंजक होईल. मित्रकार्याकरितां झीज सोसण्याचे टिळकांचे गुण बाबामहाराज–प्रकरणीं पुढें जे दिसून आले त्याचा आगाऊ पुरावा बापट–कमिशनच्या इतिहासांत मिळण्यासारखा आहे.

१८९५ सालापूर्वींच टिळकांची कामगिरी महाराष्ट्राला इतकी पसंत पडली

होती कीं, मध्यभागाला कायदेकौन्सिलांत निवडणुकीची एक जागा मिळतांच ती मतदारांनीं टिळकांना मिळवून दिली, व फिरून दोन वर्षांनंतर नवीन निवडणूक आली तेव्हांही त्यांनीं टिळकांनाच निवडलें. १८९७ सालीं प्लेगमुळें, विशेषतः प्लेगनिवारक जुलमी उपायामुळें, लोक व सरकार यांच्यामध्यें जें भांडण जुंपलें त्यांत तक्रारीपणाचा पहिला मान पुण्यानें मिळविला. या वेळीं टिळकांनीं केलेली लोकसेवा बरीचशी विधायकहि होती व त्यांच्या प्रयत्नानें खासगी प्लेग-इस्पितळें वगैरे निघून झडत्या वगैरेंचा जाच कमी झाला. टिळकांची लोकसेवा नेहमीं विकृत करून दाखविण्याची सरकारास खोड होती, त्याप्रमाणें रँडसाहेबांच्या खूनाची जबाबदारी त्यांनीं टिळकांच्या चळवळीवर लादण्याचा प्रयत्न केला. पण अखेर पोलिसखात्याकडूनच त्याचें परस्पर निराकरण झालें! रँडच्या मागून पुण्यांत लोकांचें मन संभाळून प्लेगचा कारभार करण्याचें नवीन धोरण अमलांत तर आलेंच, पण मुंबईस व इतर ठिकाणीं आणखी मारामाऱ्या झाल्यावर टिळकांनीं तक्रार केलेलें आपल्या कारभाराचें धोरण खरोखरच सदोष आहे ही गोष्ट सरकारास मान्य करावी लागली, व त्यापुढें प्लेगप्रतिबंधक उपायाच्या नांवानें जुलमी कृत्यें करण्याचें सर्वस्वीं बंद झालें. सरकारची चूक पुढें खरी ठरो, पण १८९७ सालीं टिळकांवर झालेल्या खटल्यामुळें त्यांना एक वर्ष तुरुंगवास मात्र नाहक भोगावा लागला; व अखेर प्रो. मॅक्समुल्लरप्रभृतींच्या मध्यस्थीनें त्यांची सुटका झाली. हिंदुस्थानांत राजद्रोहाचा महत्त्वाचा असा हा पहिलाच खटला होय. त्यानें टिळकांबद्दल सर्व हिंदुस्थानभर सहानुभूति उत्पन्न केली, त्यांच्याकरितां परस्पर फंड जमा झाले, मुंबईचे व्यापारी त्यांना जामीन राहिले, कलकत्त्यास जमलेल्या वर्गणीनें रवाना झालेल्या बॅरिस्टरांनीं त्यांचा डिफेन्स दिला, न्यायमूर्ति स्ट्रची यांनीं स्वतःस मूर्खांच्या गणनेंत गोंवून घेतलें, सरकारला राजद्रोहाच्या कायद्याची भाषा दुरुस्त करावी लागून स्वतःस सर्व जनतेकडून अन्यायी व खुनशी म्हणवून घ्यावें लागलें; अशा रीतीनें या प्रकरणांतला नैतिक विजय टिळकांनाच लाभला.

१९०१ सालीं ताईमहाराजांच्या दत्तक-प्रकरणास सुरुवात झाली. त्याचा पहिला व महत्वाचा खंड १९०४ सालीं फौजदारी खटल्यांतून टिळकांची सर्वस्वी दोषमुक्तता होऊन पुरा झाला पण त्यांतल्या त्यांत त्यांना तीन दिवस तरी तुरुंगवास भोगावा लागला हें ध्यानांत ठेवण्यासारखे आहे! हायकोर्टाच्या एका निकालाशिवाय यापुढें या प्रकरणीं टिळकांना अपयश आलें नाहीं. पण त्यांच्या बिनमोल वेळेची वर्षांच्या वर्षें या कामीं खर्ची पडली एवढेंच नव्हे तर इस्टेटीचा कारभार पाहण्याची दगदग सोसून शिवाय पदरचे ३०।३५ हजार रुपये त्यांना या खटल्यांत आगाऊ खर्चीं घालावे लागले. १९०५ सालीं कर्झनशाहीच्या जुलमानें स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण वगैरे चळवळा सुरू झाल्या

व या बाबतींत टिळकांनीं जी मोठी कामगिरी केली ती सर्व हिंदुस्थानास माहीत आहे. या चळवळीचें प्रायश्चित टिळकांना देण्याकरितां हिंदुस्थानांत कोठें तरी अत्याचार घडण्याची वाट सरकार पहात होतें; दरम्यान सुरत येथील राष्ट्रीय सभा मोडून टिळकांच्या बाजूला जनतेचें केवढें बळ आहे हें कळून आल्यानें सरकारास अधिकच विषाद वाटला. १९०८ सालच्या एप्रिलांत बाँबच्या अत्याचारास बंगाल्यांत सुरुवात होतांच सरकारनें टिळकांवर खटला कसा केला, त्यांत टिळकांनीं एखाद्या बॅरिस्टराप्रमाणें आपला डिफेन्स स्वतः कसा दिला, न्या. दावर यांनीं वर्तन कसें केलें, हिंदुस्थानांतील राजकीय पक्षभेद तीव्र होण्यास या खटल्यानें मदत कशी झाली, राष्ट्रीय पक्ष पुढें अनेक वर्षे राष्ट्रीय सभेंतून कां अलग राहिला व अखेर १९१४ सालीं टिळक कैदेंतून सुटून आल्यानंतर कांहीं दिवसांनीं फिरून राष्ट्रीय सभेंत तो पक्ष कसा सामील झाला, आणि तेव्हांपासून पुढें राष्ट्रीय सभेची रोडकी गंगा फुगून फोफावून दुथडी कशी वाहूं लागली, त्यांतच युद्धाची मदत झाल्यानें स्वराजाच्या चळवळीस अनपेक्षित जोर कसा आला, स्वराज्यसंघ कसा स्थापला गेला व त्याचे अध्यक्ष, उपाध्यक्ष या नात्यानें टिळकांनीं सर्व प्रांतांत चळवळ कशी केली, चिरोल केस व होमरूल लीग डेप्युटेशन या उभय कार्यांकरितां टिळक महायुद्ध चालू असतां एक प्रयत्न फसला तरी फिरून प्रयत्न करून विलायतेस कसे गेले, चिरोल–केसचा निकाल त्यांच्याविरुद्ध झाला तरी त्याची पर्वा न करितां त्यानीं राजकीय चळवळ कशी केली वगैरे गोष्टी बऱ्याच अलीकडच्या असल्यामुळें त्यांच्याविषयीं सविस्तर लिहिण्याचें आज कारण नाहीं; व तसें करण्यास आज स्थलावकाशहि नाहीं. पण या गोष्टींचें केवळ जातां जातां स्मरण करून देण्याचा हेतु इतकाच कीं, त्या प्रत्येकीवरून टिळकांची देशभक्ति, धैर्य, करारीपणा व स्वार्थत्याग यांपैकीं एकना एक गुण ठळक रीतीनें दृष्टीस पडतो.

टिळकांचें गेल्या ४० वर्षांतील चरित्र लोकांच्या डोळ्यांपुढें आरशांत पाहिल्याप्रमाणें स्वच्छ आहे. क्वचित त्यांची विचारसरणी, क्वचित त्यांचा एखादा स्वभावगुण, क्वचित त्यांच्या एखाद्या प्रसंगाची कार्यपद्धति, याविषयीं कोणाचा मतभेद होऊं शकेल पण टिळक हे कांहीं झालें तरी लोकोत्तर पुरुष होते याविषयीं कोणाचा मतभेद होणार नाहीं. गेल्या १०० वर्षांचा विचार केला असतां त्या अवधींत असा दुसरा एकहि मनुष्य झाला नाहीं कीं, ज्याला टिळकांइतकी लोकप्रियता लाभली व टिळकाइतकें लोकांच्या तोंडी नांव झालें. बद्रिकाश्रमाच्या यात्रेंत भेटणारा हिमालयाच्या पहाडांतील वनचर ज्या कौतुकानें यात्रेकरूंस टिळकांची माहिती विचारतो त्याच कौतुकानें कोलंबो व कँडी या शहरांतील सिंहली लोक त्यांची विचारपूस करतात. जंगलांतील किंचित माणसाळलेले भिल्ल व बेरड यांनीं टिळकांचें नांव कानीं पडतांच आपल्यांशीं हात जोडून

त्यांना नमस्कार केल्याचें लोकांनीं पाहिलें आहे. टिळकांच्या अनुयायी–गणांत फक्त सामान्य प्रतीच्या किंवा अशिक्षित मनुष्यांचीच गणना होते अशी एकवेळ समजूत होती. अलीकडील अनुभवावरून तरी या भ्रामक कल्पनेचा उच्चार त्यांचे सरकारी वैरीही करीनासे झाले आहेत. प्रथम राजश्री, नंतर नामदार, नंतर लोकमान्य नंतर महात्मा अशा चढत्या परंपरेनें त्यांना उपपदें लागत आलेलीं असून एकादा त्यांचा वेडा भाविक भक्त त्यांचा उल्लेख करतांना भगवान हें विशेषणहि दडपून देतो. कित्येक लोकांनां टिळकांची लोकोत्तर मान्यता कबूल असूनहि लोकमान्य म्हणण्यांत येणारा गतानुगतिकत्वाचा दोष न आवडून त्यांना ते ‘ विद्वन्मान्य ’ असें नांव देतात. कोणाला त्यांची विद्वत्ता पटत नाहीं; पण त्यांचें विभूतिमत्व पटतें म्हणून ते त्यांना ‘धि ग्रेट’ किंवा ‘महानुभाव’ अशा शब्दांनीं उल्लेखितात. पण रुचिभेदानें वैचित्र्य पावलेलीं हीं सर्व उपपदें परस्परांविरुद्ध लावलीं तरीहि त्यांतून लोकोत्तरपणाचाच अवशेष निघतो ! अर्थात् एकाद्या शतकांत क्वचित निर्माण होणारा असा हा पुरुष नाहींसा झाल्यामुळें या देशाची किती हानि झाली असेल याची कल्पना वाचकांस सहसा करतां येणार नाहीं. टिळकांचा सन्मान करणें, टिळकांना प्रिय किंवा देण्याला प्रिय अशा वस्तु त्यांना समर्पण करण्याचा आनंद उपभोगणें, त्यांचें काव्यमय गुणवर्णन करणें वगैरे बाबतींत अचाट कल्पना खर्च करूनहि अतिशयोक्तीचा दोष आपल्या हातून घडत नाहीं, उलट आपले शब्दच आपणास अपुरे पडतात अशा प्रेमळ पण प्रामाणिक भावना बाळगणारे हजारो लोक आज प्रांतोप्रांतीं आढळतात. राजाच्या शब्दालाहि मान नाहीं तो टिळकांच्या शब्दाला आज मान होता. शहाणे व समंजस लोकहि ‘ uncrowned king ’ म्हणजे ‘ ज्याच्या राजवैभवांत केवळ मुगुटच कमी आहे असा राजा ’ असें टिळकांचें वर्णन विशिष्ट अभिप्रायानें करीत, आणि हरएक प्रांतीं झालेला त्यांचा अश्रुतपूर्व सत्कार ज्यांनीं डोळ्यांनीं पाहिला असेल त्यांनां हें वर्णन अवास्तविक आहे असें मुळींच वाटणार नाहीं; उलट राजाच्या सत्कारसमारंभांत जो कृत्रिमपणा दिसून येतो तो टिळकांसंबंधानें कोठेंहि दिसून येत नसे. टिळकांना जसा राजा या नात्यानें मुगुट नव्हता तसेंच टिळकांना राजा या नात्यानें सिंहासनहि नव्हतें. सनदी राजांची परंपरा अखंड चालत असली तरी राजा हें त्यांचें केवळ आडनांव होऊन बसतें. राजा या शब्दांत जें खरें तेज आहे तें त्यामध्यें आढळत नाहीं, व राजा या शब्दाला जो खरा आदर आहे तोहि त्यांना लाभत नाहीं. टिळकांसारख्या राजाचें सिंहासन लोकांच्या मनोमंदिरांत अक्षय स्थापलेलें असतें. अशा सिंहासनावर बसणाऱ्या लोकांनां जशी पूर्वपरंपरा नसते, तसेंच त्यांच्या पश्चात त्यांच्या सिंहासनावर परंपरेनें म्हणून कोणीहि बसूं शकत नाहीं. अशांच्या निधनप्रसंगीं “ The King is dead, Long live the King ” हा दुतर्फी जयजयकार

खोटा ठरतो. त्यांचें सिंहासन मोकळें राहणें हेंच त्यांच्या लोकोत्तरपणाचें वैशिष्ट्य व त्यांची आठवण ठेवून तें सिंहासन तसेंच मोकळें ठेवणें हेंच लोकांनाहि भूषण! टिळकांवर लोकांचें जर खरें प्रेम असेल तर 'लोकमान्य' ही पदवी त्यांनीं यापुढें अनंत कालपर्यंत अनन्यसामान्यच ठेविली पाहिजे. लोकमान्य या शब्दानें या पुढील हिंदुस्थानच्या इतिहासांत कोणाहि कितीहि मोठ्या व्यक्तीचा उल्लेख होतां कामा नये. 'लोकमान्य म्हणजे बाळ गंगाधर टिळक' हें समीकरण मराठी भाषा हयात असेपर्यंत अबाधितच राहिलें पाहिजे.

असो टिळकांविषयीं लिहावें तितकें थोडेंच होणार. लिहितांना प्रस्तुत लेखकाला स्वतः त्याच्या मनांत येतें त्यापैकीं एक दशांशहि या लेखांत लिहितां आलें नाहीं, मग हजारों लोकांच्या मनांत आजच्या प्रसंगीं येणारे हजारों विचार तो कसे रेखाटणार ? टिळकांचें सर्व यथातथ्य चरित्र आजच्या काळांत कोणी लिहूं शकेल कीं नाहीं याची शंकाच आहे. तथापि त्यांच्या खासगी व सार्वजनिक चरित्राचे एकेक विषयावर पैलू पाडले असतां कमींतकमी ५० प्रकरणात्मक तरी त्यांचें चरित्र होईल असें आम्हास वाटतें. कोणी टिळकांचीं चरित्रें पुढेंमागें लिहितीलहि, व हजारों लाखों लोक ती वाचीत राहतील, तथापि आज त्यांच्या मृत्युमुळें देशाची जी हानि झाली ती मात्र भरून येणें सर्वथा अशक्य आहे. सर्वांप्रमाणें टिळक हे मर्त्यभूमींतच वास करीत होते. त्यांनीं ६४ वर्षेपर्यंत आयुष्य व चांगल्या प्रकारचें आरोग्य भोगलें ही गोष्ट आम्हास नाकबूल नाहीं. फार काय, पण खुद्द टिळकांनाहि आपणांस इतकें आयुष्य कसें लाभलें याविषयीं एक प्रकारचें आश्चर्य वाटत असे आणि त्यांनीं जन्मभर स्वदेशाकरितां केलेले कष्ट, सोसलेले हाल व वाहिलेली चिंता ही सर्व लक्षांत घेतां त्यांनीं बालपणीं कमावलेली पोलादी शरीरप्रकृतीच त्यांच्या उपयोगी पडली ही गोष्ट निर्विवाद आहे. सन १८९६ सालच्या मार्च महिन्यांत प्रस्तुत लेखक टिळकांच्या बोलावण्यावरून साताऱ्याहून वकिलीचा धंदा सोडून व 'मराठा' पत्राचें संपादकत्व पत्करून पुण्यास आला त्यावेळीं त्यास टिळकांनीं लिहिलेल्या पत्रांतील एक वाक्य असें होतें ' I want in you not a servant but a friend of the last days, as it may be of my life. " म्हणजे " तुम्ही येथें येणार ते नोकर या नात्यानें नव्हे तर माझ्या या शेवटच्या दिवसांत मला सहकारी स्नेही पाहिजे म्हणून. " ही २४ वर्षांपूर्वींची गोष्ट या वेळीं टिळक अवघे ४० वर्षांचे होते, पण बरोबरीचे सर्व स्नेही मृत्यु पावले असल्यामुळें आपल्या तारुण्याच्या ऐनउमेदींतच आपल्यावर ' शेवटच्या दिवसांची 'छाया पडली असें वाटून कदाचित् आपल्या गतस्नेह्यांप्रमाणें आपणांसही आपलें काम अर्धवट टाकून जावयाचें आहे कीं काय अशी शंका त्यांना मधून मधून येत असावी हें उघड दिसतें. सुदैवानें त्यांची ही शंका व्यर्थ ठरली, व पुढें २४ वर्षें आयुष्य लाभलें इतकेंच

नव्हे तर पूर्वी कांहींच झाली नाहीं अशी लोकोत्तर व भरीव कामगिरी करण्याचें समाधानहि त्यांना मिळालें हें सर्व खरें. पण टिळकांचें चरित्रच असें आहे कीं, त्यांना कितीहि आयुष्य मिळालें तरी आम्हांस तें अपुरेंच वाटणार, याला आमचा इलाज नाहीं. मृत्यु आमची मागणी बेताल म्हणो, पण आम्हांलाहि मृत्युला उलट विचारतां येईल कीं, ८०।९० वर्षांपर्यंत देखील वांचलेलीं मनुष्यें जर आम्हीं प्रत्यक्ष पहातों तर तुझा कृपणपणा येऊनजाऊन आमच्या भोंवतींच कां ? एकाचें आयुष्य दुसऱ्यास देण्याच्या मोबदल्याचा व्यवहार यमाच्या पेढीवर होत नाहीं म्हणूनच नाइलाज; पण तसा होऊं शकता तर महाराष्ट्रांतील शेंकडो मनुष्यांनीं आपापल्या आयुष्यांतील एकेक वर्ष टिळकांना देऊन त्यांना शेंकडों वर्षें जगविलें असतें. पण हे विचार कितीहि मनांत आले व कितीहि बोललों तरी टिळकांच्या मृत्यूनें देशाची जी आज हानि झाली ती नक्की आहे ती कांहीं परत येत नाहीं.

सर्व देशाचीच जेथें एवढी हानि झाली तेथें केसरीच्या वाचकांच्या हानीची गोष्ट बोलण्याचें अवघड होऊन बसतें; पण तिचा उल्लेख केल्याशिवाय मात्र आम्हांस राहवत नाहीं. टिळक स्वतः केसरीचे संपादक होते तोंपर्यंत वाचकांना खुद्द टिळकांच्या हातचे स्फूर्तिदायक लेख वाचावयास मिळत. पुढें त्यांनीं संपादकत्व प्रत्यक्ष सोडलें तरी त्यांची स्फूर्ति, त्यांचें ज्ञान, त्यांचा अनुभव, त्यांची सल्लामसलत, यांचा फायदा माझे मित्र रा. कृष्णाजीपंत खाडिलकर यांना व मला यथाप्रसंग मिळून त्याचा लाभ परावर्तनरूपानें केसरीच्या वाचकांस मिळत असे. यापुढें या लाभाला आम्ही व केसरीचे वाचक अंतरलों ही गोष्ट लक्षांत आली म्हणजे छाती भरून येते व एक प्रकारची खेदकारक शून्यता सभोंवार अवतरली असें वाटतें. पण लोकमान्यांची स्मृति हा यापुढें केसरीचे संपादक व वाचक यांना एकत्र आधार असून या आधारावर नजर देऊन आपण उभयतां शक्य ती परस्परसेवा करूं एवढेंच सुचवून हा लेख पुरा करतों.

# लो. टिळकांच्या अस्थींचा नगरप्रवेश समारंभ

केसरी ता. १० ऑगस्ट १९२०

लो. टिळक ता. १२ जुलै रोजीं मुंबईस जाण्याकरितां गायकवाड्यांतून बाहेर पडले, ते मुंबईहून गायकवाडवाड्यांत ता. ३ आगस्ट रोजीं परत आले! पण या दोन प्रसंगांत केवढें तरी अंतर! जातांना ते आपल्या साडेतीन हात देहानिशीं बाहेर पडलें; येतांना ते अंगुष्ठमात्र देहानें आले. जातांना त्यांनीं अंगांत नेहमींचा पोषाख घातला होता; येतांना त्यांनीं चिताभस्माचें रूप धारण केलें होतें. जातांना ते आपल्या पायांनीं गेले; येतांना ते एका वीतभर लांबीच्या चंदनी पेटींत निजून आपल्या परिचरांच्या खांद्यावर बसून आले. जातांना त्यांचा सर्व ऐहिक व्याप त्यांच्या डोक्यांत घोळत होता; येतांना त्या सर्व व्यापांचा त्याग त्यांनीं केला होता. जातांना ते वासनापूर्ण होते; येतांना त्यांनीं सर्व वासना टाकून दिल्या होत्या. जातांना ते लोकांविषयीं बोलत होते; येतांना त्यानीं स्वतः शाश्वत मौनव्रत स्वीकारलें असून सर्व लोक मात्र त्यांच्याविषयीं बोलत होते. जातांना त्यांनीं टिळकपूर्ण असें पुणें सोडलें; येतांना त्यांनीं टिळकशून्य अशा पुण्यांत प्रवेश केला.

टिळकांच्या अस्थींचा नगरप्रवेशसमारंभ गेल्या बुधवारीं सकाळीं झाला. मुंबई येथील स्मशानयात्रा आटपल्यावर त्यांना सदेह पुण्यास आणण्याची पुणेकरांची आशा अर्थात् दग्ध झाली. पण त्यांच्या देहाची राख मुंबईस पडली तरी त्यांचा अस्थिदेह पुण्यास आणण्यासारखा होता. म्हणून निदान तो तरी सत्कारसमारंभानें आणवा असें पुणेकरांनीं ठरविलें. मंगळवारी रात्रीं मुंबईहून टिळकांच्या अस्थि घेऊन त्यांच्या चिरंजीवानीं निघावें व बुधवारीं सकाळीं ७॥ वाजतां पुण्यास येऊन पोंचावें अशी प्रथम योजना होती, व त्याप्रमाणें सर्व तयारीहि झाली. पण दरम्यान एका टिळकभक्ताला असें वाटले कीं, या असामान्य मनुष्याच्या अस्थि प्रथम पुण्यास यावयाच्या तर त्या असामान्य रीतीनेंच आल्या पाहिजेत. म्हणून त्यानें पुणें स्टेशनावरून मुंबई येथील बोरीबंदरच्या स्टेशनच्या अधिकाऱ्यांशीं बोलणें करून स्पेशल ट्रेनची व्यवस्था केली. ही ट्रेन ७॥ ऐवजीं ८॥ ला पुण्यास पोंचावयाची इतकाच वेळेचा फरक होता. त्याप्रमाणें रात्रीं ३ वाजतां अस्थि घेऊन मंडळी स्पेशल गाडींत बसून निघाली.

ही स्पेशल ट्रेनची व्यवस्था परस्पर झाल्यामुळें पुण्यांतील समारंभाच्या व्यवस्थापकांस माहीत नव्हती ती दुसरे दिवशीं सकाळीं त्यांना स्टेशनवर समजली. दरम्यान ७॥ ला गाडी येणार या अदमासानें मंडळी जमूं लागली. रा. केळकर व ना. बेळवी यांना स्पेशल ट्रेनची नक्की वातमी रात्रीं एक वाजतां कळली होती.

म्हणून ते मोटारीनें डॉ. लोहोकरे यासह खडकीस स्पेशल स्ट्रेनला सामोरे जाऊन तींत बसून पुण्यास आले. स्पेशलगाडी 'साइडिंग'ला येतांच सर्व मंडळींनीं टिळकांच्या नांवाचा जयघोष करून अस्थींना सलामी दिली. अस्थि लहानशा चंदनी नक्षीदार पेटींत घातलेल्या असून फुलांच्या माळांनीं ही पेटी वेष्टिली होती. साईडिंगपासून थोड्या अंतरावर एका मोठ्या चारचाकी रथावर पालखी ठेवली होती तींत ही पेटी ठेवण्यांत आली. रथाला खांदे देऊन स्वयंसेवक मंडळी तो ओढीत होती. रथावर चढून पालखीमागें उभे राहून लोकमान्यांचे दोघे चिरंजीव पालखीवर चवऱ्या वारूं लागले. पालखीवर उंच काठीची मोठी रेशमी डेरेदार छत्री उभी केलेली होती. दोहों बाजूंस सुगंधी उदबत्त्यांचे गुच्छ धुपत होतें. रथाचें मागेंपुढें रंगण करून त्यांत प्रमुख मंडळींना घेण्यांत आलें होतें. रथामागोमाग कांहीं स्त्रिया चालत होत्या. रथापुढें रंगणापलीकडे भजनी दिंड्या रांगेनें उभ्या असून त्यांचे टाळ व मृदंग सारखे तालावर वाजत होते.

अशा थाटानें ही मिरवणूक सुमारें ९ वाजण्याचे आधीं स्टेशनच्या पश्चिमटोंकापासून निघाली ती संथपणें चालत असून इस्पितळाजवळ येण्यासच ९॥। झाले. मिरवणूक जसजशी पुढें जाऊं लागली तसतशी माणसांची गर्दीहि अधिक होऊं लागली, यामुळें उशीर होतो असें वाटलें तरी पाऊल मात्र जलद पडेना. रास्त्यांचे वाड्यापाशीं येण्यालाच १०॥। झाले, रविवार गांठण्यास १२ झाले, बुधवारांत येण्यास पाऊण वाजला आणि पालखी गायकवाडवाड्यांत शिरून अस्थिकरंडक टिळकांच्या माडीवर नेऊन ठेवून मंडळी परत फिरण्यास १॥ वाजून गेला.

सर्व वाटभर अस्थींचा सत्कार सुरू होता. ठिकाठिकाणीं फुलांचे हार समर्पण करण्यांत येत होते. स्टेशन ते गायकवाडवाडा या दोन मैल लांबीच्या हद्दींतील प्रत्येक घराची प्रत्येक खिडकी व दरवाजा स्त्रीपुरुषांनीं, विशेषतः स्त्रियांनीं ठेचून भरला होता. रस्त्याप्रमाणें सज्जांवर पत्र्याच्या छपरांवर माणसाला माणूस भिडलें होतें. स्त्रिया प्रायः पालखीसमोरून जातांना भाविकपणानें नमस्कार करीत. कांहीं वरून फुलेंहि फेकीत. कित्येक स्त्रिया डोळ्याचें पाणी पदरानें पुशीत होत्या. दिंड्यांचे टाळकरी एकसारखें भजन करीत होते. नुसता 'रामकृष्णहरि' किंवा 'ज्ञानदेवतुकाराम' हा पाठ चालू असे तोंपर्यंत ते झराझर पाऊल उचलीत. पण अभंगास सुरुवात झाली कीं, तो संपेपर्यंत मुक्कामच पडावा व मागील गर्दी येऊन अंगाशीं भिडून रेटारेटी व्हावी असें सुरू होतें. मिरवणुकींतील पुढारीपणा सर्वस्वी भजनी मंडळीकडे होता. पाऊल सावकाश अगर जलद उचलावें अगर मुक्काम व्हावा हा सर्व त्यांचा अधिकार. भजनाच्या शब्दांत सर्व प्रकारचे जयजयकार मिसळून दुमदुमत होते. सर्व नवेजुने साधु, सर्व जुनेनवे राष्ट्रभक्त, वंदेमातरम् सारखे जयशब्द आणि खुद्द टिळकांचीं नांवें व

पदव्या यांचीं पदपरिवर्तनें यांपैकीं एकनाएक उच्चारल्याशिवाय एक क्षणहि जात नव्हता. नाहीं म्हणावयाला 'दारूवाला पुला'च्या मशिदीसमोर भजनी वाद्यें बंद करण्यांत आलीं आणि ' हिंदुमुसलमान की जय ' असा एकच जयघोष करण्यांत आला.

अशा गर्दीचे समारंभ खुद्द टिळकांच्यासंबंधानेंच पूर्वीं एकदोन वेळा पुण्यांत पाहावयास सांपडले होते. पण आजची गर्दी विशेष भासली. मधून जाण्यायेण्याला रीघ नव्हती. पावलामागें पाऊल लागल्यामुळें आपल्या टाचेलाच बोटें उलटीं फुटलीं आहेत कीं काय असें प्रत्येकास वाटे. ' मुंगीच्या पायानें चालणें ' ही म्हण माणसांनीं आपल्या चालीनें खरी करून दाखविली. चार वेळां पावसानें रस्ता भिजला व चार वेळ ताबडतोब मनुष्यांच्या पावलांनीं तो कोरडा केला गेला. पुढच्या पायांनीं चिखल तुडवून मागच्या पायाकरितां पायघडी एकसारखी तयार होत होती. आजचा समारंभ मृताचा सन्मान करण्याचा असल्यामुळें सर्व लोक बोडके व अनवाणी चालले होते. या दृष्टीनें आजचा मेळा कांहीं चत्कारिकच दिसत होता. अस्थिरथ पुणें स्टेशनावरून गायकवाड—वाड्यांत पोंचण्यास सुमारें पांच तास लागले वाड्यांत गर्दी इतकी झाली कीं, पाय ठेवण्यास जागा नव्हती. खुद्द अस्थिकरंडक नेण्यालाहि वाव मिळेना. शेवटीं आडबाजूनें कसा तरी तो एका माडीवरून दुसऱ्या माडीवर नेण्यांत आला. शेवटचें दर्शन ह्मणून लोक जिन्याच्या कठड्यांवरून व ग्यालरीच्या खांबांवरून, तसेंच एकमेकांच्या खांद्यावर उभें राहून चढूं लागले. शेवटीं लोकमान्य ज्या ग्यालरींत खुर्ची टाकून नेहमीं बसत तेथें उभें राहून उंच हात करून अस्थि—करंडकाचें दर्शन दिल्यावर सर्वांनीं नमस्कार करून निरोप घेतला.

सदर लोकोत्तर समारंभांत नांव ठेवण्यासारख्या ज्या थोड्या गोष्टी घडल्या त्यासंबंधाचा निषेध आम्ही दुसरीकडे केलाच आहे. तथापि हे अपवाद वगळले असतां एकंदर समारंभ गंभीरपणानें व मनावर परिणामकारक रीतीनें पार पडला यांत शंका नाहीं.

# लो. टिळकांचें स्मारक.

केसरी ता. १७ ऑगष्ट १२९०

**' अतो न रोदितव्यं हि क्रियाः कार्याः स्वशक्तितः '**

—याज्ञवल्क्य.

प्रायश्चित्ताध्यायाच्या पहिल्या प्रकरणांत स्मृतिकार याज्ञवल्क्य यानें मृतासंबधानें अशौचनिर्वापनप्रकार कथन केला आहे. त्यांत गृहस्थाश्रमी लोकांनीं मृताला उदकदान देईपर्यंत शोकनिरसनार्थ पुरातन इतिहास वगैरे श्रवण करण्याचा उपदेश केला आहे. उद्देश हा कीं, मनुष्याचें नश्वरत्व लक्षांत येऊन मृताविषयीं त्यांना दुःख आवरतां यावें. ' गंत्री वसुमती नाशं उदधिर्दैवतानि च । फेनप्रख्यः कथं नाशं मर्त्यलोका न यास्यति' ॥ सर्व पृथ्वी नाश पावणारी आहे, तसेंच समुद्र व दैवतें सुद्धां. मग केवळ फेसाची उपमा शोभेल असा जो मर्त्यलोक त्यांतील मनुष्यदेह नाश पावला तर त्यांत आश्चर्य तें काय' ? असा युक्तिवाद करून नंतर मृताच्या आप्तांनां यथाशक्ति क्रिया करण्याचा उपदेश केला आहे अर्थात या क्रिया म्हणजे श्राद्धदानादि होत. तथापि क्रिया या शब्दाचा दुसराहि एक अर्थ विहित आहे. व आज आम्हांला त्यासंबंधानेंच लिहावयाचें आहे. धार्मिक आचार या नात्यानें श्राद्धदानादि क्रिया करणें अवश्य आहेच. पण तेवढ्यानें आपलाच काय पण मृताच्या आत्म्याचाहि निर्वाह होऊं शकत नाहीं. पुरातन इतिहास वगैरेच्या श्रवणानें क्षणभर वैराग्यबुद्धि उत्पन्न होऊं शकते; कारण त्यावरून सर्वभक्षक कालाचें प्राबल्य व मनुष्याचा कमकुवतपणा दिसून येतो. पण इतिहासाच्या अध्ययनाचा उपयोग विधायक रीतीनेंहि करितां येण्यासारखा आहे. इतिहासांत केवळ निवृत्तिचोदना म्हणजे कर्मत्यागाचाच उपदेश आहे असें ह्मणतां येत नाहीं. फार काय ज्या अशौच—प्रकरणांत श्राद्धादि क्रिया सांगितल्या आहेत त्यांचा उद्देशहि गृहस्थाश्रमी मनुष्याच्या नित्य नैमित्तिक व्यवहारांत कुटुंबामध्यें घडलेल्या मृत्युमुळें जो व्यत्यय येतो तो दूर करून फिरून सर्व व्यवहार पूर्ववत चालू करणें हाच आहे. ह्मणून अशौचाचा शेवट शुभ कृत्यांनींच करावा असें सांगितलें आहे. मृताचाहि हेतु आपल्यामागें सर्व व्यवहार नीट सुरळीत चालावें असाच असतो. ' आप मेलें जग बुडालें ' असें कोणीही सुज्ञ मनुष्य म्हणत नाहीं. आपण मेलों तरी हरकत नाहीं, पण जग बुडतां कामा नये, त्यानें चाललेंच पाहिजे, असें कोणीहि झाला तरी समंजस मनुष्य म्हणतो. येवढेंच नव्हे तर आपल्या कांहीं वासना आपल्या हयातींत पूर्ण झाल्या नसतील त्या आपल्या पश्चात् तरी पूर्ण व्हाव्या अशी इच्छा तो धारण करितो; व त्याच्या इच्छा शक्य तितक्या पूर्ण कराव्या असा त्याच्या मागें उरणाऱ्या त्याच्या आप्तांचाहि प्रयत्न असतो, निदान तसा तो असला पाहिजे.

लो. टिळकांचा आप्तवर्ग सर्व देशभरच काय पण परदेशांतहि पसरलेला आहे. त्यांत अधिकारभेदाप्रमाणें सपिंड समानोदक वगैरे सर्व कांहीं आहेत. त्या सर्वांनीं त्यांच्या मृत्युबद्दल कळकळीचें दुःख प्रदर्शित केलें येवढेंच नव्हे तर ज्या हजारों लोकांनां पुण्यास ओंकारेश्वरावर येऊन टिळकांना तिलांजली देतां आली नाहीं त्यांनीं आपल्या खऱ्याखुऱ्या अश्रूंनीं त्यांनां उदकदान केलें. पण त्या उदकदानानंतरहि क्रिया करावयाच्या उरतात, व त्या कोणत्या रीतीनें कराव्या याला मात्र एकच नियम नसल्यानें हल्लीं स्मारकाच्या रूपानें तो विषय पुढें आलेला आहे असेंच आम्हीं समजतों क्रियांचा उपयोग मृताला परलोकांत होणारा असतो ही धार्मिक कल्पना होय. पण लो. टिळकांचें सुकृतहि इतकें खंबीर व विपुल होतें कीं, त्यांच्या आत्म्याला उत्तम गति मिळण्याला मागें राहणारांच्या आचारविधीची गरज नाहीं. शिवाय टिळकांची जगाला आजवर जी माहिती होती तिजवरून पाहतां त्यांचा आत्मा स्वतः या वैयक्तिक मुक्तीपेक्षां हिंदुस्थानची पराधीनतेपासून मुक्ति कशी होईल याच्याच विचारांत गुंतला असला पाहिजे. टिळकांच्या स्मारकाचा उपयोग स्वतः टिळकांना काय होणार ? भूलोकावर त्यांची कोट्यावधि रुपयांचीं स्मारकें होतील पण वैतरणी नदी ओलांडण्याला परलोकच्या चलनी नाण्याची जर एकच दिडकी पडत असेल तरीहि या सर्व स्मारकांची किंमत त्या दिडकीच्या मोबदल्यादाखल तेथें स्वीकारली जाणार नाहीं. त्या नदीवरचा होडीवाला उतारूंच्या सुकृताशिवाय दुसरें कांहींच भाडें घेत नाहीं; तें घेण्याला त्याला वरचा हुकूम नाहीं. टिळक जर वैतरणी पार होणार असतील तर ते स्वतः त्यांच्या त्यांनीं जोडलेल्या पुण्यांशाच्या जोरावरच होतील. त्यांनीं इहलोकीं आपलें चारित्र्य जर निर्मळ ठेवलें नसतें किंवा परोपकार केला नसतां तर इकडे त्यांचीं इतकीं स्मारकें होत असतांना त्यांना वैतरणी नदीच्या ऐलतीरावरच कुडकुडत बसावें लागलें असतें. पण हल्लीं त्या नदीच्या पैलतीराला गेल्यावर ते तुमच्या स्मारकांकडे ढुंकून तरी बघतील कीं नाहीं याची शंकाच आहे.

तुम्हीं कराल त्या स्मारकांचा उपयोग तुम्हांलाच होणार आहे. बुभुक्षित काळाच्या हातून आपला सर्व नाश होऊं नये म्हणून योजण्याचा एकच उपाय हाच स्मारकाचा अर्थ होय. काळाला टिळकांचा देह नेतां आला, पण एकपक्षीं त्याला टिळकांचा आत्मा जसा टिळकांकडेच ठेवावा लागला, काढून घेतां आला नाहीं, त्याप्रमाणें आम्हा त्यांच्या भक्तांचें स्मरणहि काळाला हिरावून नेतां येत नाहीं. हें स्मरण आमचें आम्हांजवळ नित्य राहावें म्हणून तें गुंतवून ठेवण्याकरितां स्मारकें करावयाचीं. टिळकांच्या आठवणीचा हा मौल्यवान् निधी सुरक्षित रहावा याकरितां स्मारकांचे डांब रोवावयाचे, स्मारकाच्या भिंती घालावयाच्या, स्मारकाचे किल्लेकोट उभारावयाचे, स्मारकाच्या तिजोऱ्या बांधावयाच्या, स्मारकाचीं कुलुपें घालावयाचीं व स्मारकाचे जागते पहारेहि ठेवा-

वयाचे. टिळकांचें विस्मरण होण्यापासून झालें तर आमचेंच नुकसान होणार आहे, तें न व्हावें म्हणूनच हीं स्मारकें करावयाचीं. स्मारकाशिवायही स्मरण अखंड राहूं शकतें तर फार चांगलें झालें असतें. पण मनुष्यस्वभावच असा आहे कीं, नुसत्या मनानें त्याला ज्ञान होत नाहीं. कोणत्या तरी एका ज्ञानेंद्रियाचा व बाह्य वस्तूचा संबंध घडावा लागतो. हिंदुस्थानांतील किंवा बाहेरील सर्व मूर्तिपूजा याच तत्वावर अधिष्ठित आहे. मूर्तिपूजक नसणारे लोकहि देवाची प्रत्यक्ष मूर्ति ठेवित नाहींत; तथापि देवाचें देऊळ व देवळांतही एक पवित्र अशी जागा राखून ठेवतातच. सर्व विश्वांत सबाह्याभ्यंतर भरून राहिलेल्या ईश्वराला मूर्तीचें स्वरूप देणें हें जर अप्रयोजकपणाचें तर त्याच कारणाकरितां मंदिर किंवा देवघर बांधणें हेंहि अयुक्तच ठरेल. मूर्तिपूजेचा उपहास करणाऱ्या लोकांनां प्रतिमा किंवा तसबीर मात्र चालते; याचें कारण त्यांनांही झालें तरी स्मरणीय वस्तूंचें स्मरण करण्याचें काम केवळ मनावर विसंबून चालत नाहीं. फक्त काय ती योग्याच्याच मनाला इंद्रियपदार्थसंनिकर्षाची गरज नसते. पण मनुष्यसृष्टींत असे योगी किती असूं शकतात ? जी गोष्ट ईश्वराची तीच मानवी उपास्याची. प्रेमविषयाचें स्मरण हें ब्रह्माप्रमाणें अव्यक्त म्हणजे निराकार आहे. पण तें तसें आहे म्हणूनच छांदोग्योपनिषदांत सांगितल्याप्रमाणें ब्रह्मासारखें तें स्मरणहि " प्राण, शरीर, सत्यसंकल्प, सर्व गंध, सर्व रस, सर्व कर्म याप्रमाणें मनाला गोचर होणाऱ्या गुणांनीं युक्त पाहिजे. " पण स्मरणविषय सगुण किंवा साकार केल्यानें केवळ स्मरणशक्तीला मदत होते इतकेंच नाहीं तर योजनाकार कुशल भेटल्यास त्याच गोष्टीपासून स्मारक करणारास व्यावहारिक उपयोगहि होऊं शकतो. घरांत देवघर केल्यानें ईश्वरस्मरणाला मदत होतेच; पण त्यामुळें शिवाय अशीहि एक जागा निर्माण होते कीं, तींत आपल्या शक्तीप्रमाणें जास्तींत जास्ती स्वच्छता सुगंध व रुचिरदर्शक वस्तु ठेवल्या जातात; तींत बसल्यानें नित्य व्यवहारव्यतिरिक्त विचार मनांत येतात, निदान ते आणण्याची बुद्धि उत्पन्न होते. हे सर्व उपयोग व्यावहारिक म्हटलें तरी महत्वाचे आहेत. तसेंच देवळांचा उपयोग व्यवहारांत समाजाला किती होऊं शकतो हेंहि आपण पाहतों.

दैविक उपास्यांच्या उपासनेची जर ही गोष्ट तर लौकिक उपास्यांच्या उपासनेपासून सर्वच उपयोग व्यावहारिक असणें यांत कांहींच आश्चर्य नाहीं व याच दृष्टीनें लो. टिळकांच्या स्मारकाचा विचार आपणांस कर्तव्य आहे. या स्मारकाविषयीं किती निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळ्या रीतीनें विचार केला आहे हें आजच्या अंकांत पृष्ठ २ वर 'स्मारकासंबंधीं सूचना' या मथळ्याखालीं दिलेल्या मजकुरावरून लक्षांत येईलच. त्यांत उल्लेखिलेल्या पत्रांखेरीज आणखी कित्येक पत्रें आमचेकडे आलेलीं आहेत. पण त्या सूचना वैयक्तिक असून स्मारक या

शब्दास अनुरूप नसल्यानें त्यांचा उल्लेख केला नाहीं. त्यांपैकीं एकांत असें म्हटलें होतें कीं, टिळकांच्या स्मारकाचें वैशिष्ट्य कांहीं एक स्मारक न करण्यानेंच राखावें! या कूट वाक्याचा अर्थ हाच कीं, टिळक व इतर लोक यांच्यांत फरक आहे; अर्थात् तो फरक राहण्याकरितां, इतरांचीं स्मारकें होतात म्हणूनच, टिळकांचें स्मारक करूं नये. म्हणजे स्मारक नसतां टिळकांचें स्मरण होणें यांतच त्यांची लोकोत्तरता दिसून येईल. हा युक्तिवाद मोठा धीटपणाचा असून त्यांत मार्मिकपणाहि आहे. तथापि लोकांना तो पटेल असें वाटत नाहीं. आम्ही प्रसिद्ध न केलेली दुसरी सूचना अशा शब्दांनीं आम्हांकडे पाठविण्यांत आली आहे— "टिळकांचें स्मारक जें पूर्ण हिंदी स्वराज्य आहे तें मिळवावें म्हणजे त्यांचें स्मारक सर्वत्र अखंड राहील." ही सूचनाहि धाडसी व खोंचदार आहे. पण पहिल्या सूचनेप्रमाणेंच ती तूर्त अव्यवहार्य आहे. रोग्याला पथ्य सांगतांना 'सगळ्या जन्माचें एकदांच जेऊन घे म्हणजे तुला अपचनाची बाधा होणार नाहीं' असें सांगण्यासारखीच वरील सूचना आहे. अर्थात् टिळकांचें कोणतेंही स्मारक असें मुळींच न करणें व संपूर्ण स्वराज्य मिळवूनच तें करणें हीं दोनहि मतें अंतिम व अव्यवहार्य कोटींचीं दोन टोंकें म्हणून वगळून यांच्या दरम्यान उपयुक्त व विचारार्ह अशा सूचना कोणत्या हें पाहिलें पाहिजे.

वर स्मारकासंबंधीं ज्या सूचनांचा उल्लेख केला त्यांवरून पाहतां सर्व प्रकारचा रुचिभेद त्यांत प्रगट झाला आहे. एकाच साध्याचे साधनमार्ग रुचिवैचित्र्यामुळें किती भिन्न होऊं शकतात हें त्यावरून दिसून येईल. अर्थात् हीं सर्व स्मारकें होण्यास लागण्याइतका पैसा एकत्र असा कोठेंच मिळणार नाहीं, व सर्व हिंदुस्थानांत मिळून तो तितका जमला तरी तो एकाच ठिकाणीं खर्च होणें शक्यहि नाहीं. यामुळें सर्वांचें मिळून केवळ एकटें एकच स्मारक करण्याची कल्पना त्याज्यच ठरते. अर्थात् अनेक स्थळीं हीं स्मारकें झालीं पाहिजेत; व ज्या ठिकाणीं जें स्मारक होणार तें त्या ठिकाणच्या लोकांच्या पैशानें व त्यांच्या आवडीप्रमाणेंच होणें शक्य व इष्टहि आहे. आम्हांकडे आलेल्या कित्येक पत्रांवरून पाहतां बहुतेक प्रत्येक मोठा व चळवळीचा गाव आपापलें वेगळें टिळकांचें स्मारक करण्यास उद्युक्त झालेला दिसतो पण असें झालें तरी सामुदायिक स्मारक होणें इष्ट नाहीं असें मात्र नाहीं. कांहीं गोष्टी व्यक्तिशः गांवांना आपल्या द्रव्यबलावर करितां येतील तर कांहीं संघशक्तीच्या जोरानेंच साध्य होतील. आम्हांस तर असें वाटतें कीं, टिळकांचें स्मारक प्रत्येक खेडेगांवीं होणें जसें योग्य आहे तसेंच सर्व हिंदुस्थानचें मिळून होणेंहि शक्य आहे. खेडेगांवांत अर्थात् वर्गणी थोडीच जमणार; पण ती कितीहि कमी जमली तरी टिळकांच्या नांवाची तीन खणाची चावडी किंवा धर्मशाळा बांधण्यास लागण्याइतकी सहज जमेल; व प्रत्येक खेडेगांवीं सार्वजनिक चर्चा म्हणून जी जी व्हावयाची ती ती सर्व "टिळ-

कांच्या चावडींत" बसून होण्याचा प्रघात पडला तर तो अत्यंत इष्ट आहे. टिळक हे मोठ्या शहरांत राहणारे होते तरी त्यांचें अंतरंग शहरवासीयांपेक्षां खेडवळ लोकांच्या चित्तवृत्तिशींच अधिक तादात्म्य पावत होतें ही गोष्ट प्रसिद्ध आहे, म्हणून यापुढें गांवोगांव 'टिळक चावडींत' गांवचा सार्वजनिक कारभार चालूं लागेल तर तें टिळकांचें एक अपूर्व पण अत्यंत उचित असें स्मारक होईल. खेडेगांव गरीब असलें तरी त्यांत एखादें लहानसें देऊळ असतेंच. म्हणून यापुढें प्रत्येक गांवांत जसें एकेक रामसेवक बलभीमाचें तसेंच देशसेवक बलवंताचें म्हणजे टिळकांचें देऊळ असण्यास काय हरकत ? या देवळाला धार्मिक स्वरूप मात्र कांहींच असूं नये, फक्त जिवंतपणीं त्यांना नमस्कार करण्याकरितां लोक जसे जात तसेच मृत्यूनंतर त्यांना केवळ बंधुभावानें (सेव्यसेवक भावानें नव्हे) नमस्कार (वंदन नव्हे) करण्याला जाण्याची जनतेला प्रत्येक खेडोखेडीं देखील सोय कां निर्माण होऊं नये ?

खेडी सोडून शहरांकडे आपण वळलों असतां तेथें या स्मारकाचें याहून वेगळें स्वरूप दृग्गोचर व्हावें लागेल. शहरगांवची चळवळ जशी अधिक संघटित तसाच त्यांजवळ पैसाही अधिक, म्हणून त्यांना टिळकांच्या स्मरणाची साधनेंहि अधिक मोठीं व उपयुक्त निर्माण करतां येतील. आम्हांकडे आलेल्या पत्रांवरून पहातां एखादें सभागृह व त्याला जोडून एखादें वाचनालय अशा प्रकारचें स्मारक प्रायः प्रत्येक मोठ्या गांवीं होईल असा अंदाज आहे. स्वतः टिळकांना जाहीर सभा या लोकशिक्षणाचें साधन म्हणून अत्यंत प्रिय होत्या; व सामुदायिक चळवळीचें या दिवसांतलें एक अवश्यक साधन या नात्यानें लोकांनाहि स्मारकाचा हा प्रकार सहजच प्रिय वाटेल. मुंबईसारख्या राजधानीच्या शहराकडे पाहिले तरी त्यांनाहि जाहीरसभांकरितां सोईचीं सभागृहें व प्रशस्त मैदानें यांची उणीव अद्यापिहि भासतच आहे, व टिळकांच्या स्मारकाच्या निमित्तानें त्यांना ती दूर करतां आली तर हवीच आहे. उपयुक्ततेच्या दृष्टीनें वाचनालयें ही सभागृहां-इतकींच जरूर आहेत. अर्थात यापैकीं जेथें जें नसेल तेथें तें करावें व उणीव भरून काढावी हें सांगणें नकोच. याशिवाय शिक्षणसंस्था, औद्योगिक संस्था व कारखानें, बोर्डिंगें, 'कॅनव्हासिंग ब्युरो', 'इन्फरमेशनब्यूरो', रात्रीच्या शाळा, ज्योतिष शाळा, गोरक्षण, मतदारसंघ संस्था, शिष्यवृत्त्या, वगैरे अनेक सूचना झाल्या आहेत. त्याच जातीच्या पण विशेष व्यापक सूचना म्हटल्या म्हणजे टिळकांच्या नांवानें एखादी युनिव्हर्सिटी सर्व काल व सार्वत्रिक राजकीय चळवळ चालविणारी वर्तमानपत्रें, विद्यार्थीगण, प्रौढ प्रचारक, आजन्म स्वयंसे-वक वगैरेंचा उपयोग करून घेणाऱ्या सोसायट्या काढणें या होत. यांत आवड निवड करण्यासारखें सरसनिरस आमच्या मतें कांहींच नाहीं. या सर्वच गोष्टी चांगल्या आहेत, पण त्या सर्व किंबहुना त्यांतील एखादीहि अस्तित्वांत येऊन

टिकाऊ होणें हें राजधानीसारख्या एकट्या शहराच्याहि शक्तीतलें काम आहे असें वाटत नाहीं. फार झालें तर प्रत्येक प्रांत वरील कल्पनापैकीं एखादी मोठी कल्पना शक्य करून दाखवूं शकेल. त्या कामीं सर्व प्रांताचें द्रव्यबल एकवटावें लागेल.

मात्र या बाबतींत एक गोष्ट स्पष्टपणें सांगावीशी वाटते कीं, हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागणें हें सद्बुद्धीनें घडणार असलें तरी या प्रसंगीं इष्ट नाहीं. जसें एका बाजूस एका व्यक्तीला कितीहि हौस असली तरी एकट्याला टिळकांचें स्मारक करतां येणार नाहीं, तसेंच दुसरे पक्षीं सर्व प्रांताचें किंवा देशाचें मिळून स्मारक करण्याचें कामीं कोणी पुढारीपण घेईल, मग तो वर्गणी मागेल, मग ती आपण देऊं, व मग तें स्मारक होईल असा घोळ मनाशीं घालून बसू नये. असें करणें म्हणजे आळसाला व त्याचे पाठोपाठ अपयशाला निमंत्रण देण्यासारखें आहे. म्हणून एकीकडे व्यक्ति व एकीकडे सर्व देश या दोनही कल्पना तूर्त टाकून देऊन प्रत्येक लहानमोठ्या गांवानें आपल्या स्फूर्तीनें व स्वावलंबनानें, आपल्या रुचीप्रमाणें व जरूरीप्रमाणें जें स्मारक करतां येईल तें एकदम करून टाकून मोकळें व्हावें हाच उत्तम मार्ग. ‘बडा देख कर छोटा गमाया’ असें होऊं न देण्याची प्रत्येक गांवानें खबरदारी घ्यावी. पुढेंमागें मोठें स्मारक होणार आहे म्हणून आज धाकट्या स्मारकाला शक्य तीहि वर्गणी देण्याचें थांबवा असा बुद्धिभेद करणारा मनुष्य स्मारकाचा शत्रु आहे, किंवा त्याला स्वतःला स्वार्थत्यागाची खरी बुद्धि नसल्यानें तो आहली कृपणता सार्वजनिक औदासीन्याच्या आच्छादनाखालीं झांकून ठेवूं पहात आहे असें स्पष्ट ओळखावें. आतां प्रत्येक गांवानें आपल्या स्वतःपुरतें स्मारक करितांना दूरदृष्टि व व्यापक बुद्धि ठेवून प्रत्यक्ष जमलेल्या पैशांतला कांहीं अंश मोठ्या स्मारकाकरितां म्हणून वेळींच बाजूस काढून ठेविला तर तें अर्थात योग्य होईल; किंबहुना तसें करावेंहि. परंतु वर्गणी जमविण्यास प्रारंभ करण्याचें अगर शक्य तितके मोठे आंकडे वसूल करण्याचें काम ‘प्रचंड’ स्मारकाच्या भ्रांतीनें किंवा आशेवर लांबणीवर टाकू नये. ‘त्वरित दान महापुण्य’ ही म्हण या कामीं डोळ्यापुढें ठेवावी. मोठें स्मारक निघेल तेव्हां त्याला योग्य अशा वर्गण्याहि जमतील. मोठ्या वर्गण्याशिवाय मोठें स्मारक होऊं शकणार नाहीं, मोठ्या वर्गण्या फक्त श्रीमंतच देऊं शकतात, व श्रीमंत लोकांच्या मनांत सद्बुद्धि असेल तर असल्या आवडत्या कामाकरितां खिशांतून एकदी मूठ भरून काढावयाची ती दोनदां भरून काढणें त्यांना जड जाणार नाहीं. श्रीमंती व देणगी यांचें प्रमाण पाहिलें तर खरोखर गरीबच अधिक देतात, व श्रीमंत लोकांचा आंकडा मोठा दिसला तरी वस्तुतः ते अंगचोरपणाच करतात हें सप्रमाण सिद्ध करून दाखवितां येईल. म्हणून या प्रसंगीं गरीब, मध्यम व श्रीमंत या सर्वांनीं मिळून पहिल्या झपाट्यासरशीं स्थानिक स्मारकाचें

काम हौसनें व तडफेनें उरकून घ्यावें अशी आमची त्यांस आग्रहाची विनंति आहे. काल हा जसा चांगल्या व्यक्तींना ओढून नेतो, तसाच चांगल्या कल्पना निष्फळ करण्यालाहि तो केव्हां केव्हां कारण होतो असा अनुभव आहे. व जी कल्पना एकदां जन्मून तिच्या पायावरून वारें गेलें ती फिरून जन्मांत पायावर धडधाकटपणें उभी राहूं शकणार नाहीं हें लक्षांत ठेवावें. स्मारकाची मोठी कल्पना बाजूस टाकून तिचें नांवहि आज घेऊं नये असें आम्हीं म्हणत नाहीं, पण वर्गणी जमविण्याला अशानें जो विलंब होतो तो होऊं देऊं नये एवढेंच आमचें सुचविणें आहे.

स्मारकासंबंधीं सर्वसामान्य विचार आम्हीं वर दिले ते बहुधा सर्वांस ग्राह्य वाटतील असा आम्हांस भरंवसा आहे. तथापि स्वतः आमची आवड काय असें जर सांगावयाचें तर मात्र आम्हीं असें स्पष्ट म्हणूं कीं, लो. टिळकांचें कोणतेंही स्मारक स्वतः त्यांच्यासारखेंच असावें, म्हणजे त्यांत दिखाऊपणा, भपका वगैरे नसून साधेपणा व जिवंतपणाची चिकाटी हींच त्यांत शक्य तितकी अनुभवास यावीं. मूर्तिपूजेचा प्रकार शक्य तितका कमी करावा, व पुतळे वगैरेसारख्या स्मारकांवर खर्च न करितां उपयुक्ततेकडेच विशेष लक्ष द्यावें. टिळकांच्या नांवानें एखादें सभागृह बांधलें तर त्यांच्या प्रत्यक्ष दर्शनाकरितां म्हणून एखादी तसबीर किंवा लहानसा बस्ट वगैरे ठेवणें हें सदभिरुचीस सोडून होणार नाहीं, पण जमलेली सर्व वर्गणी एखाद्या मोठ्या पुतळ्यावर खर्च करून अचेतन स्थितींत त्यांच्या डोक्यावर कावळ्यांनीं बसण्याचा प्रसंग प्राप्त होऊं देऊं नये. टिळकांनीं जिवंतपणीं जे टाकींचे घाव सोसले व त्यांना जो अध्यात्मिक देवपणा आला तेवढा पुरे आहे. त्यांच्या नांवानें दगड फोडण्याचा प्रसंग मित्रांनीं स्वेच्छेनें स्वतःवर आणणें यांत फारसें स्वारस्य नाहीं. असा उपदेश केल्यामुळें देशी शिल्पकार कदाचित् आमच्यावर रागावतील. परंतु या प्रसंगीं आम्हीं शिल्पकलेचे भोक्ते या नात्यानें लिहीत नसून टिळकांचें योग्य स्मारक कोणचें या दृष्टीनेंच लिहीत आहोंत. त्यांच्या स्मारकांत त्यांनीं जन्मभर केलेल्या देशसेवेच्या उद्योगांनें येणारा जिवंतपणा, किंवा निदान त्या जिवंतपणला पोषक अशी उपयुक्त साधनसामुग्री, याच गोष्टीचा मुख्यतः समावेश व्हावा आणि शेंकडा निदान नव्वद रुपये तरी बिनदिखाऊ अशा कामावरच खर्च व्हावें असें आम्हांस वाटतें तें स्पष्टपणें लिहिलें आहे.

याहून कमी वादग्रस्त व निराळ्या प्रकारच्या किरकोळ सूचना आहेत त्यांचा विचार करीत बसण्याचें कारण नाहीं. खुद्द केसरीच्या मुखपृष्ठावर लोकमान्य टिळक यांचें चित्र निरंतर कसें रहावें, अवतरण श्लोक कोणता घालावा, वर्तमान पत्रांत फरक कोणते करावे सूचना आमच्याकडे आल्या आहेत व त्यांचाहि योग्य साभार स्वीकार करून आम्हांस योग्य दिसेल तें करूंहि; तसेंच लो. टिळकांचें

चरित्र प्रसिद्ध होण्याविषयीं आम्हांकडे अनेक सूचना आल्या आहेत व त्यांचाहि योग्य विचार झाल्याचें आजच दुसरीकडे दिलेल्या पत्रांवरून व बाहेरील जाहिरातीवरून दिसून येईल. टिळकांच्या नांवानें युनिव्हर्सिटी काढण्याची कल्पना चांगली असली तरी तिला लागणाऱ्या प्रचंड द्रव्यबलाच्या अडचणीमुळें ती तूर्त शक्य होईल असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि टिळकांच्या नांवानें सार्वजनिक शिक्षण देण्याकरितां एखादी 'टिळक मास एज्युकेशन सोसायटी' अशासारखी संस्था निघाल्यास ती आज युनिव्हर्सिटीपेक्षांहि अधिक ग्राह्य व शक्यहि वाटते. तसेंच सर्व हिंदुस्थानाकरितां म्हणून टिळकांच्या नांवानें राजकीय चळवळ करणारी संस्था असावी ही सूचनाहि उत्कृष्ट आहे, व सुदैवानें टिळकांनीं स्थापिलेल्या हिंदी स्वराज्यसंघास जन्मभर काम करणारे स्वार्थत्यागी लोक येऊन मिळतील तर तीहि कल्पना शक्यकोटींतली आहे. मात्र या कामीं हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांतील पुढाऱ्यांचें आज तपशीलवार एकमत होईल किंवा तें आज झालें तरी यापुढें निरंतर टिकेल अशी खात्री वाटत नाहीं. याकरितां कर्नाटक, महाराष्ट्र, वऱ्हाड व नागपूर इतक्या प्रांतांनीं मिळून जर अशी सोसायटी काढण्याचें मनांत आणलें तर तें शक्य आहे, व या दृष्टीनें या चारहि उपप्रांतांतल्या पुढाऱ्यांनीं विचार करावा. या सर्वांना प्रिय असे लो. टिळक गेले तरी त्यांचा परस्परांतील बंधुभाव जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत वरील उपक्रमास अडचण पडणार नाहीं. औद्योगिक बाबतींत एखाद्या कारखानदारानें आपल्या कारखान्यास टिळकांचें नांव दिलें तर तें शक्य आहे. पण त्यानें मोठीशी औद्योगिक प्रगति होऊन टिळकांचें बडें स्मारक झालें असें म्हणतां येणार नाहीं. पण टिळकांनीं वाढविलेल्या पैसाफंडाची कल्पना त्यांच्याच नांवानें जर सर्व प्रांतांतून पसरली गेली तर, मोठ्या भांडवलवाल्यांच्या नव्हे, पण सामान्य जनतेच्या दृष्टीनें टिळकांच्या औद्योगिक स्मारकाचा चांगला फायदा होईल.

शेवटीं फक्त एकाच सूचनेसंबंधानें लिहावयाचें. ही सूचना अत्यंत धाडसी आहे. यांत शंका नाहीं. ती टिळकांच्या नांवचा 'शक' चालू करण्याची ! टिळकांना Uncrowned King म्हणजे 'अनभिषिक्त राजे' अशी रूपकात्मक पदवी पुष्कळ समंजसहि लोक देतात ही गोष्ट खरी तथापि विक्रम व शालिवाहन यांचे नांव बुडवून टिळकांचा शक चालू करावा या सूचनेंतील उन्मत्तपणाचा दर्प इतका निंद्य आहे कीं, त्याचा अंगीकार कोणत्याहि खऱ्या टिळकभक्तानें क्षणभरहि करूं नये. टिळक हे प्राचीनांचें नांव बुडविण्याकरितां जन्मास आले नव्हते हें एकच उत्तर वरील सूचनेचा विध्वंस करण्यास पुरेसें आहे. तथापि ही सूचना करणारावर इतका गहजब करूनहि त्यांचें किंचित समाधान होण्यासारखें आह्मांस कांहीं म्हणतां येईल व तें मात्र आम्हीं खुल्या दिलानें म्हणतों; लो. टिळकांहून अधिक विद्वान ज्योतिषि अनेक आहेत; पण पंचांग-

शोधनाच्या बाबतींत केवळ त्यांच्यामुळें आज इतकें तरी यश लाभलें आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन आम्हीं असें सुचवितों कीं, नवीन ' करण ग्रंथ ' होऊन त्याप्रमाणें वर्तविल्या जाणाऱ्या पंचांगांत, किंवा इतर पंचांगांतहि, निरनिराळ्या शकांचा उल्लेख करितांना एक नवीन रकाना घालण्यांत यावा, व त्यांतून टिळकांचा हा ' ज्योतिष शक ' प्रवर्तित करण्यांत यावा. आमच्या पंचांगांत खिस्ती व मुसलमानी शक जर देतात तर टिळकांचाहि देण्यास कांहीं हरकत नाहीं. हे परकी संस्थापक मोठे असतील, पण आमच्या पंचांगांत ते कां ? व ते जर चालतात तर टिळक कां चालूं नयेत ? टिळकांनां कोणी राज्यपद दिलें नव्हतें. त्यांना तें कोणी तोंडानें दिलें तर मस्तवाल अधिकारी थट्टा करितांनाच देत. तथापि टिळकासंबंधानें

" नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते वने
विक्रमार्जितसत्वस्य स्वयमेव मृगेंद्रता ॥ "

या अन्योक्तिश्लोकांतील ध्वनि यथार्थ नाहीं असें कोण म्हणेल ? अन्यकालीं आजचा हा ' अनभिषिक्त राजा ' चतुरंगदलबलवान् झाला असता. पण आजच्या दुर्दैवी कालांत जन्मलेला असतांहि पंचांगबलवान् या नात्यानें तरी त्याचा शक ज्योतिषी लोकांनी कृतज्ञताबुद्धीनें चालविण्यांत कांहींच अप्रयोजकपणा नाहीं.

# अधिकाऱ्यांचा टिळकद्वेष

केसरी, ता. १० ऑगस्ट १९२०

लो० टिळक यांच्या मृत्यूच्या दुसऱ्याच दिवशीं पुणें येथें मुंबई-कायदे-कौन्सिल-ची बैठक होती. अर्थात् सर्व हिंदी जगांत दुःखोद्गार निघाले त्याप्रमाणें कायदे-कौन्सिलांतहि निघणें योग्य असें वाटून ना० बेळवी यांनीं दुःखप्रदर्शक ठराव कौन्सिलपुढें मांडण्याविषयीं गव्हर्नरसाहेबांना परवानगी मागितली. पण त्यांनीं ती नाकारली. वास्तविक लो० टिळक हे पूर्वीं दोन वेळां याच कायदे कौन्सिलांत निवडून आलेले सभासद होते. ठरावाची भाषा देखील कोणालाहि संमत होण्या-सारखीच होती. "टिळक हे पूर्वीं या कौन्सिलचे सभासद होते, ते जाडे विद्वान् व ग्रंथकार होते आणि देशांतील फार मोठ्या वर्गाला ते प्रिय व मान्य होते. असा प्रमुख पुरुष मृत्यु पावल्याबद्दल या सभेला वाईट वाटतें." या शब्दांत टिळकांच्या शत्रूंनाहि नाकबूल करितां येईल, असें एक देखील विधान नाहीं. परवानगी मागण्याच्या पत्रावर ना० बेळवी यांजबरोबर इतर सोळा गृहस्थांनीं सह्या केलेल्या असून, ज्यांना टिळकांचे राजकीय प्रतिपक्षी म्हणतां येईल असेहि बरेच लोक त्यांत होते. असें असतां नियमाबरहुकूम ठरावाची आगाऊ नोटीस नाहीं, नोटिशीची मुदत कमी भरते, असलें क्षुद्र कारण लावून गव्हर्नरसाहेबांनीं परवानगी नाकारली ! प्रस्तुतचे गव्हर्नर याहून अधिक उदार दिलाचे असतील अशी आमची समजूत होती. पण संधि येतांच त्यांनीं आपले गुण पाघळले !

ना० बेळवी यांनीं या ठरावाची परवानगी मागण्यांत पुढाकार घेतला होता व ते याकरितां मुद्दाम गव्हर्नरसाहेबांच्या भेटीलाहि गेले होते. अर्थात् त्यांना साहेब-मजकुरांच्या बिनमुरवतखोरपणाचा राग आला, व ते त्यांना उपरोधिक स्वरानें तोंडावर म्हणाले, "आपण म्हणतां तें खरें आहे साहेब; टिळकांनीं योग्य मुदतीची नोटीस देतां येईल असा बेत राखूनच मरायला पाहिजे होतें !" जसे कांहीं कौन्सिलचे हे अधिकारी कमी मुदतीच्या नोटिशीनें कधीं निर्वाह करून घेतच नाहींत. बरें, ठरावांत तरी असा काय वादग्रस्त मुद्दा होता कीं, कोणाला वादाची पूर्वतयारी करावी लागली असती ! किंबहुना हा वादाचा विषयच नव्हता. सामान्य-रीत्या गुणवर्णनपर आदरयुक्त चार दुःखोद्गार औपचारिक रीत्या काढावयाचे होते. अमक्यांनींच बोलावें असा आग्रह नव्हता. युरोपियन सभासदांना टिळकांच्या स्तुतींत अंशभागी व्हावयाचें नसल्यास त्यांना गैरहजर राहूनहि आपली अडचण टाळतां आली असती आधीं सहसा कोणी विरुद्ध बोलला नसता, आणि बोलला असता, किंबहुना ठराव बहुमतानें नामंजूर झाला असता, तरी त्याची जबाबदारी बेळवीप्रभृतींवरच होती. तात्पर्य, कायदेशीर मुदतीपेक्षां यांत परवानगी देण्यास दुसरी

अडचण कांहीं नव्हती. ही नियमभंगाची किंचित् कळ गव्हर्नरसाहेबांनीं सोसली असती तर त्यांना परस्पर भलेपणा पुष्कळ मिळाला असता. पण सहजासहजीं मिळणाराहि असला भलेपणा न घेतां लोकपक्षाच्या सहकारितेची मात्र इच्छा सरकार करणार ! पण मुदतीची ही सबब अप्रामाणिकपणाची होती. गव्हर्नरसाहेबांच्या मनांतून हा ठराव न यावा असेंच होतें, असें आम्ही स्पष्ट म्हणतों. कां तर कौन्सिलला टिळकांच्या नांवाचा विटाळ होईल ! नवा मनु अवतरला तरी कायदे-कौन्सिल ही सरकारी सभा, तिचे मुख्य अधिकारी आम्ही, लोकांच्या हातीं कांहीं नाहीं, ही सरकारची बुद्धि अद्यापि गेली नाहीं, याचाच हा पुरावा होय. दुसरें काय ? पण सर्व जगानें टिळकांची इतकी स्तुति केली व दुःखोद्गार काढले असें असतां हें तेज दुस्सह होऊन गव्हर्नरसाहेबांनीं दुर्मनस्क घुबडाप्रमाणें नियमावलीच्या अंधारांत आपलें तोंड खुपसलें यापासून सरकारचा फायदा न होतां तोटाच होईल. ठरावाची परवानगी मागणारे कित्येक गृहस्थ खचित हा मनोभंग, हा अपमान, विसरणार नाहींत. याचें उट्टें काढण्याचे प्रसंग अनेक येतील, व तेव्हां ना० बेळवीप्रभृति तें उट्टें काढल्याशिवाय गप्प बसणार नाहींत असा आम्हाला भरंवसा आहे.

ॐ ॐ ॐ

लो० टिळकांच्या मृत्यूसंबंधानें दुःख प्रदर्शित करण्याकरितां सोमवार, ता. २ ऑगस्ट रोजीं या इलाख्यांतील बहुतेक सर्व शाळा व कॉलेजें बंद होतीं, व इतर इलाख्यांतूनहि बहुधा हाच प्रकार झालेला असला पाहिजे. शाळा सरकारी म्हणून कोणीं आग्रहानें चालूच ठेवली असली तरी प्रायः मुलांनीं स्वतःला बिनपरवानगीनें सुटी घेतली असेल. असो. कोठें एखादी शाळा बंद न झाली तरी शाळा बंद झाल्याबद्दल तक्रार तरी फारशी कोठें झालेली ऐकिवांत नाहीं. शेंकडों ठिकाणच्या म्युनिसिपल व लोकलबोर्डाच्या शाळा बंद झाल्याचें आम्हांस माहीत आहे. असें असतां धारवाडचे कलेक्टर मि० इमॅन्युएल यांनाच नसता उपद्व्याप कां सुचला कळत नाहीं. त्यांनीं धारवाड म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षांना एक मासलेवाईक पत्र लिहिलें आहे. त्यांत ते म्हणतात कीं, 'धारवाड म्युनिसिपालिटीच्या शाळा टिळकांच्या मृत्यूसंबंधानें बंद केल्या होत्या कीं नाहीं ? असल्यास कां ? टिळक हा दुष्कीर्तिमान् व पश्चात्ताप न पावलेला असा गुन्हेगार (notorious and unrepentant criminal) होता. शाळा बंद केल्या असल्यास म्युनिसिपालिटी सस्पेंड कां करूं नये ?' म्युनिसिपल अध्यक्षांनीं या पत्रास पाठविलेलें उत्तर हातीं आल्यावर यासंबंधानें अधिक लिहूं. पण कलेक्टरमजकुरांचा तीव्र निषेध केल्याशिवाय मात्र आज राहवत नाहीं. टिळकांनीं मिळविलेली कीर्ति सत्कीर्ति होती कीं दुष्कीर्ति होती, हें सर्व जगानें आतां बोलून दाखविलें आहे, व साहेबमजकुरांचे डोळे धड असतील तर त्यांना तें पक्क्या शाईनें लिहिलेलें वाचावयासहि मिळेल. खिस्ती धर्मशास्त्रापुढें पश्चात्ताप न पावलेले आत्मे जेथें जातात तेथें इमॅन्युएलसाहेब जिवंत-

पर्णींच जाऊन पाहून आले कीं काय न कळे! टिळकांना पश्चात्ताप व्हावा तरी कां व कशाबद्दल? निःस्वार्थी देशसेवेबद्दल? पण साहेबमजकुरांना अधिकारमदामुळें हिंदुस्थानांत देशभक्ति ही वस्तु दिसणेंच शक्य नाहीं. ज्या राज्यांत, टिळकांचे जोडेहि पुसण्याची ज्याची योग्यता नाहीं अशा नादान मनुष्याला, एवढ्या अधिकाराची व ओझेंभर पगाराची जागा मिळूं शकते व टिळकांसारख्या तेजस्वी कर्त्या पुरुषास गुन्हेगार हा शब्द लाविला जातो, त्या परकी राज्याचा धिक्कार करण्याला अधिक सबळ पुरावा दुसरा कोणता हवा?

---

# टिळक व स्वराज्य

टिळक-स्वराज्य-संघाचा सातवा वाढदिवस शुक्रवार, ता. २८ एप्रिल सन १९२२ रोजीं सायंकाळीं शिवाजी मंदिरांत **न. चिं. केळकर** यांच्या अध्यक्षतेखालीं यशस्वी रीतीनें पार पडला. केळकर म्हणाले, "स्वराज्य-संघाचा वाढदिवस ही राजकीय पंचांगांतील एक विशिष्ट शुभतिथि म्हणून पाळण्याची असल्यानें इतर वादग्रस्त बाबींची चर्चा आजच्या प्रसंगीं अनुचित होय. स्वराज्य अत्याचारीपणानें किंवा अनत्याचारीपणानें मिळेल हा वाद केव्हांच संपावयाचा नाहीं. निदान भारताचा तरी उल्लेख कोणीं या कामीं करूं नये. धर्मराज शांतीचा व अनत्याचारीपणाचा उपदेश करीत होता हें खरें आहे; पण भीम या उपदेशावर जळफळत होता हेंहि तितकेंच खरें आहे. 'रे सहदेवा सत्वर पुष्कळसा अग्नि आण जाच कसा। जाळूं याचे हे कर आम्हां हा सोसवेल जाच कसा।' असा मयूरपंतांनीं भीमाचा क्रोध वर्णिला आहे! भीमाचा क्रोध खरा असला तरी धर्मालाच शहाणा म्हणतात व तें बरोबरहि आहे. पण शांतिप्रिय धर्म शहाणा म्हटला तरी अखेर युद्धच झालें! बरें, श्रीकृष्णानें युद्धप्रवर्तन केलें म्हणावें तर 'यानें मारलें नाहीं व हाहि मेला नाहीं' 'नायं हंति न हन्यते', असें म्हणून तत्त्वज्ञानाचा बोळा युद्धकर्मावर फिरवून समत्वाचा उपदेश करणार श्रीकृष्णच! तात्पर्य, हा वाद दाखल्यांनीं मिटणार नाहीं. ज्यानें त्यानें आपापली पात्रता पाहून व आपण ज्याला योग्य समजतों तेंच आचरणांत आणून आपल्यापुरता हा प्रश्न सोडविला पाहिजे." स्वराज्य-संघासंबंधानें केळकर म्हणाले, "कित्येकांना वाटतें कीं, टिळक १९१५ सालापर्यंत राष्ट्रीय सभेंत नव्हते; म्हणून स्वतःच्या वर्चस्वाकरितां त्यांनीं हा संघ काढला. पण हें खरें नाहीं. बेझंटबाईंना राष्ट्रीय सभेंत प्रवेश असतां त्यांनींहि एक होमरूल लीग काढली हाच वरील

गोष्टीचा अप्रत्यक्ष पुरावा. महायुद्ध सुरू होऊन जगांतील सर्व लहानमोठ्या राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचें आश्वासन इंग्लंडनें दिलें तरी, राष्ट्रीय सभेंत हिंदुस्थानाकरितां स्वराज्य असें कोणी मागेना. म्हणूनच बेझंटबाई व लो० टिळक यांनीं आपापले संघ स्थापन केले व तेंहि राष्ट्रीय सभेकडून स्वराज्याची मागणी मागण्यास मदत करण्याकरितां! तें इष्ट काम घडूनहि आलें. टिळक स्वराज्य-संघाचें डेप्युटेशन घेऊन विलायतेस गेले तेथेंहि त्यांनीं स्वयंनिर्णयावरच जोर दिला होता. स्वयंनिर्णयाचा शब्द इंग्लंडच्या मुख्य प्रधानाच्या तोंडून निघाला या परिस्थितीचा भरपूर फायदा घेऊन, त्याच शब्दाचा कोलदांडा इंग्रज सरकारला घालण्यांत लोकमान्यांनीं बुद्धिकौशल्य दाखविलें व हा पक्का वकिली कावा पुरा करण्याकरितां हिंदी लोकांनीं त्या वेळीं सैन्यांत शिरावें असाहि त्यांनीं उपदेश केला. टिळक, बेझंटबाई, गांधी या प्रत्येकाचा एक एक स्वराज्य-संघ होता व आहे. या संघांची चळवळ एवढी मोठी झाली कीं, खुद्द बादशहाहि एखाद्या आडमुठ्या पोरासारखे अखेर 'स्वराज्य' हा संस्कृत अवघड शब्द उच्चारावयास शिकले! प्रथम प्रथम टिळकांसारखे लोक प्रयत्न करीत असतांहि स्वराज्य-संघाचे सभासद होण्यास लोक कचरत; पण पुढें टिळक स्वराज्य-संघाचे पन्नास हजार सभासद झाले व म० गांधींनीं तर स्वराज्यवादी असे एक कोटि राष्ट्रीय सभेचे सभासद करण्याची आकांक्षा धरली. अर्थात् व्यक्तिमाहात्म्य तर खरेंच; पण ध्येयाला परिस्थितीचीहि मदत होत असते. स्वराज्य गेलें त्या दिवसापासून फिरून स्वराज्य मिळविण्याची आकांक्षा लोकांत उत्पन्न झाली हें खरें. तरी पण प्रत्येक पंचवीस वर्षांतील पुढाऱ्यांच्या तोंडचे शब्द परिस्थित्यनुरूप वेगवेगळे होते. दादाभाईंच्याहून अधिक नेमस्त लोक म्हणत, 'आम्ही राजनिष्ठ आहों व थोडेंफार मागत असलों तरी स्वराज्यच मागतों असें कांहीं नाहीं'. दादाभाई म्हणूं लागले, 'मी राजनिष्ठ आहें पण स्वराज्य मागतों'. पुढें लो० टिळक म्हणूं लागले, 'मी अराजनिष्ठ नाहीं, तरी पण स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व मी तें घेणार'. शेवटीं म० गांधी पुढें येऊन म्हणाले, 'होय, स्वराज्य न मिळाल्यामुळेंच मी राजनिष्ठाचा अराजनिष्ठ बनलों आहें व स्वराज्य घेतल्याशिवाय मी रहाणार नाहीं'. हीं चार वाक्यें एकापुढें एक मांडलीं असतां स्वराज्याच्या चळवळीची प्रगति दिसून येते."

३२८६

# लो॰ टिळकांच्या धोरणाची मीमांसा

केसरी, ता. १९ डिसेंबर १९२२

यवतमाळ येथील स्वराज्य-संघ परिषदेंत ता. १० डिसेंबर १९२२ रोजीं लो॰ टिळकांचें स्मारक करण्याचा ठराव पुढें आला. त्याला अनुमोदन देतांना **न. चिं. केळकर** यांनीं खालील आशयाचें भाषण केलें—

"या ठरावाला समर्थनपर अशीं कारणें श्री॰ दादासाहेब खापर्डे यांनीं कांहीं सांगितलींच आहेत. मीहि आणखी एकदोन सांगतों. स्वराज्य-संघाचे 'संस्थापक' असें टिळकांना या ठरावांत म्हटलें आहे तेंच खरोखर मुख्य कारण आहे. कल्पना सुचणें व कल्पना सिद्धीस नेणें यांत महदंतर आहे. वीस वर्षांपूर्वी बॅरि॰ बॅप्टिस्टा यांनीं होमरूल लीग स्थापावी, अशी टिळकांना सूचना केली होती; पण तो काळ या कार्याला मुळींच अनुकूल नव्हता. पण तीच कल्पना फिरून महायुद्धानंतर निघतांच, टिळकांनीं योग्य समय जाणून संघ स्थापला. पण उलट अध्यक्षपदाचा मान त्यांनीं बॅरि॰ बॅप्टिस्टा यांनाच दिला. अध्यक्षापेक्षां संस्थापकाचें महत्त्वच विशेष हें बॅप्टिस्टा यांच्या भाषणावरून दिसून आलेंच आहे. राष्ट्रीय सभेच्या धोरणाला तर सोडावयाचें नाहीं व आपलें स्वातंत्र्यहि गमवावयाचें नाहीं, असें टिळकांचें धोरण, या संघासंबंधानें प्रथमपासून आहे. तेंच यापुढेंहि त्यांच्या स्मारकाच्या रूपानें चाललें पाहिजे. पुरांत सांपडलेला मनुष्य एका हातानें प्रवाहपातित लांकडी तराफ्याचा आश्रय घेतो, पण तरून जाण्याची दिशा ठरविण्याकरितां आपल्या दुसऱ्या हातानें पाणी तोडीत असतो. असाच कांहींसा प्रकार टिळकांचा होता. स्वराज्य-संघाच्या हेतूमध्यें त्यांचें धोरण सांठविलेलें आहे; व ते त्यांचे धोरणी शब्द पूर्वींचे तसेच आजहि संघानें कायम ठेविले आहेत. स्वराज्यासंबंधाचें टिळकांचें सर्व धोरण त्यांच्या बीजमंत्ररूप एकाच वाक्यांत सांठविलें आहे. तें वाक्य म्हणजे **स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे** हें होय. स्वराज्य हें अखेरचें ध्येय, व प्रत्येक हिंदी मनुष्याला तें भोगण्याचा हक्क जन्मसिद्धच प्राप्त होतो; या दोन महातत्त्वांमुळें टिळकांचें हें वाक्य इतकें चिरस्मरणीय होईल कीं, शेंदोनशें वर्षांनीं मराठी भाषेचा कोश तयार करणारा एखादा ग्रंथकार "स्वराज्य" या शब्दाखालीं या वाक्याचें अवतरण देऊन टिळकांचें नांव आधारादाखल तेथें लिहील.

"टिळकांनीं 'स्वराज्य' हा शब्द सरकार व हिंदी जनता या दोघांनाहि महा प्रयासानें शिकविला. वास्तविक हा शब्द उच्चारतां न येईल इतका कठीण नाहीं. पण स्वराज्य देण्याचें मनांत नाहीं म्हणून सरकार तो शब्द उच्चारीना, व पीनल कोडाची भीति वाटे म्हणून स्वराज्याची अपेक्षा असतांहि लोकांच्या तोंडून तो सहसा निघेना. 'स्वराज्य' हा शब्द मूळ प्रचारांत कोणीं आणला हा राजकीय

इतिहाससंशोधकाला एक मोठा मनोरंजक विषयच आहे व या शोधांत मागें जातां जातां टिळकांचेंच नांव बरेंच आधीं हातीं लागेल असें मला वाटतें. मवाळ लोक १९०५ पर्यंत स्वराज्याचें नांव घेत नव्हते. महर्षि दादाभाईंनीं देखील–त्यांची हृदयस्थ भावना स्वराज्यमय असतांहि–१९०६ सालींच 'स्वराज्य' हा शब्द प्रथम उच्चारला. हायकोर्टाच्या निकालांतून याच सुमारास या शब्दाची वादग्रस्त चर्चा उमटूं लागली. महायुद्ध सुरू झाल्यानंतरहि प्रथम हा शब्द लवकर रूढ होईना, पण होमरूल लीग संस्था निघाल्यानंतर तो रूढ झाला; व अखेर इंग्रज बादशहांनींदेखील 'स्वराज्य' हा संस्कृत शब्द आपल्या जाहिरनाम्यांत घातला! सरकार हा शब्द एकाद्या हट्टी पोपटाप्रमाणें उच्चारावयाचें टाळीत होतें; पण अखेर तो त्यांना उच्चारावाच लागला. आज 'स्वराज्य' हा शब्द अत्यंत स्वस्त झाला आहे व 'सहीनिशीं स्वराज्य मागणारीं' एक कोटि माणसें हिंदुस्थानांत आहेत म्हणून टिळकांच्या पूर्वीच्या प्रयत्नांची किंमत कोणाला कदाचित् वाटणार नाहीं. पण अहमदनगर मुक्कामीं १९१६ सालीं टिळकांनीं स्वराज्य-संघाकरितां दोनदोन दिवस व्याख्यानें देऊन घसा फोडला तरी सभेंत वीस लोकदेखील सभासद होण्यास तयार झाले नाहींत! टिळकांचे तेव्हांचे वीस व गांधींचे आजचे एक कोटि स्वराज्यवादी लोक अशा तुलनेनें टिळकांपेक्षां म० गांधी हे पांच लक्षपट मोठे असा कोणीं हिशेब केल्यास त्याला माझी हरकत नाहीं! पण वर्तमानकाळीं भूतकाळ विसरणें ही अज्ञानाची व कृतघ्नतेची परमावधि होय! टिळकांनीं या कामीं पूर्वीं सोसलेलीं संकटें विसरूं नका. त्यांनीं किती दुरुत्तरें सहन केलीं, व परप्रांतीय लोक टिळकांना पूर्वीं कशीं कशीं नांवें ठेवीत आणि कसे वागवीत याची आठवण विसरूं नका. लखनौच्या राष्ट्रीय सभेनंतर टिळकांची सर्वमान्यता अबाधित ठरली असेल; पण त्यांच्याविषयीं पूर्वीं किती वाईट ग्रह कित्येक प्रांतांचा होता हें लक्षांत घेणारास असें दिसून येईल कीं, महात्माजींच्या धोरणासंबंधानें क्वचित् एखादा मतभेदाचा शब्द आज कोणी बोललें असतां त्याच्यावर गहजब करण्याचें कारण नाहीं. व्यक्तिद्वेष नसतांहि मतभेद तीव्र असूं शकतो. असो. 'स्वराज्य' हा शब्द सरकारला व जनतेला पढविण्याकरितां टिळकांनीं हा संघ काढला व तें काम तडीस नेलें. एवढ्याकरितांच

## स्वराज्य-संघ हेंच टिळकांचें स्मारक

असें समजून, केवळ त्यांचेंच असें जें राजकीय धोरण तेंच या संघामार्फत आपण पुढें चालविलें तरच त्यांचें खरें स्मारक होईल. या संघाचा द्रव्यनिधीहि त्यांनीं जिवंतपणीं स्वतःच्या श्रमांनीं मोठमोठे दौरे काढून व देह झिजवून मिळविला, तेव्हां तो केवळ त्यांचेंच असें धोरण पुढें चालविण्याकडे खर्च झाला तर त्यांत वावगें कोणतें? या स्मारकाच्या योजनेकरितां त्यांच्याबरोबर काम केलेला असा प्रत्येक उपप्रांतांतला एकेक प्रमुख मनुष्य कमिटीवर नेमण्यांत आला आहे; व टिळकांचें

खरें राजकीय धोरण कोणतें हें ठरवून त्याची परंपरा चालविणें, हेंच या स्मारक-कमिटीचें खरें कर्तव्यकर्म होईल.

टिळकांनीं सरकारला 'स्वराज्य' हा शब्द शिकविला तसाच तो लोकांनाहि शिकविला; व तो शिकवितांना किती विस्तृत पाया रचला हें 'जन्मसिद्ध' या एका शब्दावरून दिसून येतें. हिंदभूमींत जन्मास येणाऱ्या प्रत्येक मनुष्याला केवळ जन्मामुळेंच स्वराज्य मागण्याचा, मिळविण्याचा व भोगण्याचा हक्क प्राप्त होणें, याहून हिंदी राजकीय तत्त्वज्ञानांत अधिक उदात्त सिद्धान्त कोणता असूं शकेल ? वरील तिन्ही गोष्टींकरितां टिळकांनीं कधींहि अटक अशी मानली नाहीं. केवळ जन्म हीच मुख्य पात्रता, मग तेथें लहानथोर, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित, स्पृश्य-अस्पृश्य, असा भेद कोठून येणार ? व या स्वाभाविक पात्रतेवर कोणतीहि कृत्रिम पात्रतेची अटक त्यांनीं कधींहि घालूं दिली नाहीं. स्वराज्यवादी हा अमुक असाच असला पाहिजे, त्याचे आचारविचार, मनोरचना, पोषाक अमुकच असले पाहिजेत, अशीं कृत्रिम बंधनें टिळकांनीं कधींहि घातलीं नाहींत. आत्मशुद्धीचें स्तोम माजविणारांना मी विचारतों कीं, टिळकांना आत्मशुद्धि ही गोष्ट म० गांधींहून कमी प्रिय होती काय ? मूर्तिमंत टिळक हे स्वतः आत्मशुद्धीच होते. (ऐका ! ऐका !) आत्मशुद्धीच्या बाबतींत ते एकच महावाक्य जाणत. तें हें कीं,

'अनाचारोहि मालिन्यं अत्याचारस्तु मूर्खता'

अत्याचार व अनाचार या दोन टोकांच्या दरम्यान खरा आचार, किंवा सदाचार हा मध्यबिंदू-( Golden mean )सारखा असतो हें ओळखून त्या मध्यबिंदूचा छेद करण्याचें धोरण टिळकांनीं नेहमीं जागृत ठेविलें होतें. व्यापक दृष्टीच्या मनुष्याला असेंच करावें लागतें. व्यष्टीप्रमाणें समष्टीवरहि त्याची दृष्टि असते. प्रसिद्ध इंग्रजी म्हणीविरुद्ध, समग्र वृक्षारण्य ( Wood ) व व्यक्तिशः वृक्ष या दोनहि गोष्टी टिळकांना एकसमयावच्छेदेंकरून दिसत होत्या. सर्वांना शक्य किंवा सुलभ काय आहे हें पाहूनच व्यक्तिमात्रावरचीं बंधनें त्यांनीं मनाशीं ठरविलीं होतीं. शिस्त किंवा अटक चांगली; पण तिलाहि मर्यादा आहे; व त्या मर्यादेचें उल्लंघन झालें असतां रोकडा अपमानच आपल्या पदरीं पडतो हें ते पूर्णपणें ओळखीत होते. 'प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत्' या न्यायानें, एखाद्या चाणाक्ष पित्याप्रमाणें, स्वराज्याच्या चळवळींतील सहकारी लोकांशीं ते वागत, स्वराज्याच्या कार्याला ज्याला जें देतां येईल तें समाधानानें घेण्याला त्यांचा हात नेहमीं पुढें असे. जगाची म्हणजे मनुष्यस्वभावाची रचना त्रिगुणात्मक आहे हें गीताशास्त्री टिळक कधींहि विसरणें शक्य नव्हतें. ते सामान्यतः राजसवृत्तीचे असले तरी, केव्हां तामस तर केव्हां सात्त्विक असे स्वतःच असल्याचें स्वतः त्यांचें त्यांनाच जर कबूल करावें लागलें असतें, तर नुसत्या सात्त्विक भावनेचा जुलूम त्यांनीं जनतेवर

कसा चालविला असता ? त्रिगुणात्मकतेमुळें एकच मनुष्य निरनिराळ्या वेळीं निरनिराळा दिसूं शकतो. 'एक्स्ट्रीमिस्ट' हें त्यांचें विशेषण जगत्प्रसिद्ध आहे. पण विलायतेंत त्यांनीं 'मॉडरेट' म्हणवून घेतलें; व १९०७।८ च्या चळवळींत कित्येक तीक्ष्ण भावनेच्या आपल्याच अनुयायांकडून त्यांनीं 'टिळक मूर्ख आहेत, त्यांना खरें राजकारणच कळत नाहीं' असें म्हणवून घेतलें ! या दोनहि गोष्टी प्रसिद्ध आहेत. टिळकांना कांहीं लोक ( व्हायोलन्ट ) अत्याचारी मानीत. हें चिरोल-साहेबांच्या आरोपावरून उघड होतें. पण हें दूषण मानूनच टिळकांनीं चिरोलवर फिर्याद केली. उलट, त्यांना सोळा आणे अनत्याचारित्वच सर्वकाल मान्य होतें म्हणावें तर सन १९०७।८ च्या चळवळींत त्यांनीं सभा भरवून बंगाल्यांतील किंवा इतरत्र बाँबगोळे फेंकणारांचा कधीं निषेध केला नाहीं; व मीहि आज उघड म्हणतों कीं, तसा निषेध आम्हीं काय म्हणून करावा ? ( ऐका ! ऐका ! ) हें आमच्या डोक्यावरचें ऋण मानण्याइतका सरकारनें तरी आमच्यावर उपकार काय केला आहे ? तात्पर्य, आपापल्या आचारविचारापुरतेंच आपण धनी आहोंत व असावें आणि त्याचे परिणाम स्वतः भोगावेत, मग ते सुखकर असोत वा दुःखकर असोत. पण निःस्वार्थी बुद्धीनें इतर कोणी इतर मार्ग अनुसरल्यास त्याची निंदा किंवा निषेध करण्याची जबाबदारी आपण कां घ्यावी ? पूर्वीं कधीं कोणीं अत्याचाराचा उपदेश हिंदुस्थानांत केला होता, म्हणून आज अनत्याचारित्वाच्या उपदेशाचें इतकें स्तोम माजवावें ? टिळकांनीं सुखासुखीं कोणासच अत्याचाराचा उपदेश केला नसता, पण आज कित्येक म्हणतात त्याप्रमाणें, आयाबहिणींवर जुलूम झाले असतां अत्याचारास कोणी प्रवृत्त झाल्यास त्याचाहि त्यांनीं हात धरला नसता. ( टाळ्या !) याचेंच नांव मी म्हणतों खऱ्या मध्यबिंदूचा छेद. हेंच कार्याकार्यविषयक व्यावहारिक

## खरें शहाणपण व राजकारण

याच कारणामुळें जनतेंतले सर्व प्रकारचे लोक टिळकांच्या संग्रहीं होते व उलट सर्व प्रकारचे लोकहि टिळकांना आपले मानून अतिशय चाहत. राजे लोकहि त्यांना गुप्तपणें भेटत असत. त्यांना ते आपल्या प्रजेला स्वराज्य देण्याचाच उपदेश करीत. उलट संस्थानिक प्रजा भेटली म्हणजे संस्थानिकांशीं भांडून स्वराज्य मिळविण्याचा उपदेश ते त्यांना करीत. पंडितांतले महापंडित हे जितके त्यांना जवळ, तितकेच तेली-तांबोळीहि होते. टिळकांनीं सदनशीर चळवळच जन्मभर केली; पण रामोशी, बेरड वगैरे लोकांनाहि असा भास असे कीं, स्वराज्याच्या कामीं गरज पडली तर वेळीं अवेळीं आम्हालाहि हांक मारण्याला ते कमी करणार नाहींत. व त्यांना ते समक्ष सांगतहि कीं, 'दादा, आमचा तुम्हाला उपयोग काय होणार म्हणा, पण आमचीहि आठवण ठेवा'. कोणी तरुण मुलगा कधीं त्यांच्या दृष्टिपथांत आला कीं ते त्याच्या डोळ्यांतील तेजाकडे पहात असत, अंगावरील पेहरावाकडे पहात नव्हते.

माणसाचा पोषाकहि नीट हवा, पण पोषाकापेक्षां तेजाला ते अधिक महत्त्व देत. उपवर मुलीचा बाप सत्पात्र तरुण अविवाहित मुलाकडे ज्या लोभी दृष्टीनें पाहतो त्याच दृष्टीनें स्वराज्याच्या चळवळीकरितां तरुण पिढीकडे टिळक पाहत असत. तात्पर्य, जनता त्रिगुणात्मक आहे हें महातत्त्व आणि 'अनाचारोहि मालिन्यं अत्याचारस्तु मूर्खता' हें महासूत्र लक्षांत ठेवून ते सर्वव्यापक व सर्वकल्प असाच पाया रचीत. यामुळें उभयपक्षीं उलटसुलट असे आरोप त्यांजवर येत. पण हें नेहमीं लक्षांत ठेवावें कीं, असे आरोप घेणारा मनुष्यच मध्यबिंदूला ( Golden mean ) चिकटून आहे, याचाच तो उत्कृष्ट पुरावा होय.

स्वदेशांतील चळवळीप्रमाणेंच परराष्ट्रीय चळवळहि टिळकांना हवी होती. दोहोंनाहि ते यथाप्रमाण महत्त्व देत. म्हणूनच ते दोनहि चळवळी करण्याचें धोरण ठेवीत. स्वकीयांच्या उद्योगाबरोबर परकीयांचीहि सहानुभूति अवश्य हवी असेंच ते मानीत. परराष्ट्रीय चळवळ ही अंशतः वाईट मानली तरी, विलायती खताप्रमाणें, आपल्या राजकीय बागेंत फळेंफुलें उगवण्याकरितां झाडांच्या मुळांत तें खत थोड-थोडें टाकलेंहि पाहिजे इतकेंच ते समजत. (हंशा व टाळ्या !) त्यांची चळवळ ही दुतोंडी कपलिंग (संधिजोड) असणाऱ्या आगगाडीच्या एंजिनासारखी होती. कोठें ट्रेन तयार दिसली, कीं तिला जोडून ओढून नेऊन आपल्या कामाला ते हटकून लावीत; मग त्या गाडीला कितीहि डबे असोत; व त्या डब्यांत अत्तरां-पासून तों सोनखतापर्यंत आणि शालजोड्यांपासून तों गोधड्यांपर्यंत कोणताहि उपयुक्त व्यापारी माल सांठविलेला असला तरी चालेल. असो. या सर्व गोष्टींवरून टिळकांच्या धोरणांत वैशिष्टय म्हणून कांहीं होतें. स्वराज्य-संघांतील त्यांच्या सहकारी लोकांना तें वैशिष्टय पूर्णपणें माहीत आहे व असलेंच पाहिजे; व टिळकांचें पवित्र स्मारक म्हणून जर ही स्वराज्य-संघ संस्था त्यांना टिकवावयाची व चालवावयाची असेल, तर त्यांनीं तेंच त्यांचें धोरण चालविलें पाहिजे. तसें ते न करतील तर कृतघ्न ठरतील. कित्येकांना आज इतर कांहीं गोष्टी प्रिय वाटत असल्या तरी निदान या संस्थेपुरतें त्यांना तेंच धोरण चालविणें योग्य होईल. कॉंग्रेस-कमिट्या व खुद्द राष्ट्रीय सभा यांत मतभेदाचा खेळ खेळण्याला पुष्कळ वाव आहे. पण स्वराज्य-संघाच्या क्षेत्रांत टिळकांच्या धोरणाविषयीं मतभेदाला जागा असणें शक्य आहे असें मला वाटत नाहीं. म्हणून या संघाच्या सभासदांतील कोणाहि मनुष्याला मी हेंच म्हणेन कीं 'घर ओळख !'

# टिळकांच्या जन्मस्थानाचें स्मारक

या विषयावर १९२३ सालीं रत्नागिरी येथें भरलेल्या प्रांतिक परिषदेनें जो ठराव मंजूर केला तो पुढें मांडतांना न. चिं. केळकर यांनीं खालील आशयाचें भाषण केलें.

लो० टिळकांच्या जन्मस्थानाचें स्मारक करण्याच्या योजनेचें सर्व श्रेय रत्नागिरीं-करांसच आहे. टिळकांच्या मृत्यूनंतर लवकरच ही योजना अमलांत यावयाची, परंतु इतर ठिकाणांप्रमाणें, रत्नागिरी येथील स्थानिक स्मारक टिळक स्वराज्य-फंडामुळें मागें पडलें. तो मोठा राष्ट्रीय फंड हें अर्थात् टिळकांचें स्मारकच होय. पण स्थानिक-स्मारक हातचें गमावल्यानें अनेक ठिकाणच्या लोकांना 'बडा देख कर छोटा गमाया' असें वाटलें असल्यास नवल नाहीं. जन्मभूमीचें महत्त्व ही सर्वमान्य गोष्ट आहे. 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' या वाक्यावरून तें स्पष्टच होतें. पण या वाक्यामध्यें अवमानिलेल्या स्वर्गांत मोठीं मनुष्यें जातात तेव्हां वाटेंत यम किंवा काल नामक जो एक मोठा टोल नाकेदार—दस्तुरीवाला बसलेला असतो त्याला मृत्युरूपी जकात मोठ्याहि माणसांना द्यावी लागते. पण मृत मनुष्याचें स्मारक करून किंवा इतर रीतीनें त्याची स्मृति रक्षून कालावरहि सूड उगविण्यांत येतो. स्मारकाचा विचार उत्पत्ति-स्थिति-लय या अवस्थात्रयीच्या अनुरोधानें करावा लागतो. स्थिति म्हणजे जीवनचरित्र या दृष्टीनें पाहतां महाराष्ट्रांतील प्रत्येक स्थान टिळकांचें स्मारक करण्यास योग्य आहे. कारण टिळकांच्या स्फूर्तीनें जेथें आपलें कार्य केलें नाहीं असें एकहि ठिकाण महाराष्ट्रांत सांपडावयाचें नाहीं. लयाच्या म्हणजे मृत्यूच्या दृष्टीनें पाहतां स्मारकस्थानाचा मान मुंबईनें मिळविला. पण त्यांच्या दहनाची जागा पराधीन असल्यानें मुंबईकरांस त्यासंबंधीं अद्यापि कांहींच करतां आलें नाहीं. पण जन्मभूमीचा अग्रमान रत्नागिरीनें मिळविला, व तो यथार्थ करण्याकरितांच रत्नागिरीकरांनीं ही स्मारकाची योजना केली आहे.

जन्मभूमीला सर्व शास्त्रांनींहि महत्त्व दिलेलें आहे. जन्मपत्रिका मांडणारा ज्योतिषी जन्मभूमिस्थानाचे अक्षांशरेखांश नक्की काढूनच जन्मवेळ ठरवितो; व अशा पत्रिकेंत पडलेल्या ग्रहांवरूनच या शास्त्रावर विश्वास ठेवणारे लोक भविष्यें वर्तवितात. रोग्याला कसलेंच औषध लागू होईनासें झालें, कीं डॉक्टर वैद्य त्याला 'चार दिवस जन्मभूमीची हवा खाऊन ये' म्हणून सांगतात व हा उपाय कित्येक वेळां लागूहि पडतो. मनुष्याचे प्रथमचे धर्मसंस्कार जन्मभूमीवरच होत असल्यानें धर्मदृष्ट्याहि तिला महत्त्व येतें हें उघड आहे. टिळकांनीं स्थानमाहात्म्याचा हा मान रत्नागिरी-सच कां दिला याची एक भोळी उपपत्ति मी परवां एका भाविकाचे तोंडून ऐकली. तो म्हणाला, 'आपले परकी राज्यकर्ते पश्चिम समुद्राकडून आले म्हणून त्यांच्या

तोंडावर स्वराज्याचें ठाणें मांडण्याकरितां टिळकांनीं रत्नागिरीस जन्म घेतला !" रत्नागिरीच्या जन्मभूमीपासून टिळकांनीं कोंकणच्या विशिष्ट लक्षणांपैकीं प्रत्येकाचा थोडथोडा स्वीकार केलेला आहे. मी जुन्या पद्धतीचा कवि असतों तर असें वर्णन केलें असतें. कोंकणस्थ तांबुस व स्निग्ध मातीच्या तेजाचें अनुकरण टिळकांच्या डोळ्यांनीं केलें. समुद्रापासून त्यांनीं खोल स्वभाव व सर्वसंग्राहकपणा घेतला होता. समुद्राच्या बाहेर जितकी सृष्टि तिच्याहून समुद्राच्या उदरांत अधिक सृष्टि असते असें म्हणतात. या न्यायानें टिळकांचेंहि अर्ध्याहून कमी असेंच राजकीय अंतरंग प्रकट होत असे. त्यांचें सर्व अंतरंग कोणींच जाणलें नाहीं. कोंकणच्या सह्याद्रि पर्वतापासून टिळकांनीं आपल्या आकांक्षांचा उत्तुंगपणा घेतला होता. कोंकणी खडकाळ कातळापासून त्यांना निश्चयी मनाचा कठोरपणा मिळाला होता. खडक फुटेल; पण टिळकांचा निश्चय ढळणार नाहीं याचा अनुभव सर्वांसच असे. कोंकणच्या किंचित् पित्तकर पण एकंदरीनें निरोगी अशा हवेचें अनुकरण त्यांच्या स्वभावानें केलें होतें. नारळाप्रमाणें त्यांच्या अंतरंगांतिल गुणग्राहकतेचें व कृपेचें मधुर जल त्यांच्याशीं निष्ठापूर्वक वादाची टक्कर खेळणारासच अधिक मिळे; वरवर लोभाच्या किंवा हांजीहांजीखोरपणाच्या तोंडदेखल्या गोष्टी बोलणारास प्रसादसमर्पणाच्या बाबतींत ते टणकच होते. फणसाप्रमाणें त्यांची रीतभात वरून खडबडीत होती. 'पॉलिश्ड जंटलमन' म्हणजे रंधून साफ केलेला किंवा घासल्यापुसल्यानें अंगावर विकारवशतेची लवहि न उगवणारा महाशिष्ट ही संज्ञा त्यांचा वेष व भाषा पाहून कोणासच देतां आली नसती. पण कांटेरी फणसांत जसे रसाळ गरे असतात तसेच त्यांच्या पोटांत शिरणाराला सरळ युक्तिवाद व प्रेमळ भावना सांपडत असत. शेवटीं एकच अस्सल कोंकणी पदार्थ सांगावयाचा राहिला. व तें विहिरीवरचें रहाटगाडगें ! कोंकणांत मी आलों म्हणजे निजून उठण्याच्या वेळीं रहाटगाडग्याचा करकरणारा पण उत्साहवर्धक आवाज ऐकतों तेव्हां वाटतें कीं, कोंकणी जनतारूपी राजपुरुषाला निद्रेंतून कवनाच्या हांकेनें जागें करणारा हा कोणी पिढीजाद भाट, चारण किंवा शाहीर असावा ! रहाटगाडगें म्हटलें म्हणजे त्याचे पोहरे मोघे कधीं धड नसावयाचे. त्यांतल्या निम्म्याच पाण्याचा उपयोग व्हावा, निम्में सांडावें, अशी स्थिति हटकून असावयाची. त्याप्रमाणें लो० टिळकांच्या सर्व-संग्रहांतील मंडळींत रहाटाच्या मडक्यांप्रमाणें कोणांत कांहीं न्यून तर कोणांत कांहीं न्यून असे; पण त्यांनीं त्या सर्वांना आपल्या राजकीय वळणाच्या वळलेल्या जोरकस दोरावर बांधून त्यांच्याकडून ओंजळ ओंजळ पाणी काय मिळेल तें घेऊन त्यांतूनच राष्ट्रीय चळवळीचा अखंड जलप्रवाह निर्माण केला व देशकार्याचा मळा शिंपून घेतला. तात्पर्य, टिळकांनीं जन्मभूमीपासून घेण्यासारख्या अनेक गोष्टी घेतल्या; पण उलट तिला कीर्तीचा मोबदला भरपूर परत दिला. यामुळें रत्नागिरीकरांचें ऋण कमी न होतां वाढलेंच आहे व तें ऋण अंशतः तरी फिटावें म्हणूनच त्यांनीं ही स्मारकाची योजना केली आहे.

# लोकमान्यांची पुण्यतिथि

## ता. १ ऑगस्ट १९२३

असहकारितेच्या चळवळींत फेरनाफेर वादाच्या ऐनभरांत ही पुण्यतिथि साजरी झाली. किर्लोस्कर थिएटरमध्यें बॅरि॰ जयकर यांचें श्री॰ केळकर यांचे अध्यक्षतेखालीं व्याख्यान व्हावयाचें जाहीर झालें असल्याकारणानें थिएटर अगदीं चिकार भरलें होतें. जेथें म्हणून बसण्यासारखी यत्किंचितहि जागा असेल तेथें तेथें लोकांनीं आपला शिरकाव करून घेतला होता. यापूर्वीं शिवाजीमंदीर व रेमार्केट या दोन आखाड्यांमध्यें फेरवाले ना-फेरवाले यांच्या व्याख्यानांचा तडाखा सुरूच होता; पण लांबून व अंतरावर गोळीबार चालावा तसें तें लोकांस वाटत असे. पण 'टिळकांचें तत्त्वज्ञान हेंच आमचें राजकीय तत्त्वज्ञान' असें ढोंगीपणानें वेळीं अवेळीं प्रतिपादणाऱ्या ना-फेरपक्षानें आजच्या सभेची संधि कशी वायां जाऊं द्यावी ? म्हणून फेरवाल्यांप्रमाणेंच वासुदेवराव जोशी वगैरे प्रमुख नाफेर मंडळीहि सभेस मुद्दाम आली होती. प्रथमतः **व्याख्याते जयकर म्हणाले**–"आज लोकमान्यांच्या कार्याची जबाबदारी ज्यांच्यावर पडली आहे असे अध्यक्ष लाभले हा मोठा सुयोग आला आहे. लोकमान्यांच्या तत्त्वज्ञानाकडे आज मी महाराष्ट्रीय या दृष्टीनें पाहणार आहें. महाराष्ट्रीय महत्त्वाकांक्षेची मूर्ति म्हणजे टिळक होत. नोकरशाहीशीं झगडणारे एवढेंच त्यांचें महत्त्व नसून महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आकांक्षा त्यांच्यामध्यें एकवटल्या होत्या. टिळक व इतर देशभक्त यांत हाच मोठा फरक होता. टिळकांची दृष्टि ऐतिहासिक काळाकडे जात असे. मराठी साम्राज्याचा अधःपात होऊन त्या जागीं इंग्रजी राज्याची उभारणी झाली ही गोष्ट त्यांच्या डोळ्यांसमोर असल्यानें त्या धोरणानें त्यांनीं आपल्या सर्व चळवळी चालविल्या. या राष्ट्राला आपलें गतवैभव प्राप्त कसें करून घेतां येईल याची त्यांना चिंता लागून राहिली होती.

"टिळकांची राजकारणांतील प्रश्नांची विचारसरणी अत्यंत व्यापक व भक्कम पायावर उभारलेली असल्यानें त्यांनीं एखाद्या गोष्टीबद्दल दिलेला निर्णय महाराष्ट्रीय मनोरचनेस अनुरूप असाच असे. अशी लोकोत्तर बुद्धिमत्ता फारच थोड्या लोकांच्या वांट्यास येते. आजच्या राजकीय क्षेत्रांत ज्या गोष्टी अगदीं साध्या होऊन बसल्या आहेत त्या सिद्ध करण्यास टिळकांना अविश्रांत श्रम करावे लागले. उदाहरणार्थ, 'स्वराज्य' हा शब्द आज सुलभपणें उच्चारितां येतो व खुद्द बादशहांनींहि तो उच्चारला इतका तो रूढ झाला असला तरी तो शब्द रूढ करण्यास लोकमान्यांना आपल्या शरीरांतील रक्तबिंदू वेंचावे लागले आहेत.

"मला माझ्या देशांत स्वातंत्र्य पाहिजे अशा प्रकारचा स्वराज्याचा अर्थ करून राजकारण टिळकांनीं सर्वांना सोपें केलें. टिळकांची विद्वत्ता फारच दांडगी होती. एखाद्या विषयाचा आजन्म व्यासंग करणाऱ्या पंडितापुढें त्यांनीं व्याख्यान

दिलें असतांना सदर पंडितांनीं माना डोलावलेल्या मीं पाहिल्या आहेत. असें असूनहि इतर विद्वानांप्रमाणें ते सामान्य जनतेपासून अलिप्त राहिले नाहींत. टिळकांसारखा विद्वान् एखाद्या स्वतंत्र देशांत जन्मास आला असता, तर त्यानें पंडित म्हणून दिगंत कीर्ति मिळविली असती. अशा विद्वानाला राजकारणासारख्या विषयांत पडण्याचा प्रसंग यावा हा पारतंत्र्याचा परिणाम असून हें खरोखरच देशाचें मोठें दुर्भाग्य होय. आजकाल विद्वान् मंडळी राजकारणापासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतात. परिस्थिति त्यांना प्रतिकूल झाली आहे ही गोष्ट कबूल केली तरी देखील त्यांनीं आपली मुग्धता सोडून स्वतःच्या विद्येच्या जोरावर देशांतील राजकारणास निराळें वळण लावण्याची जबाबदारी अंगावर घेण्याचा खरोखरच काळ उत्पन्न झाला आहे."

समारोपादाखल अध्यक्ष या नात्यानें **श्रीयुत केळकर** म्हणाले:—

येथला स्थानिक नागरिक असल्याकारणानें आणि टिळकांचा सहवास घडल्याकारणानें आपल्याप्रमाणेंच या विषयावर बोलण्याला माझी अपात्रता आहे. दुसरें असें कीं, आपल्यापेक्षां परठिकाणच्या माणसांनीं कित्येक वेळेला बोललेलें पटतें, रुचतें व खरें वाटतें! जयकरांचें इंग्रजी भाषण ज्यांना समजलें नसेल त्यांच्याकरितां मी एकदोन मुद्दे सांगतों. लोकमान्यांची अलौकिक विद्वत्ता सर्वश्रुत आहे. गणित, ज्योतिष, तत्त्वज्ञान वगैरे विषयांत ते अगदीं निष्णात होते; पण टिळकांची विद्वत्ता कधीं जनतेच्या आड आली नाहीं. लहानापासून थोरापर्यंत व एकाद्या अडाणी शेतकऱ्यापासून जाड्या पंडितापर्यंत कोणाशींहि संभाषण करीत असतां संभाषण करणाऱ्या इसमाला हा इसम माझ्या धंद्यांतला दर्दी आहे असेंच वाटे, एकादा शेतकरी त्यांना भेटावयाला गेला तरी परत जातांना त्याची खात्री होई कीं, माझ्या धंद्यांतील सर्व माहिती यांना आहे; माझ्या सुखदुःखांत हे मिसळूं शकतात. यांत विभूतिपूजा वाढवावी असा माझा उद्देश नाहीं. टिळक सर्वगुणसंपन्न होते असें मी म्हणत नाहीं; ते सर्व लोकांच्यापेक्षां वर असूनहि परिस्थितीशीं समव्यास होणें, हा त्यांच्या बुद्धीच्या ठिकाणीं मोठा गुण होता. त्यामुळें ते जसे विद्वानांत विद्वान्, प्रतिष्ठितांत प्रतिष्ठित, पंडितांत पंडित, मुत्सद्द्यांत मुत्सद्दी तसे गांवगुंडांत गांवगुंडहि असत. (हंशा!) त्यांच्या ठिकाणीं सत्यवाद्यांशीं वागण्यांत जसें सत्य, तसें शठांकरितां शाठ्यहि पण राखून ठेवलेलें असे!

"लो० टिळक सर्व हिंदुस्थानचे पुढारी होते तरी, त्यांनीं प्रांतिक अभिमान सोडला नाहीं. कांहीं लोक असे असतात कीं, देशभर हुतूतू घालतात पण त्यांना घरीं अधिष्ठान नाहीं! दुसरे कांहीं असे असतात कीं, त्यांचें घरीं अधिष्ठान असतें पण त्यांना बाहेर कोणी विचारीत नाहीं. मनूच्या ओंजळींत एकदां एक मासा आला. त्यानें त्याला प्रथम पंचपात्रींत, तेथून ताम्हनांत, तेथून परातींत व तेथेंहि

तो मावेना तेव्हां समुद्रांत सोडून दिलें. त्याचप्रमाणें लोकमान्यांचें पुढारीपणहि चढत वाढत जाऊन ते परदेशांतहि माननीय ठरले. पण इकडे पंचपात्री, ताम्हन व परात यांची मात्र आपआपसांत मोठेपणाबद्दल रिकामीं भांडणें लागलीं आहेत! पण त्याचा निर्णय करण्याचें आपणांस कारण नाहीं. लोकमान्य हे परिस्थितीप्रमाणें आपलें वैशिष्ट्य न गमावतां पराक्रम करणारे होते ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे."

---

# लो० टिळकांचें पुण्यस्मरण

केसरी, ता. ११ ऑगस्ट १९२३

लोकमान्य टिळक हे निवर्तल्याला इंग्रजी तारखेनें उद्यां तीन वर्षें पुरीं होतात. तथापि ती गोष्ट जणुंकाय आज घडली अशा मनःस्थितीनें उद्यां हिंदुस्थानांत सर्वत्र सभा भरतील आणि प्रायः सर्व वर्तमानपत्रें त्यांच्यासंबंधीं गुणवर्णनपर लेख लिहितील. याहि गोष्टीला अपवाद आढळणार नाहींत असें मात्र नाहीं. कारण टिळकांसारख्या तेजस्वी लढाऊ पुरुषाला प्रतिस्पर्धी व शत्रु नसतील तरच आश्चर्य! टिळकांचें वर्णन कोणी इतर रीतीनें कितीहि केलें तरी त्यांना 'अजातशत्रु' हें विशेषण मात्र त्यांच्या मित्रांनाहि देतां येणार नाहीं. टिळक अजातशत्रु नव्हते; इतकेंच नव्हे, तर शत्रूशीं झगडून यश मिळविण्यांतच त्यांचा पुष्कळसा जन्म गेला. टिळक सहा वर्षें तुरुंगवासांत राहून परत आल्यावरहि त्यांचें तेज, त्यांचें महत्त्व व त्यांच्यावरील जनतेचें प्रेम अणुरेणुइतकेंहि कमी झालें नाहीं; उलट त्यांच्या कारागृह-तपश्चर्येनें तें वाढलें असें पाहून प्रबळ किंबहुना सर्वशक्तिमान् अशा ब्रिटिश सरकारला देखील 'टिळक हा आमचा शत्रु आहे, याच्याशीं कोणी कसलाहि व्यवहार ठेवील तर तो आमचा शत्रु ठरेल' असें जाहीर फर्मान काढावेंसें वाटलें हें प्रसिद्धच आहे. टिळकांच्या खासगी शत्रूंविषयीं तर बोलावयासच नको. कित्येकांनीं जन्मभर टिळकांची नालस्ती केली, त्यांच्यावर कुभांडें रचलीं, त्यांना तुरुंगवास घडविण्याला मदत केली, त्यांच्या सुटकेला शक्य तितका प्रतिबंध केला, व इतकेंहि करून टिळक हे हतप्रभ होत नाहींत असें पाहून दांत ओंठ चावीत प्राण सोडले.

टिळकांच्या प्रतिपक्षीयांनींहि कांहीं कांहीं बाबतींत जवळ जवळ हाच क्रम ठेविला होता. टिळकांचें कोणतेंहि लोकप्रिय कार्य म्हणजे आपणावर ती एक अप्रत्यक्ष पण

सक्रिय टीका, असें मनानें मानून जन्मभर त्यांनीं टिळकांच्या हेतूंचा विपर्यास केला. आणि कित्येकांची विरोधी भक्ति तर इतक्या परमावधीला पोंचलेली आढळते कीं, एखाद्या चरित्रग्रंथाच्या परीक्षणाचें नुसतें निमित्त करून त्यांनीं चालू टिळक-सप्ताह टिळकांची ओतप्रोत निंदा करूनच साजरा केला. जणुं काय अशा निंदेंत, स्वतः त्यांच्या पुढाऱ्यांचीं चरित्रें लिहिण्याची त्यांच्या कोणाहि भक्तास आजवर बुद्धि झाली नाहीं. या उणेपणावर झांकण पडेल; किंवा जणुं काय उसन्या ईर्षेनें उद्यां तीं कोणीं लिहिलीं तर त्या चरित्रविषयाच्या अंगच्या वैगुण्याविषयीं लोकांना भुरळ पडेल ! पण जिवंतपणीं जर या सरकारी व खासगी शत्रूंना किंवा प्रतिपक्षीयांना टिळकांच्या कीर्तीला हटवितां आलें नाहीं, तर टिळकांच्या मरणोत्तरच्या त्यांच्या या निंदेनें टिळकांच्या यशाच्या शिखरावरलें एकादें कौलहि ढांसळून पडणार नाहीं; मग मुख्य इमारतीला धक्का तो कोठून लागणार ! अनायासानें मरण येण्याप्रमाणें तें कीर्तीच्या अखंड वाढत्या ओघांत प्राप्त होणें यालाहि एक प्रकारची पुण्याईच लागते. ती टिळकांची होती खास. मरणसमयीं सर्व हिंदुस्थानांत टिळकांइतका लोकप्रिय पुढारी टिळक हा एकच होऊन गेला. त्यांनीं या जगांतील लौकिकाची शर्यत जिंकली खरी. त्यांच्या मरणोत्तर आज सरकार त्यांचे गुणच घेत असतें असा पुष्कळांना अनुभव आहे. आणि त्यांचे प्रतिपक्षी जरी खुनशीपणानें त्यांच्या कीर्तीला डसतांना दिसले तरी पोलादी कानशीवर सर्पानें दांत घासला असतां कानशीला तर धक्का लागतच नाहीं, उलट स्वतः सर्पाचा विषारी दांत मात्र पडतो, तशीच टिळकांच्या प्रतिपक्षीयांच्या या टीकेची स्थिति होणार याविषयीं कोणासच शंका नाहीं.

या सर्व स्थानिक पण अस्थानी निंदेला व टीकेला खरें उत्तर उद्यां हिंदुस्थानभर होणाऱ्या टिळकांच्या चरित्रपठनानें व गुणवर्णनानें आयतें परस्पर मिळणारें आहे. तेव्हां आम्ही तेंच उत्तर निराळें देण्याचें कारण नाहीं. टिळकांचे निंदक त्यांच्यावरील बारीकसारीक, खरेखोटे आक्षेप जितके अधिक कोरकोरून काढतील तितकी त्यांच्या आंगच्या स्थूल गुणांची मूर्ति अधिकच उठावदार बनेल. मार्मिक चितारी प्रकाशगुणवर्धनाकरितां छायेलाहि महत्त्व देतो, त्याचप्रमाणें टिळकांच्या चरित्राचें कौतुक करणारांनीं त्यांवर होणाऱ्या प्रतिकूल टीकेचेंहि कौतुकच केलें पाहिजे, किंबहुना टीका जितकी अधिक क्षुद्र असेल तितकें कौतुक अधिक !

असो. टिळकांना परलोकवासी झाल्यास जितका काळ अधिक लोटेल तितकी त्यांची कीर्ति अधिकच वाढेल, ती कमी होऊं शकणार नाहीं याविषयीं आतां कोणास फारशी शंका नाहीं. ही कीर्ति जशी त्यांच्या शत्रूंच्या कुत्सित टीकेच्या माऱ्यापलीकडे जाऊन सुरक्षित बसली आहे, तशीच ती त्यांच्या भाविक मित्रांच्या अतिशयोक्तिपूर्ण अशा स्तुतिशब्दावरहि अवलंबून नाहीं. त्यांचें चरित्र म्हणजे जिवंतपणीं त्यांनीं केलेले राजकीय पराक्रम व साधलेले लौकिक पुरुषार्थ, हाच त्यांच्या कीर्तीचा खरा आधार असल्यानें तो कधींहि डळमळूं लागणार नाहीं.

टिळकांच्या पश्चात् हिंदुस्थानचें राजकारण चालूच आहे व कदाचित् टिळकांची विस्मृति पाडतील असे पुरुष या देशांत निरवधि भविष्यकाळांत निपजूंहि शकतील. टिळक मोठे असले तरी हिंदुस्थान देश टिळकांहून मोठा आहे. प्रत्येक प्रांताला आपणांमध्यें टिळकांसारखा लोकोत्तर पुढारी उत्पन्न होत जावा अशी आकांक्षा असणें स्वाभाविक आहे; व प्रांतानिहाय असे पुढारी लाभण्यावरच या देशाचें उज्ज्वल भवितव्य अवलंबून आहे. तथापि गतकालाकडे दृष्टि फेंकली असतां क्षितिजावर टेकलेल्या पर्वतशिखराची सापेक्ष उत्तुंगता जशी नुसत्या डोळ्यालाहि दिसूं शकते त्याप्रमाणें टिळक व इतर अनेक लोकप्रसिद्ध हिंदी पुढारी यांच्या उंचीचें माप सामान्य मनुष्यहि आपल्या मनानें घेऊं शकतो. टिळकांचें चारित्र्य व त्यांच्या आकांक्षा या जशा अत्यंत उच्च त्याप्रमाणें त्यांचें राजकीय धोरणहि महनीय असेंच होतें व त्याची महनीयताहि त्यांच्या स्थिरबुद्धित्वावर अधिष्ठित होती.

टिळकांनीं मित्रमंडळींशीं खासगी संभाषण करतांना राजकारणांत, नेहमीं योग्य ठरणारें असें धोरण कोणतें, या विषयावर दिलेलें मत अनेकांनीं ऐकलेंच असेल. अशा धोरणाला ते नाजूक ताजव्याची उपमा देत. उत्कृष्ट कारागिरानें बनविलेला ताजवा तोच कीं, ज्याच्या पारड्यांत एकादा लहानसाहि रजःकण पडला असतां त्याचा कांटा तितक्यापुरता झोंक खाऊन मूळ स्थितींत बदल झाला असें दर्शवितो. पण दुसऱ्या पक्षीं, वजन कितीहि भारी व कितीहि वेळ पारड्यांत घालून ठेवलें तरी, तें निघतांच अंगच्या स्थितिस्थापकत्वाच्या मूळ गुणामुळें ताजवा फिरून आपली समतोल वृत्ति पुनः स्वीकारतो. राजकारणी पुढाऱ्यांचें धोरणहि स्थिरतम पण सूक्ष्म भावनाव्यंजक असेंच असावें लागतें. राष्ट्रीय विचारक्रान्तीच्या या युगांत हिंदी जनतेवर अनेक प्रकारचीं संकटें ओढवणार, तिला अननुभूत असे अनेक प्रसंग पहावे लागणार, आणि विविध प्रकारच्या परिस्थितींत तिला उपायहि विविध प्रकारचे योजावे लागणार. तथापि शहाणा खलाशी हा जसा आपल्या शिडाची रचना हवी तशी बदलून, वारा कोणत्याहि दिशेला वाहत असला तरी त्याला थोडा-बहुत आपल्या शिडांत घेऊन, साधल्यास जवळून व न साधल्यास निदान वळसा घालून, तरी तो आपलें बंदर हटकून गांठतोच, त्याप्रमाणें शहाणा राजकीय पुढारी देखील वाटेल त्या परिस्थितींतून आपलें ध्येय यत्किंचित् तरी साध्य करण्याचा प्रयत्न करतोच करतो. पण यांतच गर्भित असलेली दुसरी गोष्ट अशी कीं, वारा प्रतिकूल म्हणून खलाशी प्रवास थांबवीत नाहीं किंवा हटातटानें वाऱ्याशींच भांडून त्याचा मारा ऐनतोंडावर घेऊन आपली होडी बुडवीत नाहीं.

लो० टिळकांच्या राजकीय धोरणांत धाक, दहशत, गोडी, थोडासा मायावी-पणा, एवढेंच काय पण प्रांजलपणा व कपट यांचा मेळ उत्कृष्ट बसला असल्या-मुळेंच, लोकांना तर तें धोरण एकाद्या कुशल शिंप्यानें शिवलेल्या आंगरख्याप्रमाणें आपल्या मनःशरीरावर कोठेंहि मुरड न पडतां तुस्त बसल्यासारखें स्वाभाविक दुख-

प्रद वाटत होतें. आणि खुद्द सरकारलाहि आपल्या तोडीला तोड मिळाली, किंवा आपल्या पावलांचा माग बिनचूक शोधून काढणारा गुप्त हेर भेटला असा दरारा वाटत असे. टिळकांनीं राजकारणाचें वर्णन परब्रह्म स्वरूपाप्रमाणें 'नेति नेति' अशा शब्दांनीं कधींच केलें नाहीं. त्यांची राष्ट्रीय भावना ही एकाद्या सगुण मूर्तीच्या उपासनेसारखी मनाला भासण्याप्रमाणें डोळ्यालाहि स्पष्ट दिसणारी व हाताशीं मिळतील त्या व्यक्त साधनांनीं संपादिली जाणारी अशी होती. टिळकांचा हा गुण खुलवून दाखविण्याकरितांच कीं काय त्यांच्या मरणोत्तर तीन वर्षांच्या आंत राष्ट्रीय सभेचे धिंडवडे उडाले, व राजकारणाचें खोबरें झालें. मुंबईस भरण्याची म्हणून योजिलेली स्पेशल कॉंग्रेस आतां बहुधा होतच नाहीं, व झाली तरी तींत विधायक असें कोणतेंच धोरण स्वीकारलें जाणार नाहीं असें आम्हांस उघड दिसतें. पण औचित्याच्या दृष्टीनें हिंदी जनतेच्या मनाला बरोबर पटणारी अशी जर कोणती एकादी गोष्ट आज व्हावयाची तर, १९२० सालीं जादा कॉंग्रेस भरून टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेची किंवा असहकारितेची जी घडी विस्कटली तीच १९२३ सालीं भरणाऱ्या जादा कॉंग्रेसमध्यें फिरून बसावी हीच ती उचित गोष्ट होय! कांहीं हटवादी लोकांच्या दुराग्रहामुळें राष्ट्रीय सभेच्या प्रत्यक्ष ठरावांत ही गोष्ट घडून न येणार तर न येवो; परंतु जनतेचें खरें मत प्रगट होण्यास यापूर्वींच प्रारंभ झालेला आहे; व येत्या निवडणुकीच्या वेळीं असहकारितावाद्यांच्या तोंडांतील आवडता गोड पण विषारी घांस बळानें काढून घेऊन, खंड पडलेल्या राजकारणाचा ओघ फिरून अमृतसरच्या राष्ट्रीय सभेशीं जनता जोडून देईल, याविषयीं आम्हांस शंका वाटत नाहीं. आणि हें घडून आलें म्हणजे राष्ट्राकडून होणारें लो० टिळकांचें गुणग्रहण अधिकच सार्थ होईल.

---

# कै० लो० टिळकांचा पुतळा

## अपूर्व अनावरण समारंभ

कै० लो० टिळकांच्या पुतळ्याचा अनावरणसमारंभ मंगळवार, ता. २२ जुलै १९२४ रोजीं टिळक–जयंतीच्या दिवशीं सकाळीं झाला. समारंभाच्या सुरुवातीची वेळ ८।ची होती. तरी सकाळीं ६ वाजल्यापासूनच प्रेक्षकांची गर्दी लोटूं लागली होती. सात वाजल्यापासून निमंत्रित पाहुणेहि येऊं लागले. म्यु०च्या अध्यक्षांच्या सहीनें शहरांतील सर्व थोर गृहस्थांस निमंत्रणकार्डें गेलीं होतीं. परगांवच्याहि अनेक सद्‌गृहस्थांना निमंत्रण करण्यांत आलें होतें. त्यांतून प्रांतिक कायदे कौन्सिलची बैठक आदलेच दिवशीं सुरू झाली असल्यानें कौन्सिलचे सभासदांसहि निमंत्रण करण्यांत आलें होतें. समारंभास निमंत्रित पाहुणे आणि इतर गृहस्थ यांची अतिशय गर्दी लोटली होती. म्युनिसिपालिटीचे बहुतेक सर्व सभासद आणि शहरांतील बहुतेक सर्व पक्षांचे आणि वेगवेगळ्या समाजांचे सन्मान्य पुढारी हजर होते. पुतळ्याच्या चौथऱ्यावर अध्यक्षांकरतां उच्च आसन केलें होतें. त्याच्या शेजारची चौथऱ्यावरची देखील सर्व जागा प्रेक्षकांनीं भरून गेली होती. आजूबाजूचे सर्व रस्ते माणसांनीं फुलून गेले होते. मंडईच्या उत्तरबाजूच्या आवारांत पाऊल ठेवण्यासहि रीघ नाहीं इतकी चिकार गर्दी होती. समोरच्या दुकानांवरील पत्र्यावर देखील प्रेक्षकांनीं आसन ठोकलें होतें!

समारंभाच्या वेळीं व्यवस्था राखण्याचे कामीं भारतस्वयंसेवक मंडळ, शहरांतील बॉयस्काउट्स्, महाराष्ट्र-बालचर मंडळ, महाराष्ट्र-क्रीडामंडळ आणि इतर अनेक संघ दक्षतेनें झटत होते. आणि इतका अलोट जनसंमर्द जमला असून देखील त्यांनीं कोठेंहि अव्यवस्था होऊं दिली नाहीं.

अध्यक्ष पंडित मोतीलाल नेहरू हे बरोबर ८। वाजतां येऊन हजर झाले. सुरुवातीस गोपाळगायनसमाजांतील मुलांनीं सुस्वर पदांनीं ईश्वरप्रार्थना आणि स्वागत केलें. त्यानंतर म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष न. चिं. केळकर यांनीं आपलें भाषण इंग्रजींत वाचून दाखविलें त्याचा गोषवारा असा—

“पुण्याचे एक अत्यंत थोर नागरिक लो० बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मरणार्थ या शहर म्युनिसिपालिटीनें जो पुतळा तयार करविला आहे त्याच्या अनावरणसमारंभार्थ आपण येथें जमलों आहों. या शहरांत म्युनिसिपालिटीनें उभा केलेला हा पहिलाच पुतळा होय. या शहराला ललामभूत असे जे थोर पुरुष आजपर्यंत होऊन गेले, त्यांचा पुतळा उभारण्याइतकी त्या वेळीं म्युनिसिपालिटीच्या सभासदांत उत्कटता प्रकट झाली नाहीं म्हणा, किंवा म्युनिसिपालिटीच्या कर्तव्या-

धिकाराचें क्षेत्र किती विविध व विस्तृत आहे याची कल्पना आली नव्हती म्हणा; कारण कांहींहि असो, आजपर्यंत पुणें शहरांत पुतळ्याच्या स्वरूपाचें स्मारक झालेलें नाहीं एवढें खरें. आतां मात्र हा प्रारंभ झाला आहे. आणि यापुढें ही म्युनिसिपालिटी आपलें हें नवें कर्तव्य बजावण्यांत कसूर करणार नाहीं; मात्र त्यांत कर देणाऱ्यांच्या पैशाचा दुरुपयोग न होईल इतकी खबरदारी घेणें हेंहि कर देणाऱ्या लोकांच्या प्रतिनिधींचें कर्तव्यच आहे.

"या पुतळ्याचा पूर्वेतिहास आज छापून वांटण्यांत आला आहे त्यावरून या स्मारकाला सर्व पक्षांच्या लोकनियुक्त सभासदांची कशी सहानुभूति आहे तें कळून येईल. त्याचप्रमाणें कांहीं थोडक्याशा सरकारनियुक्त सभासदांनीं या कार्याला विरोध केला असला तरी प्रारंभींच्या तैलचित्राच्या कल्पनेपासून वाढत वाढत जाऊन पुढें पूर्ण आकाराच्या संगमरवरी पुतळ्यापर्यंत या स्मारकाची उत्क्रान्ति कशी होत गेली याचाहि वृत्तांत त्यांत पहावयास मिळेल. म्युनिसिपालिटीनें लोकमान्यांचें असें अपूर्व स्मारक करण्याचें ठरल्यापासून तें सरकारच्या डोळ्यांत सलूं लागलें व त्यास सरकारी विरोध सुरू झाला. ज्या सभासदांनीं पुतळ्याच्या स्मारकाच्या कल्पनेला अनुमति दिली त्यांच्यावर, पुतळ्याच्या प्राथमिक खर्चाकरितां शिल्पकार श्रीयुत वाघ यांस जी सहा हजार रुपयांची रक्कम देण्यांत आली ती भरून देण्याविषयीं, दिवाणी कोर्टांत फिर्याद झाली आहे; आणि या कामीं आणखी अधिक खर्च न करण्याविषयीं मनाई हुकूमहि देण्यांत आला आहे. उलट असलें स्मारक करण्याचा म्युनिसिपालिटीला हक्कच आहे व आपण जो खर्च केला तो यथायोग्य आहे असं म्युनिसिपल सभासदांचेंहि ठाम मत आहे."

"अशा रीतीनें हा वाद कोर्टांत घोटाळत असला तरी आजच्या कार्याला त्याचा उपसर्ग पोंचूं शकत नाहीं. सरकारच्या या अडथळ्यामुळें म्युनिसिपालिटी ज्या गोत्यांत पडली आहे त्यांतून तिची सुटका करण्यासाठीं **केसरी व मराठा** संस्थेनें पुतळ्याच्या खर्चाची राहिलेली रक्कम ९ हजार आणि पुतळा उभारण्याला लागणारा सर्व खर्च देण्याचें कबूल केलें व कमिटीचा मार्ग मोकळा करून दिला. अर्थातच कोर्टाच्या मनाईहुकमाची तलवार कमिटीवर लटकत असली तरी आज आम्ही या ठिकाणीं हें कार्य पार पाडण्याकरितां निर्धास्तपणें जमलों आहों.

"लोकमान्यांच्या जन्मकाळचा असाच गुणच आहे कीं, त्यांच्या प्रत्येक कार्यांत प्रारंभीं विघ्नें व अडथळा यांचा डोंगर येऊन पडावा. परंतु असले डोंगर बाजूस ढकलून ते कृतकार्य होत असत म्हणूनच त्यांची कीर्ति शुक्लेंदुवत् वृद्धिंगत होत गेली. आणि हा दैवाचा योगायोग त्यांच्या पश्चात्‌हि त्यांच्या मार्गांत विघ्नें आणीतच आहे. पण तीं विघ्नेंहि पूर्वींसारखींच विरघळून जात आहेत.

"असो. पुणें शहर म्युनिसिपालिटीकडून **लोकमान्य टिळकांचा** बहुमान होण्याचा हाच कांहीं पहिला प्रसंग नव्हे. विलायतच्या शिष्टाईहून टिळक परत आले

त्या वेळीं याच म्युनिसिपालिटीनें त्यांस प्रथम मानपत्र दिलें; आणि बड्या सरकारी अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतरांना मानपत्र देण्याचा पहिला पायंडाहि त्याच वेळीं घातला. म्युनिसिपालिटी म्हणजे कांहीं केवळ नागरिकांकडून कर वसूल करणारें व त्या कराचा दिवाबत्ती, रस्तेदुरुस्ती एवढ्याच कामांकडे खर्च करणारें, खराट्याचें स्वराज्य नव्हे. नागरिकांच्या, राजकीय, सामाजिक व आर्थिक आकांक्षांशीं म्युनिसिपालिटीचें जर तादात्म्य न होईल तर ती स्थानिक-स्वराज्य या नांवाला पात्रच ठरणार नाहीं. या संबंधांत सरकार व जनता यांच्यांतला विरोध आतां अगदीं निकरावर आला आहे. या झगड्यांत कायदे-कौन्सिलें कमिटीला साहाय्य करण्यास पुढें सरसावतील; आणि तूर्त जरी आपल्या म्युनिसिपालिटीवर सरकारच्या विरोधाची छाया पसरली असली तरी अखेरीस आम्ही हा दावा जिंकू असाच माझा पूर्ण भरंवसा आहे.

"पंडितजी, आपण आजमितीला ले. असेंब्लींतील लोकपक्षाचे पुढारी व नेते आहां; आणि त्या असेंब्लीच्या रचनेंत कितीहि दोष किंवा अपूर्णता असली तरी आजमितीला या देशांतील अखिल जनतेचें तें एक सनदशीर मुख आहे. अशा असेंब्लीच्या पुढाऱ्यास या समारंभाचें अध्वर्युत्व देण्यांत पुणें म्युनिसिपालिटीनें आपला गौरव केला असें म्हणण्यापेक्षां स्वतःचाच गौरव करून घेतला असें म्हटल्यास तें अधिक शोभेल. लोकमान्यांच्या हयातींत आपणास प्रत्यक्ष त्यांच्या सहवासांत कार्य करण्याचा प्रसंग आला नाहीं; व आज जरी ते हयात असते तरी इतक्या वृद्धापकाळीं ते स्वतः असेंब्लींत शिरलेहि नसते. तथापि कौन्सिलांत असो अगर कौन्सिलाबाहेर असो, राजकारण व स्थानिक-स्वराज्य-व्यवस्था हीं दोनहि परस्परांस पूरक व पोषक अशींच आहेत असेंच त्यांचें मत होतें. स्वराज्याची त्यांची आकांक्षा अतृप्त राहिली असून आज या पुतळ्याच्या रूपानें आम्ही त्यांच्याविषयीं आपली भक्ति व्यक्त करीत आहोंत, आणि या स्वरूपांत लोकमान्यहि स्वराज्याची मार्ग-प्रतीक्षा करीत आहेत. अशा रीतीनें भूतकाल व भविष्यकाल यांची सांगड घालणारा हा पुतळा आपण आतां अनावृत करा अशी मी आपणास विनंति करतों."

# टिळकचरित्राच्या टीकाकारांस उत्तर

— १ —

## ज्ञानप्रकाशाची टीका

केसरी, ता. २९ जुलै १९२४

गतवर्षी याच सुमारास मीं लिहिलेल्या टिळकचरित्राचा पहिला खंड प्रसिद्ध होऊन तो वाचकांचे हातीं पडला. तेव्हांपासून त्यावर अनुकूल प्रतिकूल असे बरेच अभिप्राय प्रगट झाले. कांहीं मजकडे खासगी पत्रद्वारें आले व कांहीं वृत्त-पत्रांतून व मासिकांतून प्रगट झाले. पैकीं अनुकूल अभिप्राय ज्यांच्याकडून आले त्यांचा मी आभारी आहेंच; पण अनुकूल अभिप्रायांपेक्षांहि प्रतिकूल अभिप्रायांचें महत्त्व मला एका दृष्टीनें अधिक वाटतें. कारण माझी अशी पक्की खात्री आहे कीं, ज्यांनीं माझें पुस्तक टीका करण्याच्या दृष्टीनें वाचलें त्यांनीं तें जितक्या बारीक नजरेनें वाचलें असेल तितकें अनुकूल अभिप्राय देणारांनींहि कदाचित् वाचलें नसेल. प्रतिकूल टीकांमध्यें दोन टीकांचा मुख्यतः समावेश होतो. एक दैनिक ज्ञानप्रकाशांत १४+३ अंकांत आलेली श्री० आंबेकर यांची व दुसरी विविधज्ञान-विस्तारांत गेल्या जानेवारी ते मेचे दरम्यान चार अंकांत आलेली श्री० नरहर रघुनाथ फाटक यांची, या दोनहि टीकांना यथाक्रम उत्तर देण्याचें योजिलें आहे.

ज्ञानप्रकाश व कै० टिळक यांचें त्यांच्या हयातींत विळ्याभोपळ्याइतकें सरळ होतें हें प्रसिद्धच आहे आणि प्रस्तुत ग्रंथांत टिळकांचें सार्वजनिक चरित्रच विशेषतः लिहिलेलें असल्यानें, तो ग्रंथ प्रसिद्ध झाल्याबरोबर ज्ञानप्रकाशकारांनीं टीका लिहिण्यास लेखणी हातीं घेतली व ग्रंथावर टीका करण्याच्या निमित्तानें चरित्र-विषयावर पुनः एकवार सडकून वाक्प्रहार करण्याची संधि साधली यांत नवल नाहीं. किंबहुना ही टीका माझ्या ग्रंथावर अशी फार थोडी असून टिळकांवर अशीच पुष्कळ आहे. यामुळें टीकेला उत्तर देण्याचें माझ्या स्वतःपुरतें काम थोडें हलकें झालें आहे. कारण टीकेंत ग्रंथकाराची अमुक एक चूक अशी विशेष न दाख-वितां टीकाकारांनीं चरित्राधारें केवळ टिळकांविषयीं स्वतःचें मतप्रतिपादनच केलें, आणि अशा मतांना उत्तर देणें व तीं बदलू पाहणें हें अशक्य असतें.

असो. स्वतः चरित्रग्रंथासंबंधानें ज्ञानप्रकाशकारांची मुख्य तक्रार अशी आहे कीं, "तो विनाकारण मोठा व बेढब झाला असून शिवाय त्यांत चरित्राचें तात्त्विक विवेचन केलेलें नाहीं, तें चरित्रसमाप्तीवरच अवलंबून ठेवलेलें आहे. टिळकांभोंवतीं जो चळवळींचा परिवार उभा केला आहे तो एरवीं व्यक्तिशः टिळकांच्या चरित्राला वाचकवर्ग भरपूर मिळाला नसता म्हणून! कित्येक जुन्या वादांच्या कढीला विना-कारण ऊत आणला आहे." इ०.

## बेढब कीं विस्तृत ?

याला उत्तर इतकेंच कीं, टिळकांच्या व्यक्तिशः चरित्राबरोबर त्यांचा सार्वजनिक इतिहास पुढील पिढयांना कळावा म्हणून मीं चरित्रग्रंथाची मांडणी मुद्दाम विस्तृत अशीच केली आहे आणि याच कारणानें अनेक जुन्या चळवळींचा त्रोटक इतिहासहि देणें जरूर झालें आहे. जुन्या गोष्टी चालू पिढीला माहीत आहेत आणि पुढच्या पिढीला त्या कंटाळवाण्या वाटतील. ही विचारसरणी ग्राह्य धरली तर कोणाचेंच चरित्र लिहिण्याचें कारण उरणार नाहीं. पण हें चरित्र कदाचित् टिळकांचें म्हणूनच त्याचा व्यापकपणा हा ज्ञानप्रकाशकारांना बेढब लठ्ठपणा दिसतो, व जुन्या हकीगती लिहिणें हें शिळ्या कढीला ऊत आणण्यासारखें वाटतें. ही टीका लिहिणारे श्री० आंबेकर यांनीं स्वतः कै० हरि नारायण आपटे यांचें 'संक्षिप्त' म्हणून चरित्र लिहिलें आहे तेंच ११० पानांचें भरलें आहे. शिवाय टिळकांच्या मानानें आपट्यांच्या चरित्रांत सार्वजनिक चळवळींना मुळांतच पुष्कळ अधिक संक्षेप पडलेला होता ही गोष्टदेखील लक्षांत ठेवली पाहिजे. तसेंच ज्ञानप्रकाशकारांनीं वाखाणलेल्या फाटककृत माधवरावजी रानडे यांच्या चरित्रांत, त्यांनीं या बाबतींत माझ्या पुस्तकास नांवें ठेविलेल्या गोष्टी, तशाच आहेत कीं नाहींत हेंहि वाचकांनीं पहावें.

## विरोधबुद्धीचा दृष्टिदोष

टिळक व केळकर या दोनहि व्यक्ति मनांतून नापसंत असल्यामुळेंच केवळ ज्ञानप्रकाशकारांनीं अशी विरोधी टीका केली हें उघड आहे. याच कारणानें टिळकांच्या उद्योगांना उपद्व्याप, तेजस्वीपणाला कलहप्रियता, टिळकांनीं जिंकलेल्या सुप्रसिद्ध वादांना परोपजीवि चळवळी वगैरे विशेषणें लावलीं आहेत. " कलहानें प्रेरणा न मिळालेल्या टिळकांच्या चळवळींचें वर्णन देऊन टिळकांचें चरित्र कोणी लिहील तर त्याला दहापांच पानेंहि लिहितां येणार नाहींत ! " असें स्पष्ट विधान ज्ञानप्रकाशकारांनीं टीकेच्या भरांत केलें आहे. येवढें सांगितलें म्हणजे त्यांच्या टीकेच्या धोरणाविषयीं वेगळें कांहींच सांगावयास नको. टिळकांच्या प्रत्येक कार्याला विध्वंसक हें विशेषण त्यांचें ठेवलेलेंच आहे. राष्ट्रीय उत्सवांचें मुख्य श्रेय टिळकांना असतां " या उत्सवांची जबाबदारी आपोआपच टिळकांच्या अंगाला येऊन चिकटली " असें विकृत वर्णन त्यांनीं दिलें आहे ! टिळकांचा लोकसंग्रह अमान्य करवेना म्हणून टिळकांनीं तो स्वतःच्या बडेजावीच्या हेतूनें केला व रानड्यांनीं मात्र लोकसंग्रह शुद्ध समाजोन्नतीच्या हेतूनें केला असें म्हणण्यापर्यंत ह्या टीकाकारांची धाव गेलेली आहे ! रानडे मात्र आपल्या सर्व परिवाराला सांभाळून घेऊन जात ! आणि टिळक हे जसे कांहीं आपल्या मित्रांना दगा देत असत किंवा सरकारच्या स्वाधीन करीत असत ! एकाच गोष्टीचा उल्लेख करावयाचा तर ती अशी कीं, रानड्यांच्याजवळ कोणतीहि गोष्ट सहसा गुप्त रहात नसे व एकाचें बोलणें दुसऱ्याला सांगून व त्याचें याला

सांगून दोघांनाहि तोंडघशीं पाडावें या रानड्यांच्या स्वभावाची पुष्कळ परिचित लोक साक्ष देतील असें आम्हांस वाटतें.

## टिळकांची इस्टेट !

टीकेच्या भरांत ज्ञानप्रकाशकारांनीं टिळकांविषयीं याहीपेक्षां अधिक वाईट विधानें केलेलीं आहेत. उदाहरणार्थ, " टिळकांनीं मागें इस्टेट राखली व एखाद्या विड्यांच्या कारखान्याप्रमाणें केसरीचा कारखाना हा व्यक्तीच्या मालकीचा केला आहे " असें हे टीकाकार लिहितात ! पण वस्तुस्थिति लोकांना माहीतच आहे. टिळकांनीं केसरी घेतल्यापासून सात-आठ वर्षेंपर्यंत तो कर्जांत होता व त्यांतील एक पैहि त्यांनीं संसाराला लावली नाहीं. १८९७ सालच्या खटल्यांत त्यांच्याजवळ स्वतःचा बचाव करण्यास पैसा नव्हता म्हणून तो सार्वजनिक वर्गणीनें परप्रांतीय लोकांनीं जमविला. १९०० पासून पुढें अनेक वर्षांत त्यांनीं केसरीच्या शिलकेंतून पन्नास-साठ हजार रुपये केवळ मित्रकार्यार्थ, ताईमहाराजांच्या खटल्यांत खर्चिले. कारण टिळक हें दत्तकाचें भांडण अंगाबाहेर टाकण्यास तयार होते तर त्यांच्यावर खटलाहि झाला नसता. हे पैसे त्यांना पुढें खटला जिंकला गेल्यामुळें परत मिळाले. हा अर्थात् त्यांचा दोष नव्हे. पण खटला अखेर बुडता तर या सर्व रकमेला त्यांना मुकावें लागलें असतें. सन १९०० पासून १९२० पर्यंत टिळकांनीं केवळ खासगी मालकीच्या असलेल्या त्यांच्या केसरीच्या उत्पन्नांतून सार्वजनिक कामावर किती हजार रुपये खर्च केले याची एकदां ज्ञानप्रकाशकारांनीं खासगी चौकशी करावी म्हणजे त्यांचें त्यांनाच आश्चर्य वाटेल ! आम्हाला या रकमेचा अंदाज आहे व जरूरच पडेल तर तो आम्ही प्रसिद्धहि करूं. चिरोल-केस उपस्थित झाली तेव्हां प्रथम कोर्टखर्चाकरितां टिळकांनीं आपला वाडा गहाण लावून कर्ज काढलें ही गोष्ट प्रसिद्ध आहे. केसरीच्या उत्पन्नांतून त्यांनीं बरीचशी रक्कम गायकवाडवाड्यांतील छापखाना व वर्तमानपत्राच्या कचेऱ्यांच्या इमारती बांधण्याकरितां व छापखान्याची यंत्रसामुग्री वगैरे घेण्याकरितां खर्च केली. मरणापूर्वीं आधीं दोन वर्षें केलेल्या मृत्युपत्रांत त्यांनीं केसरी व मराठा ही संस्था ट्रस्टींची मिळकत करून ठेवली होती; व १९२० सालचे अखेर आपल्या चिरंजीवांची स्वतंत्र व्यवस्था करून केसरी–मराठ्याचा चाळीस वर्षांचा समारंभ करून जाहीर रीतीनें तीं पत्रें, छापखाना व त्यासंबंधीं सर्व मिळकत मनानें योजलेल्या ट्रस्टींच्या स्वाधीन ते करणार होते ही गोष्ट त्यांच्या टीकाकारांनींहि ऐकली असेल. पण त्याच सालीं ऑगस्टमध्यें टिळक वारले, व त्यांची ही इच्छा माहीत असल्यानें त्यांच्या चिरंजीवांनींहि ती इच्छा पूर्ण करण्याकरितां केसरी-मराठ्याचें ट्रस्टडीड केलें व या मिळकतीवर स्वत्वनिवृत्ति केली. टीकाकारांच्या म्हणण्याप्रमाणें केसरी हा इतका फायदेशीर असतां टिळकांना अखेर आपल्या चिरंजीवांना जी मिळकत खासगी म्हणून ठेवतां आली ती माधवरावजी रानडे यांनीं मागें ठेवलेल्या मिळकतीपेक्षां फारच कमी

आहे हें सहज सिद्ध करतां येईल. या वादांत आम्ही खोल शिरूं इच्छीत नाहीं; पण प्रसंगच पडला तर दोनहि आंकडे आम्ही प्रसिद्ध करूं. तसेंच ज्ञानप्रकाशकारांचे गुरु कै० गोखले यांना मागें फक्त दोन मुलींचं वारस असतां गोखल्यांनीं त्यांना किती मिळकत मागें ठेवली याचाहि विचार प्रस्तुत टीका करतांना ज्ञानप्रकाशकारांनीं करावयास पाहिजे होता. आमच्या समजुतीप्रमाणें रानडे यांनीं धर्मार्थ म्हणून ज्या देणग्या दिल्या त्यांवरील स्वतःची पूर्ण मालकी न घालवितां त्यांवरील फक्त नक्त व्याजच दरसाल देऊं केलें होतें. रानडे यांनीं सार्वजनिक देणग्यांकरितां ठेवलेल्या रकमांचें व्याज दरसाल फार तर आठनऊशें रुपये होत असेल. टिळकांना नित्य लिहीत बसण्याच्या केसरीचें उत्पन्न होतें तर गोखल्यांना एकदांच करून ठेवलेल्या अंकगणिताबद्दल मॅकमिलन कंपनीकडून मोठें वर्षासन चालू होतें. केसरीच्या कारखान्याला विद्यांचा कारखाना म्हणणाऱ्यांना मी असें जाहीर आव्हान करतों कीं, रानड्यांनीं आणि गोखल्यांनीं दिलेल्या सार्वजनिक देणग्याच्या आणि मागें वारसास ठेवलेल्या इस्टेटीच्या रकमा त्यांनीं प्रसिद्ध कराव्या व तसें करण्यास ते तयार असतील तर टिळकांनीं सार्वजनिक कार्यांत पैसा किती खर्चला व मुलांस काय ठेवलें याचे आंकडे प्रसिद्ध करण्यास आम्हीहि तयार आहों. तसें झाल्यास अधिक स्वार्थत्यागी कोण होते याची जगच परस्पर पारख करील. हें सर्व लिहिणें मनाला अप्रिय वाटतें; पण ज्ञानप्रकाशकारांनीं टिळकांच्या मरणोत्तर केलेल्या विषारी टीकेला उत्तर म्हणून हें करणें जरूर आहे. टीकेच्या भरांत सार्वजनिक मतांचा प्रश्न सोडून टिळकांवर धनलोभाचा मिथ्या आरोप करून हल्ला केला म्हणूनच हें लिहिणें आम्हांस प्राप्त झालें व ज्ञानप्रकाशकारांची इच्छा असेल तर त्यांनीं वर दर्शविल्याप्रमाणें माहिती लोकांपुढें मांडून टिळक-रानडे व टिळक-गोखले यांच्या तुलनेस सिद्ध व्हावें व तसें करण्यास त्यांची तयारी नसेल तर आपले आरोप परत घ्यावेत. ही मळमळ एकदां केव्हां तरी निघून गेलीच पाहिजे !

## रानडे-टिळकांचा लोकसंग्रह

टिळकांनीं स्वतःच्या अंगावर घेऊन एकादें काम केलें असें क्वचित् घडलें असें ज्ञानप्रकाशकार म्हणतात. हें विधान किती खोटें आहे याची जग परस्पर साक्ष देईल. हिंदुस्थानांत टिळकांची कीर्ति झाली ती सार्वजनिक कार्यांच्या आयत्या शिधोरीवर ताजा स्वयंपाक करून खाल्ल्यानें किंवा नुसत्या भांडखोरपणानें खचित झाली नसती. टिळकांचा जर " नुसता हातावरील प्रपंच " तर रानड्यांनीं तरी अशी काय चळवळीची किंवा उद्योगाची गर्भश्रीमंती आपणाबरोबर आणली होती? रानडेहि आपल्या परीनें अत्यंत उद्योगी होते ही गोष्ट प्रसिद्ध आहे. पण त्यांनीं तरी अशा कोणत्या नव्या कायमच्या संस्था निर्माण केल्या ? व स्वतः अंगावर कामें घेऊन तीं निश्चयानें पार पाडलीं ? रानड्यांचा लेखन-वाचनाचा व्यवसाय प्रचंड होता, त्यांची सल्लामसलत अनेक सार्वजनिक कामांत घेतली जाई, व जो कोणी

नवा मनुष्य भेटेल त्याला माहिती देणें व त्याजकडून ती घेणें या गोष्टी करण्याची त्यांना मोठी हौस असे हें आम्हांला ठाऊक आहे. पण अमुक एक मोठी गोष्ट किंवा चळवळ त्यांनीं स्वतः केली किंवा संस्था चालविली असें असेल तर कोणींहि सांगावें! गोखल्यांनीं सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी काढली व शपथ देऊन त्या सोसायटीचे कांहीं सभासद केले, आणि एक मोठी इमारत बांधून ग्रंथसंग्रह केला हें त्यांना भूषणावह आहे. पण टिळकांनीं एखादी सोसायटी या नांवानें कायमची संस्था काढली नसली तरी सर्व्हंट्स् ऑफ इंडियाचे मूठभर सभासद गोखल्यांविषयीं जो प्रेमादर बाळगतात व त्यांचें जें कार्य करतात तसा प्रेमादर टिळकांविषयीं बाळगणारीं व पडेल तेव्हां त्यांच्या कामास हजर असणारीं भक्तिनिष्ठ माणसें बिनपदवीधराप्रमाणें पदवीधरहि सर्वत्र शेंकडों पसरलीं आहेत. टिळकांनीं होमरूल लीग काढली. ही संस्थाच नव्हे काय? शिवाय टिळकांचा सांप्रदाय ही टिळकांची एक मोठी सोसायटीच आहे. फक्त हुजुरकचेरींत रजिस्टर ठेवून शपथविधीनें त्यावर नांवें नोंदण्यांत येत नाहींत इतकाच काय तो फरक. रानडयांनीं संस्थानिकांपासून कारकुनांपर्यंत लोकसंग्रह केला असें सांगण्यांत आलें आहे! टिळकांच्या तीव्र राजकारणामुळें संस्थानिक लोक त्यांच्याशीं उघड संबंध ठेवण्यास पुढें अर्थातच भिऊं लागले. पण १८९७ पूर्वीं संस्थानिक लोक टिळकांच्या घरीं उतरून पाहुणचार घेत हें मी सिद्ध करून देईन. दुसऱ्या टोंकाला कारकूनच काय पण शेतकरी लंगोटेदेखील टिळकांच्या लोकसंग्रहांत असत. सरकारी नोकर टिळकांनाहि मनांतून वश होते. उलट ज्ञानप्रकाशकारांच्या गुरूंचा म्हणजे गोखल्यांचा लोकसंग्रह कशा प्रकारचा होता हेंहि लोकांना विदित आहे. गोखल्यांइतकेच टिळकहि कामांत गढलेले असत. पण वेळ ठरवूनच भेटणें, चिठ्या लिहून वर्दी लावणें व देवडीवर प्रतिष्ठित लोकांनींहि तिष्ठत बसणें या ज्या गोष्टी गोखल्यांच्या रानांतल्या बंगल्यांतहि दिवसांदेखील घडून येत, त्या भरवस्तींतल्या टिळकांच्या घरांत मध्यरात्रींहि घडून येत नसत. स्वतः टिळक राजेलोकांच्या कच्छपीं कधीं लागले नाहींत किंवा आपला लोकसंग्रह सजविण्याकरितां त्यांनीं कुणबी शेतकरी यांनाहि कधीं मुद्दाम निमंत्रणें दिलीं नाहींत. पण मोठमोठ्या राजेरजवाड्यांपासून कनिष्ठ जातीच्या बेरड लोकांपर्यंत सर्वांना अशी खात्री वाटे कीं, आमच्या हिताकरितां टिळक सरकाराशीं जीव तोडून भांडत आहेत व तसेच आजन्म भांडत राहतील. या गोष्टीची साक्ष चंदावरकरांनींच दिली आहे.

## टिळकांचीं 'जेजुइटिकल' तत्त्वें

टिळकांनीं आपल्या राजिनाम्यांत जेजुइटिकल तत्त्वांचा उल्लेख केल्यामुळें त्यांच्यावर ज्ञानप्रकाशकार फार घसरले आहेत. जेजुइटिकल याचा स्थूल अर्थ घेतल्यास तो न्यू स्कूलच्या स्वार्थत्यागी विद्वान् लोकांनीं काढलेल्या संस्थेला लागू होण्यास हरकत नाहीं. सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीचें वर्णन अशाच स्थूल शब्दांनीं

लोक करतात. गोखल्यांच्या कित्येक इंग्रज लेखांनीं त्यांच्या सोसायटीचें वर्णन हाच दाखला देऊन केल्याचेंहि प्रसिद्ध आहे. पण 'टिळकांनीं आपलें पांच हजारांचें पितृधन न्यू स्कूलला देऊन टाकलें नाहीं' म्हणून जर त्या संस्थेचें तें वर्णन खोटें, तर सर्व्हंट्स् ऑफ इंडियाच्या सभासदांनीं तरी आपली वडिलार्जित इस्टेट सोसायटीला कितीशी देऊन टाकली आहे ? मग आपल्याहि सोसायटीचें साहेब लोकांनीं केलेलें हें वर्णन खोटें असा पुकारा सोसायटीवाल्यांनीं कधीं केला आहे काय ? आगरकर निर्धन जन्माला आले आणि निर्धनच मेले ही गोष्ट खरी; परंतु त्यांच्या 'विकारविलसित' नाटकांत किंवा 'वाक्यमीमांसे'त किंवा 'सुधारकां'त जर पुष्कळसा फायदा झाला असता तर तो सर्व त्यांनीं तरी सार्वजनिक कार्यालाच सगळा दिला असता कीं नाहीं याचें उत्तर कोणीहि सहज देऊं शकेल. गरिबी होती तेव्हां टिळकांनीं गरिबीप्रमाणें दिवस काढले व पुढें वर्तमानपत्रांत फायदा उरूं लागला तेव्हां आपला खासगी खर्चहि थोड्या अधिक सढळ हातानें केला, ही गोष्ट नाकबूल करण्यांत हंशील नाहीं. पण साधनें जसजशीं अधिक अनुकूल होतील तसतसा त्यांचा अधिक उपयोग केल्यानें स्वार्थत्यागाचें मुळांतलें तत्त्व अजीबात सुटतें किंवा त्याला धनलोभ असें नांव प्राप्त होतें ही गोष्टच खोटी आहे. या बाबतींत टिळकांना नांवें ठेवावयाचीं तर रानड्यांची गोष्टच नको, पण गोखले तरी स्वार्थत्यागी कसे ठरतात ? न्यू स्कुलांतील गोखले, फर्ग्युसन कॉलेजांतील गोखले, व कौन्सिलांतील गोखले यांच्या खासगी राहणींत क्रमानें कसा फरक पडत गेला हेंहि सर्वश्रुतच आहे. म० गांधी हे हल्लीं मोटारशिवाय हिंडत नाहींत किंवा त्यांच्या रोजच्या खुराकाला मध्यम स्थितींतील मनुष्याच्या भाजीभाकरीच्या आहाराच्या खर्चापेक्षां अधिक पैसे पडतात म्हणून त्यांचा स्वार्थत्याग फुकट गेला असें कोण म्हणेल ? नेसलेल्या फडक्याची किंमत आणे आठ पण वाहनाची किंमत १०,००० रुपये हें व्यस्त प्रमाण काय दर्शवितें ? रानड्यांचा स्वार्थत्याग तर प्रसिद्धच आहे ! तीस वर्षांच्या उमरीच्या आंत त्यांना महिना ८०० रुपये पगार होता व अखेर तो ३७५० पर्यंत वाढला. त्या मानानें रानड्यांनीं सार्वजनिकरीत्या किती खर्च करावयाला पाहिजे होता ? पण खर्चाच्या बाबतींत रानड्यांची मूठ घट्ट होती हें सर्वश्रुत आहे. तपकिरीची डबी रुप्याची ठेवण्याइतके पैसे त्यांजजवळ नव्हते असें नाहीं. पण जेथें जस्ती डबीनें भागेल तेथें रुप्याची कोण घेतो ! यांतच त्यांच्या संसारविषयक अर्थशास्त्राची खरी खूणगांठ आहे. सार्वजनिक खर्चाच्या योजना किंवा छपाईचीं बिलें वगैरे बाबी उत्पन्न झाल्या असतां आपली ऐपत व आपलें महत्त्व यांना अनुसरून व शोभेल अशी खर्चाची जोखीम धडाडीनें आपल्या शिरावर न घेतां रानडे हे परस्पर बोटें दाखवीत, व छापखानेवालेहि त्यांनीं सांगितलेलें इतरांचें काम जरा जपूनच पत्करीत. मितव्यय हा चांगला खरा; पण मितव्ययानें सांठविलेला पैसा कोणीं उदार हातानें परोपकारार्थ खर्चला तरच त्या मितव्ययाचें कौतुक होतें. प्रो० कर्वे हे हजारों रुपये

संस्थेकरितां जमवीत असतां जरूर तेथेंच तांगा करतात, व प्रसंगविशेषीं शहरांतूनहि बैलाच्या एक्क्यांत देखिल बसून जातात, हें पुष्कळांनीं पाहिलें आहे. या तुलनात्मक सर्व अप्रिय गोष्टीदेखील, ज्ञानप्रकाशकारांनीं टिळकांना खोटा दोष देऊन खपली काढली, म्हणूनच मला लिहाव्या लागत आहेत. एरवीं इतर दृष्टींनीं रानडे व गोखले यांचेसंबंधानें माझी किती आदरबुद्धि आहे हें लोक जाणतातच.

## होळकरांची देणगी

टीकेच्या नवव्या लेखांत ज्ञानप्रकाशकारांनीं होळकरांच्या देणगीबद्दल चर्चा केली आहे. त्यांत ते परस्परविरोधी अशीं विधानें करतात. एक विधान असें कीं, आगरकर व टिळक या दोघांना होळकरांनीं समक्ष बोलावून सातशें रुपये दिले. त्यांत चारशें रुपये आगरकरांना खासगी म्हणूनच दिले; व लगेच ते दुसरें विधान असें करतात कीं, टिळकांनीं न्यूस्कूलकडे आपली रक्कम देऊन टाकली ती मुळीं त्यांची नव्हतीच. पण कोणासहि केवळ क्षणभर विचार केला असतां असें दिसून येईल कीं, हें बोलणें असंबद्ध आहे. टिळक व आगरकर या दोघांनाच होळकरांनीं बोलावण्याचें कारण असें कीं, संस्थानिक प्रकरणीं त्यांना शिक्षा भोगावी लागली याकरितां कांहींतरी देणगीनें त्यांचा सत्कार करावा असें होळकरांस वाटलें असावें. ही गोष्ट खरी असेल तर सातशें रुपयांत टिळक व आगरकर या दोघांचा सारखाच हिस्सा उघड ठरतो, आणि टिळकांनीं आपली रक्कम सोसायटीला दिली हा स्वार्थ-त्यागहि ठरतो. आतां टिळकांपेक्षां आगरकरांना या वेळीं रकमेची गरज अधिक असेल हेंहि खरें आहे. कोणी म्हणतात कीं, त्यांच्या मातोश्रीला काशीयात्रेला पैसे पाहिजे होते म्हणून ते त्यांनीं खासगीकडे घेतले. सोसायटींत भरले असते तर तिकडून अशा कामाकरितां एवढी रक्कम त्यांना मिळतीना. पण देणगी खाजगी रीतीनें दिली असेल तर आगरकरांनीं आपला हिस्सा घेतला यांत कांहीं चूक नाहीं. टिळकांनीं, सद्बुद्धीनें म्हणा किंवा कुबुद्धीनें म्हणा, आपली रक्कम सोसायटीला दिली; पण ती त्यांच्या हिश्शाची नव्हतीच असें मात्र ठरत नाहीं. उलट सगळीच रक्कम संस्थेला होळकरांनीं दिली असें असेल तर टिळकांचा या बाबतींत स्वार्थत्याग राहत नाहीं खरा; पण आगरकरांनीं मात्र, विशेष गरजेमुळें कां होईना, पण ती देणगी चुकून खासगी मानली असें सहज ठरतें. असो. या बाबतींतला खरा प्रकार स्वतः आम्हास कांहींच माहीत नाहीं. पण त्याची हकीकत टिळकांच्या राजिनाम्यांत आहे; व कै० वासुदेवशास्त्री खरे वगैरे लोकांनीं सांगितलेली प्रसिद्ध आहे. ज्ञान-प्रकाशकारांच्या टीकेला आमचें उत्तर इतकेंच कीं, त्यांचींच विधानें परस्पर विरुद्ध आहेत. टिळकांनीं या बाबतींत काय केलें हें प्रसिद्ध आहे. फक्त तें कुत्सितपणानें केलें होतें कीं काय, इतकाच प्रश्न उरतो व याचें उत्तर वाचकवर्ग आपापल्या मनोभावनेप्रमाणेंच देईल.

## टिळक-गोखल्यांची तुलना

१८९७ सालीं खटला सुरू असतां टिळक माफी लिहून देण्यास तयार होते असें ज्ञानप्रकाशकारांनीं लिहिलें आहे, पण त्याला त्यांनीं कांहीं पुरावा दिला नाहीं. टिळक माफी मागण्यास तयार होतेच तर मग ती कां पटली नाहीं ? व खटला पुढें कां चालला ? टिळक जी माफी मागण्यास तयार होते तिच्याहून आणखी कोणते शब्द सरकारला पाहिजे होते ही माहिती ज्ञानप्रकाशकारांनीं दिली नाहीं. टिळक माफी मागण्यास तयार होते असेंहि मानलें तरी अखेर त्यांनीं माफी मागितली नाहीं व शेवटीं त्यांना शिक्षा झाली येवढ्या गोष्टी सिद्ध आहेत. या व्यतिरिक्त पुढें मांडलेला मुद्दा शाबीत करण्याची जबाबदारी प्रकाशकारांवरच पडते. " मी कांहीं असा गोखल्यांच्यासारखा कच्चा नाहीं " असें टिळकांनीं मोतीलाल घोस यांस लिहिल्याचें तेव्हांच प्रसिद्ध झालें होतें. या लिहिण्यांत अहंकाराचा दोष येत असेल पण आपण अपमानास्पद माफी मागण्यास तयार आहों अशी टिळकांची भावना असती तर असे उपरोधिक शब्द त्यांच्या हातून लिहूनच गेले नसते, हेंच खरें प्रत्यंतर होय. गोखल्यांनीं मागितलेली माफी सरकारनें स्वीकारण्यासारखी होती, व स्नेह्यांच्या माफी मागण्याच्या सल्लयाला टिळकांनीं प्रथम रुकार दिला होता असें घेऊन चाललें तरी ते जी माफी मागण्यास तयार होते ती मात्र सरकारास पटण्या-सारखी नव्हती म्हणून स्वीकारली गेली नाहीं, असें उघड ठरत नाहीं काय ? या दोन माफींच्या मसुद्यांतील अंतर तेंच टिळक व गोखले यांच्यांतील अंतर असें कोणी म्हटल्यास त्यांत काय वावगें ?

## टिळकांचे परस्परविरुद्ध गुण

उपसंहाराच्या लेखांत, ज्ञानप्रकाशकारांनीं असें म्हटलें आहे कीं, " टिळकां-संबंधीं निरनिराळ्या लेखकांनीं त्यांचे इतके निरनिराळे गुण वर्णिले आहेत कीं, इतके परस्परभिन्न गुण धारण करणारी व्यक्ति खरोखरच झाली असेल कीं नाहीं असाहि भावी पिढ्यांना संशय येईल." पण अशानें टिळकांच्या गुणांची यादी फुगते याचें वाईट वाटूनच ज्ञानप्रकाशकारांनीं हें विधान केलें असावें. कारण हे टीकाकार म्हणजे आंबेकर यांनीं त्यांचे मित्र हरि नारायण आपटे यांचें चरित्र लिहिलें आहे त्यांत कर्मधर्मसंयोगानें स्वतःच **आपट्यांचे परस्परविरुद्ध गुण** वर्णिले आहेत. पृष्ठ ६३ वर **परस्परविरोधी गुण** असा मथळा जबऱ्या टाइपांत देऊन खालीं हा मजकूर लिहिला आहे. " त्यांच्या ( आपटे यांच्या ) स्वभावांत स्थिरता व अस्थिरता, ढिलाई व निश्चय यांचें विलक्षण संमिश्रण झालेलें दिसे. एकदां गोष्ट मनांत आली, कीं ती घडेल केव्हां असें त्यांना होऊन जात असे, तर इतर कित्येक बाबतींत त्यांची विलक्षण दिरंगाई दिसून येत असे; त्यांचा स्वभाव कांहीं बाबतींत अगदीं ढिला असे तर कांहीं बाबतींत ते पराकाष्ठेचा निग्रह दाखवीत."

ज्ञानप्रकाशकारांनीं टिळकांसंबंधानें वर दर्शविलेली अनुमानपद्धति खरी म्हणून जर ती कोणीं येथें आपटे यांनाहि लावली तर, आंबेकर यांनीं चरित्र लिहिलेले हरिभाऊ आपटे ही व्यक्तिदेखील खरोखर झाली असेल कीं नाहीं असा भावी पिढ्यांना कां संशय येऊं नये ? टिळकांच्या निरनिराळ्या भक्तांनीं वर्णन केलेला त्यांचा 'शांत मायाबीपणा' व 'सत्यनिष्ठा', किंवा त्यांची 'शांतवृत्ति' व 'तापटपणा' या गुणांच्या जोड्या स्वतः आंबेकरांनीं वर्णन केलेल्या " स्थिरता व अस्थिरता " " ढिलाई व निश्चय " या गुणांच्या जोड्यांपेक्षां अधिक असंबद्ध किंवा अशक्य कशा ठरतात ? दुसरें असें कीं, टिळकांचे परस्परविरोधी गुण निरनिराळ्या लोकांनीं वर्णन केले याचें कारण त्यांना तसा निरनिराळा अनुभव आला म्हणून. पण आंबेकर यांच्या वर्णनांत हीहि सबब उरत नाहीं. त्यांनीं आपटे यांचे परस्परविरोधी गुण लक्षांत घेऊन त्यांतला एकंदरीनें अधिक कोणता हें मनानें ठरवून निर्णायक असेंच गुणवर्णन द्यावयास पाहिजे होतें ! पण तसें त्यांनीं केलें नाहीं. टिळकांना सर्वगुणसंपन्न असें कोणीच म्हणत नाहीं. त्याहून विशेष हें कीं, टिळकांनीं कारागृहवास भोगला म्हणून ते सर्वगुणसंपन्न होते असें लोक मानीत असल्याचें प्रकाशकार समजतात तसें तर कोणींच म्हटलेलें किंवा मानलेलें नाहीं. पण अशी असंबद्धता जनतेच्या मुद्दाम गळ्यांत बांधून तिनें केलेल्या टिळकांच्या गुणवर्णनावर संशयाचा शिंतोडा उडविण्याचा टीकाकाराचा हेतु अगदीं उघड दिसतो. कारागृहवास सोसणें म्हणजे सर्वगुणसंपन्न असणें असें जरी नव्हे, तरी अंगीं तेच गुण असतां एकानें कारागृहवास धैर्यानें सोसला व दुसऱ्यानें तो टाळला असें असेल तर ज्यांनीं तो सोसला त्यांच्या ठिकाणीं तेच गुण तो टाळणाऱ्यांच्या अपेक्षेनें अधिक खुलून दिसतात व डोळ्यांत भरतात हीं गोष्ट कांहीं खोटी नाहीं. आणि एवढेंच जर ज्ञानप्रकाशकार म्हणते तर त्यांना जनतेवर मूर्खपणाचा आरोप न करतां टिळकांच्या गुणवर्णनांत जो आंकडा अतिशयोक्ति म्हणून करितां बाद घालावयाचा तोहि घालता आला असता.

## सीतारामपंत देवधरांची टीका

ज्ञानप्रकाशाच्या टीकेला पुरवणीदाखल श्री० सीतारामपंत देवधर यांनींहि तीन लेख लिहिले आहेत. त्यांत टिळक-आगरकरांचें ग्रामण्यप्रकरणीं भांडण व आगरकरांची माफी यांचा फारच चांगला खुलासा दिला आहे. देवधर यांचें म्हणणें इतकेंच दिसतें कीं, शिक्षा भोगण्याचा दुर्धर प्रसंग टाळण्यासाठीं माफी मागण्याचा अपमानाहि सोसण्यास ते (आगरकर) राजी झाले असें मीं टिळकचरित्रांत प्रतिपादिलें आहे ! पण माझ्या पुस्तकाचें पृष्ठ ३०० हें कोणी वाचून पाहील तर त्याला देवधरांचें हें म्हणणें बरोबर नाहीं असेंच आढळून येईल. मीं फक्त इतकेंच म्हटलें आहे कीं, " कोल्हापूर-प्रकरणानंतर बेअब्रूच्या आरोपावरून शिक्षा होण्याचा आगरकरांचा हा दुसरा प्रसंग त्यांच्या माफीमुळें वांचला." गोष्ट अखेर काय घडली तीच मीं दिली आहे, पण आगरकरांनीं माफी मागितली ती शिक्षा टाळावी या हेतूनें

म्हणजे भ्याडपणानें मागितली असें मीं म्हटलें नाहीं किंवा ध्वनितहि केलें नाहीं. या कामीं रानडे यांनीं मध्यस्थी केली व म्हणूनच केवळ त्यांच्या भिडेखातर आगरकरांनीं माफी मागितली असेंच मीं स्पष्ट शब्दांनीं दर्शविलें आहे. आतां टिळकांवर आपण केलेला आरोप, म्हणजे मिरजेच्या स्टेशनवर मेसमनच्या हातचा भात खाल्लयाचा आरोप, चौकशीअंतीं खरा नाहीं हें आगरकरांस इतर रीतीनें किंवा खुद्द रानड्यांकडून कळलें असावें. या गोष्टीची भर रानड्यांच्या भिडेला पडली असल्यास नवल नाहीं. रानड्यांसारख्या मध्यस्थाची भीड न पडती तर, टिळकांवरील आरोप खोटा असल्याची जाणीव असतांहि कदाचित् दुराग्रहामुळें आगरकरांनीं माफी मागितली नसती. आपण माफी मागूं किंवा लेख परत घेऊं तर तो शिक्षेच्या भीतीनें असें लोक म्हणतील, म्हणून खरी वस्तुस्थिति माहीत असतांहि आग्रहानें ते अखेरपर्यंत आपल्या लेखाला चिकटून बसले असते, व कोर्टाच्या प्रतिकूल निकालाची त्यांनीं पर्वा केली नसती, हें आगरकरांच्या बाणेदार स्वभावावरून कोणीं म्हटल्यास चूक होणार नाहीं. पण आमचें म्हणणें इतकेंच कीं, ज्या हेतूनें आगरकरांनीं माफी मागितली असें म्हटल्याचा आरोप देवधर मजवर करतात तो हेतु खरा नाहीं. आपण लिहिलें तें बरोबर नाहीं ही गोष्ट मात्र आगरकरांना कळून चुकली होती यांत शंका नाहीं. कारण त्यांनीं 'सुधारकां'तील माफीच्या लेखांत असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, "टिळकांनीं स्टेशनावर मेसमनच्या हातचा भात खाल्ला ही गोष्ट असिद्ध म्हणून परत घेतली." याला दुसरेंहि प्रत्यंतर असें कीं, याच माफीच्या लेखांत टिळकांनीं स्टेशनावर मेसमनच्या हातचा चहा घेतला ही गोष्ट मात्र सिद्ध असें प्रतिपादून त्यावर कांहीं मखलाशी केली आहे. पण ती मखलाशी योग्य कीं अयोग्य हा आजचा मुद्दा नसून, 'टिळकांनीं चहा घेतला हें सिद्ध व भात खाल्ला हें असिद्ध' असा स्पष्ट व अर्थपूर्ण भेद स्वतः आगरकरांनींच माफीच्या लेखांत केला आहे. आणि हा भेद आम्हीं पान ३०० तील हकीकतींत दर्शविला असल्यामुळें, या सत्यज्ञानाची भर रानड्यांच्या भिडेला पडूनच आगरकरांनीं माफी मागितली, शिक्षेच्या भीतीमुळें नव्हे, असाच आमच्या लिहिण्याचा खरा भावार्थ कोणासहि दिसून येईल. माफी मागितल्यामुळें आगरकरांची दुसरी शिक्षा टळली असें आम्हीं म्हटलें खरें; पण हा माफीचा नुसता परिणाम म्हणून आम्हीं दिला आहे. आगरकरांच्या हेतूचा त्यांत संबंध येत नाहीं. मला आगरकरांवर तसा आरोप करावयाचा असता तर आगरकरांनीं 'शिक्षा टाळली' असा शब्द मीं वापरला असता. आणि स्वतः माझ्या मनांत आगरकरांविषयीं आदरबुद्धि असल्याची उदार कबुली स्वतः देवधर यांनींच या टीकालेखांत दिलेली असल्यामुळें त्यांनीं माझे लिहिण्याचा गैरसमज करून घेण्याचें कारण नव्हतें.

— २ —

## विविधज्ञानविस्तारांतील टीका

केसरी, ५ ऑगस्ट १९२४

ज्ञानप्रकाशांतील टीका सुमारें एकशेंअठरा पृष्ठांची आहे. त्याचे खालोखाल विस्तृत टीका म्हटली म्हणजे श्री० नरहर रघुनाथ फाटक यांची होय. या टीकेनें विविधज्ञानविस्ताराचीं ३५ पृष्ठें व्यापलीं आहेत. या दोन टीकांत मुख्य फरक हा कीं, ज्ञानप्रकाशकारांनीं टीकेचें धोरण चरित्रग्रंथापेक्षां चरित्रविषयावर हल्ले करण्याचें ठेवलें आहे. फाटक यांच्या टीकेंत टिळकांवर तर हल्ले आहेतच; परंतु चरित्रग्रंथावर बरीचशी टीका आहे. ज्ञा. प्र.कार म्हणजे आंबेकर व फाटक यांचीं राजकीय व सामाजिक मतें एकच, व तदनुरोधानें टिळकांवरील दोषांची गैरमर्जी सारखीच तीक्ष्ण आहे. पण आंबेकर हे स्वतः एक चरित्रलेखक असतांहि, फाटक यांच्यामध्यें ते चरित्रलेखक असल्याकारणानें जी एक प्रकारची प्रच्छन्न अहंकारिता दिसते तशी आंबेकर यांजमध्यें दिसत नाहीं. असो. फाटक यांच्या मतें माझ्या चरित्रग्रंथाची हीनता किती आहे हें दर्शविण्याकरितां प्रथम याखालीं स्वतंत्र प्यारा करून त्यामध्यें फाटकांची टीकात्मक विधानें संक्षिप्त रीतीनें संग्रहीत करतों.

### फाटकांच्या टीकेचा सारांश

"केळकरांच्या चरित्रासंबंधीं लोकांची अपेक्षा होती ती फसली. टिळकांचा चरित्रग्रंथ केळकर लिहिणार तो त्यांनीं लिहिला व स्वस्त किंमतींत दिला यामुळें मराठी वाङ्मयांत मोठी भर पडेल असें ग्राहकांनीं समाधान मानलें असेल! पण ती त्यांची चूक आहे. केळकरांनीं साधनें मिळवावीं तितकीं मिळविलीं नाहींत. त्यांचें पुस्तक एकांगी झालें आहे. केसरीशिवाय दुसरीं वृत्तपत्रें त्यांना मिळालीं असतीं; पण तीं त्यांनीं मिळविलीं नाहींत. यामुळें त्यांनीं अनेक चुकीचीं विधानें व विवेचनें केलीं आहेत. त्यांनीं चरित्राचें ध्येय आपल्यासमोर ठेविलें तें संकुचित आहे. पुढें लोकांनीं नांवें ठेवूं नयेत, म्हणून आधींच आपण होऊन साधनांच्या कमतरतेविषयीं त्यांनीं तक्रार केली व या दृष्टीनें आपल्या ग्रंथाविषयीं आपणच असमाधान व्यक्त केलें! पण अशानें लोक फसणार नाहींत! उगाच टिळकांच्या संपादकीय लेखांतील सारांश किंवा उतारे एकत्र देऊन गाथा केली म्हणजे तिला कांहीं चरित्र म्हणत नाहींत. वर पहावें तों टिळकांच्या चरित्राचें नांव, आणि आंत त्यांच्या हयातींतल्या काळाचा इतिहास! जुन्या प्रसिद्ध झालेल्या गोष्टीहि कांहीं त्यांनीं दिल्या आहेत, पण केळकरांना स्वतःला असलेल्याहि सगळ्या माहितीचा त्यांनीं उपयोग केलेला दिसत नाहीं. तिसऱ्या भागांत टिळकांपूर्वीच्या महाराष्ट्रीय घडामोडीचा इतिहास दिला आहे. पण त्यांचा टिळकांच्या 'आयुष्याशीं' संबंध पोंचत नाहीं.

केळकरांनीं नुसत्या केसरीच्या फायलांचा उपयोग केला. पण तीं फायलेंहि त्यांनीं धड वाचलीं नाहींत ! मराठ्याचींहि फायलें वाचलीं नाहींत ! त्यांनीं नांवांच्या व तारखांच्या पुष्कळ चुका केल्या आहेत. परिश्रमाशिवायहि टाळतां येणाऱ्या चुका टाळल्या नाहींत ! दिलेल्यांतील कांहीं माहिती चुकीची आहे तर देण्यासारखी पुष्कळ माहिती वगळली आहे. दिलेली हकीकतहि कित्येक ठिकाणीं व्यवस्थित दिली नाहीं. विसंगतीचे दोष त्यांचे हातून फार घडले आहेत. केळकरांनीं कित्येक ठिकाणीं मोघम शब्दांनीं अज्ञान झांकण्याचा प्रयत्न केला आहे. केळकरांना माहीत नाहीं अशी किती तरी हकीकत मला माहीत आहे ! ! पुस्तक अगडबंब आहे; पण केळकरांनीं किती काळजी घेतली व बारकाई पाहिली या भ्रमाचा भोपळा तेव्हांच फुटतो ! त्यांनीं कित्येक भाकडकथा इतकेंच नव्हे तर सपशेल खोट्या गोष्टींची आरास मांडून टिळकांच्या कर्तृत्वाची शोभा वाढविण्याचा व त्यांचें चरित्र सजविण्याचा प्रयत्न केला आहे ! आपण लिहूं तेंच खरें, या गैरभरंवशाच्या भरांत केळकरांनीं जें सुचलें किंवा मनास आलें तें पुस्तकांत दडपून देऊन टिळकांचें चरित्र अविश्वसनीय करून ठेविलें आहे ! त्यांनीं आगरकरांच्या चरित्रावर शिंतोडे उडविले आहेत व कुत्सित शंका व्यक्त केल्या आहेत. टिळकांच्या चरित्रांतील उद्दिष्ट ध्येय व धोरण यांची चर्चा केळकरांनीं केली नाहीं. गोखल्यांसंबंधानें निष्कारण गैरसमज पसरविले आहेत. चरित्र लिहितांना त्यांची बुद्धि विपरीत हेलकावे खात होती. केळकर समतोलबुद्धीचे, विवेकशील व निःपक्षपाती धोरणाचे लेखक आहेत अशी त्यांची ख्याति आहे ती या चरित्रावरून अगदीं खोटी ठरते." आणि चरित्रग्रंथांतील हे इतके दोष दाखविण्याचे व त्याचबरोबर टिळकांचेहि दोष दाखवून चरित्रग्रंथ व चरित्रविषय हे दोनहि अगदीं नादान आहेत हें सिद्ध करण्याचे इतके श्रम फाटक यांनीं कां घेतले तर केवळ एका सत्यान्वेषणासाठीं ! ! फाटकांच्या भाषेंत बोलावयाचें तर केळकर हे श्रेष्ठ आहेत, टिळक हे श्रेष्ठतर आहेत, पण सत्य हें श्रेष्ठतम आहे ! हा मुद्दा पूर्ण करण्याकरितां एक गोष्ट मुद्दाम वाचकांना सांगितली पाहिजे ती ही कीं, फाटकांच्या या सर्व टीकालेखांत माझ्या सातशें पानांच्या ग्रंथाविषयीं चुकून एकहि गोष्ट त्यांना चांगली दिसली नाहीं; व त्यांच्या सत्यनिष्ठेला शोभण्यासारखा माझ्या कृतींतला एकहि गुण त्यांना घेतां आला नाहीं !

वरील सर्व दोष खरे असतील तर असलें चरित्र लिहिण्याच्या भानगडींत मी पडलों कशाला असेंच मला वाटावयास पाहिजे ! फाटक यांची माहिती ते समजतात तशी बिनचूक आणि त्यांची सत्यनिष्ठा त्यांच्या पुकाऱ्याप्रमाणें निर्दोष असती तर त्यांनीं दाखविलेले सर्व दोष मला पदरांत घेणें अर्थात् प्राप्त होतें. पण आपण पूर्ण माहितगार व बिनचूक अनुमानें काढणारे अशा प्रकारच्या निवळ घमेंडीची बाधा त्यांना झालेली आहे; व हीच गोष्ट पुढील उत्तरांत मी सिद्ध करून देणार आहें. सुदैवानें किंवा दुर्दैवानें स्वतः फाटकांनींहि एक चरित्र नुकतेंच लिहून प्रसिद्ध केलें

आहे. यामुळें जे दोष त्यांनीं माझ्या पुस्तकांत म्हणून दाखविले ते स्वतः त्यांनीं आपल्या कृतींत किती टाळले हेंहि यथाप्रसंग मधून मधून मला दाखवितां येईल.

फाटक यांच्या टीकेस उत्तर देतांना त्याचे दोन भाग करणें जरूर आहे—(१) खुद्द माझ्या पुस्तकावर घेतलेल्या आक्षेपांचें खंडन, व (२) चरित्रविषय लो० टिळक यांच्यावर घेतलेल्या आक्षेपांचें खंडन.

## आक्षेपांस उत्तर

फाटक यांनीं या आक्षेपांचें वर्गीकरण न करतां त्यांना ते सुचतील तसतसे दिले आहेत, म्हणून त्याच क्रमानें मींहि उत्तर देण्याचें योजलें आहे. यामुळें 'विविधज्ञान-विस्तारा'चे अंक ज्यांचे हातीं असतील त्यांना आक्षेप व उत्तर हीं ओळीनें वाचावयास सांपडतील व पानांची उलटापालट करीत बसावें लागणार नाहीं.

१ आक्षेप—ग्रंथाचें ध्येय संकुचित आहे.

उत्तर—माझ्या चरित्रग्रंथाचे तीन भाग करण्याचें मीं योजिलें आहे. हल्लीं प्रसिद्ध झाला हा त्यांतला फक्त पहिलाच भाग होय. तो सन १९०० पर्यंतचा आहे. टिळकांच्या आयुष्यांतील व कारकीर्दींतील खरा महत्त्वाचा भाग पुढील वीस वर्षांतच घडलेला आहे, यामुळें या पहिल्या भागांत मला टिळकांचेसंबंधीं तात्त्विक विवेचनात्मक असें कांहीं लिहितां आलें नाहीं. पुढील भागांतील गोष्टी आधीं जमेस धरून असें विवेचन केल्यास तें सहजच हास्यास्पद झालें असतें. बरें, पहिल्या भागांत हें विवेचन घातलें आणि पुढच्या भागांच्या अखेरीस काय घालावयाचें तेंहि घातलें तर पुनरुक्तीचा दोष येणार आणि तीन भाग एकत्र घेऊन वाचणारास तर ही असंबद्धता फारच वाटणार. मुळांत खरी गोष्ट ही आहे कीं, मला टिळकांच्या चरित्राचे सर्व भाग एकदम प्रसिद्ध करतां आले नाहींत. पण याला चुकीपेक्षां अडचण हेंच नांव अधिक शोभेल. ग्लॅडस्टनचें चरित्र लिहिण्याकरितां लॉर्ड मोर्ले हे जसे सर्व उद्योग टाकून दोन वर्षें चरित्रलेखनाचें एकच काम हातीं घेऊन एकांतांत बसले होते, तसें मला करतां आलें असतें तर मींहि सर्व चरित्र एकदम लिहून संपविलें असतें. मला स्वतःला तर ही गोष्ट करणें फारच आवडलें असतें. पण मला हें कां व कसें अशक्य होतें याची कल्पना ग्रंथाच्या प्रस्तावनेंत मीं वाचकांना करून दिलीच आहे. वर्तमानपत्रें चालविणें, केसरी-मराठा संस्थेची इतर व्यवस्था पाहणें, म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षाचें काम करणें, व चालू राजकारणाच्या चळवळींत योग्य तो भाग घेणें, यांपैकीं एकहि गोष्ट मला टाकतां किंवा टाळतां येणें शक्य नव्हतें. आणि अशा स्थितींत दोन वर्षांचें जुनें अभिवचन फुकट गेल्यामुळें, शक्य ती अधिक मेहनत घेऊन मीं पुस्तक लिहिलें. या जाणिवेचा निदर्शक असा सहानुभूतिपर एक शब्द जरी फाटक यांच्या लिहिण्यांत आला असता तर त्यांनीं दाखविलेल्या दोषांचें मला कांहींच वाटलें नसतें. शिवाय

हीहि गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, दोन किंवा तीन खंड एकदम लिहून प्रसिद्ध करण्यास मला वेळ मिळता तरी, ते थोड्या दिवसांत एकदम छापविण्याची अडचण पडली असती; व तीन खंड एकदम विकत घेण्याला लोकांनाहि सोयीचें झालें नसतें. माझ्या योजनेप्रमाणें यापुढील दुसरा व तिसरा खंड लिहून झाल्यास तेथ-पासून पुढें तरी मराठी वाचकांना सर्व चरित्र एके ठिकाणीं वाचावयास मिळून पहिल्या खंडांत नसलेलीं सर्व विवेचनें यथास्थलीं त्यांना वाचावयास मिळतील. आजच्या वाचकांची थोडी निराशा होईल हें मी जाणून होतों; पण माझ्या डोळ्या-पुढें केवळ आजचा वाचक नसून यापुढें पांच किंवा दहा वर्षांनीं येणाऱ्या पिढीचा वाचक आहे. तात्पर्य, फाटक म्हणतात त्याप्रमाणें माझें चरित्रग्रंथाचें 'ध्येय' खचित संकुचित नाहीं; किंबहुना तें संकुचित नाहीं म्हणूनच पहिला खंड सन १९०० पर्यंतचा आहे, व म्हणूनच त्या खंडांत त्यांना पाहिजे तें सर्व विवेचन एकत्र नाहीं.

२ आक्षेप–टिळकांच्या केवळ संपादकीय लेखांचे सारांश व उतारे देऊन पुस्तक भरलें आहे.

उत्तर—उतारे असे मीं फारच थोडे दिले आहेत. बरें, केसरींतील माहितीचा आधार, तो टिळकांचा केसरी म्हणून, टाकून द्यावा हें तरी योग्य कसें ठरेल! टिळकांच्या सर्व चरित्रक्रमाला सार्वजनिक स्वरूप होतें व जवळ जवळ सर्व आयुष्य-भर त्यांचे हातीं स्वतःचीं अशीं वर्तमानपत्रें होतीं. अर्थात् त्यांच्या हरएक सार्व-जनिक कृतीचें व विचाराचें प्रतिबिंब त्यांच्या लेखांतून दिसणें हें स्वाभाविक नव्हे काय? स्वतः फाटक यांनीं तरी आपल्या रानड्यांच्या चरित्रांत रानड्यांचे लेख, व्याख्यानें, निबंध यांच्यातील उतारे व टिपणें यांशिवाय व्यक्तिविषयक अशी अवां-तर माहिती कितीशी दिली आहे? "गेल्या तीसचाळीस वर्षांतला इतिहास येवढ्या दृष्टीनें या ( टि. च. ) पुस्तकाचें महत्त्व महाराष्ट्र वाङ्मयांत राहील" असें फाटक लिहितात. यालाच "टिळकांचा ज्यांत संबंध आला असा इतिहास" येवढे शब्द जोडले म्हणजे मग माझी कांहीं तक्रार नाहीं.

३ आक्षेप—चरित्राच्या तिसऱ्या भागांत टिळकांपूर्वीच्या महाराष्ट्राची माहिती दिली आहे. पण त्यांतील कित्येक गोष्टींचा टिळकांच्या 'आयुष्याशीं' संबंध पोंचत नाहीं. उदाहरणार्थ, डॉ० भाऊ दाजी यांचें चरित्र.

उत्तर—भाऊ दाजी मुंबईचे असले तरी महाराष्ट्रीय होत. भाऊ दाजींचा वृत्तांत दिला त्यांत टिळकांचा संबंध नाहीं, पण टिळकपूर्वकालीन महाराष्ट्राची माहिती देतांना त्या काळांतील 'नमुनेदार गृहस्थां'चे वृत्तांत देणें जरूर होतें. महादेवशास्त्री कोल्हटकर, गोपाळराव देशमुख, विष्णुबुवा ब्रह्मचारी, वगैरे इतर अनेक लोकांचे वृत्तांत दिले त्यांतहि टिळकांचा संबंध नव्हता. मग या नांवांनाहि फाटकांनीं हरकत कां घेतली नाहीं? पण तसेंच बोलावयाचें तर रानडे यांच्या चरित्रांत स्वतः फाटकांनीं अशाच संबंधांत भाऊ दाजी यांचें वृत्त दिलें आहे

त्याचें तरी काय कारण! रानडे यांचे डोळे डॉ० भाऊ दाजी यांनीं एकदां तपासले याहून त्यांचा अधिक संबंध फाटक यांनीं तरी कांहीं लिहिला नाहीं व लोकांनाहि माहीत नाहीं.

४ आक्षेप— भाऊ दाजींचा जन्म १८२२ सालीं झालेला असून तो १८१८ सालीं झाला असा केळकरांच्या ग्रंथांत उल्लेख आहे ती चूक आहे.

उत्तर—वास्तविक भाऊ दाजींचा जन्म १८१८सालीं झाला काय, किंवा १८२२ सालीं झाला काय, ती स्वतः फारशी महत्त्वाची गोष्ट ठरत नाहीं. परंतु केळकरांची चूक दाखविण्याची हौस म्हणून फाटकांनीं या गोष्टीला नसतें महत्त्व दिलें आहे! बरें, त्यांतूनही त्यांचीच माहिती बरोबर असें असतें तरी गोष्ट वेगळी. त्यांचा आधार कदाचित् 'सारस्वतरत्नमाला' हा असेल. मीं मुळांत तो पाहिलेला नाहीं. परंतु माझा आधार 'महाराष्ट्र–सारस्वत' त्रैमासिकाचा १९२२च्या एप्रिलचा अंक होय. या अंकांत गोपाळ व्यंकटेश पार्णदीकर यांनीं 'भाऊ दाजी यांच्या कांहीं आठवणी' दिल्या आहेत. त्यांत पृष्ठ ३४ वर पुढील वाक्यें आहेत—"डॉ० भाऊंचा जन्म १८१८ मध्यें झाला. म्हणजे मृत्युसमयीं त्यांचें वय ५५ वर्षांचें होतें. त्यांचें निधन २ जून १८७४ मध्यें झालें." इतका स्पष्ट उल्लेख बाजूस ठेवून फाटक यांनीं दिलेलें १८२२ हेंच साल काय म्हणून घ्यावयाचें? 'सारस्वत–रत्नमाले'चें साल कोणतें हें आम्हांस माहीत नाहीं; पण 'महाराष्ट्र–सारस्वत' १९२२ चें म्हणजे 'सारस्वत–रत्नमाले'-नंतरचें असावें. बरें, सारस्वत रत्नमाला खरी असेल किंवा पार्णदीकर खरे असतील. पण या अनिश्चित तारखेच्या चुकीवर फाटक यांनीं खालील शब्दांत मजवर भाष्य केलें आहे! "ब्रह्मदेवाला ज्या गोष्टी करतां आल्या नाहींत त्या पेनाच्या नव्हे तर जिभेच्या फटकाऱ्यासरशी करून टाकल्या आहेत. ब्रह्मदेवावर त्यांनीं कडी केली आहे." चूक असली तर किती क्षुद्र व तीहि खरी चूक नाहीं, असें असतां टीकेचे शब्द किती कडक आहेत हें वाचकांनींच पाहावें. पण फाटक यांच्या दुर्दैवानें ते माझ्यावर "परिश्रमावांचून टाळतां येण्याजोग्या चुक्या टाळल्या नाहींत" असा आरोप करीत असतां, याच मुद्द्याच्या विवेचनांत त्यांनीं स्वतःच एक अक्षम्य चूक केली आहे. भाऊ दाजी यांचा जन्म मीं १८१८ सालीं दिला आहे व तोच खरा आहे. फाटक तें साल १८२२ असें म्हणतात. त्यांचें खरें मानलें तरी माझी चूक चार वर्षांची ठरते. पण ही चूक माझ्या गळ्यांत बांधतांना फाटक काय लिहितात तें पाहा—"केळकरांनीं त्यांना पुस्तकांत सहा वर्षें अगोदर जन्मास घातलें व ब्रह्मदेवावर कडी केली." पण १८२२ व १८१८ यांची वजाबाकी ४ यावयाची ती ६ मानणें ही फाटक यांनीं ब्रह्मदेवाच्या बापावर कडी केली नाहीं काय? भाऊ दाजींचें जन्मवर्ष हुडकून काढण्यापेक्षां १८२२ व १८१८ यांची वजाबाकी करण्यास फारच कमी परिश्रम लागतील! असें असतां केळकर हे परिश्रमाशिवाय टळणाऱ्याहि चुका टाळीत नाहींत असा आरोप करण्यास मजवर फाटक फिरून

तयारच ! वास्तविक हा सर्व मुद्दा अगदीं क्षुद्र आहे हें वर सांगितलेंच आहे. पण फाटक यांनीं कोणत्या दृष्टीनें माझें पुस्तक वाचलें व टीका करतांना किती तोल संभाळला हें वाचकांना दिसून यावें म्हणूनच हें इतकें स्पष्ट विवरण केलें आहे.

५ आक्षेप—वासुदेव बळवंत फडके हे फांशीं गेले असें केळकरांनीं लिहिलें आहे.

उत्तर—फडके फांशीं गेले नाहींत. काळ्यापाण्यावर गेले हें फाटक यांचें म्हणणें बरोबर आहे. लहानपणीं ऐकलेली व पुढें तशीच मनांत राहिलेली गोष्ट, म्हणजे फांशीं दिलें ही गोष्ट, तशीच घातली. फडके फांशीं गेले कीं काळ्या पाण्यावर गेले हें पडताळून पाहण्याचें सुचलें नाहीं हें खरें आहे.

६ आक्षेप—इंदुप्रकाश १८६४ सालीं विष्णुशास्त्री पंडित यांनीं काढला असें केळकरांनीं लिहिलें पण तो १८६२ सालीं सुरू झाला.

उत्तर—'इंदुप्रकाश' संबंधाचें विधान मीं बहुधा 'बालबोधा'च्या एका जुन्या अंकावरून घेतलें असावें असें स्मरतें. १८६४ सालीं 'इंदुप्रकाश' पत्र 'चालवूं लागले' असें लिहिण्याऐवजीं 'सुरू केलें' असे शब्द पडले. इंदुप्रकाश प्रत्यक्ष १८६२ सालीं सुरू झाला असला तरी पुढें दोन वर्षांनीं विष्णुशास्त्री यांनीं त्यास हातीं घेईपर्यंत त्याला कांहीं महत्त्व नव्हतें, यामुळें विष्णुशास्त्री यांचें संपादकत्व व इंदुप्रकाशाचा प्रारंभ लोक समकालीन मानतात. 'इंदुप्रकाशा'वर कितवें वर्ष लिहिलें जातें हें पाहूनच प्रारंभाचें साल ठरविलें असतें तरीहि १८६२ साल आलें असतें असें फाटक म्हणतात. परंतु ज्यांचें वर्तमानपत्र त्यांच्याच हातून स्वतःविषयीं अशा गमतीच्या चुका होतात, मग दुसऱ्यानें लिहितांना अशी चूक झाल्यास नवल नाहीं. उदाहरणार्थ, 'ज्ञानप्रकाश' हें पत्र १८४९ सालीं सुरू झालें असतां, त्याच्या कित्येक जाहिरातींत १८४६ सालीं तें सुरू झालें असें लिहिल्याचें आपणास आढळतें असें बार्शीचे श्री० साने यांनीं आम्हांस लिहिलें आहे. हल्लीं ज्ञानप्रकाशाचे डोक्यावर त्याचें चालू वर्ष सत्त्याहत्तरावें असें लिहिलेलें आहे. याचा अर्थ ७६ वर्षें पुरीं झालीं, व त्याप्रमाणें हिशेब केला तर ज्ञानप्रकाश १८४८ सालीं निघाला असें ठरेल. पण तो वस्तुतः १८४९ सालीं निघाला ही गोष्ट निश्चित आहे. गेल्या शतकांतलीं ५२ व चालू शतकाचीं २३ वर्षें मिळून ७५ पुरीं धरलीं म्हणजे ज्ञानप्रकाशाचें हल्लींचें ७६ वें वर्ष चालू आहे असें लिहिलें पाहिजे ! तसेंच आर्यभूषण छापखाना हा १८८० सालीं निघाला असतां, तत्संबंधीं आर्यभूषण छापखान्यांतूनच निघालेल्या एका जाहीर पत्रकांत तो १८७९ सालीं निघाल्याचें आढळलें. तात्पर्य, अशी किरकोळ चूक होऊं शकते. निदान अमुक एक गोष्ट केव्हां घडली असा जेव्हां प्रत्यक्ष मुद्दा असतो तेव्हांच कालनिश्चयाची चूक अक्षम्य ठरते, एरवीं ती उपेक्षणीयच होय.

असो. घडधडीत चुकांची म्हणून सबंध तीन चुकांची जी मोठी 'जंत्री'

फाटकांनीं येथवर दिली त्यांतील एक चूकच नाहीं, एक खरी चूक होय व तिसरीचा खुलासा वरीलप्रमाणें देतां येण्यासारखा आहे. पण ही जंत्री पुरी करण्यापूर्वी पुढें त्यांनीं काढलेल्या दोनतीन चुकाहि येथेंच नमूद करूं. टिळकांच्या दुष्काळी चळवळीच्या हकीकतींत ज्या गृहस्थावर खटला झाला त्याचें नांव देण्यांत चूक झाली आहे. गोविंदराव आपटे यांचे ऐवजीं दत्तोपंत असा शब्द पडला आहे खरा. तोंडानें मजकूर सांगत असतां चित्तविभ्रमानें एकादा शब्द चुकून उच्चारला जातो, व लेखकास त्याची माहिती नसल्यास तोच तो बिनतक्रार लिहून जातो. अशा चुका शुद्धिपत्रांत निघून जाऊं शकतात. पण अशा चुकीमुळें सगळ्या टिळकचरित्रावर अविश्वसनीय असा छाप मारणें किती योग्य होईल हें वाचकांनींच पाहावें. आगरकर हे कोंकणस्थ असतां ते कऱ्हाडे असें मी लिहून गेलों ही चूक फाटक यांचे आधीं इतरांनीं माझे लक्षांत आणली होती. पण या चुकीचा खुलासा असा आहे कीं, भागवत आणि आगरकर हे आप्तसंबंधी हें माहीत असल्यानें, व हे भागवत कऱ्हाडे ( भागवत कऱ्हाडे व कोंकणस्थ असतात ) अशी चुकीची समजूत महाजनींच्या कारणानें मनांत बसून गेली असल्याकारणानें आगरकर हे कऱ्हाडे असेंच मी चूक दाखवीपर्यंत मानीत होतों. ग्रामण्य-प्रकरणांत १८९० चे ऐवजीं १८९१ हा आंकडा पडल्याचें फाटक यांनीं दाखविलें आहे. पण हातांत वर्तमानपत्राचें प्रत्यक्ष फाईल घेऊन लिहीत असतां माझी येवढी चूक होणें सहसा शक्य नाहीं. अर्थात् शून्याच्या ऐवजीं एकाचा आंकडा पडला ही छपाईतील चूक होय; पण असली छपाईची चूक पुढें ठेवून ही पाहा केळकरांची चूक असें म्हणून दाखविणें यांत नुसती चूक दाखविण्यापेक्षां दुसरा कांहीं हेतु सहज असूं शकेल.

७ आक्षेप—फडक्यांचें बंड व टिळक-आगरकरांची देशाभिमानजागृति या बाबतींत दडपशाहीचा संबंध येतो त्याची हकीकत केळकरांनीं दिली नाहीं.

उत्तर—पृष्ठ ६८ वर टेंपलसाहेबाच्या कॉन्व्होकेशन अॅड्रेससंबंधानें जो उल्लेख आहे त्यांत वर्तमानपत्रांच्या मुस्कटदाबीचा कायदा वगैरे गोष्टींचा उल्लेख आहे, तो दडपशाहीच्या संबंधाचाच आहे ! “ टेंपलसाहेब भाषण करीत असतां अँग्लो-इंडियन पत्रांनीं रंगविलेलें सुशिक्षित तरुण महाराष्ट्रीयांचें विकृत भेसूर चित्र त्यांच्या मनश्चक्षूपुढें उभें नव्हतें असें कोण म्हणेल ? ” या माझ्या एका वाक्यांत त्या वेळची राजकीय परिस्थिति मीं दिली आहे ती दडपशाहीला उद्देशूनच नव्हे काय ? फडक्यांच्या बंडाचा सूक्ष्म परिणाम टिळकांच्या बालपणाच्या भावनांवर झाला असल्याचें मीं पृष्ठ ८३ वर स्पष्ट दर्शविलें आहे.

८ आक्षेप—गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांच्या चरित्राच्या गोषवाऱ्यांत व्यंगें राहिलीं आहेत.

उत्तर—याचा अर्थ चरित्रांतील सर्व गोष्टी दिल्या नाहींत. पण नमुनेदार गृहस्थांचीं चरित्रें देतांना कोणीहि केवळ स्थूल गोष्टींचाच उल्लेख करणार. टिळकां-

पेक्षां रानड्यांशींच सार्वजनिक कामांचा संबंध अधिक व प्रत्यक्ष सहकारी म्हणून आला. पण स्वतः फाटक यांनीं रानडे यांचे चरित्रांत सार्वजनिक कामांची जी माहिती दिली आहे तिनें मीं दिलेल्या त्यांच्या माहितीपेक्षां अधिक जागा खास व्यापलेली नाहीं. फाटकांनीं दिलेल्या त्यांच्या एकदोन गोष्टीहि मीं दिल्या नसल्या तर मीं दिलेल्या एकदोन गोष्टी फाटकांनीं दिलेल्या नाहींत. पण त्रोटक वृत्तान्तांत असलीं अपूर्णत्वें राहाणारच. दोष आहे तो अपूर्णत्वाचा नाहीं, तर केवळ दोष काढण्याकरितां म्हणून दोष काढणाऱ्यांच्या दृष्टीचा !

९ आक्षेप—१८७९ सालीं सप्टेंबरांत टिळक व आगरकर यांचे शाळा काढण्याचे बेत पक्के झाले असें केळकरांनीं लिहिलें या विधानाला आधार नाहीं.

उत्तर—या बाबतींत फाटक यांनीं गोंधळ करून शुद्ध अद्वातद्वा विधानें केलीं आहेत. चरित्रग्रंथाचें पृष्ठ ३४ मध्यें मीं असें विधान केलें आहे कीं, १७७९ च्या सप्टेंबरांत टिळकांचे व आगरकरांचे बेत पक्के झाले. याला आधार फाटक यांनीं माझ्याच बुकांतून दिलेल्या १०१ पृष्ठावरील विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या पत्राचाच आहे, कारण हें पत्र १८७९ च्या सप्टेंबरांतलेंच आहे. पृष्ठ २०५ वर मीं लिहिलें तें टिळकांच्या राजीनाम्यावरून लिहिलें ही गोष्ट पानांतील अवतरणावरून कळून येण्यासारखी आहे. राजीनाम्यांत १८७९ च्या जुलै-ऑगस्टमध्यें शाळा काढण्याच्या बेतांचा उल्लेख आहे. पण त्यांत विष्णुशास्त्र्यांचा उल्लेख नाहीं व असणें शक्यहि नव्हतें.

१० आक्षेप—टिळक-आगरकरांचे बेत चालू असतां त्यांनीं रानड्यांचा सल्ला घेतला ही माहिती केळकरांनीं दिली नाहीं, वगैरे.

उत्तर—टिळक-आगरकर यांनीं रानडे यांचा सल्ला एक वेळ घेतला होता ही गोष्ट टिळकांच्या चरित्रांत घालणें जर महत्त्वाचें व अवश्य तर रानड्यांच्या चरित्रांतहि ती घालणें अवश्य होतें. पण स्वतः फाटक यांनीं तसें केलेलें आढळत नाहीं. किंबहुना डेक्कन एज्युकेशन सोसायटी व रानडे यांच्या संबंधाच्या उल्लेखाचा फाटकांच्या चरित्रग्रंथांत जवळ जवळ अभावच आहे, म्हटलें तरी चालेल. टीकेंत मला दोष द्यावयाचा म्हणूनच हा संबंध त्यांना आठवला; पण खुद्द रानड्यांचें चरित्र लिहीत असतांना तो त्यांना कां आठवला नाहीं ? पण त्यांतूनहि माझ्या पुस्तकाचें पान २०५ हें फाटकांनीं सूक्ष्म दृष्टीनें वाचलें असतें तर त्यांतील दुसऱ्या प्याऱ्यांत "आम्हीं आमचे बेत एका पुढारी गृहस्थाला कळविले; परंतु तुम्ही कार्याला सुरुवात करून दाखविल्याशिवाय लोक मदत देण्याला पुढें येणार नाहींत, या उत्तरानें आमची निराशा झाली." हीं टिळकांचीं वाक्यें खुद्द रानड्यांनाच उद्देशून आहेत हें त्यांच्या लक्षांत तेव्हांच आलें असतें. खुद्द टिळकांच्या राजीनाम्यांतूनच तीं वाक्यें मला देतां आल्याकारणानें मी ती माहिती वेगळी कशाला देऊं ? टिळकांनीं लिहितांना निराशा करणाऱ्या या थोर गृहस्थाचें नांव मुद्दाम गुप्त ठेविलें असेल; मग मी तें कशाला प्रगट करूं ? असें वाटूनच मीं रानडयांच्या नांवाचा उल्लेख केला नाहीं इतकेंच.

बाकी 'पुढारी गृहस्थ' म्हणजेच रानडे! तसेंच पृष्ठ ९९-१०० यांवर भावेस्कूल चिपळूणकरांना प्रथम देऊं केल्याचा स्पष्ट उल्लेख मीं केलाच आहे. त्यांत फाटक यांनीं नवें असें कांहींच सांगितलेलें नाहीं. भावेस्कूल ताब्यांत घेण्याचा सल्ला टिळक-आगरकरांना रुचला असें फाटक यांनीं लिहिलें आहे (पृष्ठ ५७); पण ती गोष्ट खोटी आहे.

११ आक्षेप—टिळकांना मिळालेली स्फूर्ति आगरकरांपासून मिळाली; ती स्वयंभू नव्हती!

उत्तर—हें विधान अगदीं बेजबाबदार व निराधार आहे. दोघांची स्फूर्ति स्वतंत्र असूं शकेल व दोघांची स्फूर्ति जुळली म्हणूनच त्यांनीं सहविचार व सहनिश्चय केला. पण प्रत्यक्ष किंवा प्रत्यंतर-पुराव्याशिवाय टिळकांनीं आपली स्फूर्ति आगरकरांपासून घेतली हें म्हणणें धाडसाचें व उपमर्दकारक आहे असें मी स्पष्ट म्हणतों.

१२ आक्षेप—'न्यू इंग्लिश स्कूल' ही शाळा सुरुवातीस विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या मालकीची होती. ही माहिती केळकरांनीं दिली नाहीं.

उत्तर—ही माहितीच मुळीं सर्वस्वीं खोटी आहे. मग मी ती देईन कशी? फाटक लिहितात कीं, टिळक, आगरकर वगैरे मंडळी शास्त्रीबुवांस फक्त मदत करणारी पण 'भाडोत्री' होती. (पण चुकलों, आगरकरांना फाटक भाडोत्री कसे म्हणतील? अर्थात् भाडोत्री फक्त टिळकच असले पाहिजेत! म्हणावयास वाईट दिसतें म्हणून आगरकर भाडोत्री नाहींत; आणि स्वतः फाटकांनींच शास्त्रीबुवांना शाळेचे एकटे मालक ठरविल्यामुळें आगरकर मालकहि नाहींत. अशा स्थितींत आगरकरांचा शाळेशीं संबंध काय होता हें एक कोडेंच आहे!) असो. टिळकांना निवळ 'भाडोत्री' म्हणण्याची लाज वाटल्यामुळेंच कीं काय, पुढें फाटकांनीं टिळकांना "स्वार्थत्यागाची भावना असलेले भाडोत्री" असें गौरवपर विशेषण लावून मूळच्या निंदाव्यंजनाला थोडी मुरड घातली आहे. तथापि शाळेचें सर्व उत्पन्न घेणारे शास्त्रीबुवा व टिळक-आगरकरांसुद्धां सर्व सहकारी लोकांस आपल्या मनाला येईल तो पगार ठरवून देणारे शास्त्रीबुवा ही कल्पना त्यांनीं कायमच धरली आहे. पण त्यांनीं या गोष्टीस बिलकूल पुरावा दिलेला नाहीं. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या दप्तरांत चिपळूणकरांच्या मालकीचा पुरावा असेल असा नुसता हवाला फाटक देतात. पण या धाडसी विधानानें त्यांच्यावरील पुराव्याच्या बोजाचें ओझें हलकें होत नाहीं. या बाबतींत फाटकांनीं एका अनामिक वृद्ध गृहस्थाचाहि हवाला दिला आहे. पण तो वृद्ध गृहस्थ कोण व त्याचीं मतें कशा प्रकारचीं आहेत हें आम्हांस पूर्ण माहीत आहे, व त्याचें नांव आम्हीं स्पष्ट उच्चारलें तर त्याच्या पुराव्याला वाचकवर्ग काडीचीहि किंमत देणार नाहीं हें आम्हास माहीत आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या दप्तरीं पुरावा असेल तर त्यांनीं तो प्रसिद्ध करावा असें आमचें आव्हान आहे.

आतां फाटक यांचें विधान असंबद्ध मानण्याचीं माझीं कारणें सांगतों—(१) टिळक एल्एल्. बी. झाल्यावर शाळा काढणार, झाले तर ते दुसऱ्या कोणाचे पगारी नोकर होऊन राहतील हें त्यांचा स्वभाव माहीत असणारा मनुष्य कधींहि कबूल करणार नाहीं. (२) बरें, पगार काय तर ३० रुपये! (३) हा पगारहि एक वर्षभर टिळकांनीं प्रत्यक्ष घेतला नाहीं. भाडोत्री नोकर असें पोट बांधून काम करीत नसतात! ३० रुपयांची नोकरी पत्करून एक वर्षभर पगार न घेऊन शिवाय भाडोत्री संबंध कबूल करून राहाणारा मनुष्य टिळक असूं शकत नाहीं. उष्टं खाल्लें व तूपहि नव्हतें अशी लाजिरवाणी स्थिति फाटक टिळकांच्या गळ्यांत बांधूं पाहातात. (४) टिळकांनीं नोकरी म्हणून पत्करली नव्हती येवढेंच नव्हे, तर पहिल्याच वर्षीं शाळेकडे पदरचें थोडेंसें भांडवलहि घातलें होतें ही गोष्ट फाटकांनाहि माहीत असेल. कदाचित् हें भांडवल शाळेच्या मालकीचा छापखाना करण्याकरितां म्हणून वेळेवर दिलें असेल. पण तें टिळकांच्या नांवें शाळेच्या हिशेबांतच जमा असलें पाहिजे. पगार न घेतां भांडवल घालणारा भाडोत्री नोकर लोकविलक्षणच समजला पाहिजे. (५) टिळक न्यू इंग्लिश स्कूलचे भाडोत्री नोकर होते तर संस्थापकांत त्यांचें नांव पहिल्यापासून कसें समाविष्ट झालें असतें? व शाळेच्या कोणत्याहि रिपोर्टांत पाहा, चिपळूणकरांच्या बरोबरीनें टिळक-आगरकरांचा संस्थापक म्हणून उल्लेख आढळेल. (६) टिळक जर भाडोत्री नोकर तर ते व इतर खालचे मास्तर यांत अंतर कोणतें? आणि प्रारंभींच शाळेला येऊन मिळाले म्हणून ते संस्थापक, मग ते भाडोत्री नोकर का असेनात, असें जर म्हणावयाचें तर इतर शिक्षकांचीं नांवें संस्थापकांत कां दाखल नाहींत? तात्पर्य, हा आक्षेप केवळ टिळकांचें महत्त्व कमी करण्याच्या उद्देशानें म्हणजे दुष्ट बुद्धीनें काढलेला आहे. येवढ्या मुद्द्यापुरता विष्णुशास्त्र्यांना मोठेपणा देण्याचा दोष फाटकांना न कळत जडला खरा; पण त्याचें कारण त्यांना एका 'अविचारणीयचरित' अशा वृद्धाची संगत या कामीं घडली म्हणून!

१३ आक्षेप—१८८० सालीं टिळकांनीं शाळेंत मेकॅनिक्स शिकविण्याकरितां मुलांची समजूत घालणारें एक शालोपयोगी पुस्तक छापलें होतें ही गोष्ट केळकरांना माहीत नाहीं.

उत्तर—होय. ही गोष्ट मला माहीत नव्हती. पण फाटकांच्या जबरदस्त संशोधनांत त्यांनाहि माहीत नसलेली एक गोष्ट, किंबहुना त्यांच्याच बाजूची, अशी मलाहि एक माहीत आहे ती मी त्यांस नजर करतों. येथील इनामदार श्रीमंत आबासाहेब मुजुमदार यांचे संग्रहीं टिळकांच्या सहीचें एक छापील कार्ड आहे. त्यांत टिळकांनीं तेव्हां (१८८०) बनलेल्या इनामदार असोसिएशनचे सेक्रेटरी म्हणून सही केली आहे. अर्थात् या असोसिएशनचें थोडेंबहुत काम करावयाचें त्यांच्या मनांत आलें असेल. पण हें शालोपयोगी पुस्तक व हें कार्ड दोनहि जमेस

यरून मी असेंच म्हणतों कीं, मुख्यतः शाळेच्या व वर्तमानपत्रांच्या कामास वाहून घेण्याच्या टिळकांच्या ध्येयाला त्यांनीं बाध येऊं शकत नाहीं. 'जेजुइटिकल' हा शब्द लाक्षणिक अर्थानेंच व्यावयास पाहिजे. सन १८८१ सालीं जुलै महिन्यांत टिळकांनीं वकिलीची सनद काढली असें फाटक लिहितात. पण न्यू इंग्लिश स्कूल सुरू झाल्यावर १८ महिन्यांनीं व केसरी-मराठा सुरू झाल्यावर ६ महिन्यांनीं काढलेली सनद कोर्टांत वकिलीचा धंदा करून पैसे मिळविण्याच्या हेतूनें काढली नसली पाहिजे हें कोणीहि कबूल करील. या अठरा महिन्यांत टिळकांचें शाळेंतील अधिष्ठान डळमळलें होतें असा पुरावा नाहीं. शास्त्रीबुवांचा व त्यांचा बेबनाव झाला होता असाहि पुरावा नाहीं. किंबहुना या अवधींत शास्त्रीबुवांनीं शाळेकडील लक्ष हळुहळू कमी केलें व मुख्य शासनाधिकार इतरांकडे दिला असाच पुरावा आढळतो. छापखाना व वर्तमानपत्रें हीं काढण्यांत टिळकांनीं किती हौस दाखविली होती व टाइपांच्या केसी खांद्यावर रात्रीं वाहून कशा नेल्या होत्या हें प्रसिद्ध आहे. टिळक वर्तमानपत्रांतून लिहूंहि लागले होते. अशा स्थितींत त्यांनीं वकिली करण्याची कल्पना मनांत आणणें हें असंभाव्य दिसतें.

१४ आक्षेप—टिळकांच्या राजीनाम्यासंबंधीं सोसायटीच्या दप्तरांतील ठराव वगैरे पाहण्याची केळकरांनीं तसदी घेतली नाहीं.

उत्तर—तसदी घेतली होती, पण फुकट गेली. डे. ए. सोसायटीच्या एका अधिकाऱ्यास मीं सांगितलें कीं, सोसायटीचें दप्तर पाहण्याची परवानगी द्या, त्यांतील उतारे घेईन ते तुम्हास दाखवून मग बाहेर नेईन, व त्यांचा उपयोग करून जो मजकूर चरित्रांत लिहीन त्याचीं प्रुफेंहि तुम्हांस दाखवीन. इतक्या अटी स्वतः होऊन घालून दप्तर पाहण्याची परवानगी मागितली; पण ती मिळाली नाहीं ! ज्याचे हातीं ससा तो पारधी या न्यायानें फाटक आतां गोखल्यांचें चरित्र लिहितील तेव्हां त्यांना ती सर्व माहिती मिळेलच. मला राजीनाम्याची नक्कल अशीच परस्पर वाचावयास मिळाली तेवढ्याचा होईल तो उपयोग मीं केला आहे. तेवढ्यापुरतें मीं कांहीं अविश्वसनीय लिहिलें असल्यास फाटक यांनीं सांगावें.

१५ आक्षेप—नागपूर येथील सामाजिक परिषद् हीच टिळक हजर असलेली अशी बहुधा दुसरी व शेवटची परिषद् होय, असें मोघम विधान केळकरांनीं केलें आहे, म्हणजे नक्की माहिती काढण्याचे श्रम त्यांनीं घेतले नाहींत.

उत्तर—होय. सामाजिक परिषदेचे सर्व रिपोर्ट मीं चाळून पाहिले नाहींत हें खरें. एरवीं मिळाली त्या माहितीवर मीं हें लिहिलें आहे. पण माझी ही माहिती अपूर्ण असूं शकेल हें दर्शविण्याकरितांच 'बहुधा' हा शब्द मीं मुद्दाम घातला आहे. पण माझ्यावर टीका करतांना फाटक यांनीं स्वतःहि तोच गुन्हा केल्याचें बिंग न कळत बाहेर पडलें आहे. कारण ते लिहितातः "टिळक कमींत कमी तीनदां सामाजिक परिषदेच्या बैठकींना हजर होते." आतां मी वाचकांस

विचारतों कीं, माझा 'बहुधा' हा शब्द फाटक यांनीं 'कमींत कमी' हे शब्द यांत फरक तो काय झाला ? असलें तर दोहोंतहि सारखेंच चांचपडतें विधान आहे. मोघम शब्दानें अज्ञान झांकण्याचा प्रयत्न असेल तर तो दोहोंत सारखाच आहे !

१६ आक्षेप—१८९० सालीं सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरवूं नये अशा अर्थाचा पुण्याच्या शास्त्रीवृंदाचा ठराव टिळकांनीं स्वतः कलकत्त्याच्या परिषदेस पोंचविला. पण इकडे केसरी पत्रांत या ठरावावर त्यांनीं प्रतिकूल टीका केली असें दुटप्पी वर्तन टिळकांनीं केलें !

उत्तर—हा आक्षेप सर्वस्वीं खोटा आहे. कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेहून या सालीं पुण्यास परत आल्यावर मगच टिळक केसरींत संमतिबिलासंबंधानें लिहूं लागले. पण तेव्हांहि त्यांचे प्रत्यक्ष हातीं केसरी नव्हता, व पुढें रमाबाईच्या प्रकरणीं कै० प्रो० केळकर व टिळक यांचा पुरा बेबनाव झाल्यावर मगच निर्विवाद रीतीनें टिळकांनीं केसरी आपल्या हातीं घेतला. शास्त्र्यांच्या ठरावावरील निषेधपर लेख टिळकांचा नाहीं हें मला पक्कें माहीत आहे. अर्थात् टिळकांच्या वरील दुटप्पी वर्तनाचा हा आरोप सर्वस्वीं खोटा आहे.

१७ आक्षेप—१८९१ सालांतल्या पुष्कळशा हकीकती केळकरांनीं दिलेल्या नाहींत.

उत्तर—नक्की कोणत्या द्यावयाच्या राहिल्या व स्वतः फाटक यांनीं त्यांच्या पुस्तकांत त्या कितीशा दिल्या हें कळलें, म्हणजे उत्तर देण्यास बरें पडेल. १८९१ सालीं टिळक व रानडे दोघेहि पुण्यासच होते व एकाच वातावरणांतहि होते.

१८ आक्षेप—पंडिता रमाबाईच्या सदनाला हिंदुसमाज मुकल्यानंतर नवें सदन उघडण्याच्या उद्देशपत्रिकेवर टिळकांची सही आहे हें केळकरांनीं केसरी चाळून पाहिलें नाहीं.

उत्तर—हें मीं पाहिलें नाहीं असें फाटक कशावरून म्हणतात ? वरील उद्देशपत्रिकेवर टिळकांबरोबर इतर कित्येक मोठ्या गृहस्थांच्या सह्या आहेत. मग नवीन सदन उघडण्याची विधायक कामगिरी करण्याची जबाबदारी सर्वांवरच पडते, व ती न पार पडल्यास सर्वच सारखे दोषी ठरतात, एकटे टिळक कसे ?

१९ आक्षेप—क्राफर्ड-प्रकरणीं कबुतरखान्यांतील सभेंत टिळकांनीं अगदीं प्रथम वक्तृत्व केलें हा केळकरांचा गैरसमज आहे व तो होण्याचें कारण त्यांचें पूर्वीच्या हकीकतीचें अज्ञान !

उत्तर—हा अज्ञानाचा आरोप खोटा आहे. यापूर्वीं प्रांतिक परिषदांतून किरकोळ ठरावांवर टिळकांनीं लहानसान भाषणें केलीं हें मला पूर्ण माहीत आहे, व त्यांचें दिग्दर्शन पुढें २६९ पृष्ठावर प्रांतिक परिषदांत टिळकांनीं घेतलेला भाग वर्णन करतांना मीं केलेंच आहे. क्राफर्ड-प्रकरणीं जाहीर सभेसंबंधानें माझे नक्की शब्द असे आहेतः "कित्येक लोकांच्या मतें टिळकांनीं गेल्या ९ वर्षांत जाहीर सभेंत खरोखर

भाषण असें केलें तें याच सभेंत पहिल्यानें. यापूर्वीं एकाद्या कॉंग्रेसमध्यें किंवा कान्फरन्सच्या बैठकींत टिळक दहावीस वाक्यें बोलले असतील; पण जाहीर सभेंत असे ते कधीं फारसे आले नव्हते. टिळकांचें नांव वसंत-व्याख्यानमालेच्या यादींत किंवा उपवक्त्यांत कोठेंहि आढळत नाहीं." इतकें स्पष्ट लिहिल्यावर फाटक यांना भ्रम कां पडावा ? वरील अवतरणांत 'कित्येक लोकांच्या मतें' आणि 'खरोखर भाषण असें' हे शब्द सूचक आहेत ते फाटक विसरतात. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, याच मुद्द्यावर पुढें याच प्यान्यांत फाटक लिहितात कीं, "टिळकांच्या प्रस्तुत भाषणासारखा गोखल्यांच्या त्या वेळेच्या ( कबुतरखान्याच्या सभेंतील ) भाषणा-संबंधीं एक सार्वत्रिक गैरसमज आहे. त्यांनींहि प्रथम याच सभेंत भाषण केलें असें लोक समजतात." पण वरील माहिती देऊन फाटक यांनीं माझेंच उलट समर्थन केलें नाहीं काय ? मीं टिळकांसंबंधानें लोकांची समजूत दिली व त्यांनीं त्याच बाबतींत गोखल्यांसंबंधीं असलेली समजूत दिली. पण अशा लोकांच्या समजुती होत्या हीच गोष्ट त्यांनीं सिद्ध केली; व मीं झालें तरी "कित्येक लोकांच्या मतें" असेंच विधान केलें आहे. बरें, ही 'समजूत' चुकीची म्हणणार फाटक कोण ? प्रांतिक वगैरे परिषदांतील भाषणें लहान, त्या सभाहि लहान, फक्त प्रतिनिधींपुरत्या आणि क्राफर्ड-प्रकरणांतील या सभेचा गाजावाजा झालेला व अशा सभेंत लांब व महत्त्वाचीं भाषणें टिळक-गोखल्यांनीं केलेलीं समाजानें पहिल्यानेंच ऐकलीं असल्या-स वरील प्रकारची समजूत होणें स्वाभाविक आहे. या बाबतींत फाटक मला दोष देतात, एवढेंच नव्हे पण ज्यांच्या समजुतीचा आधार घेऊन मीं लिहिलें त्या लोकां-शीं त्यांच्या समजुतीबद्दलहि भांडण्यास फाटक तयारच ! पुण्याचे त्या वेळचे लोक खरोखरच वेडे. त्यांनीं आपली तशी समजूत करून घेण्यापूर्वीं फाटकांसारख्या जाड्या संशोधकास आधीं विचारावयास हवें होतें. म्हणजे प्रांतिक परिषदेंतील टिळक गोखल्यांच्या भाषणाची माहिती देऊन फाटकांनीं त्यांची वेडी समजूत खोडून काढली असती; पण फाटक त्या वेळीं जन्मलेच नव्हते म्हणून नाइलाज झाला !

२० आक्षेप—सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत रानड्यांनीं पंचवार्षिक करारावर लिहिलेले लेख निनांवी होते असें सांगण्यांत केळकरांनीं चूक केली. कारण रानड्यांची लेखमाला त्रैमासिकांत सुरू झाली तेव्हांच एका टीपेंत लेखकाच्या नांवाचा स्पष्ट निर्देश आहे. इ०

उत्तर—या बाबतींत फाटकांचें विधान सर्वस्वीं चूक आहे. रानड्यांची ही लेखमाला 'डीसेंट्रलायझेशन ऑफ प्रॉव्हिन्शिअल फिनॅन्स' या मथळ्याखालीं सार्व-जनिक सभेच्या त्रैमासिकाच्या १८९३ च्या जुलै महिन्यांत प्रथम छापण्यास सुरुवात झाली. ती तेव्हां निनांवीच सुरू झाली. पुढें १८९४ च्या एप्रिलच्या अंकांत ती संपली. तेथपर्यंत, म्हणजे या लेखाचीं १५० पानें हप्त्यानें छापून होईपर्यंत ती रानड्यांनीं लिहिली असा त्रैमासिकांत कोठेंच उल्लेख नव्हता. १४९ पानांत ती त्या

वेळीं धुरती समाप्त झाल्यावर त्रै. मा.च्या पुढील पानांत या लेखांची प्रस्तावना छापलेली आहे, त्या प्रस्तावनेंत रानडे व मुंबईचे अकौंटंट-जनरल यांचा या लेखांसंबंधीं झालेला पत्रव्यवहार छापण्यांत आला; त्यांत रानडे यांचें नांव प्रथम आलें. अर्थात् लेखकाचें नांव आजपर्यंत जें गुप्त होतें तें असें अचानक रीतीनें वाचकांपुढें आल्यामुळेंच. त्रैमासिकाचे संपादक गोपाळरावजी गोखले यांना हा लेख रानड्यांनींच लिहिला असें टीपेंत अर्थातच प्रसिद्ध करावें लागलें व नंतरच त्या लेखांचें पुस्तक रानड्यांच्या नांवानें निघालें. तात्पर्य, लेखमाला त्रैमासिकांत 'सुरू झाली तेव्हांच एका टीपेंत रानड्यांच्या नांवाचा निर्देश होता' ही फाटकांनीं दिलेली माहिती धडधडीत खोटी आहे. लेखमाला संपल्यानंतर पुस्तकाच्या प्रस्तावनेच्या वेळीं तें नांव प्रथम प्रसिद्ध झालें. अर्थात् जुलै १८९३ पासून एप्रिल १८९४ पर्यंत म्हणजे सर्व लेख छापून होईपर्यंत ते 'निनांवीच' होते. अशा रीतीनें फाटकांनीं दाखविलेली चूक खोटी ठरते. दुसऱ्या आक्षेपाचें उत्तर असें कीं, रानड्यांनीं १८९४ च्या एप्रिलांत लेखमाला संपविली ती अपूर्ण होती, व ती तेव्हां पूर्ण होणें शक्यच नव्हतें. कारण विषय जमाखर्चविभागणीचा म्हणजे 'पंचवार्षिक'करारांच्या पद्धतीचा. १८७१ पासून या पंचवार्षिक करारांना सुरुवात झाली होती. दर पांच वर्षांनीं मुंबईसरकारशीं नवे करार होत असें रानडे यांनीं एप्रिल १८९४ च्या म्हणजे शेवटच्या लेखांत ज्या पंचवार्षिक कराराची तपासणी सुरू केली तो पांचवा पंचवार्षिक करार असून त्यांतील पहिल्या वर्षांचे म्हणजे १८९१चेच तेवढे पक्के हिशेब त्यांना मिळाले होते व १८९२ चे आंकडे त्यांनीं त्या सालच्या केवळ अंदाजपत्रकावरून घेतले होते. रानडे आणखी दोन वर्षें ही लेखमाला चालविते तर अर्थात् त्यांनींच सर्व पंचवार्षिक करारांची तपासणी पुरी केली असती. परंतु कारण कांहीं असो. हे लेख १८९४ च्या एप्रिलच्या अंकांतच त्यांना संपवावे लागले. अर्थात् पंचवार्षिक करारांची तपासणी अपुरीच राहिली. मुंबईचे अकौंटंट-जनरल मि० कॉक्स यांनीं रानड्यांना जें पत्र लिहिलें, व जें प्रस्तावनेंत रानडे यांनीं छापलें आहे त्यांत मि० कॉक्स यांनीं ही गोष्ट नजरेसहि आणली कीं, ज्या सालांचे केवळ अंदाजी आंकडे घेऊन तुम्ही तपासणी करीत आहांत त्या सालांचे पक्क्या हिशेबांचे आंकडे हातीं आल्यावर केलेली पंचवार्षिक करारांची तपासणीच अधिक बरोबर होईल. यावरून हें दिसून येईल कीं, पंचवार्षिक करारांच्या १८९१ ते ९५ या पांच सालांपैकीं जवळ जवळ तीन वर्षांचे आंकडे घेऊन तपासणी करण्याचें काम शिल्लक उरलें होतें; व तेंच काम टिळकांनीं कायदेकौन्सिलांत गेल्यावर पुरें करून तो लेख १८९६ च्या एप्रिलच्या अंकांत प्रसिद्ध केला. पूर्वीच्या रानड्यांच्या लेखांप्रमाणें टिळकांनींहि या लेखावर आपलें नांव न घालतां तो निनांवीच प्रसिद्ध केला होता. या दोन लेखमालांचा सांधे-जोड असें जें मीं म्हटलें त्याची निनांवी लेख ही एक बाब तर झालीच; पण दुसरी बाब विषयसंगतीची. ती अशी कीं, पंचवार्षिक करारांपैकीं पक्के आंकडे

मिळण्याची मजल टिळकांनीं लेख लिहिला तेव्हां दोन वर्षें सहजच पुढें गेली होती. टिळकांच्या लेखांत ही गोष्ट नमूद केलेलीहि आहे! एका अर्थानें टिळकांचाहि परीक्षणलेख अपूर्ण होता! कारण १८९५ सालचे पक्के हिशेब प्रसिद्ध झाल्यानंतर १८९७ सालीं जर कोणीं तो विषय पुढें लिहिला असता तरच तो पूर्ण होऊं शकता, पण टिळकांनीं अशा पद्धतीनें लेख लिहिला होता कीं, रानडे यांचे लेख व हा टिळकांचा लेख एकत्र वाचले असतां पद्धतीच्या दृष्टीनें 'मागील अंकावरून पुढें चालू' असेंच वाचकांस वाटलें असतें. अशा रीतीनें फाटक यांचे दोनहि आक्षेप निर्मूल ठरतात. रानड्यांनीं अपुऱ्या विषयाचें पुस्तक छापून काढलें म्हणून तो विषय संपला असें होत नाहीं. व रानड्यांसारखेच टिळकांनाहि सरकारी फडनिशी खात्याचें ज्ञान होतें येवढेंच मला दाखवावयाचें होतें. यांत फाटक म्हणतात त्याप्रमाणें गौडबंगाल कांहींच नाहीं!

२१ आक्षेप—गणपत्युत्सवामुळें टिळकांवर खटले झाले हें केळकरांचें म्हणणें खरें नाहीं.

उत्तर—कायदेशीर भाषेनेंच बोलावयाचें तर शिवाजी-उत्सवामुळेंहि टिळकांवर खटला झाला म्हणतां येत नाहीं. रँडसाहेबांचा खून झाला नसता तर शिवाजी उत्सव आणखी कित्येक वर्षें असाच खटला झाल्याशिवाय चालू राहिला असता. पण खटले करण्यास सरकार प्रवृत्त होण्यापूर्वीं टिळकांचें जें संचित सांठत आलें होतें त्यांत शिवाजीउत्सवाबरोबर गणपत्युत्सव हाहि होता. मींहि या दोन राष्ट्रीय उत्सवांचें मिळूनच विधान केलें आहे. याला प्रत्यंतर हेंच कीं, चिरोलसाहेबांनीं हिंदी असंतोषाचें जनकत्व टिळकांचे पदरीं बांधणाऱ्या पुस्तकांत गणपत्युत्सवालाहि महत्त्व दिलें आहे. 'टिळकांनीं या उत्सवाच्या योगानें खटले अंगावर ओढवून घेतले' या शब्दांचा अर्थ फाटक यांची बुद्धि सरळ असती तर त्यांना कळला असता. पण 'ओढवून घेतले' या शब्दांना 'हेतुपुरस्सर व मुद्दाम' हे पदरचे शब्द लावून फाटकांनीं नसती असंबद्धता माझ्या गळ्यांत बांधण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या४१९पृष्ठाचा फाटकांनींच उल्लेख केला आहे त्यांत 'हेतुपुरस्सर व मुद्दाम' हे फाटकांचे शब्द मीं कोठें लिहिले आहेत ते त्यांनीं दाखवावे. टिळकांनीं मॅजिस्ट्रेट कोर्टांत जाऊन स्वतःविरुद्ध फिर्याद दाखल केली नाहीं हें अगदीं खरें! पण या उत्सवानें आपण सरकारला अधिक अप्रिय होत आहों हें त्यांना उमजल्याशिवाय कसें राहील? व असा समज पडल्यावरहि उत्सवांची चळवळ पुढें नेटानें चालविणें याचेंच नांव खटले ओढवून घेणें.

२२ आक्षेप—टिळकांनीं १८८० सालीं मुन्सफीच्या जागेचा अर्ज केला व सरकारी नोकरी मिळाली नाहीं म्हणून १८८१ सालीं वकिलीची सनद काढली ही गोष्ट केळकरांनीं सांगितली नाहीं!

उत्तर—टिळकांनीं वकिलीची सनद १८८१ मध्यें काढली. तिचा उपयोग माझ्या माहितीप्रमाणें सर्व जन्मांत त्यांनीं एकच वेळ केला. तो १८९६ सालीं त्यांचे

त्रेही सरदार विंचूरकर यांच्या एका दिवाणी दाव्यांत पुणें फर्स्टक्लास सबजज्ज कोर्टांत हिंदुधर्मशास्त्राची एक भानगडीची तक्रार सांगण्याकरितां केला. हातांत पडलेल्या सनदेविषयीं टिळकांची जर इतकी आस्था, तर मुन्सफीच्या जागेकरितां टिळकांनीं अर्ज केला होता असें फाटक म्हणतात त्या मुन्सफीविषयीं त्यांची किती आस्था असेल हें दिसतच आहे. पण आधीं टिळकांनीं मुन्सफीच्या जागेकरितां अर्ज केला या गोष्टीला प्रत्यक्ष पुरावा काय ? माझ्या समजुतीप्रमाणें त्या वेळीं अशी चाल होती कीं, कोणीहि एल्‌एल्. बी. झाला म्हणजे त्यानें आपलें नांव गव्हर्नरसाहेबांच्या प्रायव्हेट सेक्रेटरींकडे कळवून ठेवावयाचें व मुन्सफीची इच्छा असणारे व नसणारे-हि सर्वच तो एक नुसता परिपाठ समजून तें करीत. बरें, टिळकांची इच्छा मुन्सफी करण्याची असती तर त्यांना ती न मिळण्याला, स्वतः त्यांच्या इच्छेशिवाय, तेव्हां दुसरी आडकाठी कोणती होती कीं जीमुळें टिळकांनीं नोकरी मागावी व त्यांना ती मिळूं नये ? ४५ वर्षांपूर्वीं एल्‌एल्. बी. इतके थोडे होते कीं, त्यांना मुन्सफी मागण्याचा नुसता अवकाश कीं ती मिळत असे. तीन वर्षें वकिली केलीच पाहिजे असा नियम नंतर झाला. कै० काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांनीं एक वेळ मला असें सांगितलें कीं, 'माझ्या जिल्ह्याचा डि. जज्ज मला एल्‌एल्.बी. होतांच मुन्सफी देऊं लागला. मी म्हणालों, मला दोनतीन वर्षें वकिली करूं द्या. तेव्हां साहेब रागावले. म्हणून मीं वकिली सोडून मुन्सफी स्वीकारली." टिळकांची 'इच्छा असतां' त्यांना मुन्सफी मिळाली नाहीं हें अनुमान निघण्यासारखीं कांहीं तरी कारणें फाटक यांनीं दाखवावयास पाहिजे होतीं. कोणत्या एका चळवळींत एल्‌एल्. बी. पडला म्हणून त्याला मुन्सफी मिळाली नाहीं अशी गोष्ट घडण्यासारखी तेव्हां परिस्थितिच नव्हती. तात्पर्य, टिळकांनीं मुन्सफीकरितां अर्ज केला होता असें म्हटलें तरी त्यांची मुन्सफी करण्याची खरी इच्छा होती हें विधान त्यांना उगीच कांहीं तरी कमीपणा आणण्याकरितां फाटक यांनीं केलें आहे हें उघड ठरतें.

२३ आक्षेप—१८८० सालीं केसरी-मराठा काढण्याचें ठरल्यावर छापखाना घेतला गेला असें केळकर म्हणतात तें चूक आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं छापखाना १८७९ सालींच विकत घेतला होता.

उत्तर—फाटक यांचीं विधानें चूक आहेत. १९१६ सालीं 'बालशिक्षण-माले'चा टिळक-अंक निघाला त्यांत मी म्हणतों त्याप्रमाणेंच हकीकत आहे. १८८० सालीं आपटे यांचे घरीं श्राद्धानिमित्त न्यू स्कूलची मंडळी एके दिवशीं जेवावयास गेली, त्या दिवशीं वर्तमानपत्रें काढण्याची कल्पना निश्चित झाली, व त्यानंतर त्याच्या छापखान्याची योजना झाली. फाटक समजतात तसा यापूर्वीं एक छापखाना होता त्याचें नांव 'किरण', आर्यभूषण नव्हे. शिवाय या छापखान्याशीं चिपळूणकरांचा संबंध पूर्वींचा असला किंवा तो संबंध जोडण्याचा त्यांचा इरादा असला, तरी एक गोष्ट निश्चित आहे कीं, न्यू स्कूलचीं म्हणून जीं वर्तमानपत्रें निघावयाचीं होतीं

त्यांच्याकरितां लागणारा छापखाना आधीं तयार नव्हता. माझ्या पुस्तकाच्या ११४ व्या पृष्ठावर मीं काय लिहिलें हें फाटकांनीं वाचलेलें दिसत नाहीं. माझे शब्द असे आहेतः “ ज्यांचीं वर्तमानपत्रें त्यांचाच छापखाना असणें अधिक इष्ट असा विचार करून ही मंडळी प्रथम छापखाना उभारण्याच्या प्रयत्नास लागली. केसरी-मराठा पत्रें निघण्यापूर्वीं, म्हणजे न्यू स्कूल मंडळीच्या समाईक मालकीचीं पत्रें निघण्या-पूर्वीं त्या मंडळींच्या मालकीचा छापखाना नव्हता, व तो तसा हवा म्हणून पत्रां-ची कल्पना ठरल्यावर मग तशा छापखान्याची जुळवाजुळव झाली, हें माझें विधान चूक कसें आहे हें फाटक यांनीं दाखविलें नाहीं. लक्ष्मणराव चिपळूणकरांनीं लिहि-लेल्या विष्णुशास्त्र्यांचे चरित्रांत १८८० सालचे अखेर आर्यभूषण छापखान्याची स्थापना झाली असें स्पष्ट लिहिलें आहे (पृष्ठ २६३). वर्तमानपत्र काढण्याची कल्पना आधींच ठरली होती, पण छापखान्याची योजना झाल्यावर मग अँग्लो-मराठी कीं नुसतें मराठी, पानें किती, आकार काय वगैरे गोष्टी नक्की ठरल्या. फाटक म्हणतात कीं, १८७९ सालींच चिपळूणकरांनीं छापखाना विकत घेतला, पण या छापखान्याच्या आधारावर केसरी मराठ्याची योजना निश्चित झाली नाहीं हें खास. चिपळूणकरांनीं कदाचित् आपल्या मालकीची निबंधमाला छापून निघण्या-पुरती व्यवस्था केली असेल. ती व्यवस्था इंग्रजी-मराठी साप्ताहिकें चालविण्याला अर्थातच पुरी पडणें शक्य नव्हतें. शिवाय चिपळूणकरांची मालकी म्हणजे न्यू. इं. स्कूलच्या मंडळींची समाईक मालकी नव्हे.

२४ आक्षेप—टिळकांनीं न्यू स्कूलच्या पहिल्या वर्षीं पगार घेतला नाहीं असें केळकर म्हणतात तें खोटें, कारण पुढें हिशेब करून त्यांना तो पगार देण्यांत आला होता.

उत्तर—टिळकांनीं पहिल्या वर्षींचा पगार सोडला किंवा त्याची सूट दिली असें मीं म्हटलें असतें तर आक्षेप खरा होता. ‘पहिल्या वर्षींचा पगार घेतला नाहीं असेंहि मीं म्हटलें नाहीं’. फक्त ‘पहिल्या वर्षीं पगार घेतला नाहीं’ इतकेंच मीं म्हटलें आहे व तें अबाधित आहे.

२५ आक्षेप—स्वतः केळकरांनींच टिळकांना कलहप्रिय अर्थात् भांडखोर म्हटलें आहे.

उत्तर—आक्षेप खोटा आहे. पृष्ठ २४९ यांत कलहप्रिय हा शब्द आहे. पण तें सर्व वाक्य खालीं दिल्याप्रमाणें आहे:—“ टिळकांच्या स्वभावाला कलह-प्रिय हें दूषणास्पद नांव योग्य असो वा नसो, त्यांच्या मनाची ठेवण मात्र अशी होती कीं, प्रतिपक्षी जितका अधिक जोरदार व वादाची बाजू जितकी अंगावर अधिक कोसळलेली तितकें त्यांचें तेज, धैर्य व बुद्धिमत्ता हीं अधिक चमकत असत यांत मात्र शंका नाहीं.” हें माझें लिहिणें कोणीकडे व मीं टिळकांना कलहप्रिय म्हटलें हा फाटकांचा आक्षेप कोणीकडे ! या एकाच उदाहरणावरून फाटकांनीं माझे शब्ददेखील धादांत रीतीनें विकृत भासविले हें उघड होतें.

२६ आक्षेप—आगरकरांच्या अंगीं कर्तेपणा नव्हता असें केळकर म्हणतात पण आगरकर संपादक असतां केसरीचा खप वाढला असें केळकर लिहितात हीं विसंगति आहे.

उत्तर—आगरकर हे केसरीचे संपादक होते तरी न्यू स्कूलची पुष्कळ मंडळी त्यांत लेख लिहीत. अर्थात् केसरीचे वाचक वाढल्याचें सर्व श्रेय आगरकरांस देतां येत नाहीं. आगरकर संपादक असतां त्यांनीं छापखान्याकडे एक दिवसहि ढुंकून पाहिलें नाहीं. छापखान्याच्या कामांत अडचण आली किंवा हिशेबाची भानगड निघाली तर तें काम न्यू स्कूलची मंडळी आपल्यातर्फे टिळकांकडे देत हें मीं पुस्तकांत दर्शविलेंच आहे. आगरकरांच्या कर्तेपणांत मीं दोष काढला त्याचा अर्थ असा आहे कीं, छापखान्याची जबाबदारी किंवा कर्जाच्या बोजासह वर्तमानपत्रें अंगावर घेऊन चालविण्याची धमक आगरकरांत नव्हती व त्याला लागणारें व्यवहारज्ञानहि त्यांना नव्हतें. आगरकरांना लिहिण्याची कला उत्कृष्ट येत होती याविषयीं कोणासच शंका नाहीं. पण लेखन व मतप्रतिपादन यांची हौस असतांहि हातीं असलेलें वर्तमानपत्र कर्जाच्या धाकानें ( व तें कर्जहि इतरांबरोबर त्यांच्याच अमदानींत झालेलें ) त्यांनीं सोडलें. आगरकर हे केसरी घेण्यास पुढें झाले असते तर, ते पहिल्या फारकतीचे वेळीं संपादक असल्यामुळें, त्यांनाच तें प्रथम मिळालें असतें; व तें देऊं करण्यांतहि आलें असतां त्यांनीं तें नाकारलें हा कर्तेपणाचा पुरावा खचित नव्हे. सुधारक पत्राचा इतिहासहि याचीच साक्ष देतो. टिळकांनीं आगरकरांच्या मृत्युलेखांत आगरकरांच्या विद्वत्तेचें व मार्मिकतेचें वर्णन करून देशी वर्तमानपत्रांना त्या वेळीं आलेल्या महत्त्वाचें श्रेय आगरकरांना दिलें आहे; पण ही स्तुति प्रस्तुत मुद्दयाला लागू नाहीं.

२७ आक्षेप—केळकरांनीं आगरकरांसंबंधानें " मनुष्य चुकला असला तरी प्रामाणिक होता " या वाक्यानें आगरकरांच्या चरित्रावर शिंतोडा उडविला आहे.

उत्तर—नुसते हेच शब्द घेतले तरी चरित्रावर शिंतोडा त्यांतून कसा निघतो ? एकादा मनुष्य चुकला तरी त्याला प्रामाणिक म्हणणें ही त्याची स्तुतिच नाहीं काय ? ज्ञानप्रकाशांत देवधरांनीं आगरकरांच्या माफीचा इतिहास दिला त्यांत ते आपल्या पहिल्या लेखांत लिहितात, " केळकरांनीं अवघ्या आठ ओळींत आगरकरांच्या अनुकरणीय चरित्राचें संकलित दिग्दर्शन करून त्यांच्या चरित्रास पूर्णपणें साजेसे प्रशंसापर उद्गार काढले." तात्पर्य, 'आगरकरांसंबंधानें अनादर' या माझ्यावरील आरोपास कोठेंच आधार मिळणार नाहीं.

२८ आक्षेप—केळकरांची समतोल बुद्धि व निःपक्षपातीपणा हीं टिळकचरित्र लिहितांना राहिलीं नाहींत.

उत्तर—याला उत्तर म्हणून 'टिळकजीवनरहस्यां'त म्हणजे ज्ञानप्रकाशकारांनीं लिहिलेल्या टीकालेखांत यासंबंधानें जो अभिप्राय लिहिला आहे तो नजर

करतों व तेवढें उत्तर पुरें आहे. "कोणत्या ना कोणत्या तरी कारणानें टिळकांचें प्रतिपक्षीयत्व ज्यांच्याकडे आलें त्यांचेंहि यथाप्रसंग गुणग्रहण करण्यास चरित्रकारांनीं (केळकरांनीं) नाखुषी दाखविली नाहीं हें कोणासहि कबूल करावें लागेल. चरित्रनायकाचें महत्त्व कमी न होतां तोहि असामान्य असला तरी मनुष्यप्राणीच होता ही जाणीव वाचकांच्या मनांत सदैव जागृत राहील अशीच त्यांनीं आपल्या वृत्तकथनाची व विवेचनाची सुबक रीतीनें मांडणी केली आहे. त्याचप्रमाणें टिळकांच्याहून ज्यांचीं भिन्न मतें होतीं त्यांनाहि आपल्या आयुष्यक्रमांत निश्चित असा कार्यभाग करावयाचा होता आणि त्याकरितां त्यांचे हातून झालेले प्रयत्नाहि प्रामाणिकपणाचे होते, हीहि गोष्ट वाचकांच्या नजरेस आणण्याची (केळकरांनीं) सावधगिरी बाळगिली आहे. टिळक व त्यांचे प्रतिपक्षीय यांच्यासंबंधानें चरित्रकारानें दिलेलीं मतें व त्यांनीं अंगिकारलेल्या पद्धतीची चरित्रकारानें केलेली मीमांसा हीं आम्हांला अर्थातच सर्वस्वीं मान्य होणार नाहींत; पण याहि बाबतींत उलटसुलट बाजूंचा चरित्रकारांनीं समन्वय लावण्याचा यथामति प्रयत्न केलेला दिसतो. चरित्र म्हटलें कीं, त्यांत थोडीफार पक्षपातबुद्धि ही असावयाचीच. प्रस्तुत चरित्रांतहि त्या बुद्धीचें जागजागीं आविष्करण झालेलें दिसतें; तरी पण ती अमर्याद न होऊं देण्याबद्दल चरित्रकारांनीं बरीच खबरदारी घेतलेली दिसते."

२९ आक्षेप—रानड्यांवर सरकारची मेहेरनजर होती व टिळकांवर नव्हती; म्हणून रानड्यांच्या वेळीं सार्वजनिक सभेवर गंडांतर आलें नाहीं व टिळकांच्या वेळीं सभेवर तें आलें असें केळकर म्हणतात तें चूक आहे.

उत्तर—रानड्यांवरहि सरकारची इतराजी झाली होती, पण ती १८७७-७८ चे सुमारास. पण त्याला विशेष कारणें होतीं. शिवाय इतराजी हा शब्द सापेक्ष असतो. १८९६ सालीं रानड्यांच्याहूनहि सरकारास अधिक पसंत असे लोक असतील, पण टिळक व रानडे यांच्या तुलनेनें बोलावयाचें म्हटलें तर तेव्हां रानड्यांवर कृपा व टिळकांवर इतराजी होती असेंच म्हटलें पाहिजे. रानड्यांनीं काढलेल्या डेक्कन सभेलाहि सार्वजनिक सभेपेक्षां अधिक लभ्यांश मिळाला नाहीं हें खरें. परंतु सरकार असें खमंग आहे कीं, त्याच्या कृपेंतल्या मनुष्यालाहि राजकीय दृष्ट्या तें फारसा लभ्यांश मिळूं देत नाहीं. तथापि त्याच्या इतराजीचें फळ मात्र तेव्हांच पदरांत पडतें. म्हणून डेक्कन सभा कांहींएक लभ्यांश न मिळतां नुसती वांचली, आणि कांहीं तरी निमित्त काढून टिळकांचा संबंध लक्षांत ठेवून सार्वजनिक सभा सरकारानें बहिष्कारांत बुडविली. १८९७ सालीं रानडे हायकोर्टांत न्यायाधीश होते व टिळक तुरुंगांत कैदी होते, यावरून सरकारची मर्जी कोणावर व गैरमर्जी कोणावर हें सहज सिद्ध होतें.

३० आक्षेप—युनिव्हर्सिटीचे फेलो या नात्यानें केलेली टिळकांची कामगिरी टिळकांवरच उलटणारी आहे!

उत्तर—ती कशी काय उलटणारी आहे याचें दहापांच वाक्यांनीं तरी फाटक यांनीं दिग्दर्शन करावयास पाहिजे होतें. मला तर हें गूढच आहे.

३१ आक्षेप—प्लेगचे दिवसांत टिळकांनीं मुलाबाळांसह पुण्यास राहून लोकांना मदत केली हें विशेष केलें असें केळकर म्हणतात. पण इतर शेंकडों माणसें तशींच राहिलीं होतीं.

उत्तर—प्लेगचे दिवसांत पुणें शहर सोडून बाहेर न पडलेलीं खालच्या प्रतीचीं पुष्कळ माणसें होतीं. परंतु टिळकांच्या प्रतिपक्षी लोकांपैकीं पुष्कळ लोक बाहेर जाऊन राहिले होते व त्यांनीं लोकांस फारशी मदत केली नाहीं येवढेंच मला दर्शवावयाचें होतें. टिळकांनीं हिंदु इस्पितळ काढलें ही त्या वेळीं खरोखरच फार मोठी गोष्ट केली हें त्यांच्या कट्टया वैऱ्यांखेरीज कोणीहि नाकबूल करणार नाहीं. टिळकांच्या प्रतिपक्षीयांचा या कामगिरींत कांहींच भाग नव्हता म्हटलें तरी चालेल.

३२ आक्षेप—१८९८ सालीं तुरुंगांतून सुटका व्हावी म्हणून टिळकांनीं कांहीं 'अपमानास्पद' अटी लिहून दिल्या होत्या त्या केळकरांनीं लपविल्या आहेत.

उत्तर—माझ्या माहितीप्रमाणें टिळकांनीं दोनच अटी कबूल केल्या होत्या. एक अशी कीं, 'फिरून माझ्यावर राजद्रोहाचा गुन्हा शाबीत झाला तर मला आज सोडल्यामुळें उरलेली सहा महिन्यांची शिक्षा भोगून देईन'; व दुसरी ही कीं, 'मला सोडल्यामुळें होणाऱ्या उत्सवसमारंभांत मी प्रत्यक्ष भाग घेणार नाहीं'. या अटींतच जर कांहीं अपमानास्पद असेल तर असेल याहून अधिक अपमानास्पद किंवा वेगळ्या अटी कोणत्या टिळकांनीं लिहून दिल्या होत्या हें फाटक यांस माहीत असल्यास फाटक यांनीं त्या प्रसिद्ध कराव्या. साधल्यास टिळकांकडून सरकारास असें लिहून हवें होतें कीं, 'मी यापुढें राजकारणांत पडणार नाहीं'. परंतु ती अट टिळकांनीं मान्य केली नाहीं, ही गोष्ट पृष्ठ ६२० वर मीं स्पष्ट दिलीच आहे. टिळक सरकारच्या अटी मान्य करीनात, म्हणून सरकारला टिळकांच्या सुटकेसंबंधाचा ठराव बदलून दुसरा काढावा लागला हें मीं पृष्ठ ६२१ वर स्पष्ट दर्शविलें आहे. पृष्ठ ६२२ वर मीं हें सांगितलें आहे कीं, पुढें राजकारणांत न पडण्याची अट स्वतः दाजीसाहेब खरे यांनाच इतकी अप्रशस्त वाटली कीं ती मान्य करावी असा सल्ला खऱ्यांनाहि देववेना मग स्वतः टिळक ती अट कसची मानणार ? व ही अट टिळक मान्य करीनात म्हणूनच, पुढें राजद्रोहाचा गुन्हा घडल्यास उरलेली शिक्षा भोगण्याच्या दुरुस्तींत तिचें पर्यवसान झालें.

३३ आक्षेप—चिरोल खटल्यांत टिळकांनीं वकिलाच्या माहितीकरितां चारदोन पानांचें त्रोटक आत्मचरित्रपर टिपण तयार केलें होतें असें केळकर म्हणतात पण तें टिपण चारदोन पानांचें नव्हतें.

उत्तर—फाटकांच्या धाडसाची कमाल आहे ! माझ्या संग्रहीं असलेल्या

कागदासंबंधानेंहि ते बेधडक विधान करतात व मला खोटा किंवा निष्काळजी ठरवूं पाहातात ! फाटकांच्या संग्रहीं हें टिपण असलें तर त्यांनीं तें पुढें मांडावें.

३४ आक्षेप—केळकरांनीं मुंबईच्या इंग्रजी वर्तमानपत्रांच्या फायली पाहिल्या नाहींत.

उत्तर—फाटकांइतकें मला रिकामपण असतें तर मीं या इंग्रजी पत्रांच्या फायलीपेक्षांहि आणखी पुष्कळ कागद चिवडले असते. व्यक्तिशः टिळकांसंबंधीं मुंबईच्या इंग्रजी दैनिक पत्रांत सामान्यतः असा कोणता मजकूर सांपडणार कीं, ज्याचा परामर्श केसरी वगैरेंतून घेतला गेला नसेल ?

३५ आक्षेप—समकालीनांच्या आठवणीला केळकरांनीं फांटा दिला आहे.

उत्तर—मीं फांटा दिला नाहीं, इतकेंच नव्हे तर त्या साधनाला मी फार महत्त्व देत होतों. टिळकांच्या समकालीन स्नेह्यासोबत्यांपैकीं पुष्कळांना मीं लिहून पाहिलें. त्यांतील एकदोघांकडून कांहीं लेखी टिपणें मिळालीं त्यांचा उपयोग मीं केलेला आहे. टिळकांच्या कॉलेजांतील वर्तनासंबंधाची माहिती अशा टिपणांतून मीं घेतली आहे. बापट-प्रकरणीं देखील बडोद्यास स्नेही मंडळींना लिहून लेखी माहिती आणविली. हल्लीं सदाशिवराव बापट यांनीं टिळकांच्या आठवणींचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे त्यांत त्यांच्या परिश्रमाची सीमा प्रस्तावनेंत पाहावयास सांपडेल. पण १८९९ पर्यंतच्या टिळकांच्या चरित्रावर प्रकाश पाडणाऱ्या आठवणी या पुस्तकांतील शेंकडों आठवणींपैकीं किती थोड्या निघतील तें वाचकांनींच पाहावें.

३६ आक्षेप—केळकरांनीं शारंगपाणी यांच्या आठवणी 'नवयुग' मासिका-वरून घेतल्या असतां त्या मासिकाचें नांव घेण्याचें औदार्य दाखविलें नाहीं.

उत्तर—मीं त्या आठवणी नवयुगावरून जर घेतल्याच नाहींत तर मीं त्याचें नांव कसें घालीन ? रा. ब. शारंगपाणी यांनीं स्वहस्तें कांहीं आठवणी लिहून खुद्द माझ्याकडे पाठविल्या होत्या त्यांतूनच कांहीं आठवणी सारांशरूपानें मीं पृष्ठ ४० वर दिल्या आहेत.

३७ आक्षेप—हिंदु-मुसलमानांच्या प्रकरणांत हिंदु लोकांच्या सभेसंबंधानें लिहितांना टिळकांनीं लिहिलें कीं, पुढारी हे लोकांचे धनी नव्हेत तर चाकर होत. या सिद्धान्ताची उपपत्ति केळकरांनीं सांगितली नाहीं.

उत्तर—टिळकांच्या सिद्धान्ताची मला न उमजलेली उपपत्ति सांगून टिळकां-चें समर्थन करण्याचा फाटक यांचा हा केवढा कळवळा ! 'पुढारी हे लोकांचे धनी नव्हेत तर चाकर होत' या वाक्यावर मीं भर दिला असता तर उलट फाटकच म्हणाले असते, 'हें पाहा टिळकांचें लोकच्छंदानुवर्तित्व'. तात्पर्य, फाटकांचा आक्षेप टिळकांच्या खऱ्या सहानुभूतीनें काढलेला नसून उगाच माझी एकादी किरकोळ उणीव दाखविण्याच्या बुद्धीनें काढलेला आहे.

३८ आक्षेप—'ब्रूट-फोर्स'च्या वादांत 'जनावरें कोण' या केसरींतील लेखाची केळकरांना दादहि नसावी असें दिसतें.

उत्तर—फिरून फाटकांच्या धाडसाची ही कमाल होय! माझ्या पुस्तकाचें ४६६ वें पान त्यांनीं पाहिलें असतें तर त्यांना असें आढळलें असतें कीं, 'केसरी हा जात्याच जनावरांचा राजा असल्यानें' हे जे शब्द मीं तेथें उतरून घेतले आहेत ते ज्या लेखाची मला दादहि नाहीं असें फाटक म्हणतात त्याच लेखाचीं शेवटचीं वाक्येंच होत. व तीं ४६६ पानावर अवतरण देऊन प्रत्यक्ष उद्धृत केलीं आहेत. 'परिश्रमावांचून टाळतां येणाऱ्या चुका' स्वतः फाटक किती करतात, याचें हें आणखी एक उदाहरण आहे.

३९ आक्षेप—१८९७ तले विभूतिपूजेवरील लेख टिळकांच्या लेखणींतून उतरलेले नाहींत असें असतां ते त्यांचे म्हणून निक्षून सांगितलें आहे.

उत्तर—त्या लेखांची माहिती फाटक समजतात त्यापेक्षां मला अधिक आहे. ते लेख प्रत्यक्ष टिळकांच्या लेखणींतूनच उतरले असें मीं म्हटलें नाहीं. ते लेख टिळकांनीं एका मदतनिसाकडून लिहविले. पण त्यांनीं त्याला परोपरीनें सर्व माहिती कशी तयार करून दिली, समजावून कशी सांगितली, लिहिण्याच्या सूचना कशा व किती दिल्या व त्यांत सुधारणा किती केली यांचें ज्ञान फाटकांपेक्षां मला खचित अधिक आहे.

४० आक्षेप—१८८९ सालीं कॉलेजाच्या विद्यार्थ्यांनीं कॉंग्रेसकरितां कांहीं वर्गणी जमविली. त्याचा टिळकांनीं केसरींत निषेध केला व कॉंग्रेसच्या अधिकाऱ्यांनीं ती स्वीकारूं नये असें स्पष्ट सुचविलें हेच टिळक पुढें विद्यार्थ्यांनीं राजकारणांत पडावें व हे आमचे गुरूच नव्हत, असें केसरींत लिहूं लागले. इ०

उत्तर—या आक्षेपांत दोन चुका आहेत. पहिली ही कीं, १८८९ सालीं टिळकांचेच हातीं केसरी होता त्या वेळीं केसरी हा आपला नव्हे अशा समजुतीनेंच ते लातूर येथील जिनिंग फॅक्टरी व लॉ क्लास या दोन उद्योगांत गढले होते, हें मीं पृष्ठ २३६ वर लिहिलें आहे. २३८ पृष्ठावर सन १८९१ पर्यंत केसरी टिळकांच्या मालकीचा झाला नाहीं असेंहि लिहिलें आहे. १८९० च्या कॉंग्रेसनंतर रमाबाई-प्रकरण घसास लागलें तेव्हां म्हणजे १८९१ च्या आरंभापासून टिळकांनीं संपादकीय हक्काच्या बळावर केसरी हातीं घेतला. पण फाटक यांची दुसरी व पहिलीहून फार मोठी चूक ही कीं, विद्यार्थ्यांच्या वर्गणीचा टिळकांनीं निषेध केला असें ते समजतात. या वर्गणीला वास्तविक आपटे यांनीं शिस्तीच्या सबबीवर हरकत घेतली. टिळकांची विद्यार्थ्यांना सहानुभूतीच होती; व विद्यार्थ्यांनीं टिळकांचाच आधार या बाबतींत धरला होता. आपटे हे प्रिन्सिपाल व शिस्तीचे धनी म्हणून टिळक या बाबतींत फारसे पडले नाहींत. यासंबंधानें स. वि. बापट यांनीं प्रसिद्ध केलेला टिळकांच्या आठवणींचा ग्रंथ याचें पान १९५ फाटक यांनीं पाहावें म्हणजे

त्यांना खरा प्रकार समजून येईल, व त्यांचें संशोधन किती सदोष असतें हेंहि कळून येईल. १९५ पानावरील हकीकत श्री० शंकरराव लवाटे यांनीं लिहिली आहे. तात्पर्य, १८८९ सालांतील केसरींतील विद्यार्थ्यांच्या निषेधाचा लेख वासुदेवराव केळकर यांचाच असला पाहिजे, तो टिळकांचा नाहीं.

असो. अशा रीतीनें फाटक यांनीं माझ्या ग्रंथावर जे आक्षेप काढले त्यांतील कांहींचीं मीं उत्तरें देऊन ते खोडून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. याहूनहि आणखी आक्षेप बरेच आहेत; किंबहुना फाटकांच्या टीकालेखांत प्रत्येक ओळींत एकेक आक्षेपच आहे म्हटलें तरी चालेल. पण त्या सर्वांना उत्तरें कोठवर देत बसावें ? ज्या आक्षेपांना मीं उत्तरें दिलीं आहेत तेच किती किरकोळ, क्षुद्र व किचकट सांधीकोपऱ्यांतले आहेत हें वाचकांच्या लक्षांत येईलच; व त्यावरूनच मी ज्यांना उत्तरें देण्याच्या भानगडींत न पडलों ते आक्षेप कसे असतील याची कोणासहि कल्पना करतां येईल. या आक्षेपांच्या प्रकारावरून या ग्रंथाकडे फाटकांनीं कोणत्या दृष्टीनें पाहिलें हें आपोआपच कळून येणार आहे. उत्तर न देतां सोडलेल्या आक्षेपांत पुष्कळ असे आहेत कीं, त्यांत 'केळकरांनीं हें लिहावयास पाहिजे होतें, तें लिहावयास पाहिजे होतें, हें अधिक लिहावयास पाहिजे होतें, तें कमी लिहावयास पाहिजे होतें' असलेच आक्षेप पुष्कळ आहेत. पण असलेच दोष कोणाहि ग्रंथकाराला टाळतां येणें शक्य नाहीं. शिवाय ते खरे दोष नसतात, रुचिभेद होत. स्वतः फाटक यांनीं लिहिलेल्या रानड्यांच्या चरित्रांत त्यांनीं लिहाव्या पण लिहिल्या नाहींत अशा गोष्टींची जंत्रीची जंत्री मला देतां येईल. एकच उदाहरण देतों. कोल्हापूर-प्रकरणीं बर्व्यांचीं बनावट पत्रें टिळक-आगरकरांनीं पूर्वीं रानड्यांना दाखविलीं होतीं व तीं त्यांनीं विश्वसनीय म्हणून अभिप्रायहि दिला होता, असें असतां त्यांनीं टिळकांतर्फे साक्ष देण्याचें नाकारलें ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. पान १३९ वर मीं ही गोष्ट विस्तारपूर्वक लिहिली आहे अर्थात् ही माहिती फाटक यांना नसणें शक्य नाहीं; व ते स्वतःला म्हणतात त्याप्रमाणें खरेच सत्यनिष्ठ असते तर रानड्यांवरील हा आक्षेप त्यांनीं खोटा म्हणून खोडून तरी काढावयास पाहिजे होता, किंवा 'सत्यप्रियते'मुळें तो रानड्यांविरुद्ध मान्य तरी करावयास पाहिजे होता. त्यांनीं तो असिद्ध ठरविला असता तरीहि माझें कांहीं म्हणणें नव्हतें. पण ज्या माझ्या चरित्रग्रंथाचें अक्षरन् अक्षर फाटकांनीं धुंडाळलें त्यांत रानड्यांवरील या आक्षेपानें एक पान भरलें असतां त्या मुद्द्याला बगल देऊन, निघून जातात. तेव्हां त्यांची संशोधनाची व पुऱ्या माहितगिरीची बढाई तरी खोटी, किंवा त्यांची सत्यनिष्ठा तरी खोटी. या दोन्हींपैकीं कोणतें तरी एक त्यांना मान्य केलेंच पाहिजे. वाचकांच्या डोळ्यांत भरणाऱ्या व रानड्यांच्या भक्तांच्या डोळ्यांत खुपणाऱ्या या ठळक आक्षेपांविषयीं एक शब्दहि न लिहिणारे फाटक मला मुंबईतील टाईम्स गॅझेटच्या फायली न चाळल्याबद्दल दोष देणार ! टिळक हे रानड्यांचे मुख्य प्रतिपक्षी. असें असतां

स्वतः टिळकांचा उल्लेख रानड्यांच्या चरित्रांत त्यांनीं कितीसा केला आहे ? रानडे व टिळक यांचा समाईक संबंध असणाऱ्या कित्येक महत्त्वाच्या आठवणी टिळकांच्या मृत्यूनंतर इंदुप्रकाशांत छापलेल्या होत्या व त्या वेळीं फाटक हे स्वतः इंदुप्रकाशाचे संपादक किंवा उपसंपादक होते ! असें असतां त्यांचा उपयोग फाटकांनीं मुळींच केला नाहीं. बापट यांच्या टिळकांच्या आठवणी आहेत. फाटक हे जर माहिती मिळविण्याविषयीं इतकी बढाई मारतात तर या आठवणी जशा बापटांना मिळाल्या तशा त्यांनाहि कां न मिळत्या ? रानड्यांचे चरित्रांत समकालीन पुण्यांतील रँडच्या खुनासंबंधीं व चाफेकर बंधूंसंबंधीं उल्लेख नाहीं. रानड्यांनीं लिहिलेलें त्या धामधुमीच्या काळांतलें एक जजमेंट चोरीला गेलें ही हकीकत त्यांना रमाबाईसाहेबांनीं सांगितली असती. टिळक-आगरकर यांचीं भांडणें मिटविण्याचा रानड्यांनीं प्रयत्न केला, याचा उल्लेख फाटकांच्या चरित्रग्रंथांत नाहीं. फर्ग्यूसन कॉलेजाच्या लोकांना सरकारनें डेक्कन कॉलेज देऊं केलें त्या वेळीं रानड्यांनीं जें धोरण स्वीकारलें त्याचाहि उल्लेख नाहीं. रानड्यांच्या चरित्रांत समकालीन व्यक्तींचा उल्लेख कितीसा आहे तें वाचकांनींच पाहावें. खुद्द गोखल्यांसंबंधानें हकीकत किती त्रोटक आहे हें पाहिलें म्हणजे आश्चर्यच वाटतें. युनिव्हर्सिटींत मराठी भाषेच्या प्रश्नावर टिळकांनीं रानड्यांना विरोध केला (!) असा उडता आक्षेप फाटक व ज्ञानप्रकाशकार यांनीं घेतला आहे, पण त्याचा पुरावा दोघांच्याहि टीकेंत नाहीं. पण आधींच माझें हें उत्तर वाढलें असल्याकारणानें ही जंत्री वाढवीत नाहीं. माझा उद्देश असे अकरणरूपी आक्षेप घेणें हें किती अयुक्त होय हेंच दर्शविण्याचा होता. फाटकांच्या पुस्तकावर टीका करण्याचा नाहीं. पण एक गोष्ट सांगितल्याशिवाय राहवत नाहीं ती ही कीं, फाटक हे ज्या मला टिळकांचे पक्षपाती म्हणतात त्या मीं टिळकांचे कांहीं स्वभावदोष ओझरते तरी दाखविले आहेत. पण फाटक यांचा निष्पक्षपातीपणा व सत्यप्रीति एवढी जबरदस्त, कीं सबंध रानड्यांच्या चरित्रांत त्यांचा एकहि दोष फाटकांना दिसला नाहीं. फाटकांचा माझ्या पुस्तकावर एक मोठा आक्षेप असा कीं, त्यांची माझ्यासंबंधीं अपेक्षा फसली ! पण सर्व टीकाकारांच्या सर्व अपेक्षा एकाच ग्रंथकाराला कशा भागवितां येणार ? एकच ग्रंथ अनेक दृष्टींचें समाधान होण्यासारखा लिहितां येत नाहीं हें मीं आपल्या प्रस्तावनेंत अत्यंत स्पष्ट करून ऐच्छिक रीतीनें आपणाकडे थोडासा कमीपणाहि घेतला आहे. पण तेंच फाटकांना तक्रारीचें कारण होऊन बसलें ! आपल्या पहिल्या टीकालेखांत ते लिहितातः "केळकरांना आपल्या लेखांत न्यूनें राहिल्याची जाणीव होती. वाचकांची टीकाबुद्धि नरम पडून लेखकाविषयीं सहानुभूति उत्पन्न व्हावी हा उद्देश प्रस्तावनेंत त्यांनीं सिद्धीस नेला आहे." मी माझी प्रस्तावना अहंकारबुद्धीनें लिहिली असती तर तो उघडच दोष घडला असता. पण मी आपणाकडे कमीपणा घेऊन व माझ्या ग्रंथांतील उणेपणा मीच कबूल करून प्रांजळपणानें लिहिलें तरी तेंहि फाटकांना

खपत नाहीं ! फाटकांची टीकाबुद्धि नरम पडली हीच त्यांची तक्रार ! अर्थात् त्यांना हें हवें होतें कीं, मीं प्रस्तावनेंत स्वतःच्या ग्रंथाविषयीं अहंकारबुद्धि दाखवावी आणि मग फाटकासारख्यांना खूप सडकून टीका करण्याला वाव ठेवावा. पण माझ्या लीनतेनें मीं त्यांच्या हातचा लोण्याचा गोळा काढून घेतला. त्यांची शिकार दवडली ! तथापि वर जें फाटकांच्या आक्षेपांचें प्रदर्शन मीं उत्तरासकट मांडून दाखविलें आहे त्यावरून हें स्पष्टच होईल कीं, हातचा लोण्याचा गोळा निघून गेला तरी मडक्याचा कडा चाटीत बसण्याला त्यांनीं कांहीं कमी केलें नाहीं. हातची शिकार गेली तरी होता नव्हता तेवढा सर्व दारूगोळा वायबार काढण्यांत खर्च करून आपली मृगयेची हौस त्यांनीं भागविलीच.

असो. टीकांना उत्तर देण्याच्या कारणानें टिळक-चरित्राच्या वाचकांची केसरीद्वारा फिरून एक वेळ गांठ घेण्याची संधि मिळाली याबद्दल टीकाकारांचे आभार मानून हा लेख पुरा करतों.

---

# लोकमान्य-स्मारक-मंदिरसमारंभ

## स्मारक-मंदिराचा पूर्ववृत्तांत

[ता. १ ऑगस्ट सन १९२५ रोजीं सदर स्मारक-मंदिर उघडण्याच्या समारंभाचे प्रारंभीं **न. चिं. केळकर** यांनीं स्मारकट्रस्टचे चिटणीस या नात्यानें जें भाषण वाचून दाखविलें तें खालीं दिलें आहे.]

टिळक-स्मारकसंस्थेच्या ट्रस्टींच्यातर्फे मीं आपणांस या प्रसंगीं या ठिकाणीं येण्याचें निमंत्रण दिलें, तें स्वीकारून आपण आलां याबद्दल मी आपले सत्कारपूर्वक आभार मानतों. आजचा हा प्रसंग एका अर्थानें दुःखकारक व एका अर्थानें आनंददायक, म्हणून मिश्रभावनात्मक आहे. लो० टिळक हे निवर्तल्यामुळें सर्व हिंदुस्थानाची व त्यांतूनहि विशेषतः महाराष्ट्राची जी हानि झाली आहे तिच्या आठवणीमुळें हा प्रसंग दुःखद वाटतो. पण त्याचबरोबर त्या लोकोत्तर पुढाऱ्याची स्मृति आपल्या नजरेसमोर मूर्त स्वरूपानें ठेवण्याचा एक प्रयत्न आज या इमारतीच्या रूपानें सिद्धीस जात आहे, यामुळें त्यांतल्या त्यांत किंचित् समाधान वाटतें. सर्वभक्षक काळ हा आपणाला प्रिय अशा वस्तु बलात्कारानें ओढून नेण्यास सिद्ध झाला असतां, स्मृतिरूपानें तरी त्या वस्तु आपल्या नजरेसमोर कायम ठेवण्याचा

मनुष्यप्रयत्न नेहमीं सुरू असतो. कोणाचेंहि स्मारक करणें म्हणजे वरील हेतूनें काळाविरुद्ध केलेला सक्रिय सत्याग्रहच होय.

लो० टिळक यांच्या मृत्यूपासून आज पांच वर्षांचे अवधींत त्यांचीं जीं स्मारकें अनेक ठिकाणीं झालीं त्यांचा इतिहास सांगण्याचें या ठिकाणीं प्रयोजन नाहीं. तथापि इतकें सांगितलेंच पाहिजे कीं, हिंदुस्थानांत असे प्रांत किंवा मोठीं शहरें थोडींच असतील कीं, ज्यांनीं आपापल्या परीनें शक्य त्या मार्गानें लो० टिळकांचें स्मारक केलें नाहीं खुद्द पुणें शहरानें येथील मंडईपुढें टिळकांचा पुतळा उभारून गतवर्षीं हें स्मारक केलेंच आहे. त्याच बुद्धीनें बृहन्महाराष्ट्रानेंहि प्रथम टिळक विद्यापीठ व महाविद्यालय आणि नंतर प्रस्तुतची स्मारकसंस्था स्थापन केली. सन १९२१ मध्यें डिसेंबरच्या १० व्या तारखेस यवतमाळ येथें 'इंडियन होमरूल लीग' ऊर्फ 'टिळकस्वराज्यसंघ' या संस्थेची सहावी वार्षिक परिषद भरली होती. मुंबईचे सुप्रसिद्ध नागरिक व टिळकांचे परम स्नेही बॅ० बॅप्टिस्टा हे परिषदेचे अध्यक्ष होते. सदर परिषदेंत नं. ३ चा ठराव सर्वसंमत होऊन असें ठरलें कीं, " संघाचे संस्थापक व अध्यक्ष लो० टिळक यांच्या स्मारकाचें काम सध्यांच्या कार्यकारी मंडळानें ताबडतोब हातीं घेऊन तें पूर्ण करावें." हें काम करण्याकरितां बॅप्टिस्टा-प्रभृति सात गृहस्थांची कमिटी नेमण्यांत आली. कमिटीकडून स्मारकाची योजना पूर्ण होतांच ती विचारांत घेऊन, तिला मूर्त स्वरूप येण्याकरितां संघाच्या निधींतून जरूर तो पैसा खर्च करून, पुढील कायम व्यवस्थेकरितां त्याचा ट्रस्ट करावा, असेंहि या ठरावांत सांगितलें होतें.

## स्मारकाची योजना

सदर ठरावान्वयें या कमिटीनें स्मारकाची योजना मुक्रर केली. तिचा विचार ता. २८ जानेवारी १९२३ रोजीं मुंबई येथें सरदारगृहांत कार्यकारी मंडळाची जी सभा भरली तिनें केला, व मूळ योजनेंत आपल्या मनाप्रमाणें कांहीं फेरफार करून ती मंजूर केली. पुढें तारीख ७ जून १९२३ रोजीं स्मारकसंस्थेचा ट्रस्ट मुंबई येथें नोंदण्यांत आला. टिळकस्वराज्यसंघापाशीं जी रक्कम होती तिच्यापैकीं एक लक्ष रुपये वेगळे ठेवून स्मारकसंस्था बनवावी, व ही रक्कम सदर ट्रस्टच्या अधिकाऱ्यांचे स्वाधीन करावी अशी मंजुरी मिळाली होती, त्याप्रमाणें ट्रस्टींनीं ती रक्कम आपले स्वाधीन करून घेतली. या एक लक्ष रुपयांपैकीं तीस हजार रुपयांच्या रकमेंतून पुण्यास स्मारकाची इमारत व तींत ठेवण्याकरितां लो० टिळकांचा अर्धपुतळा करावा असें ट्रस्टडीडमध्यें एक कलम आहे. त्यास अनुसरून हल्लींची ही इमारत बांधण्यांत आलेली आहे. परंतु ट्रस्टींचे या कामांतील तज्ज्ञ सल्लागार श्री० विनायक त्रिंबक आगाशे, पेन्शनर इंजीनियर, यांच्या सल्ल्यानें इमारतीचें काम, पुढें वारंवार होणार नाहीं म्हणून, वेळींच कांहींसें वाढविण्यांत आलें व मूळ योजनेंत विशेष सोईकरितां

बऱ्याच दुरुस्त्याहि करण्यांत आल्या. या कारणानें मूळच्या अंदाजापेक्षां इमारतीस सुमारें दीडपट खर्च लागणार असें दिसतांच तोहि कार्यकारी मंडळानें पुढें मंजूर केला.

## श्रीमंत जगन्नाथमहाराजांची देणगी

हल्लींच्या इमारतीवर यापूर्वींच सुमारें चाळीस हजार रुपये खर्च झाला असून यापुढील अवश्य खर्च आणखी सुमारें पांचसहा हजार होईल असा अंदाज आहे. तथापि एक गोष्ट मुद्दाम सांगितली पाहिजे ती ही कीं, इतर कोठेंहि नवीन जागा घेऊन, असली व येवढी इमारत बांधावयाची असती तर ही रक्कम फारच अपुरी पडली असती. परंतु श्री० जगन्नाथमहाराज यांनीं या विस्तृत प्राकारासह आंतील बहुतेक जागा या स्मारकाकरितां दिली आणि या जागेंतील पहिल्या जुन्या चबुतऱ्यावर ही इमारत बांधतां आली म्हणूनच एवढ्या रकमेंत हें काम झालें. कांहीं तज्ज्ञ लोकांचा असा अभिप्राय पडतो कीं, हल्लींची विस्तृत मोकळी जागा, तिच्या भोंवतालचा मजबूत तट व हा जुना चौथरा या सर्वांची किंमत सुमारें एक लक्ष रुपये होईल. यावरून श्रीमंत जगन्नाथमहाराज यांनीं या स्मारककृत्यास अर्पण केलेल्या मौल्यवान् मिळकतीच्या मानानें स्मारक-कमिटीनें इमारतीवर खर्च केलेली रक्कम फारच अल्प आहे आणि इमारत उठावदार व शोभिवंत अशा परिस्थितींत आज जी दिसते तिचें श्रेय मुख्यतः श्री० जगन्नाथमहाराज यांसच दिलें पाहिजे. इमारतीचा नकाशा मंजूर करण्यापूर्वीं जुना पाया कितपत मजबूत आहे हें पाहण्याकरितां इंजिनियरसाहेब यांनीं खोदून पाहिलें. तेव्हां दहापंधरा फूट खालीं खणलें तरी तो संपत नाहीं असें आढळून आल्यावर मगच जुन्या पायावर इमारत बांधण्याला त्यांनीं संमति दिली. अशा रीतीनें या स्मारक-मंदिरांत जुन्या-नव्याचा उत्कृष्ट मेळ पडलेला असून, कोणत्याहि कामांत नव्याला जुन्याचा आधार कसा असावा याचें हें एक नमुनेदार उदाहरण म्हणून दाखवितां येण्यासारखें झालें आहे.

## उरलेलें कार्य

स्मारक-संस्थेचें एक कार्य म्हणजे ही इमारत आज आपणास दिसते अशा स्थितींत, प्रवेशसमारंभ करण्यापुरती, पुरी झाली आहे; तथापि अद्यापि खुद्द इमारतींत व इमारतीबाहेरच्या जागेंत सुधराई-सफाईचें काम व्हावयाचें उरलें आहे व तें महिना-पंधरा दिवसांत पुरें होईल. तें झाल्यावर इमारत व भोंवतालची मोकळी जागा यांचा निरनिराळ्या सार्वजनिक कार्यांकरितां कसा उपयोग व्हावयाचा याचा विचार ट्रस्टी लवकरच करतील. स्मारक-ट्रस्टमध्यें नमूद केलेलीं आणखीं तीन कामें आहेत तीं अशीं:—१ लो० टिळकांच्या आवडत्या विषयांना अनुलक्षून या इमारतींत ग्रंथसंग्रह करणें. २ वरील प्रकारच्या विषयांसंबंधाचे व लो० टिळक यांचीं मतें प्रतिपादन करणारे ग्रंथ मुद्दाम लिहून प्रसिद्ध करणें व दुसऱ्या कोणीं ते लिहिलेले असल्यास त्यांच्या प्रसिद्धीस व प्रसारास मदत करणें. आणि ३ राष्ट्रोपयोगी कार्य

करण्यास तयार असणाऱ्या कांहीं थोड्या तरुण विद्यार्थ्यांस या कार्यास लागणारें शिक्षण देणें. हीं तीनहि कामें स्मारक-ट्रस्ट लवकरच हातीं घेणार आहे; व त्यांच्या कचेरीला ही इमारत मुख्यतः उपयोगी पडणार आहे. हीं तीनहि कार्यें पुष्कळ दिवस चालणारीं असून त्यांना पुष्कळ पैसा व पुष्कळ लोकांची मदत लागेल हें उघड आहे. पण हीं दोनहि साधनें यथाकाल मिळतील अशा ट्रस्टींना आशा वाटत आहे.

शेवटीं मुख्यतः एक गोष्ट सांगावयाची ती ही कीं, प्रस्तुत स्मारक-संस्थेची इमारत, जरी कोठें तरी एका ठिकाणींच होणें शक्य म्हणून, मध्यवर्ति अशा आणि लो० टिळकांचें वसतिस्थान झालेल्या पुण्यांत बांधली गेली आहे, तरी तिच्या-विषयीं ममत्व बाळगण्याचा हक्क मुंबई शहर, छोटामोठा महाराष्ट्र व कर्नाटक या सर्व प्रांतांना आहे. खुद्द या इमारतीवर खर्च झालेला पैसा व पुढें या इमारतींत स्थापल्या जाणाऱ्या कचेरीवर व तिजकडून होणाऱ्या कार्यावर खर्चिला जाणारा पैसा हा मूळ 'इंडियन होमरूल लीग' किंवा त्यानंतर नामांतर पावलेला 'टिळक स्वराज्य-संघ याच्या तहाहयात व इतर सभासदांच्या वर्गणीच्या रकमेंतूनच संघाकडून दिला गेला आहे. होमरूल लीग किंवा टिळक स्वराज्य-संघ या संस्थेच्या शाखा मुंबई, मध्यप्रांत, वऱ्हाड, दक्षिण-महाराष्ट्र व कर्नाटक या प्रांतांत पसरलेल्या होत्या व या सर्व प्रांतांत मिळून त्याचे सुमारें एक हजार तहाहयात सभासद प्रत्येकीं १०० रुपये देऊन झालेले होते. अर्थात् स्वामित्व किंवा ममत्व यांपैकीं कोणत्याहि दृष्टीनें पाहतां हा स्मारकट्रस्ट व त्याचें जुनें-नवें कार्य या अनेक प्रांतांत पसरलेल्या राष्ट्रीयभावना-प्रेरित सद्‌गृहस्थांचेंच आहे यांत काय संशय ?

स्मारक-संस्थेच्या कार्यासंबंधानें पाहतां यवतमाळ येथील परिषदेचे अध्यक्ष बॅरि० बॅप्टिस्टा यांनीं आपल्या भाषणांत खालील उद्गार काढलेले नमूद आहेत.

## प्रतियोगी सहकारिता

" लोकमान्यांनीं अमृतसर येथें प्रतियोगी सहकारिता महात्माजी व बेझंट या जोडीनें सुचविलेल्या पूर्ण सहकारितेच्या ऐवजीं सुचविली. अमृतसरहून परत आल्यावर कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पार्टीची संघटना करण्याचा त्यांचा विचार होता व त्यांनीं तूर्तातूर्त एक योजना प्रसिद्ध करून निवडणुकी करण्याची तयारी चालविली होती. जिकडे तिकडे यशाची आशा दिसत होती. अशा वेळीं कलकत्त्याची स्पेशल कॉंग्रेस भरली. लोकमान्यांना आपल्यांतून घेऊन जाणें ईश्वरास इष्ट वाटलें. कलकत्त्यास या " सैतानी सरकारा "कडून स्वराज्य हिसकावून घेण्याचा कृतनिश्चय झाला त्या वेळीं एकाहि टिळकभक्तानें कौन्सिलबहिष्काराकरितां आपलें मत दिलें नाहीं. आणि कौन्सिलांत शिरणें हें कॉंग्रेसचें वैर होऊं शकत नाहीं असें जरी महात्माजींनीं सांगितलें तरी एक खेरीज करून बाकी कोणताहि टिळकानुयायी कौन्सिलांत गेला नाहीं. स्वराज्य एका वर्षांत देऊं असें आश्वासन देण्यांत आलें,

परंतु आज तें एका पिढीमागें ढकलण्यांत आलें आहे. नॉन्-को-ऑपरेशनच्या शस्त्रांगारांतलीं मुख्य हत्यारें म्हणजे कायदेभंग व कर न देण्याची चळवळ! परंतु हीं दोनहि आज एकमतानें दूर फेंकून दिलीं गेलीं आहेत. कोणीहि तीं साधनें हातीं धरण्यास तयार नाहीं. अशा परिस्थितींत कौन्सिलांत शिरावें कीं न शिरावें हा प्रश्न राष्ट्रापुढें येऊन पडला आहे. ह्या संघाचें त्याला काय उत्तर आहे ? संघाचे सभासद या नात्यानें आपल्याला स्वराज्यसाधनाकरितां कोणताहि उपाय टाकून देणें इष्ट नाहीं, मग तें को-ऑपरेशन असो, रिस्पान्सिव्ह को-ऑपरेशन असो किंवा नॉन्-को-ऑपरेशन असो."

बॅप्टिस्टा यांनीं आपल्या भाषणांत वरील उद्गार निराशाजनक अशा परिस्थितींत काढले होते. तथापि, होमरूल लीग काय किंवा टिळकस्वराज्यसंघ काय, यांच्या उद्देशाविषयीं व कार्याच्या धोरणाविषयीं त्यांना किंवा संघाच्या इतर सभासदांना विस्मरण पडलें नव्हतें किंवा कायमची निराशाहि वाटत नव्हती. यवतमाळ येथील सभेनंतरच्या दोन वर्षांत या दृष्टीनें दिशा अधिक उजळूं लागल्या आहेत, आणि मुख्यतः तो हेतु व तें कार्य यांच्या संरक्षणार्थ संघानें स्थापन केलेली ही स्मारकट्रस्टची संस्था आपल्या अंगावर पडलेली जबाबदारी पार पाडण्यास लवकरच समर्थ होईल असा भरंवसा वाटतो.

केवळ इमारती बांधून व पुस्तकसंग्रह करून टिळकांसारख्या तेजस्वी पुढाऱ्याचें खरें स्मारक होऊं शकत नाहीं ही गोष्ट अगदीं उघड आहे. तथापि अशा विभूतीचें अल्पस्वल्प सक्रिय अनुकरण होण्यासहि त्यांचा स्मृतिप्रसाद अवश्य असतो, हें हिंदुस्थानांत झालेल्या टिळकांच्या अनेक स्मारकांनीं सिद्ध केलें आहे; आणि प्रस्तुतची इमारत उभारून उपरिनिर्दिष्ट कार्यें तींत घडवून आणण्याचा स्मारकसंस्थेचा उपक्रमहि वरील सिद्धान्तास धरूनच आहे.